# वाङ्मय-माला

पुष्प २ रें

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय किरकोळ
दा. क्र. 9203

(गद्य व पद्य)

वा. म. जोशी
ना. [illegible] पटवर्धन

# वाङ्मय-माला

पुष्प २ रें

## ( गद्य-विभाग )

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्रमांक. ३६३
ता. १९-१-३४
ठाणें.

संपादक

प्रो० वा. म. जोशी, एम्. ए.
ना. म. पटवर्धन, एम्. ए., एल्. टी.

१९३३

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६८८४
ठाणें.

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
क्र. नं. ........ नों. दि. ........
दि. ........

प्रकाशक
**ना. म. पटवर्धन**, एम्. ए.
प्रिन्सिपाल, अध्यापिकाशाळा,
हिंगणे बुद्रुक, पुणें ४.

[ या आवृत्तीचे हक्क पूर्णपणें उभयसंपादकांकडे आहेत. ]

मुद्रक
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु**,
राजगुरु आणि कंपनीज प्रेस,
५१३ शनवार पेठ, पुणें २.

वा० क्रं० 9203

# अनुक्रमणिका

## विभाग १ ला—गद्य



| | मथळा | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | १–२ |
| १ | शिवाजी मेला आणखी तानाजी आहे! | ह. ना. आपटे | १ |
| २ | वाचनाची खरी रीत | विष्णुशास्त्री चिपळूणकर | १५ |
| ३ | कडक थंडीचे अद्भुत चमत्कार | गो. ग. आगरकर | २० |
| ४ | सिमलावर्णन | न. चिं. केळकर | २७ |
| ५ | गोपाळ कृष्ण गोखले | ” ” | ३६ |
| ६ | ही आमची समाजव्यवस्था! | वा. म. जोशी | ४२ |
| ७ | नगरसौंदर्य | श्री. व्यं. केतकर | ४९ |
| ८ | सुहास्य | ना. सी. फडके | ५५ |
| ९ | राष्ट्रधर्म | ना. ह. आपटे | ६२ |
| १० | कोलंबसाच्या सफरी | श्री. म. माटे | ६८ |
| ११ | कवीचें कार्य | प्र. के. अत्रे | ७९ |
| १२ | काव्याचे घटक | ह. ना. आपटे | ८१ |
| १३ | गरजवंताला अक्कल नाहीं | भा. वि. वरेरकर | ८३ |
| १४ | पोराचा नाद झालं! | शं. का. गर्गे | ९५ |
| १५ | म्हातारपणचे फायदे | श्री. कृ. कोल्हटकर | १०१ |
| १६ | अप्पांची बैलांची जोडी | र. ज. सामंत | १०८ |
| १७ | गोपाळराव आगरकर | ल. रा. पांगारकर | ११८ |
| १८ | जुन्याभाषेचे दोन नमुने | | १२५ |
| १९ | भले बहाद्दर! | ना. सी. फडके | १२७ |
| २० | लग्न का नाटक? | रा. ग. गडकरी | १३८ |
| २१ | रामदासाची शिकवण | वि. ल. भावे | १४१ |
| २२ | तुकारामबोवांच्या कवित्वाचे हेतु | बा. अ. भिडे | १४४ |
| २३ | कै० न्या० महादेव गोविंद रानडे | बा. गं. टिळक | १४८ |
| २४ | भाऊबीज | ना. म. पटवर्धन | १६१ |

# प्रस्तावना

'वाङ्मयमाला पुष्प २ रें' हें पुस्तक पाठशाळांतील (हायस्कुलांतील) वर्गांकरितां म्हणून योजिलेलें असून त्याचे विशेष पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—

(१) उतारे घेतांना मुलांच्या आवडीनिवडी, त्यांचे मनोधर्म, त्यांच्या प्रवृत्ति व त्यांची आकलनशक्ति यांकडे लक्ष दिलें आहे. माहिती व बोध यांकडे दुर्लक्ष केलें आहे असें नाहीं, तर रसोत्पत्तीकडे विशेष लक्ष दिलें आहे येवढेंच.

(२) उतारा एका तासाला पुरेल अशा दृष्टीनें काढला असतां तो इतर दृष्टींनीं अपुरा व असमाधानकारक होतो. म्हणून उताऱ्यांच्या लांबीपेक्षां त्यांच्या स्वयंपूर्णतेकडे अधिक लक्ष दिलें आहे.

(३) उतारे एकाच प्रकारचे असल्यास मुलांना कंटाळवाणे होतात हें एक; व वाङ्मयाचे विविध प्रकार, विविध भाषाशैली वगैरेंचें ज्ञान त्यांस होत नाहीं हें दुसरें. म्हणून सदरहु उताऱ्यांमध्यें प्रकार, विषय, भाषाशैली लेखनहेतु इत्यादींसंबंधीं शक्य तेवढें वैचित्र आणण्याचा प्रयत्न केला आहे.

(४) इयत्तांमध्यें सामान्यतः जितकीं पानें करून घेण्यांत येतात त्यापेक्षां कांहीं अधिक पानें दिलेलीं आहेत. हेतु हा कीं, शिक्षकांना स्वतःच्या व मुलांच्या आवडीच्या दृष्टीनें त्यांतल्यात्यांत पुन्हा थोडीशी निवड करतां यावी. उरलेलीं पानें मुलें जिज्ञासेनें व स्वयंस्फूर्तीनें वाचतील अशी आमची कल्पना आहे. पानें जास्त दिलीं असलीं व लेखकांचे कांहीं फोटो घातले असले तरी त्यामानानें किंमत वाढविलेली नाहीं.

(५) जुन्या भाषेचे दोन नमुने म्हणून उतारे दिले आहेत; त्यांचा व्याकरणदृष्टीनें बारकाईनें अभ्यास व्हावा अशी अपेक्षा नाहीं. जुन्या-नव्या भाषेंतील फरक सहजगत्या त्यांचे ध्यानांत यावा व जुन्या भाषेची तोंड-ओळख लहानपणापासूनच होऊन तिच्याबद्दल मोठेपणीं उगीचच्या उगीच बाऊ वाटूं नये येवढ्याकरितांच त्यांचा समावेश केला आहे. शिवाय ते जात्याच सुबोध व मनोरंजकहि आहेत.

( ६ ) पाठांच्या शेवटीं प्रश्न व सूचना दिलेल्या आहेत. त्या शिक्षक व विद्यार्थी यांना सूचक व मार्गदर्शक होतील अशी अपेक्षा आहे. त्या त्या पाठांसंबंधीं आणखी दुसरे प्रश्न शिक्षकांना व विद्यार्थ्यांना सुचण्यासारखे आहेत हें आम्ही जाणून आहों.

आमच्या विनंतीला मान देऊन ग्रंथकारांनीं किंवा त्यांच्या आप्तांनीं उतारे घेण्याची परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत. त्याचप्रमाणें फोटोंचे ब्लॉक्स ज्यांनीं आम्हांस उसने दिले त्यांचेहि आम्ही आभारी आहोंत.

हें पुस्तक तयार होत असतां प्रो० ना. ग. नारळकर, रा० वि. आ. मोडक इत्यादि मित्रांनीं वेळोवेळीं आम्हांला ज्या सूचना केल्या व जी मदत केली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. तसेंच हें पुस्तक छापून देण्याचे कामीं रा० बापूराव राजगुरु यांनीं जी तत्परता दाखविली तिजबद्दल त्यांचेहि आभार मानले पाहिजेत.

हिंगणें,<br>
विजयादशमी<br>
२८।९।३३

वा० म० जोशी<br>
ना० म० पटवर्धन

# वाङ्मय-माला (पुष्प २ रें)

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रम नं. ८८८८
ठाणे.

## विभाग १

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता. क्रियाविनं. ३६३
ता. ११-९-३८
ठाणे.

## "शिवाजी मेला आणखी तानाजी आहे!"

[ 'गड आला पण सिंह गेला' या कादंबरींत हरिभाऊ आपटे यांनीं तानाजी मालुसरे यांची स्वामिनिष्ठा व कर्तव्यतत्परता वर्णिलेली असून महाराजांचीहि आपल्या सहकारी मित्रांबद्दलची भक्ति व आस्था सुंदर तऱ्हेनें चित्रित केली आहे. आपल्या मुलाचें ठरलेलें लग्न बाजूला सारून तानाजी शिवाजीच्या हाकेला ओ देऊन रायगडीं ताबडतोब गेला व महाराजांच्या आज्ञेनुसार कोंडाणा(सिंहगड)कसा हस्तगत करून घेतां येईल या तजविजीला लागला. कोंडाण्याकडे जाऊन त्यानें गोंधळ्याचें सोंग घेतलें व किल्ल्याच्या पायथ्याजवळील गांवांतील माहितगार पुढाऱ्यांच्यापुढें पोवाडा गाऊन व त्यांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना आपलेसे करून घेतले. कोंडाण्या किल्ल्यावर कमलकुमारी नांवाच्या एका रजपूत स्त्रीवर दुर्धर प्रसंग ओढवला होता, व ताबडतोब उपाय केला नसता तर या प्रसंगांतून तिची सुटका होणें अशक्यप्राय होतें; म्हणून तानाजीनें कोंडाण्यावर हल्ला चढविण्याचें काम शिवाजीला आगाऊ न कळवितांच अंगावर घेतलें. कामाची घाई व धांदल असल्यामुळें शिवाजीमहाराजांकडे त्याला लखोटा वगैरे पाठविणें शक्य झालें नाहीं. यामुळें शिवाजीमहाराज चिंतातुर झाले होते.

येवढा पूर्वसंदर्भ पुढील उतारा समजण्यास पुरेसा असला तरी विद्यार्थ्यांनीं सबंध कादंबरीच वाचावी अशी शिफारस आहे. ]

तानाजीराव महाराजांची आज्ञा व जिजाबाईसाहेबांचा आशी-



ह. ना. आपटे

र्वाद घेऊन गेल्या दिवसापासून रोज काय काय हकीकत झाली ती त्यांचेकडे कळविण्यास मुळींच कसुरी करीत नसत. परंतु शेवटल्या चार पांच दिवसांत घडलेल्या गोष्टी इतक्या एका-मागून एक गर्दीनें झाल्या कीं, त्या कळविण्यास तानाजीरावांस मुळींसुद्धां वेळ मिळाला नाहीं. एकतर त्यांचे-बरोबर त्यांनीं कोणी कारकून आणलेला नव्हता; आणि शेवटल्या चारपांच दिवसांत महाराजांकडे पाठविण्या-जोगा कोणी माणूसहि त्यांच्याजवळ नव्हता. गोंधळ्याच्या रूपानें आपण कोळ्यांच्या गोटांत शिरून त्यांचा भेद[1] केला व त्यांची आपल्याला मदत आहे, आतां थोडक्यांत किल्ला सर करतो अशी हकीकत कळविल्यानंतर पुढील हकीकत महाराजांना मुळींच कळली नाहीं. रोज रात्रीं त्यांनीं किल्ल्याकडे पहात असावें. कोळ्यांच्या गोटांत शिरल्यानंतर कांहीं कळविण्याजोगें झालें नसेल म्हणून त्यानें कळविलें नसेल किंवा प्रसंग इतक्या एकामागून एक घडत असतील, कीं ते कळविण्यास त्यास फुरसत होत नसेल, असें म्हणून त्यांनीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. परंतु दोन दिवस या प्रकारानें समाधान झालें. तिसरे दिवशीं त्या समजुतीनें समाधान होईना. शिवाजीमहाराजांची आज्ञा जी काय होईल ती

१ फोडलें, फितवलें.

अगदीं अक्षरशः पाळणारा जर कोणी त्यांचा सेवक असेल, तर तो एक तानाजीच होय. त्यांनीं केलेल्या आज्ञेबाहेर एक रतिभरसुद्धां आजपर्यंत तो गेला नाहीं. अमुक वेळीं अमुक काम झालें पाहिजे, म्हणजे तें तितकें झालेंच पाहिजे, असा त्यांचा बाणा असे. रोजची हकीकत जासुदाच्या तोंडीं किंवा पत्रानें कळविली पाहिजे म्हणजे ती नेमक्या वेळीं यावयाचीच असें असून आज तीन दिवसांत जेव्हां त्याच्याकडून पत्र नाहीं किंवा कांहीं बातमी नाहीं, तेव्हां कांहीं तरी दगा झाला असावा, कोळ्यांनीं त्याला फितल्याचा आव दाखवून आंत घेऊन वर उदयभानूकडे नेलें असावें आणि त्या दुष्टानें त्याचा कडेलोट केला असावा; त्याखेरीज दुसरें कांहीं असतें तरी हरतऱ्हा करून तो माझ्याकडे हकीकत कळविता. तानाजी हरहुन्नरी[1] माणूस असे. त्याला वाटेल तीं सोंगें घेऊन त्या सोंगांची बतावणी करतां येत असे आणि त्याची जिव्हा इतकी मधुर कीं, कोणाचेंहि मन आपलेकडे ओढण्यास त्याला कधीं प्रयासच पडत नसत. लहानपणापासून त्यानें काय काय सोंगें करून कोठें कोठें प्रवेश केला तें सर्व महाराजांस ठाऊक होतें. कधीं गोसाव्याचें, कधीं किनरी वाजविणाऱ्या कानफाट्याचें, कधीं कडकलक्ष्मीचें, कधीं जख्ख म्हातारीचें अशीं सोंगें घेऊन कोठूनकोठून तरी त्यानें बातम्या काढून आणाव्या. तें सर्व महाराजांस आठवलें आणि गोंधळ्याचें सोंग घेऊन पोवाडा म्हणून, कोळ्यांना वीरश्रीला पेटवून, आपण त्यांना आपल्याकडे मिळविले आहेत असें पत्र व त्यांत पोवाडा' लिहिलेला जेव्हां त्यांनीं वाचला तेव्हां तर त्यांना त्याच्या युक्तिवंतपणाची फार कमाल वाटली. चिटणिसांकडून[2] त्यांनीं तें पत्र आपल्या आईला वाचून दाखविलें.

---

१ हर+हुन्नर ( हर–फारसी सर्वनाम = प्रत्येक ) २ चिट( = चिठ्ठी)+नवीस ( = लिहिणारा. )

तेव्हां जिजाबाईसाहेबांनींहि आश्चर्यानें थक्क होऊन तोंडांत बोटच घातलें. त्यांच्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे राहिले व त्या शिवाजीमहाराजांला म्हणतात, "अशीं सोंगं घेऊन दुसऱ्याच्या गोटांत शिरून हा त्यांच्या पोटांत शिरतो, याला आपल्याला कोणी ओळखून पकडील आणखी जिवंत मारील असं भय कसं वाटत नाहीं बाई? काय पण कवन केलं आहे? आतां तो परत आला कीं नाहीं म्हणजे त्याला 'या गोंधळेबोआ', म्हणून मी त्याच्या पाठीस लागून तें त्याचें कवन म्हणून घेईन. शिवबा, तुझ्या ठिकाणीं त्याची अगदीं खरी भक्ति बरं का."

महाराज त्यावर म्हणतात "आईसाहेब, मी काय तें जाणून नाहीं! आज माझ्याभोंवतीं इतका परिवार आहे, पण त्यांत वेळ-प्रसंग पडला तर आपला जीव पुढें करून माझा वांचवील असा कोणी असेल तर तो एकटाच आहे. अगदीं तोरणा घेतल्याच्या आधींपासून मी पहातों आहें. संकटाची वेळ आली कीं मला म्हणायचा, "शिवबा, तूं मागें हो. मीं तें वारतों." (तेव्हां तो मला 'अरे तुरे' म्हणत असे. आतां तसं म्हण म्हटलं तर म्हणत नाहीं!) श्रीधरस्वामीला पुरंदरावरून सोडवायला आपण पुढें होत होता. मीं होऊं दिलें नाहीं. दिल्लीहून निघतांना हीच अवस्था; वाटेंत सुद्धां हीच स्थिति. संकटाची वेळ आली कीं मला मागें सारून स्वस्थ बसायला सांगून आपण आपली मान पुढें द्यायचा. तो आहे तोंपर्यंत मला कशाची काळजी वाटत नाहीं याचं कारण काय? एकदां त्यानं एखादी गोष्ट करतों म्हटलं कीं मग तिकडे पहायलाच नको. इतकंहि असून कधीं मीं आपल्यासाठीं असं केलं, मीं तसं केलं, असा उच्चार? छे नांव सुद्धां नको, त्याची कांहीं गोष्टच निराळी आहे."

इतकें बोलून महाराज थांबले. त्यांना लहानपणच्या कित्येक आठवणी होऊन त्यांचें अंतःकरण सद्गदित झालें. ते किती वेळ तरी स्तब्ध बसले आणि पुन्हा म्हणतात, " आईसाहेब, आज मला चैन पडत नाहीं. तृतीयेपर्यंतच्या हकीकतीचं त्याचं पत्र आलं. आज नवमी. चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, आणखी अष्टमी, पांच दिवसांची हकीकत कांहीं नाहीं. ती हकीकत कळवणार म्हणून मीं आपला हेर पाठविला नाहीं. आणखी आज उठल्या-वेळेपासून माझ्या मनाला हुरहूर लागल्यासारखं वाटतं आहे; काय आहे कांहींच कळत नाहीं. आतां आजचा दिवस वाट पहातों नाहीं तर संध्याकाळीं निघून कोंडाण्याकडे जातों. तो जर संकटांत पडला असला तर त्याला सोडवायला मला स्वतःलाच गेलें पाहिजे. किल्ला सर करण्याच्या घाटांत असला तर माझी त्याला मदत होईल. पण आतां इथें उगीच वाट पहात माशा मारीत बसणं उपयोगी नाहीं. गेलेंच म्हणजे काय असेल तें समजेल. माझ्यानं आतां रहावत नाहीं."

महाराजांचें हें बोलणें आईसाहेबांना उद्देशून होतें खरें, परंतु खरोखरच तें त्यांचें आत्मगत भाषणच होतें म्हटलें तर विशेष शोभणार आहे. आपला परम मित्र आणि अत्यंत एकनिष्ठ सेवक कांहीं तरी संकटांत असला पाहिजे, ही शंका मनांत आल्या-वेळेपासून आपण आतां इथें स्तब्ध बसतां उपयोगी नाहीं, त्याच्या सोडवणुकीला गेलें पाहिजे, असें त्यांच्या मनानें घेतलें. जसा तानाजी हा आपल्या स्वामीचा परमभक्त होता तसेच महाराजहि आपल्या खऱ्या सेवकाचे परमभक्त होते.

तें बोलणें ऐकून जिजाबाईसाहेबांना असें वाटलें कीं, स्वाभाविक-पणें महात्मे महाराजांनीं इतकी उतावळी करून जाण्याचें कारण

नों. नं. ६८८५
ता. किरकोळ ३६३
ता. २९
टा गां.

नाहीं. परंतु अशा कामांत त्या माउलीचेंसुद्धां कांहीं चालत नसे. एक वेळां अमुक हें करणें रास्त आहे आणि केलें पाहिजे असें ठरलें म्हणजे त्याप्रमाणें झालेंच पाहिजे. त्यांत कधीं अंतर नाहीं. महाराजांच्या मनानें घेतलें, कीं आपला तानाजी कांहीं तरी विलक्षण संकटांत पडल्यामुळें त्याच्याकडून आपल्याला बातम्या यावयाच्या त्या आल्या नाहींत, आणि अशा संकटाच्या वेळीं आपण त्यास साहाय्य करण्याला गेलें पाहिजे, मग काय विचारतां! लागलीच आपल्या खास तैनातीच्या सरदारांपैकीं दोघे व बारगिरां-पैकीं पंधरा असामींना त्यांनीं हुकूम सोडला, कीं आज संध्याकाळीं रायगड सोडून कोंडाण्याकडे जायचं आहे. तुम्हीं तयारींत असावें. बरोबर काय तिकडील हालहवाल ही समजण्यासाठीं आपला एक हेर—विशेष हुशार असा हेरहि त्यांनीं पुढें पाठविला. त्यानें तेथें जाऊन बातमी काढून आपल्याला रात्रीं अर्ध्या वाटेंत अमुक ठिकाणीं येऊन सांगावी, तेथें त्याची वाट पहात आपण बसूं, असे सर्व हुकूम दिवसासच देऊन ठेविले, आणि तानाजीवर कोणतें संकट आलें असेल, काय झालें असेल याबद्दल कल्पना करीत स्वारींनीं तो दिवस काढिला. क्षणोक्षणीं, आतां कोणीतरी बातमीदार येईल, मग येईल, असेंहि त्यांस एकसारखें वाटतच होतें; त्याचप्रमाणें कोंडाण्या-वर तानाजीला कैद करून ठेविलें असलें तर, त्याला सोडविण्या-विषयीं आपण काय काय तजविजी कराव्या, याबद्दलहि विचार स्वारींच्या मस्तकांत चाललेच होते.

* * *

होतां होतां सूर्यास्त होऊन अंधार पडूं लागला. महाराजांचें लक्ष त्या रात्रीं एका प्रहरांत कमींतकमी दहाबारा वेळां तरी कोंडाण्याकडे गेलें असेल; परंतु विशेषसा उजेड कांहीं दिसेना.

तेव्हां अर्थातच त्यांनीं आपल्या बेताप्रमाणें करण्याचें ठरवून आपल्या आवडत्या काळ्या घोडीवर खोगीर चढविण्यास सांगितलें. या घोडीवर महाराजांचें फार प्रेम. तिनें त्यांस कित्येक चकमकींत पाठीवर वाहून यश मिळविलें होतें व संकटांतून दूरहि केलें होतें. या घोडीचें नांव 'कृष्णघोडी' असें ठेविलें होतें. त्या घोडीवर खोगीर करण्याचा हुकूम देऊन त्यांनीं आपली सुरवारी तुमान चढविली. अंगांत पातळ कापडाचा सदरा घालून वर लहानसें चिलखत चढविलें. आणि पुनः वर एक किनखापी बिनबाह्यांचें कुडतें घालून वरून जाळीदार कपड्याचा पायघोळ झगा चढविला. नंतर डोक्याला जिरेटोप वसविला होता. हातांत वाघनखें चढविलीं, सोनसोळ्या पट्टा घेतला. पाठीवर ढाल कसली आणि दोन सरदार, पंधरा बारगीर व बाळाजी आवजी चिटणीस अशा मंडळीसकट स्वारी रायगडाहून कोंडाण्याकडे जाण्याला निघाली.

महाराजांची स्वारी कधीं मोठी ऐटीनें होतां होईल तों निघतच नसे. त्यांतून आज तर हलके हलके बेतानेंच तिकडे काय आहे याची चौकशी करण्याला जावयाचें होतें. महाराज निघाले तेव्हां सुमारें १६ घटका रात्रीचा सुमार होता. चांदणें निघण्याच्या बेताला होतें. रायगड किल्ला कोंडाण्यापासून सुमारें बारा किंवा तेरा मैल आहे. तेव्हां जर मंडळी तडक निघाली असती, तर अर्ध्या-पाऊण प्रहराच्या आंत गडाच्या घेऱ्यांत जाऊन पोहोंचती. परंतु तितकी गर्दी करण्याचें त्यांना कांहीं कारण नव्हतें. वाटेनें इतकी मंडळी बरोबर होती, परंतु महाराज कांहीं कोणाशीं बोलले नाहींत. आपले सावकाश चालले होते. बिनीला[१] एक सरदार व पांच बारगीर होते. ते जिकडे जातील तिकडे जावयाचें असा जणूं काय

१ सैन्याची पुढची बाजू-आघाडी.

त्यांच्या मनाचा विचार होता. सुमारें अर्ध्या वाटेवर मंडळी गेली तों एकदम पुढला एक बारगीर मोठ्यानें ओरडून म्हणतो "महाराज, या कोंडाण्यावर इकडल्या उगवत्या बाजूला कांहीं पेटून आग लागल्यासारखं दिसतं आहे." महाराजांनीं पाहिलें तों खरेंच. तो जाळ कशाचा आहे आणि ज्या बाजूला जाळ करूं, होळी करूं, असें त्यांना शेलारमामा वगैरेनीं सांगितलें होतें तिकडेच आहे कीं नाहीं असें एकवार नीट पाहून तिकडेच आहे, अशी खात्री होतांच "शाबास तानाजी! खरा शूराचा बच्चा आहेस" असा एकदम त्यांच्या तोंडून उद्गार निघाला. इतका वेळ त्यांच्या चित्ताला अस्वास्थ्य झालें होतें तें एकदम नाहींसें होऊन, जीव खालीं पडल्या-प्रमाणें झालें आणि आतां पुढें जावें कीं परत रायगडला जावें या विचारांत ते होते. इतक्यांत ज्या गांवाला जाऊन आपण वाट पाहूं म्हणून त्यांनीं दिवसा पुढें पाठविलेल्या आपल्या हेराला सांगितलें होतें, त्या गांवापाशीं स्वाऱ्या आल्या. तेव्हां, साहजिकपणेंच तो येईपर्यंत येथें वाट पहावी आणि तो काय हकीकत सांगेल त्याप्रमाणें पुढें जावयाचें कीं परत रायगडावर जावयाचें तें ठरवावें, असा विचार करून आंबराईकडे आपली घोडी वळविली. नोकरांनीं लगेच जागा झाडून गाशे टाकून मशाली पेटविल्या. महाराजांची चर्या आतांपर्यंत अगदीं कोमेजल्याप्रमाणें दिसत होती ती आतां जरा प्रफुल्लित झाली आणि चिटणिसांस व हिरोजी फर्जंदास ते म्हणतात, "हा गड हातीं आला यांत आपलं फार काम झालं, बादशहाशीं तह केल्याखेरीज इलाज नव्हता म्हणूनच मी हा गड आणखी पुरंदर, हे दोन्ही गड त्याच्या ताब्यांत ठेवण्याचं कबूल केलें. नाहींतर पुणें, सासवड आणि सुपें हे प्रांत मला देतो, पण त्यांतले

१( आरबी ) घाशिया = पातळ गादी.

किल्ले तेवढे आपल्या ताब्यांत ठेवतो याचा अर्थ काय ? जसा कांहीं आम्हाला त्याचा कावा समजत नव्हता ! पण काय करायचं ! जसवंतसिंग व जयसिंग या दोघांचा आग्रह पडला कीं, हा तह तुम्ही बेलाशक[1] कबूल करा. मग पुढें त्याच्याबद्दल काय विचार करायचा तो पाहतां येईल. म्हणून मींहि त्यांचं म्हणणं कबूल केलं. पण बादशहाला आमचा कुठं विश्वास ! इकडे आमच्याशीं तह करून पुन्हा आम्हाला विश्वासघातानें पकडण्यासाठीं माणसंन् हुकूम पाठवतोच आहे. आतां तें तहाचें कांहींच राह्मलं नाहीं. मला मोठी काळजी पडली होती कीं हा गड पुन्हा हातीं घ्यावयाच्या वेळीं काय त्रास होईल आणि काय नाहीं. पण माझा तानाजी मोठा बहाद्दर सिंह खरा. त्या सिंहानें छाती केली म्हणूनच गड हातीं आला. बाळाजीपंत, आजपासून या गडाला आपण सिंहगड हेंच नांव ठेवूं. या नांवाला सगळ्या अर्थांनीं हाच किल्ला योग्य आहे."

शिवाजीमहाराज साधारणतः फार बोलके नसत. जीं कार्यकर्ती माणसें असतात तीं बहुशः अल्पवाक् असावयाचीं. तसाच महाराजांचा स्वभाव होता आणि यामुळें महाराज इतके बोललेले आज ऐकून त्या बरोबरीच्या मंडळींना थोडेंसें आश्चर्य वाटलें; तथापि आजची वेळच विलक्षण होती. इतका वेळ काळजीनें त्यांचें अंतःकरण अगदीं व्याप्त झालें होतें. अर्ध्या वाटेंतच आपल्याला गड घेतल्याचें समजेल असें त्यांना वाटत नव्हतें; उलट गड घेण्यांत कांहीं तरी अडचणी उत्पन्न झाल्या असून तानाजी कांहीं तरी संकटांत सांपडला असावा अशी बातमी येईल, असेंच त्यांना वाटत होतें; तें सर्व जाऊन गड घेतल्याची ठरलेली खूण दिसल्याबरोबर एकदम तीं

१ बिलाशिक–विनाशंक–निःशंक, बेशक.

चिंता पार नाहींशी झाली. मनावरचें दडपण दूर होऊन झालेला आनंद व तानाजीविषयींचा प्रेमादर हीं एकदम शब्दरूपानें बाहेर पडलीं.

अशा स्थितींत सुमारें चार घटका गेल्या. पहांट झाली, कोंबडे आरवूं लागले, व खेड्यांतील बायकांचीं दळणाची वेळ होऊन त्या जात्यावर बसून गाणीं म्हणूं लागल्या; चंद्र निस्तेज झाला, आणि पूर्व दिशेच्या आकाशभागाला तांबूस तांबूस छटा दिसूं लागल्या. महाराज त्या आपल्या हेराची एकसारखी वाट पहात बसले होते; परंतु त्याचा मुळींच ठिकाण नाहीं. तेव्हां महाराजांच्या मनाला पुनः चिंता उत्पन्न झाली, आपण जो जाळ पाहिला तो नुसता भास तर नव्हे ? किंवा जाळ असला, तरी तो कदाचित् आपल्या ठरलेल्या खुणेचा नसेल, दुसराच कसला असेल, असें त्यांच्या मनांत आलें व आपण हळुहळू कल्याणच्या बाजूपर्यंत तरी जावें, तेथेंच गेल्यावर कांहींतरी खरी बातमी आपल्याला समजेल, आतां हेराचीन् बातमीदाराची वाट पहात बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून स्वाऱ्या पुन्हा निघाल्या. थोडासा वळसा घेऊन कल्याण गांवच्या बाजूला स्वाऱ्या गेल्या. त्या गांवाजवळ जातात तों गांव अगदीं घाबरून गेलेला दिसला ! एका माणसाला जवळ बोलावून गांवांत काय गडबड आहे म्हणून विचारतां त्याला नीट कांहींच ठाऊक नव्हतें. त्यानें एवढेंच उत्तर दिलें कीं, " रात्रीं दोन प्रहराला गडावर कांहीं गडबड झाली खरी. कोणी म्हणतात मराठे लोकांनीं गड घेऊन उदेभानला मारलं; कोणी म्हणतात उदेभानूनें तानाजी मालुसऱ्याला मारून सगळ्या मराठ्यांना कापून काढलं; काय आहे काय नाहीं अशा धाकानं सगळा गांव असा

बसला आहे. अजून कांहीं कोणी खालीं येईना; मग काय असेल तें परमेश्वराला ठाऊक !

हें तो इसम बोलल्याबरोबर महाराजांच्या काळजाचें एकदम पाणी झालें. आणि तशांत आपला डावा डोळा लवतो आहे असा त्यांना भास झाला. महाराजांचा शकुनावर विशेष विश्वास असे; त्यामुळें त्यांना तें दुश्चिन्ह वाटून कांहीं तरी दगा आहे असें वाटलें. आतां आपण पुढें काय करावें हा प्रश्न त्यांच्या मनांत उभा राहिला; परंतु त्यांची वृत्तिच अशी होती, कीं कोणताहि प्रश्न मनांत फार वेळ कांहीं टिकावयाचाच नाहीं. तावडतोब त्याचें काय तें उत्तर ठरवून ते त्याप्रमाणें वागायचे. उगीच हें करूं कां तें करूं असा विचार करीत ते बसावयाचे नाहींत. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत—कल्याण दरवाज्याच्या पायथ्यापर्यंत—तर रेटायचेंच असा निश्चय करून ते पुढें चालले. हिरोजी फर्जंदानें व बाळाजी आवजींनीं पुढें होऊन त्यांस विनविलें कीं, " किल्ल्याची खरी स्थिति कळेपर्यंत महाराजांनीं पुढें जाण्यास धजूं नये. अनिष्ट स्थिति असली तर आयतेंच मोंगलांच्या हातांत गेल्याप्रमाणें होईल. त्यांना आपण स्वतः सांपडल्यावर आणखी काय पाहिजे ! तर महाराजांनीं परतून कांहीं लांब जावें, आम्ही दोघे शोध करून येऊन महाराजांकडे वर्दी देतों." परंतु महाराजांनीं यावर एकच उत्तर दिलें, " दिल्लीस मोंगलांच्या तडाख्यांतून मला जिनं सोडविलं तीच भवानीमाता आतांहि मला कां नाहीं सोडविणार? तानाजीसारख्याला संकटांत टाकून परतणं म्हणजे काय ? " असें म्हणून त्यांनीं आपल्या त्या कृष्णघोडीला जरा जोरानें चाबूक केला व ते किल्ल्याच्या पायथ्याशीं गेले. जातात तों [illegible] पहारा ! त्या गेटावरल्या लोकांनीं

नोंद नं. ६९६६
नं. [illegible] ता. २१ ...
ठा.गं.

उठून खडी[1] ताजीम देऊन जोहार केला. किल्ला केव्हां पडला म्हणून विचारतां, पडला दोन प्रहर रात्रीला असें उत्तर आलें. किल्ला मिळाला, जय झाला; परंतु माणसांच्या तोंडावर जयाची कळा म्हणून दिसेना. तेव्हां महाराजांस कांहीं उलगडा होईना. इकडे डावा डोळा तर फारच जलद जलद लवूं लागला; तेव्हां कांहीं तरी मोठें अनिष्ट आहे अशी खात्री वाटून महाराज अधिकउणी चौकशी न करतां थेट गड चढूं लागले. ठिकठिकाणीं पांचपांच चारचार मावळ्यांचीं गेटें बसलीं होतीं त्यांनीं महाराजांना ओळखून रामराम करावा, मुजरा करावा, परंतु माना खालीं घालाव्या, असा प्रकार चालला होता. महाराजांच्या केवळ गळ्यांतील ताईत असा तानाजीराव पडला ही बातमी कोणीं आपल्या तोंडानें बोलावी! कोणाच्या जिभेला एवढें धैर्य! महाराज पायऱ्या चढूं लागतात, तों जिकडे तिकडे रक्ताचा शिंपडा व प्रेतांचा खच! दरवाजांतून आंत जातात तों सगळी जमीन तांबडी लाल! ठिकठिकाणच्या टांक्यांतलें पाणीसुद्धां लाल झालेलें! असा एकंदर भयंकर देखावा दिसला. सगळे रजपूत शिपाई अगदीं निःशस्त्र होऊन एका बुरुजाच्या बाजूला जमा होऊन बसलेले! महाराज पुढें जातांच जणूं अंतः-प्रेरणेनें त्या रजपुतांनीं त्या महाविभूतीस ओळखून मुजरे केले. महाराजांनीं ते घेऊन ते पुढें गेले. प्रेतें पडलीं होतीं त्यांत बहुतेक रजपूतच दिसले. परंतु तानाजी, सूर्याजी किंवा शेलारमामा यांपैकीं कोणीच दिसेना. जरा आणखी पुढें गेले, तों राजमहालाच्या बाहेरचे बाजूला एका प्रेतावर बारीक पांढरा शेला घालून सूर्याजी व शेलारमामा बसलेले! महाराज मनांत चरकून अंमळ पुढें होतात तों शेलारमामाची दृष्टि त्यांच्यावर गेली, आणि एकदम "महाराज,

१ उभें राहून सलामी देणें. (खडी = उभी.)

माझा तानाजी गेला हो आपला तानाजी गेला ! " असें ओरडत त्यांच्यापुढें गेला. ते म्हाताऱ्याचे हृदयभेदक शब्द कानीं पडतांच महाराजांचें सर्वांग थरारलें आणि त्यांनीं एकदम त्या म्हाताऱ्याला आपल्या बाहूंनीं कवटाळलें. किती वेळ तरी ते त्या स्थितींत राहिले. नंतर त्यांनीं शेलारमामास सोडलें आणि आपल्या डोक्याचा टोप व तुरा खोंवलेला पटका उतरून टाकून अंगावरला पांढरा शेला डोक्याला गुंडाळला, पायांतले जोडे काढून ते तानाजीच्या प्रेता-जवळ गेले, व त्याच्या अंगावरला शेला आपल्या हातांनीं दूर करून किती वेळ तरी त्याच्या त्या आकाशाकडे लागलेल्या दृष्टीकडे ते एकसारखे पहात राहिले. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा वहात राहिल्या. ते तानाजीकडे इतक्या तटस्थपणें पहात होते कीं, जणूं काय तो निद्रित आहे कीं मृत आहे याबद्दल त्यांना शंकाच वाटत असून तिचें 'चक्षुर्वै सत्यं' असें निराकरण करून ते घेत आहेत ! नंतर कांहीं वेळानें सूर्याजीकडे वळून डोक्यास गुंडाळलेल्या शेल्या-च्या खांद्यावरून लोंबणाऱ्या पदरानें डोळे पुशीत अत्यंत सद्गदित कंठानें म्हणतात, " सूर्याजी, गड आला पण सिंह गेला अं ! असो, त्या अंबाबाईची मर्जी ! मामा, आतां आपल्याला मी समाधानाच्या गोष्टी काय सांगूं ? शिवाजी मेला आणखी तानाजी आहे असं तुम्ही आणखी सूर्याजी समजा. जानकी-आकालाहि तसाच माझा निरोप सांगा. तिला म्हणावें जसा माझा शंभु आणि राजाराम तसाच तिसरा रायबा."

ह० ना० आपटे

( गड आला पण सिंह गेला )

उठून खडी[1] ताजीम देऊन जोहार केला. किल्ला केव्हां पडला म्हणून विचारतां, पडला दोन प्रहर रात्रीला असें उत्तर आलें. किल्ला मिळाला, जय झाला; परंतु माणसांच्या तोंडावर जयाची कळा म्हणून दिसेना. तेव्हां महाराजांस कांहीं उलगडा होईना. इकडे डावा डोळा तर फारच जलद जलद लवूं लागला; तेव्हां कांहीं तरी मोठें अनिष्ट आहे अशी खात्री वाटून महाराज अधिकउणी चौकशी न करतां थेट गड चढूं लागले. ठिकठिकाणीं पांचपांच चारचार मावळ्यांचीं गेटें बसलीं होतीं त्यांनीं महाराजांना ओळखून रामराम करावा, मुजरा करावा, परंतु माना खालीं घालाव्या, असा प्रकार चालला होता. महाराजांच्या केवळ गळ्यांतील ताईत असा तानाजीराव पडला ही बातमी कोणीं आपल्या तोंडानें बोलावी! कोणाच्या जिभेला एवढें धैर्य! महाराज पायऱ्या चढूं लागतात, तों जिकडे तिकडे रक्ताचा शिंपडा व प्रेतांचा खच! दरवाजांतून आंत जातात तों सगळी जमीन तांबडी लाल! ठिकठिकाणच्या टांक्यांतलें पाणीसुद्धां लाल झालेलें! असा एकंदर भयंकर देखावा दिसला. सगळे रजपूत शिपाई अगदीं निःशस्त्र होऊन एका बुरुजाच्या बाजूला जमा होऊन बसलेले! महाराज पुढें जातांच जणूं अंतः-प्रेरणेनें त्या रजपुतांनीं त्या महाविभूतीस ओळखून मुजरे केले. महाराजांनीं ते घेऊन ते पुढें गेले. प्रेतें पडलीं होतीं त्यांत बहुतेक रजपूतच दिसले. परंतु तानाजी, सूर्याजी किंवा शेलारमामा यांपैकीं कोणीच दिसेना. जरा आणखी पुढें गेले, तों राजमहालाच्या बाहेरचे बाजूला एका प्रेतावर बारीक पांढरा शेला घालून सूर्याजी व शेलारमामा बसलेले! महाराज मनांत चरकून अंमळ पुढें होतात तों शेलारमामाची दृष्टि त्यांच्यावर गेली, आणि एकदम " महाराज,

१ उभें राहून सलामी देणें. (खडी = उभी.)

माझा तानाजी गेला हो आपला तानाजी गेला ! " असें ओरडत त्यांच्यापुढें गेला. ते म्हाताऱ्याचे हृदयभेदक शब्द कानीं पडतांच महाराजांचें सर्वांग थरारलें आणि त्यांनीं एकदम त्या म्हाताऱ्याला आपल्या बाहूंनीं कवटाळलें. किती वेळ तरी ते त्या स्थितींत राहिले. नंतर त्यांनीं शेलारमामास सोडलें आणि आपल्या डोक्याचा टोप व तुरा खोंवलेला पटका उतरून टाकून अंगावरला पांढरा शेला डोक्याला गुंडाळला, पायांतले जोडे काढून ते तानाजीच्या प्रेताजवळ गेले, व त्याच्या अंगावरला शेला आपल्या हातांनीं दूर करून किती वेळ तरी त्याच्या त्या आकाशाकडे लागलेल्या दृष्टीकडे ते एकसारखे पहात राहिले. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा वहात राहिल्या. ते तानाजीकडे इतक्या तटस्थपणें पहात होते कीं, जणूं काय तो निद्रित आहे कीं मृत आहे याबद्दल त्यांना शंकाच वाटत असून तिचें 'चक्षुर्वै सत्यं' असें निराकारण करून ते घेत आहेत ! नंतर कांहीं वेळानें सूर्याजीकडे वळून डोक्यास गुंडाळलेल्या शेल्याच्या खांद्यावरून लोंबणाऱ्या पदरानें डोळे पुशीत अत्यंत सद्गदित कंठानें म्हणतात, " सूर्याजी, गड आला पण सिंह गेला अं ! असो, त्या अंबाबाईची मर्जी ! मामा, आतां आपल्याला मी समाधानाच्या गोष्टी काय सांगूं ? शिवाजी मेला आणखी तानाजी आहे असं तुम्ही आणखी सूर्याजी समजा. जानकीआकालाहि तसाच माझा निरोप सांगा. तिला म्हणावें जसा माझा शंभु आणि राजाराम तसाच तिसरा रायबा."

ह० ना० आपटे
( गड आला पण सिंह गेला )

## प्रश्न व सूचना

( १ ) [ अ ] पुढील शब्दसमूहांचा अर्थ उदाहरणें देऊन स्पष्ट करा:- पोटांत शिरणें, वीरश्रीला पेटविणें, माशा मारीत बसणें, काळजाचें पाणी होणें.

[ आ ] समास सोडवा:—कडेलोट, कानफाट्या, हरहुन्नर, ( तानाजी विषयींचा ) प्रेमादर, अल्पवाक्.

( २ ) [ अ ] चिटणीस, यासारखे शेवटीं 'नीस' ( नवीस ) असलेले तीन शब्द सांगा.

[ आ ] हरहुन्नरसारखे 'हर' आधीं असलेले तीन शब्द सांगा.

( ३ ) " शिवाजीमहाराजांची आज्ञा जी काय होईल ... ... ... तानाजी होय " या पान २-३ वरील वाक्याचें पृथक्करण करा.

( ४ ) " तानाजी जसा परम भक्त होता तसेच महाराजहि आपल्या खऱ्या सेवकाचे परमभक्त होते—" या वाक्याचें आधारें स्वामी आणि सेवक यांचे परस्परसंबंध कसे असावेत यावर जुनीं-नवीं उदाहरणें घेऊन एक लहानसा निबंध लिहा.

( ५ ) पहिल्या परिच्छेदाच्या अखेरीस योजिलेला विनोद व प्रकरणाच्या अखेरीस वर्णिलेला दुर्धर प्रसंग यांत लेखकानें कौशल्यानें दाखविलेला विरोध लक्षांत घेण्यासारखा आहे.

( ६ ) शाळेच्या संमेलनाकरितां पुढील प्रकारचे ( किंवा तुम्हांला सुचतील त्याप्रमाणें ) नाट्यप्रवेश लिहा.

( १ ) स्थळ:—रायगड; पात्रें:—शिवाजी व जिजाई.

( २ ) स्थळ:—किल्ल्याचा पायथा; पात्रें:—शिवाजी, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद इत्यादि.

( ३ ) स्थळ:—सिंहगड; ( तानाजीच्या शवाभोंवतीं )—पात्रें:—शिवाजी, शेलारमामा वगैरे.

---

# वाचनाची खरी रीत

[ विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५० ते १८८२) हे मोठे विद्वान व विचारशील असून त्यांना वाचनाचा फार नाद असे. इतका कीं, त्यांनीं डेक्कन कॉलेजमध्यें विद्यार्थी म्हणून असतांनाच तेथील वाचनालयांतील वरींचशीं पुस्तकें वाचून टाकिलीं होतीं. वाचन कसें करावें याबद्दल स्वतःचे अनुभवानें त्यांनीं केलेलें विवेचन त्यांच्या 'निबंधमालेंत' आलें असून त्याचा शेवटचा भाग पुढील उताऱ्यांत घेतलेला आहे. ]

ज्यांस ग्रंथ वाचण्याचा नाद असतो, किंवा डौलाकरितां जे तसा आव घालितात, ते बहुधा आपली विद्वत्ता वाचलेल्या पानांच्या संख्येवर लेखतात, म्हणजे जितकीं पानें आपण वाचिलीं तितक्या मानानें आपले ठायीं अधिक ज्ञान आलें असें ते समजतात. पण हा केवढा भ्रम आहे हें हवें त्यास अंमळ विचार केला असतां कळण्यासारखें आहे. जितकें जितकें ज्यानें वाचलें तितका तितका तो विशेष ज्ञानसंपन्न व शहाणा असें जर असतें, तर सध्यांचा काळ जगाच्या मागील सर्व काळापेक्षां ज्ञानांत व शहाणपणांत श्रेष्ठ असता; कारण हल्लीं जितके ग्रंथ झाले आहेत व होताहेत, व लोकांत वाचनाचा सध्यां जेवढा प्रचार आहे त्याचा लक्षांशहि प्राचीन काळीं नव्हता. पण चमत्कार पहा काय आहे, कीं अत्यंत प्राचीन काळचेच महान् महान् ग्रंथकार कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदांवर जे एकदां अढळ



विष्णुशास्त्री चिपळूणकर

बसले आहेत ते आहेत ! हल्लींच्या काळीं ज्ञानाचा केवढाहि फैलाव झाला तरी त्यांची सर कोणासहि येत नाहीं ! तेव्हां यावरून स्पष्टच दिसतें कीं, वाचलेल्या ग्रंथांच्या संख्येचा आणि विद्वत्तेचा मेळ घालणें हें नेहमीं बरोबरच असतें असा नेम नाहीं. ज्यानें दहाच ग्रंथ वाचले पण मननपूर्वक, शोधक बुद्धीनें वाचले त्याचें ज्ञान, आणि ज्यानें शेंकडों भराभर वाचून फेंकून दिले त्याचें ज्ञान, या दोहोंत कांहींच साम्य धरतां येणार नाहीं. पारसीकांचें[1] मोठ्या डामडौलाचें अफाट सैन्य आणि शिकंदराचें थोडकेंच पण कसलेलें सैन्य या दोहोंचा सामना झाला असतां जो परिणाम झाला तोच वरील दोन पंडितांचें वाग्युद्ध झालें असतां व्हावयाचा. पण इतकेंच नव्हे. असें 'भराभर केलेलें पाठांतर' सर्वथा 'व्यर्थ' होय इतकेंच नव्हे, तर तें अत्यंत अनर्थकारकहि होय. वरच्या सैन्याचाच दृष्टान्त घेऊन पहा. त्यांत कोणाचाच जोडा कोणाच्याच पायांत नसल्यामुळें व जो तो आपल्याच थाटांत असल्यामुळें ऐन गर्दीच्या वेळेस सगळा घोंटाळा होऊन सैन्याची संख्याच त्याच्या नाशास जशी कारण होते, त्याप्रमाणेंच वरील ग्रंथसंख्या वाचणारास उपयोगी पडत तर नाहींच, पण उलटी गर्वोत्पत्तीस मात्र कारण होऊन त्यास प्रसंगीं गोत्यांत आणण्यास मात्र खाशी उपयोगी पडते ! अथवा सर्वांच्या अतिशय परिचयांतला जो व्यापार भोजन त्याचा दाखला घ्या. अन्न जसें शरीरास तसें वाचन, श्रवण वगैरे जीं ज्ञानाचीं साधनें तीं मनास होत. एकानें जसें शरीराचें पोषण होतें तसेंच दुसऱ्यानें मनाचें होतें. या दोन्ही व्यापारांत पुष्कळ प्रकारचें मोठें चमत्कारिक साम्य आहे. तें असें—जेवण जसें सावकाश नेमस्तपणाचें व नियमानें असेंच केलें असतां अंगीं लागून शरीरास हितावह होतें,

१ पारशी लोकांचें.

त्याप्रमाणेंच वाचायाचे ग्रंथ जर पूर्ण लक्ष देऊन मननपूर्वक असे वेतानेतानें वाचले तरच त्यापासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ति वृद्धिंगत होत जातील. नाहीं तर जसा आधाशी मनुष्य अन्नाशीं गांठ पडली असतां आकंठ तृप्ति करून घेऊन पुढें मग आमांशाच्या योगानें होणारी पीडा भोगीत बसतो त्याप्रमाणेंच वाचणाराचीहि स्थिति होते. म्हणजे सगळेंच अर्धंमुर्धं माहीत, पक्कें निश्चित असें कांहींच नाहीं, असें असल्यामुळें भलभलत्या कल्पना व विलक्षण वेडगळ मतें त्याच्या मनांत शिरून तीं अभिमानास्तव त्यास कधींहि टाकावींशीं वाटत नाहींत. तेव्हां अन्नाचा परिपाक होऊन तें रक्तरूपानें शरीरास मिळालें म्हणजे जसें त्याचें सार्थक झालें त्याप्रमाणेंच आपण जें वाचलें त्याचें पुरतेपणीं विवेचन करून त्यांतलें ग्राह्य कोणतें व त्याज्य कोणतें वगैरेची नीट व्यवस्था झाली म्हणजे तो मजकूर ज्ञानरूपानें आपल्या मनाशीं मिळून तो आपला झाला असें समजावें. या ठिकाणीं मांसाहाराचा दृष्टान्त फार समर्पक होय. पशुपक्ष्यादिकांचें मांस खाल्लें म्हणजे तें जसें तत्क्षणींच शरीराच्या मांसाशीं मिळत नाहीं, तर जठराग्नीनें त्याचें पुनः पृथक्करण होऊन व तेथील सर्व व्यापार त्यावर क्रमाक्रमानें होऊन शेवटीं जेव्हां त्याचें रक्त बनतें व रक्ताचें मांस होतें, तेव्हांच तें जसें खाणाराच्या मांसाशीं मिळतें, तशीच गोष्ट ग्रंथवाचनाची होय. शेंकडों जाडे मोठमोठाले ग्रंथ जरी घोकून टाकले, तरी जोंपर्यंत त्यांचें विवेचन करण्यास वाचणारानें आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला नाहीं, तोंपर्यंत तितकी विद्या त्या जाडी पुस्तकांतल्या पुस्तकांतच राहिली. त्याचा लवलेशहि याच्या मनांत शिरला नाहीं. इसापनीतींतील उंटाप्रमाणें त्याच्या पाठीवर मात्र अन्नसामग्री पुष्कळ

झाली, पण पोटांत कांहीं नाहीं ! त्या खाशा ओझ्यानें यास वाहण्याचे मात्र श्रम होतील, व मूर्खत्वास्तव त्याच्या भाराचा यास मोठा गर्वहि वाटेल; पण उपयोग म्हटला तर जो कोणी शहाणा त्यांतील अन्न काढून करून घेईल त्यासच !

असो; वरील अर्ध्याकच्च्या विद्वत्तेचे अनर्थ फार प्राचीनकाळापासून सर्व देशांतल्या पंडितांनीं पाहून ठेवले आहेत. ते सर्व भाषांतील म्हणींत व सुभाषितांत बहुधा सांपडतील. त्यांपैकीं आम्हांस अवगत असलेल्या तीन भाषांतले तीन चुटके येथें लिहून हा लेख पुरा करतों.

आपल्या मराठींतील म्हण आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच—

'उथळ पाण्याला खळखळ फार'.

पोप कवीनें आपल्या एका लहानशा काव्यांत ( Essay on Criticism ) म्हटलें आहे:—

A little learning is a dangerous thing;
Drink deep, or taste not the Pierian* spring,
There shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again.

" चुटपुटती विद्या ही फार भयंकर आहे. विद्यारूप झऱ्याशीं तोंड लावून एक यथेच्छ प्राशन तरी कर, नाहीं तर एक बिंदूहि घेऊं नको. कारण त्याचा असा विचित्र गुण आहे कीं, थोडेच घोट घेतले असतां त्यांनीं माथें फिरून जातें; पण तेच पुष्कळ जसजसे घ्यावे तसतसा मद उतरत जातो !"

---

* Relating to the Pierides or Muses ( from mount Pierus, in Thessaly sacred to the Muses. )

ग्रंथ
१९
ता.
ठाणें.

## वाचनाची खरी रीत

भर्तृहरि 'नीतिशतका'च्या आरंभीं म्हणतो—

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि च तं नरं न रञ्जयति ॥

" जो केवळ अज्ञान आहे त्याची लवकर समजूत करून देतां येते; किंवा जो ज्ञाता आहे त्याची तर त्याहिपेक्षां लवकर करतां येते. पण ज्ञानाचा अर्धामुर्धाच संस्कार ज्यास घडला आहे अशास नमस्कार असो ! साक्षात् ब्रह्मदेवाच्यानेंहि त्याचें समाधान करवणार नाहीं !

वि० कृ० चिपळूणकर
( निबंधमाला )

### प्रश्न व सूचना

( १ ) या धड्यांतील २–३ चांगले दाखले सांगा. लेखक दाखले देतात ते कशाकरितां ? या धड्यांतील एखादा मुद्दा स्पष्ट करण्याकरितां तुम्ही आपल्या पदरचा एखादा दाखला सुचवा.

( २ ) वाग्युद्ध, कीर्तिमंदिर या रूपकांतील भावार्थ ५-६ वाक्यांत स्पष्ट करून सांगा.

१८ व्या पानावर पोपच्या कवितेचें जें मराठींत भाषांतर दिलें आहे त्यांत तुम्ही एखाददुसरें रूपक घालून तीच कल्पना निराळ्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न करा.

( ३ ) वाचन पुष्कळ केलें व तेंहि भराभर केलें तर नेहमीं दोषच समजला पाहिजे काय ? केव्हां तो दोष होतो व केव्हां नाहीं हें ( पांच ओळींत ) स्पष्ट करून सांगा.

( ४ ) शेवटीं दिलेल्या सुभाषितांत तुमच्या वाचनांत आलेल्या कांहीं ( मराठी, संस्कृत, इंग्रजी ) म्हणींची व सुभाषितांची भर घाला.

( ५ ) पंचतंत्रांत दिलेली ' मूर्ख पंडितां'ची गोष्ट ठाऊक असल्यास सांगा. ठाऊक नसल्यास अवश्य वाचावी.

---

# कडक थंडीचे अद्भुत चमत्कार

[ प्रि० गोपाळ गणेश आगरकर यांचें लक्ष विशेषेंकरून सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयांकडे असे, व त्यांचे 'सुधारकां'तील बहुतेक निबंध याच विषयांवर असत. तथापि ते मधून मधून व्याकरण, भूगोल, विज्ञान इत्यादि विषयांवरहि लिहीत असत, व त्यांचे हेहि लेख वाचनीय आहेत. खालील लेखांत एरव्हीं रूक्ष वाटणारा शास्त्रीय विषय आगरकरांनीं कसा मनोरंजक केला आहे हें पाहण्यासारखें आहे.]

आपल्या देशांत सर्वत्र उष्ण हवा असल्यामुळें, अतिशय थंडीनें होणारे चमत्कार आपल्या दृष्टीस पडत नाहींत. ते पहावयाचे असल्यास आपणांस हिमालयपर्वतावर संचार केला पाहिजे. पण तसें करण्याचीं साधनें फारच थोड्यांस अनुकूल असतात. सबब ज्या शेंकडों जिज्ञासु लोकांस तीं कधींच प्राप्त होण्याचा संभव नाहीं त्यांनीं आपल्या प्रांतांत क्वचित् प्रसंगीं दिसून येणाऱ्या गोष्टींचें लक्षपूर्वक अवलोकन करून, त्यांच्या साहाय्यानें तत्तुल्य इतर गोष्टींची कल्पना केली पाहिजे.



गो. ग. आगरकर

पावसाळ्याच्या आरंभास कधीं कधीं गारा पडतांना आपण पाहिल्या आहेत. या गारा जमिनीवर राहिल्या म्हणजे त्या वितळून जाऊन त्यांचें पाणी होतें. त्या वरून खालीं पडतात येवढें मात्र आपल्या दृष्टीस पडतें; पण त्या वर कशा होतात हें आम्हां-

पैकीं पुष्कळांस नीट ठाऊक असण्याचा संभव नाहीं. तसेंच त्या पांवसाळ्याच्या आरंभासच कां पडतात, या प्रश्नाचें तरी यथास्थित उत्तर कितीजण देऊं शकतील? तथापि, नित्याच्या अनुभवावरून सर्वांस ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, पाण्यास बरीच उष्णता लाविल्यानें त्यास उकळी फुटून अखेर त्याची वाफ होते; तसेंच याच वाफेस थंडी लाविली असतां तिचें पाणी होतें. गार स्लेट-पाटीवर तोंडांतली वाफ सोडिली असतां एक प्रकारचें दंव जमतें हें सर्वांनीं पाहिलें असेल. तसेंच आजारी मनुष्यासाठीं तापविलेल्या पाण्यावर, किंवा थालिपिठाच्या पातेल्यावर थंड भांडें ठेविलें असतां त्याचें बूड ओलें होतें, हेंहि सर्वांच्या पाहण्यांत आहे. यावरून काय झालें कीं, पाण्याच्या उष्ण वाफेचा थंडीशीं संयोग झाला असतां, तिचें फिरून पाणी होतें. याच पाण्यास आणखी थंडी लाविली तर त्याचें बर्फ होतें. हें म्हणणें आमच्या लोकांस सहसा कळावयाचें नाहीं. प्रथम अशी शंका येणार कीं, ही फाजील थंडी आणावी कोठून? लांकडें पेटविलीं असतां हवी तितकी उष्णता उत्पन्न करतां येते; पण थंडी कशी उत्पन्न करावी? ही थंडी कशी उत्पन्न करतात हें ज्यांस पहावयाचें असेल त्यांनीं कृत्रिम बर्फ करण्याचा एखादा कारखाना जाऊन पहावा. उन्हाळ्यांत आपण बाजारांतून जें बर्फ विकत आणतों, तें येथल्या येथें पाण्यास थंडी लावून केलेलें असतें. बर्फ हें किती थंड असतें याचा पुष्कळांना अनुभव असेलच; पण बर्फापेक्षांहि विशेष थंड असें मिश्रण आपणांस मिठाच्या साहाय्यानें करतां येतें. ऐस्क्रीम पुष्कळांनीं चाखलें असेल. एकदां आम्हीं एका गृहस्थास असें विचारिलें कीं, ऐस्क्रीम कसें करतात हें तुला ठाऊक आहे काय? त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, त्यांत हो काय? बर्फाचे तुकडे, दूध आणि साखर हीं एके

ठिकाणीं केलीं, कीं ऐस्क्रीम तयार होतें. आणखी एका प्रसंगीं आमच्या पाहण्यांत एक गोष्ट आली ती तर याहूनहि मौजेची असल्यामुळें, ती येथें थोडक्यांत सांगितल्यावांचून राहवत नाहीं. आमच्या एका मित्राच्या घरीं गेल्या उन्हाळ्यांत कांहीं सुशिक्षित व ठळक मंडळी संध्याकाळीं फराळास बोलाविली होती. पुण्यांत फार न दृष्टीस पडणारी, वसंत ऋतूंत अत्यंत आल्हादकारक अशी कांहीं चीज मंडळीच्या सेवनास सादर करतां यावी, म्हणून ऐस्क्रीम करण्याचें यंत्र आणवून त्यांत तें घरच्या घरीं करविण्याचें ठरविलें होतें. फराळ झाल्यावर मंडळी आराम करीत गच्चीवर बसली असतां, ऐस्क्रीमचें यंत्र मालकानें मंडळींत आणून ठेविलें. दुर्दैवानें यंत्राच्या पंचपात्रास[1] एक लहानसें भोंक होतें, व त्यांतून थोडा थोडा स्राव होत होता. मंडळीपैकीं एका जिज्ञासू गृहस्थास काय उत्कंठा झाली कोण जाणें, त्यानें आपलें एक बोट त्या पंच-पात्रांतून पडणाऱ्या द्रवांत बुडवून तोंडांत घातलें, आणि तें वेडें-वांकडें केलें ! त्यावर मालकानें असें विचारलें कीं, "कां हो, तोंड असें वेडेंवांकडें कां केलेंत ?" त्यावर चाखणारा गृहस्थ प्रत्युत्तर करतो, "मी मुंबईत ऐस्क्रीम घेत असें तें गोड लागे; तुमच्या येथलें असें खारट कां लागतें बरें ?" यावर आमच्या विनोदी मित्रानें उत्तर केलें कीं, "थोडा वेळ थांबा, तें अजून पुरतें थिजलें नाहीं, चांगलें थिजलें म्हणजे गोड लागूं लागेल." तात्पर्य काय, कीं थंडीनें घडून येणाऱ्या ज्या गोष्टी येथें सहजगत्या दिसण्यासारख्या नाहींत, त्या ग्राज्वेटांस-सुद्धां नीट समजून घेतल्याशिवाय लक्षांत येण्यासारख्या नाहींत ! एक शेर बर्फाच्या चुरांत अर्धा शेर मीठ घातलें तर तें मिश्रण बर्फापेक्षां फारच थंड होतें. असें मिश्रण एकाद्या लांकडी पंचपात्रांत

१ पंच (= विस्तृत) असें पात्र.

घालून त्यांत साखर मिसळलेल्या दुधाचें भांडें ठेविलें म्हणजे तें दूध थिजून त्याचें ऐस्क्रीम बनतें. दुधाच्या भोंवतालचें मिश्रण पराकाष्ठेचें थंड असल्यामुळें दुधांतील उष्णता त्याला लागून त्याचें खारट पाणी होतें. पण इकडे दुधांतील उष्णता नाहींशी झाल्यामुळें तें सांखळून जाऊन त्याचें द्रवत्व नाहींसें होतें, व त्याच्या अंगीं जडत्व येतें; तेव्हां पाण्यास थंडी लाविल्यानें त्याचें प्रवाहित्व नष्ट होऊन त्यास घनत्व येतें, व उष्णता लाविल्यानें वाफ होते, म्हणजे त्याला वायुरूपता येते, हें सिद्ध आहे. व याच रीतीनें, म्हणजे कमीअधिक थंडी व उष्णता आणि दाब यांच्या मदतीनें पाहिजे त्या पदार्थास या तीन स्थितींपैकीं पाहिजे ती स्थिति आणितां येईल, असें शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. आणि बहुतेक पदार्थांस त्यांनीं त्या तीनहि स्थिति आणून दाखविल्या आहेत.

*　　　　*　　　　*

आतां नैसर्गिक थंडीपासून होणारीं कांहीं अद्भुत कार्यें सांगून हा लेख पुरा करितों. बेंजामिन फ्रांकलिनचें नांव सर्वश्रुत आहे. हा गृहस्थ एका कडक हिंवाळ्यांत कॉपरमाइन नांवाच्या नदीच्या कांठीं होता. त्या वेळेस थंडी इतकी तीव्र होती कीं, धीवरांनीं[1] जाळीं पाण्याच्या बाहेर काढलीं कीं, त्यांतले मासे थिजून जाऊन लांकडासारखे होत; आणि मग, त्यांचे कुऱ्हाडीनें[2] तुकडे करावे लागत ! तशांत एकादा मासा विस्तवापुढें धरला कीं, हालचाल करूं लागे ! यावरून ज्या प्राण्यांचें रक्त थंड असतें त्यांचें चैतन्य बरेंच टिकून कसें राहतें हें समजणार आहे. आपल्या साध्या जळूच्या अंगीं देखील थंडी साहण्याचें मोठेंच सामर्थ्य आहे असें म्हणणात. या जळवांचे पुंजकेच्या पुंजके इजा न होतां कित्येक दिवस

१ धीवर = कोळी. २ संस्कृत 'कुठार'पासून.

बर्फाखालीं सजीव राहतात असें पाहण्यांत आलें आहे. उत्तरध्रुवासभोंवतीं हिंडणाऱ्या एका प्रवाश्याचें असें म्हणणें आहे कीं, ग्रीनलंडांत माशाशिवाय पाहिजे त्या प्राण्याचें मांस धूर दिल्याशिवाय, भाजल्याशिवाय किंवा मीठ घातल्याशिवाय न कुजतां पुष्कळ दिवस टिकतें. स्कॉटलंड वगैरे देशांतून या बेटांत आणिलेल्या बैलाच्या, बकऱ्याच्या किंवा डुकराच्या मांसाचे उबडे मुढे आणि पंख न उपटलेलीं किंवा मसाला न भरलेलीं पांखरें जशींच्या तशीं राहतात! पाकसिद्धि करावयाची असल्यास हीं विळ्यांनीं तोडावीं लागतात! सारांश, येथील अतिशय थंडीमुळें तीं थिजून जाऊन कोणत्याहि प्रकारें त्यांची रुचि कमी होत नाहीं. ज्या वेळेस खाण्यास काढावीं, त्या वेळेस जणूं काय आतांच कापिलीं आहेत कीं काय असें वाटतें. प्राण्यांच्या मांसाप्रमाणेंच वनस्पतींचीं अंगेंहि थंडीनें कुजत नाहींत. स्पिट्सबर्जेन येथें एक शंभर वर्षांचें लांकूड तिळमात्र न बिघडलेलें पाहण्यांत आलेलें होतें. इ०स० १६३५त याच शहरीं एका तरीच्या कांठीं सात असामी पुरण्यांत आले होते. पुढें वीस वर्षांनीं कांहीं खलाशी ज्या ठिकाणीं हे सात इसम पुरले होते त्या ठिकाणींच उतरले, आणि त्यांचीं तीं सात प्रेतें जशींच्या तशीं त्यांच्या दृष्टीस पडलीं! याच कारणामुळें थंड देशांतील पर्वतांत प्रवास करणारे लोक एकाएकीं बर्फाचे कडे घसरूं लागले असतां त्यांच्याखालीं सांपडून गतप्राण होतात; व त्यांचीं शरीरें अनेक वर्षें दऱ्यांच्या तळाशीं जशींच्या तशीं राहतात. बर्फांत सांपडून मेलेल्याचें प्रेत सांपडणार नाहीं अशी निराशा त्यांच्यामागें राहिलेल्या आप्तांस कधींहि होत नाहीं. तूप वगैरे प्रवाही पदार्थ थिजले असतां, त्यांचें घनफळ थोडें कमी होतें. पाण्याची तशी गोष्ट नाहीं. तें थिजलें असतां त्याचें घनफळ वाढतें. म्हणजे कांठोकांठ

भरून ठेविलेल्या तपेलींतील पाणी थिजलें तर तें त्या तपेलीवर चढेल; थिजलेल्या तुपाप्रमाणें कांठाच्या आंत जाणार नाहीं याचें कारण असें आहे कीं, पाण्याच्या परमाणूंत जितकें अंतर असेल त्याहून वर्फाच्या स्फटिकाकार कणांत अधिक अंतर असतें. स्फटिक अनेक आकाराचे असतात, पण त्या सर्वांत एक सामान्य गुण हा असतो कीं, त्यांस बहुश: सहा बाजू असतात. उदकस्फटिकाचा एक कण दुसऱ्या कणाशीं साठ अंशांच्या कोनानें भिडलेला असतो असें कित्येकांचें म्हणणें आहे. पाणी थिजलें असतां त्याचें घनफळ वाढतें, यामुळें पुष्कळदां अपघात होतात, व नुकसान होतें. पाण्याच्या तोट्यांस वाव नसल्यास त्या दुभंगतात; झाडांच्या रसवाहिन्यांतील रस एकदम थिजल्यास तीं उकलतात; जमिनींतील पाण्याचें वर्फ झाल्यास तीवरील घरें उलथून पडतात; व कधीं कधीं खडकांच्या भेगांत सांचलेलें पाणी थिजून फुगल्यामुळें सुरुंगाप्रमाणें आवाज होऊन त्यांचे कळपे सुटतात! थिजून फुगूं लागलेल्या पाण्याच्या अंगीं केवढा जोर येतो, हें पहाण्यासाठीं एका अमेरिकन लष्करी अंमलदारानें मोठ्या गंमतीचे दोन प्रयोग केले. चवदा इंच व्यासाचा एक तोफेचा कुलपी गोळा घेऊन त्यांत त्यानें पाणी भरलें, आणि लोखंडाच्या जाड खुंटीनें त्याचें तोंड बंद करून तो गोळा कडक हिंवाळ्यांत उघड्या हवेंत कित्येक दिवस ठेविला. एके दिवशीं खुंटी शंभर यार्डांवर जाऊन पडली, आणि तिच्या पाठोपाठ तिच्या जाडीचें एक आठनऊ इंच लांबीचें भरींव वर्फी पंचपात्र बाहेर पडलें! दुसऱ्या प्रयोगाचे वेळीं खुंटीनें टिकाव धरला, पण गोळ्याचें मध्यांग दुभंगून त्याच्या कमरेसभोंवतीं वर्फाचें एक कडें ठोकल्यासारखें झालें! प्रस्तुत लेख बराच लांबला आहे, तरी बर्फाच्या प्रसरण सामर्थ्याचें आणखी एक चमत्कारिक उदाहरण सांगण्याचें

धाष्टर्य करतों आणि आटपतों. अमेरिकेंत केनेबेक नांवाची एक नदी आहे. तिची रुंदी एके ठिकाणीं सुमारें सातशें फूट आहे. या नदीचें पाणी समुद्राच्या भरतीओहोटीनें या ठिकाणीं सुमारें पांच फूट चढतें व उतरतें. याच ठिकाणीं ओहोटी असल्यास हिची कमींतकमी खोली सतरा फूट असते, व भरती आली असतां ती अगदीं खोल जागीं पंचवीस फूट होते. हिंवाळा पडूं लागला कीं, हिचा पृष्ठभाग गोठूं लागून बर्फाच्या वेड्यावांकड्या राशी दोहों किनाऱ्यांवर ठिचूं लागतात. हा प्रकार पाहून, एका गृहस्थानें दोनहि किनाऱ्यांकडे शंभर शंभर फूट जागा सोडून मधल्या पांचशें फुटांत शंभर फुटांच्या अंतरावर बर्फ फोडून पाण्याच्या तळास लागलेले असे पांच डांब पुरले. पुढें एका महिन्यानंतर असें दिसून आलें कीं, पहिल्यांत व दुसऱ्यांत आणि चवथ्यांत व पांचव्यांत शंभर फुटांच्या ऐवजीं एकशें-एक फुटांचें अंतर पडलें आहे; पहिल्यांत आणि पांचव्यांत पांचशें फुटांऐवजीं पांचशें तेरा फुटांचें अंतर पडलें आहे ! !

**गो० ग० आगरकर**
( विविधविषयसंग्रह )

## प्रश्न व सूचना

( १ ) आइस्क्रीम कसें करतात याचें वर्णन करून त्यांतील शास्त्रीय तत्त्व स्पष्ट करून सांगा. आइस्क्रीमच्या पात्रांत दूध कांठोकांठ भरतात काय ?

( २ ) गारा कशा बनतात ? त्या पावसाळ्याच्या आरंभींच कां पडतात ?

( ३ ) गारा पडत असतांना लहान-मोठ्यांना कशी मौज वाटते व मुलांबाळांची धांदल कशी उडते याचें अनुभवांतील प्रसंगावरून वर्णन करा.

( ४ ) खालील शब्दांवर व्याकरणात्मक टीपा द्याः—शास्त्रज्ञ, सर्वश्रुत, कांठोकांठ, पाठोपाठ, पंचपात्र.

(५) या धड्यांत 'आइस्क्रीमचें (यंत्र)' 'फ्रांकलीनचें(नांव)' 'ग्रीनलंडांत' अशीं इंग्रजी शब्दांचीं रूपें आलीं आहेत त्यांकडे लक्ष द्या.

परभाषेंतील शब्दांचीं सामान्यरूपें मराठींतल्याप्रमाणें केव्हां करावींत याबद्दल (नेपोलियन्, अकबर, महंमद इत्यादि शब्दांचीं उदाहरणें घेऊन) चर्चा करा.

---

... ग्रं... दा. ...... नं. ता.

# सिमलावर्णन

[ नरसिंह चिंतामण केळकर हे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद असतांना त्यांना दिल्लीस व सिमल्यास जावें लागत असे. तेथील सभांचें काम संभाळून ते वेळांत वेळ काढून तेथील कामकाजासंबंधानें व इतर गोष्टींसंबंधानेंहि 'केसरी'करितां पत्रें लिहीत असत, अशा एका पत्रांतूनच पुढील सिमलावर्णन घेतलें आहे.

विषय साधा भौगोलिक असूनहि उपमाउत्प्रेक्षादि अलंकार; गोष्टींचे वगैरे दाखले; ऐतिहासिक, सामाजिक वगैरे माहिती; मधून मधून विखुरलेला विनोद इत्यादिकांनीं तो विषय कसा सजविलेला आहे हें पाहण्यासारखें आहे. ]

दिल्ली आणि सिमला यांतील अंतर जमीनअस्मानाचें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्ली समुद्राच्या सपाटीपासून सुमारें तीनशें फूट उंच असेल, तर सिमला सात हजार फूट उंच भरेल. सिमल्यावर चढलेल्याला झालें तरी आकाश ठेंगणें होतें असें थोडेंच आहे. पण हिमालय म्हटला म्हणजे पृथ्वीवरच्या कोणाहि मनुष्याला जरा आदरानेंच बोलावें लागतें. समुद्राच्या सपाटीपासून तडक एकदम सात हजार फूट उंच चढणें हें आधुनिक वैमानिकालाहि थोडें अवघडच जाईल. 'सिमल्याची टेकडी' हें 'नगाधिराज हिमालया'चें एक लहानसें बछडें आहे; तथापि, हें बछडें आपल्या

वडिलांचें नांव कांहीं अगदींच घालविणारें नाहीं. कारण येथें



न. चिं. केळकर

हिवाळ्यांत बर्फ पडतेंच, पण ऐन उन्हाळ्यांत देखील येथून जवळच बर्फाच्छादित शिखरें दिसतात. हल्लीं[1] सिमल्यास हवा फारशी गार नाहीं. सिंहगड किंवा महाबळेश्वर येथली हवा देखील कदाचित् थोडी अधिक गार ठरेल. पण आठपंधरा दिवसांपूर्वींच येथें थंडीचा कडाका पडून लिंबा-एवढ्या गारांचा पाऊस कोसळला होता असें आमच्यापूर्वीं येऊन राहिलेले लोक सांगतात. उंच दर्जाच्या माणसाच्या स्वभावाप्रमाणें उंच जागेचें हवामान लहरी नसेल तरच आश्चर्य !

हिमालय पर्वतांत एकाहून एक उंच अशा शिखरांच्या रांगा एकामागें एक लागलेल्या असतात असें म्हणतात. त्याचा मासला सिमल्यास येतांना पहावयास सांपडला. कालका येथें चढण्यास प्रारंभ केला तेव्हां वाटे हा डोंगर चढून गेलों म्हणजे सिमला दिसेल. पण सिमला नुसता दिसण्याला देखील, त्याच्या सात हजार फूट उंचींतले सहा हजार फूट खर्चीं घालावे लागले. आणि हें करतांना आगगाडीला वळसे इतके घ्यावे लागले कीं, आम्ही जिच्या-कडे तोंड करून चाललों नव्हतों अशी एकहि दिशा उरली नाहीं. खुद्द सिमलाच पाठीशीं वाळून पुढें चाललों कीं काय असाहि

१ मे महिन्यांत.

कित्येक ठिकाणीं भास झाला ! वळणें घेण्याला सापाच्या गतीची उपमा देतात. पण आमच्या पूर्ण चक्राकार गतीनें ही म्हण साफ खोटी पाडली ! वळणाची एक रांग संपली कीं, पहिली दरी बुजून नवी दरी व नवें खोरें दिसूं लागे; यामुळें जमिनीपासून डोळ्याला उंची फारशी भासत नसे. पण नवीं संकटें उद्भवलीं म्हणजे जुन्यांचा विसर पडावा त्यांतलेंच हें आहे ! अगणित दऱ्याखोऱ्यांचीं पुढांत पुढें बसवून हिमालयाची बनावट एखाद्या गेंदेदार दीपमाळी-प्रमाणें किंवा पाकळीदार फुलाच्या माळेप्रमाणें केलेली आहे. सिमल्याचा पर्वत हें या एकंदर माळेंतील शेंकडों फुलांपैकीं फक्त एक फूल आहे. या प्रत्येक फुलाच्या वांट्याला एकेक उंच गिरि-शिखर आलेलें आहे. प्रायः हीं सर्व शिखरें श्रीशंकराच्या नांवानें पवित्र झालेलीं असावीं. आमच्यासमोर दिसतें त्या शिखराला 'चुडेश्वर' म्हणतात, व या 'जटाधारी' योगीश्वराच्या विरागी[1] ऐश्वर्याची आठवण करून देणारा पवित्र भस्मराशीच कीं काय असा तो त्या शिखरावरील बर्फाचा विसकटलेला ढीग दिसतो. येथून केदार, कैलास, कांचनगंगा—धवलगिरी वगैरे शंकरजींच्या इतर आवडत्या निवासस्थानांची आठवण सहजच होते, आणि 'एवरेस्टवर' चढण्याच्या 'प्रयत्नाची' हकीकत आजच्याच वर्तमान-पत्रांत वाचली, त्यावरून अजून 'साहेब' शिवला नाहीं अशी देवतानिवासाची एक तरी जागा शिल्लक उरली आहे या विचारानें खरोखरच जरा बरें वाटलें !

हिमालयांत अनेक जातींचे पहाडी लोक आहेत. त्यांचीं पूर्वीं लहान लहान संस्थानें होतीं. १८०३ सालीं दिल्ली हस्तगत झाल्यावर इंग्रजांचा प्रवेश पंजाबच्या या कोपऱ्याकडे झाला. पहाडी

१ वैराग्ययुक्त.

संस्थानिकांना लढवय्ये व निर्दय गुरखे लोकांचा त्रास होऊं लागला. तो टाळावा म्हणून त्यांनीं इंग्रजांची मदत मागितली. इंग्रजांनीं नेपाळच्या युद्धांत गुरख्यांना आपल्या हद्दींत पिटाळून लाविलें. हें कार्य झाल्यावर इंग्रजांनीं पहाडी संस्थानिकांना त्यांचा बहुतेक मुलख परत दिला. पण लष्करी दृष्टीनें कांहीं नाक्याच्या जागा म्हणून आपल्या ताब्यांत ठेवल्या. तात्पर्य, इसापनीतींतील 'मनुष्य आणि घोडा' या गोष्टीची येथें पुनरावृत्ति होऊन साहेब जो एकदां सिमल्याच्या पहाडावर चढला तो कांहीं केल्या खालीं उतरलाच नाहीं ! परत दिलेल्या जागांत देखील उंच उंच हवाशीर पठारें पाहून येथें दुखणाईत लोकांकरितां झोंपड्या व घरें बांधण्याची परवानगी त्यानें मिळविली; व अखेर हीं लष्करी ठाणीं व हीं पठारें मिळून सिमल्याची वस्ती बनली. सिमल्याच्या सात टेकड्यांवर मिळून आज सुमारें नव्वद हजार वस्ती आहे व सगळ्या हिंदुस्थानचा कारभार बारांपैकीं सात महिने या पहाडावरून चालतो !

हल्लीं सिमल्यावर चढून येण्याला मोटारी चालण्यासारखा रस्ता व प्रत्यक्ष आगगाडीहि झाल्यामुळें दळणवळणाची कांहीं अडचण वाटत नाहीं. पण पहिले जे इंग्रज येथें आले त्यांना अमेरिकन वसाहतवाल्यांप्रमाणें धैर्य, काटकपणा व स्वावलंबन या गुणांचा फार उपयोग करावा लागला. १८१९सालीं सिमल्यावर साहेबाची पहिली झोंपडी बांधली गेली. तेथपासून पुढें उन्हाळ्यांत चार दिवस व्हाइसरॉय व सेनापति यांनीं नुसतें हवेखातर येथें येऊन राहावें असा प्रघात पडला. १८२७ मध्यें लॉर्ड आमहर्स्ट हे आपली खास कचेरी घेऊन सर्व उन्हाळाभर येथें राहिले. अखेर १८६४ सालीं ग. ज. लॉर्ड लॉरेन्स यांनीं सिमला ही कायमची राजधानी बनविली. या शंभर वर्षांत सरकारी रीत्या या ठिकाणावर किती

कोटी रुपये खर्च झाले असतील याची कोणासहि सहज कल्पना करतां येईल. या राजधानींत सरकारच्या सर्व खात्यांच्या कचेऱ्या, दप्तर, छापखाना, लष्करीछावणी, बिनतारी व साधीं तारायंत्रें, लष्करी विमानें वगैरे सर्व कारखाने एप्रिलच्या प्रारंभापासून नोव्हें-वरच्या प्रारंभापर्यंत जोरांत चालू असतात. उरल्या पांच महिन्यांत सिमला योगनिद्रा घेतो.

एवढ्या सगळ्या हिंदुस्थानची राजधानी व ती एखाद्या पर्वत-शिखरासारख्या अडचणीच्या जागेंत कां असा प्रश्न सहज सुचतो. पण त्याचें उत्तर पूर्वींच्या इतिहासांत व परंपरेंत आहे. कंपनी-सरकारचा राज्यसंपादनाचा उद्योग प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत झाला; व कलकत्त्याहून राजधानी बदलून दिल्लीला आली तरी वरील कारणांत कांहीं फरक झाला नाहीं. उलट कलकत्त्यापेक्षांहि दिल्लीला सिमला फारच जवळ, यामुळें ही सकारणता बळावली. नव्या दिल्लीची रचना व इमारती झाल्यापासून मात्र सिमल्याचें महत्त्व सरकारच्या मनांतून थोडें कमी झालें आहे. सर्व कचेऱ्या सात महिने येथें असतात त्या उठून बारा महिने दिल्लीस राहाव्या व मुख्य मुलकी-लष्करी अधिकारी यांनींच वाटेल तर आपले खास नोकर व हस्तक बरोबर घेऊन उन्हाळ्यांत सिमल्यास राहावें अशी नवी योजनाहि पुढेंमागें होण्याचा संभव आहे, नाहीं असें नाहीं; पण आज तरी सात हजार मैल समुद्रापलीकडचा साहेब हिंदुस्थानांत येऊन सात हजार फूट उंचीच्या पहाडावर बसून राज्य करतो अशी विपरीत वस्तुस्थिति आहे खरी! हवाखोरीची आवड, एकतंत्री राजसत्ता, परक्या लोकांचा मुबलक पैसा इतके गुणदोष एकत्र झाल्यावर पर्वतावर तर पर्वतावर पण सुखाला लागेल अशी राजधानी इंग्रजांनीं कां न करावी?

पण इंग्रजांनीं सिमल्यास राजधानी केली तिला वरच्यापैकीं कोणतेंच कारण लागू पडत नाहीं. सुरक्षितपणा म्हणावा तर सिमल्यास तटबंदी कोठेंच नाहीं, उलट बिकट जागांतून वर सहज जातां यावें म्हणून वाटा, सडका कितीतरी केल्या आहेत. एकान्त-प्रियता म्हणावी तर कलकत्ता–मुंबई येथील सरकारी बंगल्यांना जितकी गर्दी दूर तितकी येथें नाहीं. मुख्य सडक अशी एकच म्हणजे मालरोड. आणि संध्याकाळीं किंवा दुपारीं पाहावें तो रावां-बरोबर रंकहि येथें खांद्याला खांदा लावून हिंडलेले दिसतात. मुंबई-कलकत्ता येथें गाड्या, मोटारी असल्यामुळें गर्दींत देखील श्रीमंताला संपर्क लागत नाहीं. येथें पाहावें तों सगळ्या सिमल्यावर मुलकी लाट (व्हाइसरॉय), जंगी[1] लाट (सेनापति), पतियाळचे महाराज व भोपाळच्या बेगमसाहेब या चौघांखेरीज इतर कोणालाहि मोटार किंवा घोडागाडी वापरण्याची परवानगी नाहीं ! यामुळें मालवरील अरुंद रस्त्यांत सगळ्या बड्या अधिकाऱ्यांना पायानेंच चालावें लागतें. एखादुसरा घोड्यावरून जातो, कांहीं थोडे रिक्शामधून जातात, पण बहुतेक पायीं जातात यामुळें खांद्याला खांदा सहजच भिडतो. बरें, पवित्रपणा म्हणावा तर इंग्रजांनीं येथें देव-देवळांची भानगड फारशी ठेवलेली नाहीं; आणि सामाजिक व्यवहारांत पाहावें तर शहरांपेक्षांहि येथें ख्यालीखुशाली व तदनुषंगिक गोंधळ अधिक माजतो म्हणतात.

सिमल्याचा विस्तार सात टेकड्या मिळून सहा मैल लांबीचा आहे. त्या मानानें रुंदी फारच कमी भरेल. कोठें कोठें पर्वताच्या माथ्याचा सपाट भाग शंभर फूट देखील रुंद नाहीं. या सहा टेकड्यांना आधारभूत असलेला मुख्य पर्वत घोडनालाच्या आकाराचा

---

१ लष्करी ( जंग = युद्ध, लढाई ).

आहे. त्याच्या मध्यभागीं दाट वस्ती असून इतर वस्ती टेकड्यांवर पसरलेली आहे. मुख्य वस्ती एकाच्या माथ्यावर एक, म्हणजे एकानें आपल्या पडवींत बसून दुसऱ्याच्या धुराड्यांतून खालीं पाहावें अशी वसल्यासारखी दिसते. काळ्या लोकांची वस्ती ही बाजारपेठ व त्याखालीं लागलेली वीस मजली घरांची उतरंड यांत सांठविलेली असून सरकारी व युरोपियन लोकांचे खाजगी मालकीचे बंगले बाजूच्या टेकड्यांवर पसरलेले आहेत. तथापि बाजूस झालें तरी महाबळेश्वराप्रमाणें येथें बंगल्यांना विस्तीर्ण कंपाउंड किंवा आवार नसतें. कारण माथ्यावर सपाटी अशी फार कमी. स्वाभाविक मैदानी जागा नसल्यानें घर-बंगला बांधणाराला प्रत्येक ठिकाणीं झाडें तोडून डोंगराची कड खोदून जागा साफ करून घ्यावी लागली आहे. कोणत्याहि एका घरांतून दुसऱ्या घरांत जावयाचें असल्यास चढलें तरी पाहिजे किंवा उतरलें तरी पाहिजे. अशा स्थितींत दळणवळण किती अवघड होत असेल याची कल्पना सहजच करतां येईल. लांब पल्ल्याला चौघांच्या खांद्यांवरून जावें लागतें ! पण मोठे गाडी-रस्ते नसले तरी लहान सडका व पाऊलवाटा यांचा जणूं कांहीं नागमोडी मोक्षपटच पर्वताच्या सर्व अंगभर आंखल्यासारखा दिसतो. सिमल्याची इतकी वस्ती, पण कोणीहि कोणाजवळ असा राहात नाहीं असें यथार्थतेनें म्हणतां येईल. कोणत्याहि वस्तीला पाण्याची सोय मुख्य लागते, ती सिमल्यास असावी तितकी नाहीं. या पहाडांत पाण्याचा सांठा फार होत नसावा असें वाटतें. कारण डोंगरकपारींतून निघालेला जिवंत वाहता झरा येथें सहसा दिसत नाहीं. येथील म्युनिसिपालिटीनें दुरून

पाण्याचे नळ आणले आहेत; पण कित्येक बंगल्यांना पाणी बरेंच लांबून आणावें लागतें.

विजेची रोषनाई मात्र सिमल्याला भरपूर आहे. दुरून रात्रीं बड्या सिमल्याकडे पाहिलें म्हणजे हिरेमोत्यांचीं ताटेंच्या ताटें भरून तीं लीलेनें वर उधळून द्यावीं असा दाट विखुरलेल्या विजेच्या दिव्यांचा लखलखाट दिसतो आणि दूर बाजूच्या टेकड्यांवर पसरलेले तुरळक दिवे पाहिले, म्हणजे आपण एखाद्या मोठ्या बंदरांत उभे असून समोर रात्रींच्या वेळीं समुद्रांत नांगरलेल्या शेंकडों आगबोटींचा काफिला पहात आहों असा भास होतो. तारायंत्री तारांच्या जाळ्यांचा विस्तार पाहिला म्हणजे बिनवापराच्या जागेंत कोळ्यांनीं केलेल्या विणकामाची आठवण होते. एखादे वेळीं एखादें लष्करी विमानहि पहाडावर घिरट्या घालतें तेव्हां खालच्या दरींतील चीड, देवदार वगैरे वृक्षांच्या झाडींत नव्या फुलांवर मधाकरितां घोंगावणाऱ्या भुंग्यांच्या गुंजारवाचा प्रतिध्वनीच आपण आकाशांत ऐकत आहों कीं काय असें वाटतें. तथापि अजूनहि सिमला सगळाच कांहीं नवाळला नाहीं ! त्याच्या जुनाट परंपरेचा धागा अजूनहि शिल्लक आहे. कारण पहांटेच्या वेळीं ‘कार्ट रोड’-वरून लमाणी खेचरांचे तांडे वर घाट चढून येतात तेव्हां त्यांच्या गळ्यांतील घंटा आपल्या गोड आवाजानें जुनी परिचित रागदारी गाऊन साखरझोंप घेणाऱ्या आळशी मनुष्याला जागें करून उषःकालाची वर्दी देत असतात. अजूनहि माल देऊन माल विकत घेणारे म्हणजे अडाणी तिबेटी लोक हिमालयांतून येऊन आश्चर्यचकित मुद्रेनें सिमल्याच्या बाजाराकडे पहात उभे राहतात. अजूनहि आपलें सगळें अंग नखशिखान्त झांकून घेणाऱ्या पहाडी स्त्रिया अर्धे वक्षःस्थळ उघडें टाकून फिरणाऱ्या गोऱ्या युरोपियन

चायांकडे भित्र्या दृष्टीनें पण तिरस्कारयुक्त मुद्रेनें पहात जात असतात. अजूनहि एखादा जंगली गुराखी पहाडाच्या माथ्यावर बसून जुन्या पद्धतीनें अलगुज वाजवून खालचें दरीखोरें मधुर आवाजानें भारून टाकतो.

सिमल्यास सुमारें नव्वद हजार वस्ती आहे म्हणून सांगितलें, पण ती उन्हाळी वस्ती होय. ऐन हिंवाळ्यांत जेव्हां सरकारी कचेऱ्या येथून खालीं जातात व चोहोंकडे बर्फ पडतें तेव्हां ही वस्ती चवथ्या हिश्शाची रहाते; बाकीची खालीं निघून जाते. घर-धन्यांपेक्षां पाहुण्यांचीच गर्दी अधिक, अशांतला येथील कायम वस्तीचा प्रकार आहे. आणि उन्हाळी वस्तींत देखील उद्योगी मधमाश्यांपेक्षां गुलहौशी फुलपांखरेंच अधिक. सरकारी पेट्या, कागदाचीं पुडकीं, पट्टेवाल्यांची गर्दी, हें सर्व पाहून येथें चाल-णाऱ्या कामकाजाची कल्पना येते ती कांहीं अगदींच खोटी नसते. पण रस्त्यांत भेटणाऱ्यांपैकीं खऱ्या कामांत गढलेल्या अशा एका माणसागणिक दोन माणसें ख्यालीखुशालीच्या ढंगांत असतात असें म्हटल्यास फारशी चूक होणार नाहीं. सरकारी कचेऱ्या येथून हलल्या म्हणजे मग येथील कायम रहिवासी पहाडी लोक व नेपाळ-तिबेटाकडून येणारे फेरीवाले यांच्या स्वाधीन सगळा सिमला होतो. या दोन जातींचे लोक पाहतांच वेगळे म्हणून ओळखतां येतात. पहाडी मनुष्य हा अर्धशुभ्र, नाकाडोळ्यांनीं तरतरीत, व ठेवणीनें किंचित् छलकाटा असा असतो. आणि तिबेटी वगैरे प्राय: नकटे, खुजे, कुरूप, घाणेरडे पण मोठे बळकट असे असतात. हातगाड्या वगैरे ओढण्याचें काम पहाडी लोक करतात. पण पल्लेदार मजली-वरचें किंवा ओझें वाहण्याचें काम हे दुसऱ्या प्रकारचे लोक करतात. आमचे घाटी लोक खंबीर खरे, पण हे तिबेटी मोठीं ओझीं

पाठीवर घेऊन उंचवटयावरून खुशाल चढून गेलेले पाहिले म्हणजे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. या कायम रहिवाश्यांच्या यादींत सिमल्यावरील माकडांचाहि समावेश केल्यास चूक होणार नाहीं! कारण त्यांची वस्ती तशीच जुनाट व कायम आहे!

न० चिं० केळकर

( गद्यगुच्छ )

### प्रश्न व सूचना

( १ ) घोडा आणि मनुष्य यांची इसापनीतींतील गोष्ट सांगा. तिचा उपयोग सिमलावर्णनांत कोणता मुद्दा स्पष्ट करण्याकरितां केला आहे ?

( २ ) [ अ ] पुढील वाक्याचा अर्थ सांगाः—
'उरल्या पांच महिन्यांत सिमला योगनिद्रा घेतो.'

[ आ ] पुढील शब्दांचा अर्थ सांगाः—मुलकी (अधिकारी), विपरीत, जंगीलाटसाहेब, मोक्षपट, साखरझोंप.

( ३ ) या धडयांतील तीन चांगले दाखले सांगा व ते त्या त्या प्रसंगीं कसे लागू पडतात तें स्पष्ट करा.

( ४ ) तुम्हीं पाहिलेल्या एखाद्या रम्य स्थानाचें ( शहराचें, तीर्थाचें किंवा पहाडी गांवाचें ) वर्णन करा. ( वर्णन केवळ भूगोलांत दिल्याप्रमाणें नसावें. त्यांत स्वतःच्या अनुभवाच्या, कल्पनेच्या वगैरे गोष्टी घालण्याचा प्रयत्न करा. )

---

## गोपाळ कृष्ण गोखले

[ टिळक व गोखले हे दोघेहि कालवश होऊन पुष्कळ वर्षें झालीं असल्यामुळें त्यांच्या गुणावगुणांकडे तटस्थपणें व निर्विकार चित्तानें पाहणें आतां शक्य झालें आहे. तत्कालीन वादांचें व भांडणांचें महत्त्व आतां उरलें नसल्यामुळें त्यांकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांनीं गोखल्यांचे चरित्रापासून आपणाला काय बोध मिळण्यासारखा आहे व केळकरांच्या भाषाशैलींत कोणते गुण आहेत हें पाहण्याच्या दृष्टीनेंच खालील उतारा वाचावा. ]

गोपाळराव गोखले हे एका गरीब कुळांत जन्मले. कागल येथील त्यांच्या वडील भावानें त्यांचें एकंदर शिक्षण केलें आणि अल्पवयांतच ते बी. ए. झाले. पण स्वार्थत्यागाची वृत्ति मनांत असल्यामुळें टिळकांच्या उज्ज्वल उदाहरणानें मोहून त्यांच्याच बोलण्यावरून ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले व लाइफ-मेंबर झाले. पुढें त्यांचे व टिळकांचे ग्रह जमले नाहींत ही गोष्ट वेगळी. शिक्षकाचें काम थोडे दिवस केल्यावर त्यांची बुद्धिमत्ता, इंग्रजी लिहिण्याबोलण्याची हातोटी, कोणत्याहि विषयाचा अभ्यास करण्याची इच्छा आणि मर्मग्राहकता व सर्वांत विशेष म्हटलें म्हणजे विनयशीलता हे त्यांचे गुण पाहून माधवराव रानड्यांनीं त्यांना निवडून आपल्या आवडत्या शिष्यवर्गांत सामील केलें. आणि तेव्हांपासून त्यांनीं रानड्यांच्या ठिकाणीं जी गुरुनिष्ठा ठेविली ती यावज्जन्म. आणि या गुरुनिष्ठेचें फळहि त्यांना तसेंच मिळालें. कारण 'आपणासारिखे करिती तात्काळ' ही म्हण या ठिकाणीं खरी ठरली. गोखले यांचा बी. ए.च्या परीक्षेचा विषय गणित असला तरी इंग्रजी भाषेच्या आवडीनें त्यांनीं तिचा परिश्रमानें अभ्यास करून ती चांगली हस्तगत केली. स्मरणशक्ति खूप कमावलेली असल्यानें त्यांचें इंग्रजी भाषेचें पाठांतर फार चांगलें होतें. पण पुढें हळुहळू इंग्रजी हा शिक्षणाचा विषय सोडून देऊन त्यांनीं इतिहास व अर्थशास्त्र घेतलें आणि शिक्षकाचें काम सोडून देईपर्यंत त्यांनीं त्या विषयांतील आपली प्रवीणता जशी वाढविली त्याप्रमाणें आपल्या उत्कृष्ट व्याख्यानांनीं शिष्यांचेंहि कल्याण केलें. हे दोन विषय त्यांना सार्वजनिक आयुष्याच्या प्रवेशद्वारासारखे उपयोगी पडले. १८८७ पासून रानड्यांनीं त्यांचा सार्वजनिक सभेंत प्रवेश करविला; आणि सीतारामपंत चिपळूणकरांनंतर ते

सभेचे चिटणीस व त्रैमासिकाचे संपादक झाले. या सुमारास आगरकरांबरोबर त्यांनीं 'सुधारक' पत्र काढलें; पण पुढें लवकरच त्यांनीं त्याचा संबंध सोडला. टिळक त्यांहून नऊ वर्षांनीं वडील, तथापि दोघांचेंहि सार्वजानिक चरित्र बरोबरच सुरू झालें व प्रथम बरींच कामें उभयतांनीं भागीदारीनें केलीं. एका बाजूनें टिळक हे चिटणीस निवडून द्यावे तर दुसऱ्या बाजूनें गोखले. पण थोड्या दिवसांनीं त्यांची जोडी फुटली आणि दोघांनींहि दोन मार्ग आक्रमिले.

सन १८९२ किंवा १८९३ सालीं मुंबईस एका सभेंत लष्करी खर्चाच्या विषयावर गोखल्यांचें मुख्य वक्ते म्हणून भाषण झालें. अध्यक्ष मेथा व उपवक्ते वाच्छा हे होते. पण आपल्या वक्तृत्वानें व विषयप्रतिपादनाच्या शैलीनें गोखल्यांनीं दोघांवरहि ताण केली; आणि हें पाहून मेथा व वाच्छा या दोघांच्याहि चेहऱ्यावर गोखल्यांविषयींच्या कौतुकाचें तेज चमकत होतें हें सर्वांनीं पाहिलें. त्या वेळीं गोखले अवघे सव्वीस किंवा सत्तावीस वर्षांचे असावे. सार्वजनिक कामांत त्यांचें पाऊल जें एकदां पुढें पडलें तें कधींच मागें आलें नाहिं. १८९६सालीं हिंदुस्थानतर्फे वेल्बी कमिशनपुढें त्यांना साक्षीदार म्हणून पाठविण्यांत आलें आणि तेथें झालेलीं त्यांचीं प्रश्नोत्तरें पाहिलीं म्हणजे कोणालाहि त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल अभिमान वाटेल. १८९९ सालीं ते मुंबई कायदेकौन्सिलांत शिरले; पण तें क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाला अपुरें असें तेव्हांच दिसून आलें. १९०२–०३ सालीं सर फेरोजशहा मेथा यांनीं वरिष्ठ कौन्सिलांतील आपली जागा खालीं करून त्यांना दिली. तेथपासून सतत अकरा-बारा वर्षें ते तेथें होते; पण त्यांची जागा घ्यावी असें दुसऱ्या कोणास वाटेना व द्यावी असें कोणास म्हणवेना. कौन्सिलांतील त्यांचीं भाषणें

वाचलीं म्हणजे तीं माहितीनें पूर्ण भरलेलीं व अत्यंत परिणामकारक अशीं सहज दिसतात. शिवाय त्यांची वाणी मृदु, मोहक असल्यामुळें आणि त्यांच्या बोलण्यांत सच्चेपणा व कळकळ हीं मूर्तिमंत प्रकट होत असल्यानें त्यांची छाप तज्ज्ञ, निष्णात अशा अनुभविक व हुषार अधिकाऱ्यांवरहि पडे. त्यांच्या भाषणांत मुख्य गुण म्हटले म्हणजे भाषण लहान असो मोठें असो, त्यांत प्रमेय व अनुमान हीं एखाद्या सुंदर इमारतीप्रमाणें प्रमाणबद्ध असत. आधार व आंकडे पाहून पारखून घेतलेले असावयाचे. विषयांतर कोठेंहि नसावयाचें. शब्द, मेजके, रेखीव, तोलीव असे असावयाचे. प्रत्येक वाक्यागणिक उद्दिष्टाचें पाऊल पुढें पडत असावयाचें, आणि या सर्वांवर प्रांजलपणा व मृदुलपणा हीं बारिक हातानें पसरलेलीं असावयाचीं. पण उलट त्यांच्या भाषणांत विनोद सहसा कोठें आढळावयाचा नाहीं. ज्याप्रमाणें डॉ० रासबिहारी घोष वगैरेंच्या भाषणांत अभिजात वाङ्मयाचे संदर्भ व रुचिर ध्वनि पदोपदीं उमटलेले दिसतात तसे यांच्या भाषणांत आढळत नसत. वक्तृत्वाची जी एक ठरीव कल्पना आहे त्या दृष्टीनें गोखल्यांना कदाचित् वक्तेहि म्हणतां येणार नाहीं; पण मन वळविणें किंवा दुसऱ्यांना आपलेसें करणें हा जो वक्तृत्वाचा हेतु व परिणाम तो सिद्ध करण्यांत इतर नामांकित वक्त्यांपेक्षांहि गोखल्यांचा हातखंडा असे. याचें कारण एकच कीं त्यांत प्रसाद, प्रांजलपणा, बुद्धिमत्ता व कळकळ हीं खेचून भरलेलीं असत. यांतच त्यांचा वर्ण व बाह्यरूप यांची भर पडे. व त्याहिपेक्षां खरा गुण म्हटला म्हणजे त्यांच्या भाषणांतच ज्यांना एकदा गुरुजन किंवा नेते त्यांनीं मानलें त्यांच्याविषयींच काय, पण समोरच्या प्रेक्षकांविषयींहि त्यांची विनयबुद्धि प्रकट होई. त्यांच्या भाषणांत आवेश असला तरी अपशब्द नसे, आणि मर्मज्ञपणा

असला तरी कुचाळी नसे. हे जे त्यांचे गुण सभापांडित्यांत तेच खाजगी संभाषणांतहि दिसून येत. यामुळें नेमस्त पक्षाकडून परदेशीं पाठविण्याला जर कोणी एकच मनुष्य योग्य असेल तर ते गोखले असें त्या पक्षानें कायमचें ठरवून टाकलें होतें. आणि ते सार्वजनिक कार्याला वाहिलेले व पडेल तें काम अंगावर घेण्याला तत्पर असे असल्यामुळें, इतर धंदेवाईक, वकील, सॉलिसिटर, व्यापारी, कारखानदार, शाळूमुत्सद्दी व पर्यंकपंडित यांना यांच्या-पुढें हारच खावी लागे.

पण इतके गुण असूनहि त्यांच्या ठिकाणीं होती तशी उज्ज्वल देशभक्ति, कर्तव्यनिष्ठा व स्वार्थत्यागबुद्धि नसती तर त्या गुणांचें तेज जनतेवर पडलें नसतें. त्यांच्या प्रतिपक्ष्यांना देखील हे त्यांचे दुहेरी गुण मान्य होते. पक्षाभिमानामुळें टिळकांचे गुण उघडपणें मान्य करण्याला नेमस्त हे खळखळ करीत व त्यांची जीभ किंवा लेखणी होईल तितकें अंग चोरी. तोच प्रकार गोखल्यांच्या संबंधानें राष्ट्रीयपक्षाचाहि होत असे. आणि दुर्दैवानें जन्मभर या दोन पक्षांच्या मूर्धाभिषिक्त पुढाऱ्यांचें धावतें युद्ध चालू राहिल्यामुळें आणि परस्परांनीं परस्परांविषयीं मर्यादेबाहेर अनादर दाखविल्यामुळें अनुयायांच्या वर्तनांत अनादराला अप्रीति व द्वेष यांचेंहि स्वरूप आलें होतें. पुष्कळांना असें वाटे कीं हे दोन पुढारी एका बाजूला राहून एकच धुरा मानेवर घेऊन काम करतील तर काय बहार होईल; पण अशी अपेक्षा करणें म्हणजे सूर्यचंद्र एकाच वेळीं आभाळांत राहून सारखेच प्रकाशमान व्हावे अशी अपेक्षा करण्या-सारखेंच व्यर्थ होतें. एका क्षितिजाच्या दोन टोकांवर राहूनच त्यांनीं आपापलें काम आपापल्या निम्म्या भागापुरतें करावें असाच ईश्वरी संकेत होता. आतां ते दोघेहि कालवश झाल्यानेंच त्यांची

नांवें जनतेच्या मुखांत एकत्र नांदूं शकतात. त्यांच्यांतील वाद दुष्ट स्वप्नाप्रमाणें लोक आनंदानें विसरले, व राजकारणी महाराष्ट्राची स्मृति जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत हे दोन राष्ट्रपुरुष एकदम सारखेच डोळ्यांपुढें आल्यावांचून राहणार नाहींत.

टिळकांप्रमाणें गोखल्यांच्याहि स्वभावांत व्यंगें नव्हतीं असें नाहीं. ते तापट नसले तरी त्रासिक होते. त्यांचा स्वभाव थोडा हाळवा व चिरचिरा होता. वेळ आली असतां कोणाला टाकून बोलणार नाहींत किंवा त्याचा पाणउताराहि करणार नाहींत असें नव्हतें. टिळकांनीं त्यांची निंदा केली, तशी त्यांनींहि टिळकांची करावयाला सोडलें नाहीं. टिळकांची एक प्रकारची तर त्यांची दुसऱ्या प्रकारची. पुण्याच्या दुखवट्याच्या सभेंत एका वक्त्यानें केलेलें त्यांचें वर्णन येथें दिलें असतां अप्रस्तुत होणार नाहीं. " ॲरिस्टॉटल याच्या व्याख्येप्रमाणें गोखल्यांनीं अवगुण व गुणातिरेक या दोहोंमधल्या सुवर्णबिंदूचा बरोबर वेध केला होता. त्यांच्या अंगीं धारिष्ट नव्हतें पण धैर्य होतें. तीव्र मतभेद-पात्रता होती, पण भांडखोरपणा नव्हता. शब्दांत गोडी किंवा मवाळी होती, पण तोंडदेखलेपणा किंवा तोंडपुजेपणा नव्हता. त्यांचा शब्दस्पर्श मृदु, पण तत्त्वाला ते कठोर होते. त्यांनीं हातांत मखमालीचे हातमोजे घातलेले वाटले तरी आंत वळलेली मूठ लोखंडी किंवा पोलादी असे. ते सुविनीत असत, पण भिऊन वागत नसत."

न० चिं० केळकर

(टिळकचरित्र–खंड ३ रा)

**प्रश्न व सूचना**

( १ ) वक्तृत्व परिणामकारक होण्यास कोणते गुण आवश्यक आहेत हें सांगून गोखल्यांच्या अंगीं ते कितपत होते हेंहि सांगा.

( २ ) पुढील वाक्यांचा अर्थ सांगाः—

[ अ ] 'गोखल्यांचे व टिळकांचे ग्रह जमले नाहींत.'

[ आ ] 'गोखल्यांनीं अवगुण व गुणातिरेक या दोहोंमधल्या सुवर्णबिंदूचा बरोबर वेध केला होता.'

[ इ ] 'त्यांनीं हातांत मखमालीचे हातमोजे घातलेले वाटले तरी आंत वळलेली मूठ लोखंडी किंवा पोलादी असे.'

( ३ ) पुढील शब्दांचे अर्थ द्याः—मूर्धाभिषिक्त, प्रमेय, यावज्जन्म, हस्तगत, पर्यंकपंडित, शाळूमुत्सद्दी, कालवश.

( ४ ) पुढील वाक्यें पुस्तकांत न पाहतां पुरीं कराः—(पुस्तकांतीलच शब्द आले पाहिजेत असें नाहीं; अर्थ मात्र पुरा झाला पाहिजे.)

[ अ ] गोखल्यांच्या शब्दांत गोडी किंवा मवाळी होती पण ... ... ... ...नव्हता. त्यांचा शब्दस्पर्श मृदु पण तत्त्वाला ते... ... ...होते. त्यांच्या अंगीं धारिष्ट नव्हतें, पण...होतें.

[ आ ] गोखल्यांच्या भाषणांत आवेश असला तरी... ... नसे. आणि मर्मज्ञपणा असला तरी... ... ...नसे.

---


## ही आमची समाजव्यवस्था !

[ प्रो० वा. म. जोशी यांनीं लिहिलेल्या 'सुशीलेचा देव' या कादंबरींत सुशीला ही नायिका आहे. तिला दुर्दैवानें वैधव्य प्राप्त झालें असून लोणावळें येथील मिशनऱ्यांनीं चालविलेल्या क्राइस्टस क्रॉस चर्च नांवाच्या एका कल्पित शाळेंत तिला राहावें लागलें आहे. या शाळेच्या मिश्र विद्यार्थि-गृहांत कांहीं दिवस राहिल्यावर तिनें आपल्या वडिलांना पुढील पत्र लिहिलें आहे. या पत्रांत तिला कोणत्याहि धर्माची निंदा किंवा स्तुति करावयाची नसून तोंडानें धर्म धर्म म्हणत असतांना आपण खरी धर्मबुद्धि कशी विसरत चाललों आहोंत व निकृष्ट वर्गाकडे कसें दुर्लक्ष करीत आहोंत हें दाखविण्याचा तिचा हेतु आहे. ]

लोणावळें,
ता. ..........

प्रिय तात्या यांस सा. न. वि. वि.—

आपण व आई मला भेटून गेल्यापासून शारीरिक दृष्ट्या माझी



वा. म. जोशी

खुशाली आहे; पण मनांत फार गोंधळ माजून राहिला आहे. मी मनानें बाटत आहें—म्हणजे क्रिस्ती धर्माकडे माझा ओढा अधिक होत आहे असें नव्हे तर हल्लींच्या सर्व धर्मांचा व प्रचलित समाज-व्यवस्थेचा (म्हणजे अव्यवस्थेचा) मला तिटकारा येत चालला आहे. प्रत्येक धर्मांतील तत्त्वें चांगलीं असतात, पण त्या तत्त्वांचा व्यवहारांत कांहींच उपयोग होत नाहीं; उलट हे धर्म कांहीं वाईट चालीरीतींना व नामधारी 'समाज-व्यवस्थेला' पाठिंबा देऊन गरिबांच्या नाशाला कारणीभूत होत आहेत असें माझें मत होत चाललें आहे. एकच गोष्ट पाहून माझें मत बदलत चाललें आहे असें नाहीं. जगांतील अनेक व्यवहार पाहून मला असें वाटूं लागलें आहे कीं, एक अजिबात विचार करण्याचें तरी टाळावें किंवा धार्मिकदृष्ट्या क्रान्तिकारक तरी बनावें. ही वृत्ति नुकतीच फार बळावली आहे आणि त्याला कारण पुढील अनुभव.

" आमच्या वसतिगृहाच्या शेजारीं रेल्वेवर माती, खडी वगैरे गाढवांवर वाहून नेणाऱ्या वडारी लोकांचीं पालें आहेत. इतके

दिवस आम्ही येथें आहोंत; पण त्या पालांत कधीं आम्ही गेलों नव्हतों. त्या लोकांशीं कधीं बोललोंहि नाहीं. जणूं कांहीं त्यांचीं गाढवं आणि ते यांमध्यें फरक नाहीं असें आम्ही त्यांना लेखीत होतों. आणि खरोखर म्हणावयाचें म्हणजे तेहि गाढवासारखेच वागत होते! दहाबारा दिवसांपूर्वीं एकाला कांहीं रोग झाला, तेव्हां त्याच्या बायकामुलांनीं रडण्यास आरंभ केला, आणि पुरुष मंडळी कांहीं तरी अघोरी उपाय करूं लागली. एकजण अगदीं जवळच असलेल्या डॉक्टराकडे गेला; पण त्या साहेबाच्या ख्रिस्ती धर्मानें त्याला कांहीं बुद्धि दिली नाहीं कीं फी मिळण्याची आशा नसली तरी गरिबांना औषध द्यावें! मागाहून हिंदु वैद्य, मुसलमानी हकीम, पारशी डॉक्टर, सगळ्यांकडे तो गेला; पण कोणी कांहीं आलें नाहीं. शेवटीं तो आमच्या मिसेस स्वीटबाईकडे भीतभीत आला आणि हातांपायां पडून कांहीं तरी औषधपाणी द्या म्हणून म्हणूं लागला. मी, मास्टर काफ नांवाचा माझा एक शाळेंतला मित्र, आणि दोनचार मुली व मुलगे त्या दिवशीं बॅडमिंटन्च्या मॅचिस खेळून झाल्यावर मिसेस स्वीटबाईनें प्रेमपूर्वक बोलाविलें होतें म्हणून चहा पिण्यास त्यांच्याकडे गेलों होतों. आम्हीं ती सगळी हकीगत ऐकली आणि या गरिबाला मदत करण्याला जाऊं या असें म्हटलें. स्वीटबाईहि तयार होत्याच. त्यांनीं सामान्य घरगुती औषधांच्या दोनतीन बाटल्या घेतल्या व आम्ही सगळींजणं वडाऱ्याच्या पालांकडे निघालों. गेलों तों तेथें काय, जिकडेतिकडे आकान्त चालला होता. रोगी ज्या पालांत होता त्यांत स्वीटबाई आणि मी वांकून कशा तरी शिरलों. उभं राहण्यास जागा नव्हती. आंत देखील एवढीशी जागा, पण त्यांत तो रोगी आणि त्याच्या-भोंवतीं दोन पुरुष आणि दोन म्हाताऱ्या बाया, आणि आसपास

घाणेरड्या गोधड्यांवर बसलेलीं तीन मुलें आणि निजलेलें अंगावरचें मूल ! रोग्याच्या उशाशींच एक चूल ! त्यांत गोंवऱ्या घातलेल्या होत्या आणि त्यामुळें त्या पालांत धूर भरून राहिला होता. मिसेस स्वीटबाईनें ओरडणाऱ्या त्या सगळ्यांना आधीं गप्प बसविलें आणि मग त्या चौकशी करूं लागल्या. त्या वडाऱ्याची दहाबारा वर्षांची मुलगी होती तिनें आपल्या धाकट्या भावांना जवळ घेतलें होतें. तिची आई नुकतीच वारली होती आणि एवढ्या वयांत त्या पोरांचा सांभाळ करण्याचा भार तिच्यावर पडला होता ! तिनें प्रथम माझे आणि मग स्वीटबाईचे पाय धरले आणि ओक्साबोक्सीं ती रडूं लागली. रोग्याजवळ बसलेल्या बायांनीं तिची सगळी हकीगत सांगितली. आम्हीं तिला उगी केलें आणि विचारपूस करून कांहीं औषध देण्याच्या उद्योगाला लागलों. पिण्याच्या पाण्यांत परमँगनेट (Permanganate) घालून द्यावें म्हणून स्वीटबाईनीं मोठें भांडें भरून पाणी मागितलें. पण घरांत भांडेंच रिकामें नव्हतें ! अखेर एक कटोरें मिळालें; पण पाणीच मिळेना ! एका मातीच्या गाडग्यांत बुडाशीं थोडें राहिलेलें गढूळ पाणी शेवटीं मिळालें. त्यांत तें परमँगनेट किंचित् घालून लाल करून रोग्याला पिण्याकरितां दिलें व मग औषधाची बाटली देऊन आम्ही बाहेर पडलों. मिसेस स्वीट अगदीं घाबरलेल्या दिसल्या. त्या म्हणाल्या : “ ही कॉलऱ्याची केस आहे. तुम्ही माझ्याबरोबर उगाच आलांत. आतां घरीं गेल्याबरोबर डिसूइन्फेक्टंट घालून अंघोळ करा; आणि कपडे वाफारून परटाकडे द्या.” मास्टर ‘काफ’नें शेजारच्या पालांत राहणाऱ्या वडाऱ्यांकडून पुष्कळ माहिती काढिली होती त्यावरून त्यालाहि ही कॉलऱ्याची केस आहे असें कळून चुकलें होतें; पण तो स्वतः-विषयीं न घाबरतां ज्या समाजव्यवस्थेनें या लोकांना अशा अज्ञानांत

आणि दारिद्र्यांत ठेविलें त्या समाजव्यवस्थेला रागारागानें शिव्याशाप देऊं लागला. “ ही पहा आमची भांडवलशाही; हा पहा तुमचा हिंदु-धर्म; यांना तुम्ही अस्पृश्य समजतां ना ?” तो मला म्हणाला.

“ यांना नाहीं आम्ही अस्पृश्य समजत, –महार, मांग वगैरेंना अस्पृश्य समजतों ” मीं उत्तर दिलें.

“ पण अस्पृश्यांप्रमाणें वागवतां तर खरें ना ? मी तुम्हां हिंदूंनाच दोष नाहीं देत, –भांडवलशाहींतले सगळे धर्म आणि सगळे लोक सारखेच. युरोपियन, पारशी, मुसलमान–कोणी तरी डॉक्टर येथें आला का ? माणसाची किंमत नाहीं, पैशाची किंमत आहे या जगांत. This must be done away with. ”

अशा रीतीनें तो चेवाचेवानें बोलूं लागला तेव्हां मिसेस स्वीटनें त्याला दाबलें व तोहि मग बराच गप्प राहिला. ( पूर्णपणें गप्प राहणें काफच्या स्वभावांतच नाहीं ! ) या काफबद्दल मी घरीं आलें होत्यें तेव्हां पुष्कळ गोष्टी मीं तुम्हांला सांगितल्या आहेत. त्याचा उतावळेपणा, घायकुतेपणा, प्रेमळपणा व रागीटपणा हे सर्व गुण अतिरेकामुळें हास्यास्पद होतात, पण मला तरी तो आवडतो; आणि म्हणूनच त्याच्याशीं मी स्नेह करत्यें. त्याला सुटीमध्यें आपल्या घरीं बोलवूं काय ? त्याची इच्छा आहे, पण मिसेस स्वीट पाठवितील किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. पण या पुढच्या गोष्टी आहेत. वडाऱ्यांबद्दल लिहीत होत्यें ती हकीकत राहिलीच ! औषधपाणी देऊन व पाणी तापवून पिण्यास सांगून आम्ही तेथून निघालों. घरीं आल्यावर आम्ही अंघोळी करून कपडे बदलले. पण त्या वडाऱ्यांना आणि त्यांच्या मुलाबाळांना कोण अंघोळ घालतो आणि त्यांचे कपडे कोण बदलतो ? अखेर जें व्हावयाचें तेंच झालें.

७०–८० वडारी एका आठवड्यांत पटकीला बळी पडले! 'पटकीला बळी पडले' म्हटलें, पण हे पटकीला बळी पडले का आपल्या 'समाजव्यवस्थेला' हा मला व काफला प्रश्नच पडला आहे. याचें उत्तर, तात्या, तुम्ही द्याल काय? ही समाजास्थिति बदलतां येणार नाहीं काय? काफ आणि मी दोघांनीं तरी बदलण्याची प्रतिज्ञा केली आहे. पोरपणाची प्रतिज्ञा म्हणून हंसाल तुम्ही, पण हंसण्यावारी दवडण्याचा हा प्रश्न नाहीं. सध्यां अधिक लिहीत नाहीं.

बळवंतरावांना व सुनंदरावांना नमस्कार कळविणें. बळवंतरावांच्या पत्नीला थोडा ताप येत असतो असें मागील पत्रांत लिहिलें होतेंत. ताप कसा आहे तो कळवावा.

—सुशीला"

ता. क.—"वडाऱ्याची मुलगी व तिचे धाकटे तीन भाऊ यांना भाड्याचे पैसे देऊन मीं पुण्यास एका मिशनमध्यें पाठविलें आहे. हीं मुलें बाटतील व हिंदु धर्माला मुकतील हें खरें; पण हिन्दु धर्मानें त्यांच्याकरितां काय केलें आहे? मुलीच्या शिक्षणाचा खर्च मी सोसणार आहें; लहान मुलांचा मिशनमार्फत होईल असें मिसेस स्वीटबाई म्हणाल्या. असल्या मुलांची सोय कशी लावावयाची याबद्दल समाज विचार करीत नाहीं. कादंबऱ्या-नाटकांना प्रेमाशिवाय विषयच नाहींत; राजकारणी पुरुषांना 'स्वराज्या'शिवाय दुसरें कांहीं सुचत नाहीं; समाजसुधारकांना विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, ब्राह्मण-ब्राह्मणेतर असलेच विषय सुचतात! गरीब महार-मांग, वडारी-डोंबारी यांची स्थिति कशी असेल, ही स्थिति अशी कां, ती कशी सुधारावयाची, याचा कोणीच विचार करीत नाहीं! मला तर काफप्रमाणेंच वाटूं लागलें आहे कीं, सर्व समाज किडलेला—सडलेला 'rotten' झालेला आहे. तो सुधारण्याला उपाय म्हणजे पूर्वींची

मूर्खपणाची धर्म-'व्यवस्था' व समाज-'व्यवस्था' मोडून टाकली पाहिजे. माझीं हीं मतें चुकीचीं असतील, 'आहेतच' अशी मी आपलीं सध्यां समजूत करून घेत्यें. पण तुमच्याशीं याविषयीं बोलूं नये तर कोणाशीं बोलूं? सुटीमध्यें तुम्ही, बळवंतराव, सुनंदराव, काफ वगैरे मंडळी एकत्र जमून आपण जर चर्चा केली तर किती चांगलें होईल! पण या पुढच्या गोष्टी! असो. ताजाकलम फारच वाढला, पण इलाज नव्हता.

-सुशीला"

वा० म० जोशी
( सुशीलेचा देव )

### प्रश्न व सूचना

( १ ) निकृष्ट वर्गांतील एखाद्या झोंपडीचें व तेथील परिस्थितीचें वर्णन मित्राला पत्र लिहून २० ओळींपर्यंत करा. ती परिस्थिति पाहून तुमच्या मनांत कांहीं विचार आले असल्यास तेहि पत्रांत लिहा. (वरील उताऱ्यांतील विचारांप्रमाणेंच तुमचे विचार असले पाहिजेत असें मुळींच नाहीं.)

( २ ) गरीब व अशिक्षित लोकांना उपयोगी पडण्याचे क्षुल्लक का होईनात पण तुमच्या आंवाक्यांतले कांहीं प्रकार सांगून त्यांतला कोणता प्रकार तुम्हांला विशेष आवडतो हें व्यावहारिक उदाहरणें देऊन सांगा.

( ३ ) " मला तर वाटूं लागलें आहे कीं समाज किडलेला-सडलेला 'Rotten' झाला आहे." हें सुशीलेचें मत तुम्हांला कितपत खरें वाटतें हें तुमच्या भोंवतालच्या परिस्थितींतील कांहीं उदाहरणें देऊन ३० ओळींत सांगा.

( ४ ) पत्रांत घरगुती मजकुराबरोबर सामाजिक किंवा धार्मिक स्वरूपाची चर्चा येणें तुम्हांला कितपत स्वाभाविक वाटतें ?

'प्रकृति ठीक आहे, अभ्यास ठीक चालला आहे, काळजी नसावी, पैसे जरूर पाठवावेत' अशा प्रकारच्या केवळ ठराविक ठशाच्या मजकुराचीं पत्रें नेहमीं पाठविणें तुम्हांला कितपत आनंददायी वाटतें ?

क्रमांक ३६३ ता. ...३८

# नगरसौंदर्य

[ सदरहु उतारा डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या 'संकीर्ण लेखां'त आलेल्या 'नगर-संवर्धन आणि नगर-सौंदर्य' या निबंधांतून घेतलेला आहे. या विषयाकडे सामान्यतः दुर्लक्ष केलें जातें. परंतु तो भावी नागरिकांचे दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा आहे हें सदरहु लेखावरून समजून येईल. डॉ० केतकर यांनीं अनेक देशांत प्रवास केला आहे, व समाजशास्त्राचा खोल अभ्यास केला आहे. त्यांची दृष्टि व्यापक असून त्यांचे विचार स्वतंत्र असतात. हे सर्व गुण या लेखांत थोड्याफार प्रमाणांत दिसून येतात. ]

ज्याप्रमाणें आपण एखादें घर बांधीत असतां केवळ सोईकडे



डॉ० श्री. व्यं. केतकर

लक्ष दिल्यानें भागणार नाहीं त्याप्रमाणेंच नगररचनेची गोष्ट होय. नगररचना सुंदर असली पाहिजे. इटली, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका या देशांत नगरसौंदर्याचें महत्त्व लोक चांगलेंच ओळखूं लागले आहेत. तिकडील एखादें लहानसें खेडें का असेना, त्याच्या सौंदर्यवृद्धीकडे लोकांचें लक्ष असतेंच. आपल्या लोकांत सौंदर्याभिज्ञताच[1] फारशी नाहीं. ती आपणांत उत्पन्न झाली म्हणजे तिचा परिणाम प्रत्येक गोष्टीवर घडून येईल. एखाद्या खटपटी मनुष्यानें शहराचें सौंदर्य वाढविण्यासाठीं हातीं सत्ता आली असतां खडतर उपाय

१ सौंदर्य ओळखण्याची पात्रता.

योजिले तर तो मनुष्य लोकांत प्रिय न होतां अप्रिय होईल. जी परिस्थिति शहरांत उत्पन्न करावयाची असेल त्या परिस्थितीची आवश्यकता अनेक तऱ्हेची चर्चा करून लोकांस भासवून दिली पाहिजे. ज्याप्रमाणें एखाद्या राष्ट्रास स्वतंत्रता कोणीं मिळवून दिली तथापि त्या स्वतंत्रतेची महती राष्ट्रांतील व्यक्तींस भासून आली नाहीं म्हणजे ती स्वतंत्रता देखील टिकावयाची नाहीं; स्वतंत्रता मिळवून देणारा मनुष्य निजधामास गेला म्हणजे त्या राष्ट्राची लवकरच राखरांगोळी उडते, त्याप्रमाणेंच सुधारणांची गोष्ट आहे. सुधारणा कोणावरहि सर्वस्वीं लादतां यावयाची नाहीं. नगर-सौंदर्याची अभिरुचि लोकांत उत्पन्न केली पाहिजे व थोड्या अंशीं-पण फारच थोड्या अंशीं–सुधारणा लादण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, नव्या गोष्टींसंबंधानें सामान्य जन साशंक असतो व कांहीं अंशीं त्यांस भीत देखील असतो. तथापि एकदां एखादी सुधारणा आली व तिची संवय लोकांना झाली म्हणजे तिच्याशिवाय लोकांचें चालेनासें होतें. सुंदर वस्तु पाहण्याची व सुंदर शहरें पाहण्याची लोकांस संवय झाली म्हणजे बेढब व घाणेरडीं शहरें दृष्टीस दुखवि-तात. ज्याप्रमाणें एखादा मनुष्य संगीतशास्त्र शिकला म्हणजे बेसूर गाणें त्याच्या कानांस दुःख देतें, त्याप्रमाणेंच दृष्टिसुखाची देखील गोष्ट आहे. अमेरिकेंतून मनुष्य जाऊन आला म्हणजे हिंदुस्थानांतील दैन्य अगोदर दृष्टीसच त्रास देतें.

शहराचें सौंदर्य सुधारावयाचें तें केवळ आपल्या दृष्टीचें कोड पुरविण्यासाठीं नव्हे. त्याचे सांपत्तिक स्थितीवर देखील परिणाम घडून येतात. जे लोक आपलें शहर अधिक सुंदर करतील ते आपल्या शहराची संपत्ति देखील वाढवितील. आज पॅरिस शहरास जें वैभव आहे व उत्पन्न आहे त्याचा बराच भाग तें शहर पाहण्या-

साठीं आलेल्या लोकांकडून आहे. या रीतीनें जो प्रत्यक्ष फायदा होतो त्यापेक्षां व्यावहारिकदृष्ट्या अप्रत्यक्ष फायदा बराच आहे. ज्या लोकांची अभिरुचि देखील सुशिक्षित आहे त्या लोकांत् ती प्रत्येक वस्तूच्या घडणीवर परिणाम करिते. शहराचें सौंदर्य कांहीं अंशीं सुशिक्षित अभिरुचीचें फल होय व कांहीं अंशीं कारण देखील होय. अभिरुचि सुशिक्षित झाली म्हणजे लोकांस प्रत्येक वस्तु दिसण्यास सुंदर अशी हवी लागते; व त्या देशाचे कारागीर नेहमींच्या उपयोगाच्या चिजांमध्यें अधिकाधिक सौंदर्य वाढविण्याचा प्रयत्न् करितात. आपणांस कांहीं एक वस्तु खरेदी करावयाची झाली म्हणजे आपण तिच्या कामचलाऊ उपयुक्ततेकडे जसें लक्ष देतों, तसें सौंदर्याकडेहि देतों. जर आपणांस एखादा चाकू घ्यावयाचा असेल तर आपण त्याची धार पाहतों. पुस्तक विकत घेतांना केवळ आंतील मजकुराकडेसच लक्ष देतों असें नाहीं तर त्याच्या छपाई-कडे, कागदाकडे देखील पाहतों. जीं मासिकें आपलें बाह्यांग सुधारण्याची खटपट करितात तीं आपला खप वाढवितात. एवंच, जर आपण आपल्या राष्ट्रांतील अभिरुचीचा विकास केला व चित्रादि ललितकलांचें शिक्षण जर आपल्या सर्व लोकांस दिलें तर आपल्या अपेक्षा देखील वाढतील. मग आपल्या देशांतील कारा-गिरांस चित्रादि ललितकलांचें शिक्षण मिळवून जिनसा निर्माण कराव्या लागतील व आपल्या व्यापारास अधिक उत्तेजन येईल. मनोहर दिसणारा आपल्या देशांतील माल परदेशीं देखील खपा-वयास लागेल आणि आपले ग्राहक व आपले कारागीर यांची अभिरुचि एकच तऱ्हेची बनविली व ती उच्च प्रकारची केली म्हणजे आपल्या श्रेष्ठप्रतीच्या गरजा परदेशीयांस पुरवणें अशक्य होईल.

आज आपल्या देशांतील अभिरुचि सुधारली नाहीं व आजच शहरांचे व्यवस्थापक सौंदर्याचीं तत्त्वें लोकांवर दडपूं लागले तर तें लोकांस आवडणारहि नाहीं. शिवाय दुसरी गोष्ट अशी आहे कीं, आज ज्यांची सौंदर्याभिज्ञता वाढली आहे, असा आमच्यांत वर्गच नाहीं व त्यामुळें शहर सुंदर करण्यासाठीं नगराचे व्यवस्थापक खडतर उपाय योजितील असा संभवच नाहीं. आमच्या शहरांत आज इतकी घाण आहे कीं, आमच्या शहरांच्या पुढाऱ्यांचीं नाकेंच कोणीं कापून नेलीं आहेत कीं काय असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे.

आज आपणांस फार तर शहरांचें सौंदर्य बिघडविणाऱ्या ढोबळ चुकांपासून अलिप्त राहतां येईल.

आपल्या शहरांचें सौंदर्य वाढवावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं खालील गोष्टी म्युनिसिपालिटीकडून घडवून आणाव्यात.

शहराच्या ज्या भागांत सुंदर बंगले असतील त्याच भागांत सर्वत्र दुकानें घालूं देऊं नयेत, व लहानसहान झोंपड्या बांधूं देऊं नयेत. ज्या लोकांच्या सुंदर घराशेजारीं घाणेरडीं घरें बांधण्याचा कोणी इरादा करील तर त्याविरुद्ध म्युनिसिपालिटीकडे त्यांनीं आपला जोराचा निषेध कळवावा. घाणेरडें घर जवळ बांधूं दिल्यानें आपल्या जागेची किंमत कमी होते म्हणून कोर्टांत नुकसानीचा खटला आणला तरी देखील चालण्यासारखें आहे. आपल्या देशांत यासंबंधानें अनास्था फार मोठी आहे. कलकत्त्यास तर फारच दिसून येते. एखाद्या सुंदर राजवाड्यासारख्या तीन चार लाख रुपये किंमतीच्या घराशेजारींच झोंपड्या बांधल्या जातात व त्यांत अगदीं निकृष्ट दर्जाची व अत्यंत घाणेरडी वस्ती येऊन राहते. घरें कशीं असावींत यासंबंधीं म्युनिसिपालिट्यांनीं कायदे केले पाहिजेत.

तसेंच शहरांतील मुख्य रस्ते सुंदर ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखाद्या सुंदर रस्त्यावर खाटकाचें, भडभुंजाचें अगर मिठाईवाल्याचें दुकान येऊं देऊं नये. हे सर्व दुकानदार घाणेरडीं लखतरीं वापरणारे असतात. जे माल तयार करितात तेच विक्रीत बसतात. या कारणानें त्यांना स्वच्छ कपडे घालून माल विकीत बसणें शक्यच नाहीं. असलीं दुकानें गल्ल्याकुच्यांतूनच असलेलीं बरीं. शहरांतील श्रेष्ठ आणि सुशिक्षित वर्गानें अशिक्षितांस व घाणेरड्या लोकांस शिस्त लावून देणें हें कर्तव्यकर्म आहे, ही गोष्ट आपण विसरतों असें दिसतें. कलकत्त्यांत तर कांहीं दुकानदार दुकानाच्या पुरोभागींच आपल्या अंगास तेल चोपडीत बसतात. असल्या प्रकारचे देखावे डोळ्यांस अत्यंत दुःसह होतात. असले देखावे दृष्टीस पडत असले म्हणजे त्या भागांतून सभ्य स्त्रियांस जाण्याची देखील लाज वाटेल. असल्या दुकानदारांस शहरपोलीसकडून पकडवून जर पंचवीसतीस रुपये दंड करविला तर त्यांचें वर्तन सुधारेल असें वाटतें. नागरिकांनीं कसें वागावें यासंबंधाचीं पत्रकें काढून जरी म्युनिसिपालिटीच्या लोकांनीं वारंवार उपदेश केला, तरी तो हवाच आहे. कायदा करण्याच्या अगोदर लोकांस असा उपदेश केलेला बरा. कारण कायद्यास अनुकूल असें लोकमत जोंपर्यंत तयार झालें नाहीं तोंपर्यंत त्या कायद्याचा भंग लोकांकडून वारंवार होणार व सर्वांवरच फिर्याद करून त्यांस शिक्षा करणें हें शक्य नसतें. जो कायदा अमलांत आणावयाचा तो आणण्याअगोदर त्या नियमानें वागणारे कांहीं लोक तयार झाले पाहिजेत. म्हणजे त्या लोकांचें कायद्यास पाठबळ मिळतें व ही गोष्ट गैरशिस्त आहे हें लोकांस भासविण्यास ते लोक उपयोगी पडतात. समजा, दुकानदाराच्या शिस्तीसंबंधानें कांहीं नियम शहरानें केले

व त्या नियमांप्रमाणें वागणारे कांहीं दुकानदार अगोदरच असले तर ते दुकानदार त्याप्रकारच्या नियमांचें समर्थन इतर दुकानदारांपाशीं बोलतांना करतील. फायदे कळविणें, महत्त्व कळविणें, उपदेश करणें या गोष्टी अगोदर करून मागाहून सक्ति केली पाहिजे.

असो, या विषयावर लिहावें तेवढें थोडेंच आहे. मीं येथें जें लिहिलें आहे, त्याचाच थोडाबहुत विचार केला व निरनिराळ्या शहरांच्या व्यवस्थापकांनीं व प्रमुख नागरिकांनीं थोड्या अंशानें तरी पूर्वोक्त विचार कृतींत उतरविण्याची खटपट केली म्हणजे पुष्कळ झालें.

डॉ० श्री० व्यं० केतकर
( संकीर्ण लेख )

## प्रश्न व सूचना

( १ ) नागरिकांत सौंदर्याभिरुचि उत्पन्न झाली असतां सांपत्तिकदृष्ट्या, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कसे फायदे होतात हें सांगा.

( २ ) नगररचनेसंबंधींचे आपले सुविचार कृतींत आणण्याकरितां काय केलें पाहिजे ?

( ३ ) पुढील शब्दांचे किंवा शब्दसमूहांचे अर्थ सांगा:— साशंक, दुःसह, निजधामास जाणें, कोड पुरविणें.

( ४ ) एक अत्युत्तम शहर तुम्हांला वसवावयाचें आहे व सर्व प्रकारची अनुकूलता आहे अशी कल्पना करा. तुमचें शहर कसा प्रकारचें असेल हें ४० ओळींत सांगा.

# सुहास्य

[ या 'गुजगोष्टीं'त प्रो० नारायण सीताराम फडके यांनीं सुहास्यापासून फायदे काय, मनुष्यानें नेहमीं हंसतमुख असण्याचा कां प्रयत्न करावा इत्यादि गोष्टींचें विवेचन सोप्या व सुंदर भाषेंत, दृष्टान्त वगैरे देऊन फार मार्मिकपणें केलेलें आहे. विषय साधा असून त्याची मांडणी व सजावट किती सुरेख केलेली आहे हें पाहण्यासारखें आहे. ]

स्त्रीचें काव्यमय वर्णन करावयाचें झालें कीं, तिला सुहासिनी हें विशेषण देण्याचा प्रचार आहे. सरल नासिका, लांब सडक काळे केस, प्रफुल्ल नेत्र, याप्रमाणेंच सुहास्यामुळेंहि स्त्रीच्या सौंदर्याला शोभा येते हें सर्वमान्य आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, सुहास्य हें स्त्रीच्या बाबतींत तेवढें आल्हादकारक आहे, आणि पुरुषाच्या बाबतींत नाहीं. खरें पाहतां हंसतमुख हें उमलल्या कळीप्रमाणें किंवा चतुर्थीच्या चंद्रकलेप्रमाणें आहे. तें कोठेंहि दिसलें तरी पाहणारांची वृत्ति प्रसन्न झालीच पाहिजे. तरुणीच्या सुहास्यांत कधीं कामुकता, कधीं साधी प्रसन्नता, तर कधीं नुसता विनय, असे निरनिराळे विकार प्रकट होतील; पण हास्याची उत्पत्ति कोणत्याहि मनोवृत्तींतून झाली तरी त्याची आकर्षकता सदा सारखीच असते; आणि कामिनीच्या तोंडावर विलास करणाऱ्या भावपूर्ण हास्या-



प्रो० ना. सी. फडके

प्रमाणेंच लहान अर्भकाच्या तोंडावरचें भावशून्य साधेंसुधें हास्यहि मनोरम वाटतें. इतकेंच काय, ज्याच्या तारुण्याची सारी सौंदर्यसंपत्ति नाहींशी झाली आहे अशा म्हाताऱ्याच्या, किंवा ब्रह्मदेवानें ज्याच्या हातीं सौंदर्यसंपत्तीची एक पैहि लागूं दिली नाहीं अशा एखाद्या कुरूप पुरुषाच्या तोंडावर चमकणारें हास्यहि, तें अंतःकरणापासूनचें असेल तर, आनंददायक वाटल्यावांचून राहात नाहीं. कुरूप स्त्रीनें किंवा पुरुषानें भूषणांचा किंवा वस्त्रालंकारांचा सोस केला, कीं तें दृश्य रमणीय वाटण्याऐवजीं उपहासास्पदच वाटतें. नकट्या नाकावरची मोरणी, हाडकुळ्या उंच मानेंतल्या पोतपेट्या, काटकुळ्या दंडावरच्या वांकी आणि काळ्याकभिन्न देहावरचें कोईमतुरी गुलाबी पातळ, हीं सर्व आल्हादापेक्षां विनोदाचींच उत्पत्तिस्थानें ठरतील; आणि त्याचप्रमाणें कोळशाचा रंग आणि उंसाच्या चिपाडाचें सौष्ठव अंगीं असणाऱ्या एखाद्या तिरळ्या माणसानें भिकबाळी-सलकड्यांचा थाट केला आणि रेशीमकांठी धोतरउपरण्यांचे सोंगे सोडले तर तें पाहून पाहणाऱ्या डोळ्यांना समाधान वाटण्याऐवजीं वीटच येईल. परंतु सुहास्याची गोष्ट मात्र अशी नाहीं. हंसणारी व्यक्ति कशीहि असली तरी तिचें सुहास्य पाहणाराच्या मनाला प्रसन्न करील. शेवाळाच्या अलंकारानेंहि कमळ सुंदरच दिसतें, या कालिदासाच्या उक्तींत जरा पालट करून असें म्हणतां येईल, कीं सुहास्य हा अलंकार असा आहे, कीं तो कोणत्याहि मुखकमलावर मनोहरच वाटतो.

आणि याचें कारण हें कीं, हा अलंकार कृत्रिम नसून नैसर्गिक आहे. सुहास्य हें एका अंतःप्रवृत्तीचें चिन्ह आहे. व ती अंतःप्रवृत्ति अत्यंत रमणीय अशी आहे. या अंतःप्रवृत्तीला तुम्ही कोणतेंहि नांव द्या; किंवा तिला कोणतेंहि नांव दिलें तरी तिचा बोध नीटसा

होणार नाहीं अशी ती गूढ आहे असें वाटल्यास म्हणा; पण येवढें खास, कीं ती आकर्षक आहे. जगाच्या व्यवहारांत हरघडी कांहीं अंतःकरणें एकमेकांकडे आकर्षित केलीं जात असतात, आणि कांहीं परस्परांपासून अलग होत असतात. यांपैकीं दोन अंतःकरणांचें आकर्षण ज्या ज्या वेळीं होतें त्या त्या वेळीं तेथें वर सांगितली ती अंतःप्रवृत्ति उत्पन्न झालेली असते. ही अंतःप्रवृत्तीच सुहास्यरूपानें प्रकट होते; आणि म्हणूनच सुहास्याचा अलंकार नैसर्गिक असून त्याची शोभा कांहीं वेगळीच असते असें म्हटलें पाहिजे. सौंदर्य हें बाह्यांगामध्यें किंवा वस्त्रालंकारांमध्यें नसून अंतःकरणाचें जें सौंदर्य तेंच खरें सौंदर्य असें सर्व कवि व तत्त्ववेत्ते सांगतात; आणि हें जर खरें तर सुहास्याचें सौंदर्य सर्वांत उच्च दर्जाचें होय यांत शंका नाहीं.

शिवाय असें कीं, सुहास्याचा हा अलंकार निसर्गनिर्मित असूनहि त्याची इच्छा करतांच तो मनुष्याला प्राप्त होतो. शरीर-सौंदर्याची आणि वस्त्रालंकाराची गोष्ट अशी नाहीं. गरीब कारकुनाच्या पत्नीनें मोत्याच्या कंकणांची कितीहि वांच्छा केली तरी ती 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः' या सदरांतच जाणार! वाढप्याच्या बायकोला बुट्याच्या काळ्या शालूची केवढीहि हौस वाटली तरी ती हौस तिच्या नेसत्या जुनेराइतकीच अपुरी राहणार! आणि बागेंतल्या वाटा झाडणाऱ्या माळ्याच्या मुलाला राजासारखे विविध रंगांचे साफे बांधावेसे वाटले तरी त्याच्या डोक्यावर जन्मभर मळकट मुंडासेंच राहणार! शरीरसौंदर्याची प्राप्ति तर सर्वस्वीं मनुष्याच्या सत्तेबाहेरची असते. वस्त्रालंकार मिळवितां आले नाहींत तर निदान उसने मागून आणतां येतील, किंवा तितका अट्टाहास करावयाचाच झाला तर चोरून आणतां येतील! पण शरीरसौंदर्य

म्हणजे विधीनें कायमची ओढलेली काळ्या दगडाची रेषा ! नकट्या नाकाच्या स्त्रीला चांफेकळीसारखें नाक नकोसें का असतें ? अरुंद कपाळाच्या आणि रुंद जिव्हणीच्या बाईला आपल्या अवयवांच्या मापांत अदलाबदल झाली असती तर बरें झालें असतें असें वाटतं का नाहीं ? रंभेच्या रूपाचा अलौकिकपणा कुब्जेलासुद्धां कळत का नसतो ? पण तो सर्वस्वीं पराधीन आहे याचीहि जाणीव तिला असते. सारांश, शरीरसौंदर्याचा अलंकार निसर्गनिर्मित असला तरी तो सर्वांना सारखा वापरतां येण्यासारखा नाहीं. उलट सुहास्याचा अलंकार मात्र असा आहे, कीं तो जितका अकृत्रिम आणि नैसर्गिक तितकाच सर्वांच्या आटोक्यांतील आहे. रानावनांत झुळझुळ वाहणाऱ्या ओढ्याच्या कांठीं फुललेल्या वेलीवरील फुलाप्रमाणें सुहास्याचें भूषण कोणींहि ल्यावें, आणि तें धारण करून स्वतःची प्रसन्नता इतरांच्या ठिकाणीं उत्पन्न करावी.

होय ! इतरांच्या ठिकाणीं उत्पन्न करावी ! कारण, सुहास्य हें ज्या भावनेचें चिन्ह आहे ती इतर भावनांप्रमाणेंच संसर्गजन्य आहे. एकाचें अंतःकरण शोकविव्हल होऊन त्यानें हुंदका दिला कीं दुसऱ्यालाहि न कळत हुंदका येतो; आणि अंतःकरणाच्या पूर्ण प्रसन्नतेनें एकजण हंसला, कीं दुसऱ्याचेहि ओंठ हळूच हालल्याखेरीज राहात नाहींत. किंबहुना असें म्हणतां येईल कीं, सर्व मानवी अंतःकरणाचा समुच्चय हा एखाद्या जलाशयासारखा आहे. त्याच्या एका भागांत जे तरंग उठतील त्यांची प्रतिक्रिया घडून इतर भागांतहि ते उठलेच पाहिजेत. हंसण्याच्या ऐन भरांत आलेल्या मनुष्याला रडण्याचा आक्रोश ऐकूं आला तर त्याचा आनंद क्षणमात्र विरघळल्यावांचून राहणार नाहीं. उलट, भोंवतालचीं सारीं माणसें आनंदानें हंसत-खिदळत असतांना आपलें दुःख न विसरणारा,

आणि चेहवऱ्याची विषण्णतेची छाया कायम राहूं देणारा मनुष्य क्वचितच आढळेल.

भावनांचा संसर्ग फार विलक्षण असतो. एकाचे विचार दुसऱ्या माणसाला पटावयास फार अवधी लागतो; पण भावनांचा संचार अतिशय शीघ्र वेगानें होत असतो. महंमदाच्या धर्मतत्त्वांची उच्चता त्याच्या समकालीनांना कळेना; आणि म्हणूनच आपल्या पत्नीला ती पटली हें पाहतांच त्याला अमर्याद आनंद झाला. पण ज्या लोकांना महंमदाच्या मतांची थोरवी कळणें कठीण होतें, याच लोकांवर, इतर धर्मपंथांचा उच्छेद करण्यास्तव उच्चारलेल्या 'अल्ला हो अकबर' या गर्जनेंतील भावनेचा पगडा सहज बसला.. विचार किंवा मतें हीं मधाप्रमाणें होत. एका अंतःकरणांतून दुसऱ्या अंतःकरणांत त्यांचें प्रसरण व्हावयास उशीर लागतो. भावना किंवा विकार मात्र तैलबिंदूप्रमाणें शीघ्रगामी असतात. रागद्वेषादि भावना आगीच्या डोंबासारख्या अल्पकाळांत सर्व देशभर पसरतात हें इतिहासावरून सहज समजण्यासारखें आहे; आणि आनंद किंवा हर्षदेखील सुखस्पर्शी वायुलहरीप्रमाणें झटकन पसरतो याचा अनुभव रोजच्या व्यवहारांतसुद्धां हरघडीं मिळेल. म्हणूनच मीं म्हटलें कीं, जो अंतःकरणाची प्रसन्न वृत्ति ठेवून सुहास्य धारण करील तो इतरांच्या ठिकाणींहि प्रसन्नता उत्पन्न केल्यावांचून राहणार नाहीं.

यासाठींच सदा हंसतमुख असणाऱ्या माणसाचें महत्त्व मला फार वाटतें. सदा हंसतमुख असणारा मनुष्य सूर्यप्रकाशाइतकेंच लोकांचें हित करतो. मानवी शरीरांतील रोग घालविण्याचें सामर्थ्य सूर्यप्रकाशांत आहे, त्याप्रमाणेंच लोकांचीं कुढणारीं मनें प्रफुल्लित करण्याची शक्ति सुहास्यमुखी मनुष्यांत आहे. असा मनुष्य जेथें जेथें जाईल त्या त्या ठिकाणीं प्रसन्नतेचें वातावरण निर्माण करील

यांत संशय नाहीं. एखाद्या सभेंत आधींच भरपूर रोषनाई असली तरी सुहास्यवदन अशी एखादी व्यक्ति येथें आली, कीं आणखी पांच-पंचवीस दिवे एकदम प्रज्वलित झाल्यासारखें वाटतें. प्रत्यक्ष परमेश्वर आनंदमय आहे हें जर खरें, तर या कष्टमय अवनीतलावर हंसत-मुखानें वावरणारा मनुष्य एक प्रकारें परमेश्वराचेंच स्वरूप उघड करीत असतो असें मला वाटतें. विश्वकर्त्या प्रभूचें मानवी जीवांना पुन:पुन्हा स्मरण करून देणें हेंच ज्यांचें जीवितकार्य होतें ते नारदमुनि विनोदप्रिय आणि सदा सुहास्यवदन होते यांतील मर्महि हेंच होय.

पण हास्यवदनाची ही थोरवी फारच थोड्या लोकांना कळते. नीतिमान् असावें, धर्मशील असावें अशा उपदेशाचा कंठरव आपल्या कानींकपाळीं नित्य होत असतो. परंतु माणसानें सदासर्वदा सुहास्यवदन असावें असें कोणी कोणाला सांगतांना ऐकूं येत नाहीं. तसेंच म्हटलें तर कट्टया कर्मठ माणसापेक्षां नेहमीं हंसतमुख असणारा मनुष्य अधिक योग्यतेचा समजला पाहिजे. सकाळ-संध्याकाळ चार चार घटका जपजाप्य करणारा, भोजनापूर्वी देवदर्शन करण्याविषयीं दक्षता ठेवणारा, आणि शास्त्रविहित व्रतवैकल्यें कडकडीतपणें करणारा माणूस सदा आंबट चेहरा करून राहात असेल, आजूबाजूच्या माणसांवर हरघडी खेंकसत असेल, आणि प्रत्येक कामांत चिरचिर करीत असेल तर त्याच्या धर्ममार्तंडत्वामुळें समाजाचें– आणि खरें म्हटलें तर त्याचें तरी कोणतें कल्याण होईल ? उलट, एखादा मनुष्य सदा हंसतमुख असेल तर त्याच्या धर्माभिमानाची ज्वाला विशेष प्रखर नसली तरी, केवळ आपल्या सान्निध्यानें देखील लोकांच्या दु:खानें गारठलेल्या अंत:करणांत तो आशेची ऊब उत्पन्न करील. आधींच जग कष्ट

गोष्टींनीं व कडू अनुभवांनीं भरपूर भरलेलें आहे. कडू दृश्य पहावयाचें झालें तर माणसानें आपली नजर कोणीकडेहि फिरविली तरी तें त्याच्या दृष्टीस पडेल. अनंत संकटांनीं, व्याधींनीं आणि यातनांनीं गांजलेल्या या जगांत दुःखी-कष्टी चेहऱ्याचा अंधःकार सगळीकडें साहजिकपणेंच भरलेला आहे. हास्याचे सूर्यकिरणच या संसारांत दुर्मिळ आहेत, आणि ते किरण जेथून प्रसृत होत असतील त्या चेहऱ्याचें पावित्र्य शेंकडों धर्मक्षेत्रांहून अधिक समजलें पाहिजे. 'देव तेथेंचि जाणावा' असेंच कवि त्याविषयीं म्हणतील ! 'हाचि हाचि खरा धर्म' असेच उद्गार कोणीहि साधुसंत त्याविषयीं काढतील. कारण संसारांतील दुःखांचा विसर ज्या योगानें पडतो आणि जीवांच्या ठिकाणीं प्रसन्न वृत्तीचा परिपोष ज्या योगानें होतो तोच खरा धर्म होय. सुहास्य केवळ काव्यविषय नसून उच्च धर्मतत्त्व आहे. त्याचें आचरण प्रत्येकानें करावें. सर्व स्त्रीपुरुष सुहास्यवदन झाले तर सृष्टीची नुसती शोभाच वाढणार नाहीं, तर संसार अधिक धर्ममय होईल. खरें सौंदर्य आणि खरा धर्म हीं परस्परविरोधी नसतात ही गोष्ट सिद्ध करण्याचें सामर्थ्य सहस्र प्रवचनांत नसेल; पण सुहास्यवदनांत खचित आहे !

ना० सी० फडके
( गुजगोष्टी )

## प्रश्न व सूचना

( १ ) हसतमुख मुलगा व 'रडतमुख' मुलगा यांचीं चित्रें रेखाटून त्यांची संगति कशी प्रिय किंवा अप्रिय होते तें सांगा.

( २ ) [ अ ] पुढील शब्दांचें अर्थ सांगा:—
व्रतवैकल्यें, धर्ममार्तंड, अट्टाहास.

[ आ ] पुढील वाक्यांचे अर्थ सांगा: —

[ १ ] भावनांचा संसर्ग फार विलक्षण असतो. [२ ] विचार किंवा मतें हीं मधाप्रमाणें होत; भावना किंवा विकार मात्र तैलबिंदूप्रमाणें शीघ्रगामी असतात. [३] शरीरसौंदर्य म्हणजे विधीनें कायमची ओढलेली काळ्या दगडावरची रेषा.

( ३ ) ठेंच लागणें, केळ्याच्या सालीवरून घसरणें, टोपी उडून जाणें, छत्री वाऱ्यानें उलटी होणें, अशा प्रकारच्या क्षुल्लक आपत्ति आल्या असतांना एकादा रडवा व चिडका मुलगा कसा वागेल व आनंदी आणि विनोदी मुलगा कसा वागेल याचीं २०-२५ ओळींत शब्दचित्रें काढा.

---

## राष्ट्रधर्म

[ पुढील उतारा प्रसिद्ध कादंबरीकार, व निबंधलेखक ना. ह. आपटे यांचे लेखांतून घेतला आहे. जातींजातींतील व धर्माधर्मांतील हरतऱ्हेच्या कलहांनीं एकंदर देशाचें नुकसान कसें होत आहे हें पाहून त्यांचें हृदय तळमळत आहे, व त्यांची तळमळ व देशहिताबद्दलची कळकळ सदरहु उताऱ्यांत चांगल्याप्रकारें प्रतिबिंबित झाल्या आहेत. त्यांनीं केलेला उपदेश विफल होणार नाहीं अशी आशा करावी काय ? ]

प्राचीन काळीं प्रत्येक गृहस्थाश्रमी पुरुषावर तीन ऋणांचा बोजा असे व तो त्यानें निवारिला पाहिजे, तरच त्याच्या जन्माचें सार्थक असें मानीत. हीं तीन कर्में म्हणजे ऋषी, पितर व देव यांचीं होत. ऋषींचें ऋण वेदाध्ययनानें, पितरांचें संसार करण्यानें आणि देवांचें यज्ञयागादिकांनीं फेडण्याची प्रत्येक पुरुषावर जबाबदारी असे. कालानुरूप आज आपणा हिंदवासीयांवर एकच फार मोठें ऋण आहे, तें आपल्या देश-जननीचें होय. याची फेड आपण अंशतः तरी केलीच पाहिजे. अर्वाचीन कालीं पुढारलेल्या अशा सर्व राष्ट्रांनीं जो राष्ट्रधर्म प्रचारांत आणिला आहे, तो अंगीकारून आपण या ऋणाची फेड करूं शकूं. पारतंत्र्यांत तळमळ-

णारी मायभू आपल्या अनेक हीनदीन देशबांधवांच्या मुखांनीं हंबरडे फोडीत असतां कोणत्या सत्पुत्राला स्वतःचें सुख मोठें वाटेल ? जननी व जन्मभूमि यांचें ऋण फिटण्यासारखें नसतेंच मुळीं. पण तें कृतज्ञतेनें मान्य करणें व त्याच्या शोधांकरितां तळमळणें व्यक्तिमात्राचें कर्तव्य नाहीं का ?

स्वतःच्या उत्कर्षाकरितां झगडा, पण त्या वेळीं मायभूमीचा उत्कर्ष पायतळीं तुडवूं नका. स्वतःचें कुटुंब, कुल, वंश, जाती किंवा समाज यांच्या उन्नतीकरितां तुम्हांस झटावेंसें वाटतें ना ? अगदीं जरूर. पण तें करितांना आपल्याच देशांतील, आपल्याच लाग्याबांध्याच्या इतरांना तुडवण्याबुडवण्याचा अधमपणा पत्करूं नका ! त्यांत भलेपणा नाहीं, सुख नाहीं व उत्कर्षहि नाहीं ! आपल्या धर्मोद्धारार्थ धन द्या, मान द्या, प्राण वेंचा; दुसऱ्यांच्या धनाचा—मानाचा—प्राणांचा चुराडा करूं नका ! आजच राष्ट्रधर्म पाळावयाचा असेल तर त्यास हेंच पथ्य आहे. हाच एक सन्मार्ग आहे ! दुसऱ्याच्या रक्तमांसावर पुष्ट होणारा मनुष्य अधोगतीला जातो अशी महाभारताची शिकवण आहे. ती अयथार्थ समजणें आत्मघातकीपणाचें आहे.

दुसऱ्या कुलाला न दुखवितां आपलें कुल उद्धरतां येईल, दुसऱ्या वंशास खच्ची न करतां आपल्याचा विस्तार करतां येईल. दुसऱ्या समाजाच्या पायांत पाय न घालतां आपल्याच्या[1] अडचणी दूर करतां येतील. दुसऱ्याच्या धर्मावर आघात न करतां आपल्याचा सांभाळ करतां येईल. आपली देशजननी एवढी विस्तृत, एवढी उदार, एवढी संपन्न आहे कीं, तिच्या मांडीवर सर्वांनीं

१ फेडण्याकरितां.

सुखानें खेळावें आणि आपापलें अन्नोदक विपुलतेनें मिळवावें. मग आपसांत लाथाळी कां ?

कोणत्याहि व्यक्तीला आपला धर्म श्रेष्ठ व पूज्य वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. तिच्या धारणपोषणार्थ त्याची आवश्यकता आहे. तिनें तो आपल्या इच्छेप्रमाणें यथासांग पाळावा. पण त्या त्या धर्मांचे हातपाय घराबाहेर व दुसऱ्याच्या आसनावर न जाऊं देण्याची दक्षता ज्यानें त्यानें घेतली पाहिजे. आपल्या गृहाच्या मर्यादेंत राहून तीन वेळांच कां वाटेल तितक्या वेळां स्नान करावें, नाक धरून बसावें व सोंवळेंओंवळें पाळावें. त्याला कोणाचीहि आडकाठी येणार नाहीं. पण घर सोडून बाहेर आल्यावर त्यानें आपल्या इतर बांधवांशीं समभावानें वागण्यास शिकावें व आपलें वर्णश्रेष्ठत्व वाऱ्यावर उधळून द्यावें. अगदीं याच नमुन्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या धर्मांच्या व पंथांच्या लोकांनीं स्वधर्माचरण करावें. धर्माच्या नांवाखालीं एकमेकांच्या उरावर बसण्याचे हे दिवस नाहींत. घराबाहेर किंवा मंदिर सोडून किंवा मशिदीच्या पलीकडे आपल्या धर्माचा लाडीकपणा नेल्यास त्याचे दुष्परिणाम सर्वांना भोगावे लागतील व लागतात हें ध्यानीं घ्यावें. एखाद्या व्यक्तीला, जातीला किंवा समाजाला कांहीं सवलती मिळत असल्या किंवा तसा त्यास भ्रम असला तरी त्यानें शेंफारून इतरांना कांद्याप्रमाणें सलूं नये. जात्यांतल्यांच्या मागोमाग सुपांतल्यांची रवानगी असते. व्यक्तिधर्माचें अवास्तव स्तोम माजवून राष्ट्रधर्माला पराङ्मुख होणाऱ्या व्यक्तीचा किंवा समाजाचा शेवटीं नाश ठरलेला आहे. धर्म हा इहलोकीं अभ्युदय करणारा व परलोकीं कल्याण व शांति देणारा आहे-यांत शंका नाहीं; पण राष्ट्रधर्माच्या आड तो आल्यास अगोदर इहलोकींचें घात करील, मग परलोकांतील सुख

कोठलें ? व शांति तरी कसली ? याकरितां प्रत्येक हिंदवासियानें राष्ट्रधर्माला प्राधान्य द्यावें. तें न करितां आम्ही अलग राहूं तर एकट्या वृक्षाप्रमाणें बुंध्यासह उखडले जाऊं. राष्ट्राराष्ट्रांतील जीवन-कलह तीव्रतर होत चालला आहे. यांत स्वतःचें आसन स्थिर ठेवावयाचें असेल तर राष्ट्रधर्माचा अंगीकार केला पाहिजे, दुसरा उपाय नाहीं. कोळसे करण्यास निघालेला अंगारकें[1] कुऱ्हाड चालवूं लागल्यावर कोणताहि भेदाभेद पाहात नाहीं, हें विचारी मनुष्यानें ध्यानांत ठेवावें, असो.

हिंदुस्थान आतांपर्यंत पायरी पायरीनें अधोगतीलाच चालला आहे. या दुर्दैवी देशांत नानाविध रोग बळावत आहेत, दारिद्र्याचा नंगा नाच सर्वत्र सुरू आहे, दुष्काळांनीं धुमाकूळ घातला आहे आणि सर्वांचें आयुर्मान, बळ व आरोग्य सारखें घटत आहे. काय बरें याचें कारण ? आतांपर्यंत या देशाच्या पुनरुद्धारार्थ प्रयत्न करणाऱ्या, संकटें सहन करणाऱ्या, आपलें रक्त सांडणाऱ्या व वेळीं आपले प्राण वेंचणाऱ्या उदारधी, समतोल विचार करणाऱ्या लोकनायकांनीं व देशसेवकांनीं 'राष्ट्रधर्म आचरा' असाच आक्रोश केला नाहीं काय ? तरीहि आमच्यांत आपसांतील लाथाळी आहेच. काय बरें याचें कारण ? दुसऱ्याच्या लत्ता मस्तकीं बसत आहेत, साऱ्या जगांत आमच्या मायभूची विटंबना सुरू आहे आणि सारीं राष्ट्रें आमच्या तोंडावर थुंकत आहेत, तरीहि आमच्यांत एकोपा होत नाहीं. काय बरें याचें कारण ? सर्व प्रश्नांचें एकच उत्तर. राष्ट्रधर्माचें मर्म आमच्या गळीं उतरत नाहीं. जो तो व्यक्तिशः

१ अग्नि

वा....२-५

सुखी होऊं पाहतो आहे. पण स्वसुखाच्या लालसेनें राष्ट्रधर्मावर निखारा ठेवूं बघणारी व्यक्ति सुखी कशी होईल?

माझ्या वाचकांनो! तुम्ही कोणत्याहि धर्माचे व पंथाचे असा. मी तुम्हांला आपले मानतों आणि प्रेमालिंगन देऊन विनवितों कीं, या बंधूंनो! जातिभेदाचें भूत कोठेंतरी गाडून टाका आणि समतेचा अंगीकार करा. जैनांनो, लिंगायतांनो, सत्यशोधकांनो, आर्य-समाजी, प्रार्थनासमाजी अनुयायांनो! केवळ धर्माच्या नांवाखालीं परस्परांना तुच्छ लेखण्याचा खुळेपणा पुरे झाला! पारशी, ख्रिस्ती, मुसलमान, ज्यू, या भिन्न धर्मीय बंधूंनो चला, या सांखळींत तुमचेहि दुवे घट्ट अडकवून टाका! या-मित्रांनो या! आपसांत भांडण्यास यापुढें आपण अवकाशच ठेऊं या नको! साऱ्या धर्मांचीं मूलतत्त्वें एकच नाहींत का? मग आपसांत विद्रोह कां बरें?

हिंदभूमि आपली सर्वांचीच जननी नाहीं का? मग तिच्या उद्धारार्थ झगडावयाचें कीं तमासगिरांनीं टाकलेल्या चार दाण्यांच्या आशेनें आपसांत झुंजावयाचें? इतिहासांतरींचीं वैरें आतां पाहिजेत कशाला? सर्वांना आसरा, अन्न, वैभव, बल देणारी मायभू पायीं तुडवायची? हा धर्म कोठला? या वेळीं प्रत्येक हिंदी माणसानें ज्या भूमींत माझा जन्म झाला, ज्या ठिकाणीं माझे पूर्वज नांदले व वंशज नांदणार आहेत त्या भूमीच्या उद्धारापुढें बाकीच्या सर्व गोष्टी तुच्छ समजावयास नकोत काय? हिंदुस्थानांत जन्म घेतलेल्या व येथेंच राहूं पाहणाऱ्या इंग्रजानें सुद्धां भलत्या मोहाला बळी न पडतां या देशाला आपला मायदेश मानून चालावयास नको काय?

हिंदुस्थानचें सुख तेंच आपलें सुख व कुटुंबाचें किंवा जातीचें सुख; त्याचें जें संकट तेंच आपणां सर्वांचें संकट, त्याचा अपमान

तोच सर्वांचा अपमान अशी आत्मीयता प्रत्येक हिंदवासियाच्या रोमरोमांत भिनली पाहिजे. खरोखर ज्या दिवशीं असा योग घडून येईल तोच भारताचा भाग्यदिन !

मराठी ग्रंथ संग्रहालय
ना० ह० आपटे
वा. ........ नं. ........ (गृहसौख्य)
ता. ........
टाणें.

## प्रश्न व सूचना

( १ ) [ अ ] पुढील वाक्यांचा अर्थ सांगा:—

( १ ) जात्यांतल्यांच्या मागोमाग सुपांतल्यांची रवानगी असते.

( २ ) जातीभेदाचें भूत गाडून टाका.

( ३ ) कोळसे करण्यास निघालेला अंगारक कुऱ्हाड चालवूं लागल्यावर कोणताहि भेदाभेद पहात नाहीं.

[ आ ] वरील तिन्ही वाक्यांत गर्भित असलेलीं रूपकें सांगा; तिसऱ्या वाक्यांत दोन रूपकांचा गोंधळ झाला असल्यास कसा तें स्पष्ट करा.

[ इ ] अयथार्थ, उदारधी यांचे अर्थ सांगून समास सांगा.

( २ ) जातीजातींतील व धर्माधर्मांतील भांडणांमुळें देशाचें अहित कसें होत आहे हें उदाहरणें घेऊन सांगा. हें अहित होऊं नये म्हणून नारायण हरि आपटे काय उपाय सुचवितात ?

( ३ ) एक ब्राह्मण व एक ब्राह्मणेतर यांचें अगदीं क्षुल्लक कारणांवरून भांडण चाललें आहे अशी कल्पना करा, व त्या भांडणांत दोघांचा मूर्खपणा, त्यांची संकुचित दृष्टि व त्यांचा आततायीपणा हे दोष स्पष्ट होतील अशा रीतीचा ( ३० ओळींपर्यंत ) संवाद तयार करा.

# कोलंबसाच्या सफरी

[ कोलंबसानें अमेरिका शोधून काढली हें पुष्कळांना माहीत असतें; परंतु त्याला कोणत्या अडचणी आल्या, त्यांतून तो कसा पार पडला इत्यादि गोष्टी सामान्यतः माहीत नसतात; त्या रा० माटे यांनीं सदरहु लेखांत थोडक्यांत पण परिणामकारक रीतीनें सांगितल्या आहेत. योग्य ठिकाणीं योग्य विशेषणें, अव्ययें वगैरे घालून वर्णनाला त्यांनीं कसा जिवंतपणा व उठावदारपणा आणिला आहे हें पाहण्यासारखें आहे. ]



श्री. म. माटे

इ० स० १४९२ ऑगस्ट ३ रोजीं या सफरीसाठीं कोलंबसानें जहाजें हांकारिलीं. सप्टेंबर ता० ९ ला पोर्तुगीज लोकांचें फेरो बेट त्याला लागलें. तेथून पुढें सगळा समुद्र केवळ अज्ञातच होता. जमीन दिसेनाशी झाल्यावर खलाशी जास्तच हिरमुसलेले दिसूं लागले. त्यांना मारूनमुटकून जहाजांबरोबर पिटाळलेलें होतें. त्यांच्या मनानें खास घेतलें, कीं आतां आपण घरादारास मुकलों. मर्दासारखे मर्द पण ते बायकांसारखे रडूं लागले. कप्तानानें त्यांना समजुतीच्या गोष्टी सांगून पाहिल्या. जेथें पोंचावयाचें ते देश कसे सुंदर आहेत, तेथील जमिनी कशा सुपीक आहेत आणि सोनें तर किती सुलभ आहे इत्यादि अनेक काल्पनिक वर्णनें त्यानें केलीं; पण त्यांना वाटे कीं हें सगळें जगलों वांचलों तर मिळावयाचें.

तीनहि जहाजांच्या तांडेलांस त्यानें हुकूम केला, कीं थेट पश्चिमेकडे चलावें. खलाशांचें भय वाढत जाऊं नये म्हणून त्यानें एक हिकमत योजिली. आपण फार अंतर तोडीत चाललों नाहीं

असें त्यांस वाटविण्यासाठीं त्यानें अंतर मोजण्याचीं दोन मापें केलीं. खरें आपल्यापाशीं व खोटें सर्वांना दिसेसें. प्रत्येक दिवशींच्या मैलांतून अमुक एक वजा करून उरलेला आंकडा मात्र पाटीवर लावावा असा त्याचा क्रम असे. सप्टेंबर ता. १२ ला होकायंत्राची सळई सरळ राहीनाशी झाली. प्रथम त्यानें हें कोणास दिसूं दिलें नाहीं, पण सुकाणूंवाल्यांच्या तें लवकरच ध्यानांत आलें व सर्व जहाज़ांवर जिकडे तिकडे खळबळ झाली. कारण सळई वांकडी झालेली त्यांनीं कधीं पाहिली नव्हती. अर्थात् दिशासुद्धां फिरल्या कीं काय असें लोक कुजबुजूं लागले; पण कोलंबसानें आपल्या ज्योतिषाच्या ज्ञानावर वेळ मारून नेली. तो जेव्हां नक्षत्रतारांचीं नांवें व होकायंत्राचा त्यांच्याशीं संबंध इत्यादि बाबी सांगूं लागला, तेव्हां कांहींच न कळल्यामुळें त्यांनीं त्याचा बोज राखला व पडतें घेतलें. थोड्याच दिवसांत समुद्रावर फांद्या, फळें, लांकडें इत्यादि दिसलीं आणि तीं जिकडे जात आहेत तिकडे जावें असें कित्येकांनीं सुचविलें; पण तो म्हणाला, 'हिंदुस्थान तिकडे सांपडावयाचें नाहीं, आपणास सरळच गेलें पाहिजे'. त्याहि खुणा पुढें दिसेनाश्या झाल्या. दिवसामागें दिवस व रात्रीमागें रात्र यावी व जावी असें झालें. वर आकाश व खालीं पाणी यांशिवाय तिसरा पदार्थ नाहीं असें झालें. त्यांना वारा फार अनुकूल होता व त्यामुळें प्रवास जलदीनें चालू होता. पुष्कळांना शंका येऊं लागली कीं कप्तान खोटें मैल लावीत असावा. शेवटीं हा अनुकूल वाराच त्यांना शत्रु वाटूं लागला. कारण पश्चिमेकडून वारा मुळींच येईना. त्यांना वाटे कीं आपणांस परत वळतां यावयाचें नाहीं. पूर्वेकडूनच जर वारा वहात राहिला तर उरफाटें फिरतां तरी कसें येईल? कोलंबसास यावर कांहीं तोड सुचेना.

पण दैवयोगानें पश्चिमेकडून वारा वाहूं लागला व खलाशांचा जीव भांड्यांत पडला. कारण कीं, इतक्या दूरच्या समुद्रावरहि वाऱ्यास पश्चिमेकडून वहात येण्याची संवय आहे हें त्यांस दिसलें! पुढें तीन चार दिवसांनीं वारा अगदींच पडला. समुद्र हलेना कीं डोलेना. खलाशांस वाटलें आतां तर बोटी जागच्या हलावयाच्या सुद्धां नाहींत! समुद्रांत मध्येंच असलेल्या एखाद्या उथळ जागीं आपण आलों असून रेताडांत वगैरे नावा अडकणार ही भीति त्यांस वाटूं लागली. कोलंबसानें लागलीच नांगर टाकून किती खोल पाणी तेथें आहे हें त्यांस पटवून दिलें. तरी त्यांस दम निघेना. ते म्हणत, " असें जर आहे तर नावा सरकत कां नाहींत ? " पण दैवयोगानें दुसरे दिवशीं समुद्रास गरगरून भरतें आलें व नावा भराभर चालूं लागल्या. तरी पण जमीन कोठेंच नाहीं! मागली फार मागें राहिली; पुढें असेलच अशी खात्री नाहीं. नावाड्यांत फार चुळबूळ सुरू झाली. " राजानें हा कोठला भुरटा परदेशी जवळ केला आणि स्वदेशच्या माणसांच्या गळ्याला दावें लावून तें त्याच्या हातीं दिलें ! " असा जो तो तक्रार करूं लागला. " लोक चांगलें सांगत होते कीं, हा उगाच एक उडाणटप्पू भटक्या आहे. पण तें राजानें ऐकलें नाहीं आणि आतां आमच्या जिवाला तात लागली आहे, आम्हीं याचें आतां कां ऐकावें ? " दुसरा म्हणे, " खरेंच आहे. परत फीर म्हटलें तर हा ऐकत नाहीं." तिसरा म्हणाला, " हा बऱ्या बोलानें ऐकेलसें दिसत नाहीं. त्याला जरा चुणूकच दाखविली पाहिजे." शेवटीं कांहीं लोक बेफाम होऊन त्याला म्हणाले, " आतां जर तूं परत फिरला नाहींस तर तुझे हातपाय बांधून तुला समुद्रांत फेंकून देऊं. नाहीं तर परत फीर. " कोलंबसाहि भला हिकमती व धीट

होता. केव्हां शिवी हसडून, केव्हां दादा बाबा करून, केव्हां भेद पाडून तो त्यांस वळवीत असे. एकदां असें झालें कीं, पिंझो आपल्या जहाजावरून 'जमीन जमीन' म्हणून मोठ्यानें ओरडला. वेळ रात्रीची होती. कोलंबसासहि वाटलें जमीनच आहे. जिकडे तिकडे आनंद झाला. पण सकाळीं पाहतात तों एका ढगापलीकडे तेथें कांहीं नाहीं. खलाशी जास्तच चवताळले. आक्टोबर ता. ७ च्या सुमारास संध्याकाळीं पक्ष्यांचे थवेच्या थवे डोक्यावर उडत जात असतांना त्यांस दिसले. पक्षी आपल्या घरट्यांसच जात असावे हें उघड होतें. म्हणून त्या रोखानें कोलंबसानें जहाजें वळविलीं, तरी तीन दिवस जमीन नाहीं. चवथे दिवशीं एक झाडाचीं फळें असलेली फांदी, एक नकशी नक्शी केलेला लांकडी सोटा, समुद्रकांठीं जमले असतात तसले मासे अशा वस्तु त्यांस दिसल्या. इतक्यांत त्या दिवशीं रात्रीं कोलंबसास दोनदां उजेड दिसलासा वाटला. पण उगाच खोटी आशा वाटूं लागूं नये म्हणून त्यानें एक-दोघांस निरखून पहावयास सांगितलें. त्यांनाहि ओझरता उजेड दिसला. अर्थात् ते सर्व गप्प बसले. शेवटीं रात्रीं दोहोंच्या अमलांत आघाडीस असलेल्या पिंटो जहाजावरून जमीनसूचक असा कडाडून बंदुकीचा बार झाला! सर्व लोक ताडकन् उभे राहिले. ज्याला हा उजेड प्रथम दिसला त्याचें नांव रीड्रिग् बर्मेजो असें होतें. जिकडे तिकडे लगबग झाली. जमीन तर आहेच आहे; पण तेथें माणसेंहि आहेत असें वाटून मंडळी आनंदांत गर्क झाली. तांबडें फुटतांच जमीन स्पष्ट दिसूं लागली. तीवरील झाडें, थुइथुइ करणारे झरे, गवताळ रानें हीं दुरून पाहून सर्वांना आनंदाचें भरतें आलें. कोलंबस काळजीनें खंगत होता. त्याला एकदम स्फुरण चढलें. त्यानें कृतज्ञताबुद्धीनें आकाशाकडे पाहिलें आणि

अश्रूंचा प्रवाह त्याच्या डोळ्यांतून वाहूं लागला. वीस वर्षांची तपस्या फळास आली. अवमान, अवहेलना, दारिद्र्य धुऊन निघालें. लबाड, उपऱ्या, भटक्या या नांवानीं संबोधिलेले आपण, खरोखर परमेश्वराची इच्छा व्यक्त होण्याचें साधन झालों म्हणून त्यास समाधान झालें. जे मारावयास उठले होते ते चरणीं लोळण घेऊं लागले. शिव्या देणारे घसा फोडून त्याचा जयजयकार करूं लागले. त्याचें भाकीत खरें झालें. सकाळ होतांच सर्वांनीं आपापले पोषाख चढविले. कोलंबसानें आपला दर्यासारंगाचा जरतारी झगा घातला. कमरेस समशेर लटकाविली व हातांत स्पेनच्या राजाचें निशाण घेऊन तो जमिनीवर उतरला. सर्वांनीं जमिनीचें चुंबन घेतलें व गुडघे टेंकून मनोभावें ईश्वराची प्रार्थना केली. या ठिकाणीं एका नवीन जगाचा आणि नवीन युगाचा अनावरणविधि झाला व तो कोलंबसाच्या हस्तें झाला.

तेथच्या उघड्या नागड्या लोकांनीं जेव्हां हे उंच, सुस्वरूप, शुभ्रवर्ण, रंगीबेरंगी कपड्यांनीं झकमकणारे आणि तलवार-बंदुकांनीं उग्र झालेले लोक समुद्रांत अचानक पाहिले तेव्हां त्यांस आश्चर्य वाटलें. इकडे कोलंबसास वाटलें, आपण हिंदुस्थानासच आलों ! व त्या कल्पनेनें तो तेथील सर्व गोष्टींचा अर्थ बसवूं लागला. तेथील सुंदर व तेजःपुंज पक्षी, ऊबदार आणि खेळकरपणा आणणारी हवा हीं पाहून त्याची खात्री झाली कीं हें हिंदुस्थानच. हिंदुस्थानांत मसाल्याचीं रानेंच्या रानें आहेत असें त्यानें ऐकिलें होतें. तेथील हवेलाहि मसाल्याचा वास येत आहे असें त्यास वाटूं लागलें ! अर्थात् शोधासाठीं त्यानें कांहीं हत्यारबंदांस 'आंत जा' म्हणून सांगितलें. त्यांना अनेक तद्देशीय भेटले. ते फार सुजन व सभ्य दिसले. त्यांचीहि कल्पना तीच झाली. तेथेंच त्यांच्या

नजरेस पानाच्या सुरळ्या एका टोंकास पेटवून दुसरें टोंक तोंडांत धरून जिकडे तिकडे धूर माजविणारे लोक दिसले. हीच आपली तमाखू! बरेच दिवस किनाऱ्यानें फिरून बेटां-भूशिरांना नवीं नांवें देऊन कोलंबसानें तेथील लोकांशीं स्नेह संपादिला. मग वर्ष-भर हिंडून सोन्याचाहि शोध लाविला. मग बरेच दिवस घाल-विल्यावर सोनें, सुंदर पक्षी, पांच-सहा तद्देशीय माणसें व इतर अनेक वस्तु घेऊन परत फिरण्याचा त्यानें निश्चय केला. पण कित्येक खलाशांना त्या देशाचें इतकें वेड लागलें, कीं तेथेंच राहण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. म्हणून कोलंबसानें तेथें एक किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें. ही वसाहतीची मूळ कल्पना होय. किल्ला, खंदक तयार करून जवळचा जरूर तो दारू-गोळा तेथें ठेवून त्यानें वसाहतवाल्यांस बऱ्या हुषारीनें राहावयास सांगि-तलें आणि कृतकृत्य होत्साता तो स्पेन देशास परत निघाला. परत-वाट फारशी सुखाची गेली नाहीं. पिंझो भांडून दूर निघून गेला. वादळें झालीं व आपण आतां सर्व बुडणार असें कोलंबसाला वाटूं लागलें. त्यानें आपलें सर्व वृत्त लिहून काढिलें; तो कागद मेण-कापडांत बंद करून वरून पुन्हा मेणाचे थर बसवून तें सर्व एका पिपांत बसविलें व पीप चांगलें बंद करून समुद्रांत फेंकून दिलें. हेतु हा कीं, आपण बुडाल्यास तें वाहात वाहात कदाचित् युरोपास जाऊन लागावें! पण वादळें शांत झालीं व हाल-विपत्ति सोसून कोलंबसाचें जहाज पोर्तुगालच्या किनाऱ्यास लागलें. धिक्का-रिलेला तांडेल नवें जग हुडकून काढून परत आला हें पाहून राजाला खंती वाटली. पण त्यानें उदारपणानें त्याचें स्वागत केलें. सर्व लिस्बन शहर त्यास पहावयास लोटलें. लवकरच कोलंबस स्पेनच्या किनाऱ्यास लागला. तेथून त्यानें फर्डिनंड व इझाबेला

यांस आपण परत आल्याचीं पत्रें लिहिलीं. राजधानींतचशी काय, सर्व मुलखभर ही बातमी हां हां म्हणतां पसरली. सर्व लवाजम्यासह कोलंबस राजधानीस आला. तेथून राजवाड्याकडे त्याची मिरवणूक सुरू झाली. रोमन वीरांचाहि असा सन्मान कधीं झाला नसेल. आघाडीला ते सहा इन्डिअन्स चालले होते. त्यांचीं रंगविलेलीं अंगें व सुवर्णभूषणें पाहून लोक चकित झाले. त्यांच्यामागें पोपट व इतर नवे पक्षी व पशु यांचे पिंजरे होते. त्याच्यामागें उंचावर ठेवलेले सोन्याचे मुकुट, सलकडीं इत्यादि सोन्याच्या जिनसा चमकत ठेविल्या होत्या. त्यांच्यामागून स्वतः कोलंबस घोडेस्वार होऊन हातांत राजाचें निशाण घेऊन दिमाखानें चालला होता. आज राजानें आपलें सिंहासन वाड्यापुढील पटांगणांत मांडविलें होतें. सर्व मांडलिक, अमीर-उमराव, सरदार-दरकदार, विद्वान्, शास्त्रवेत्ते यांनीं दरबार गच्च भरून गेला होता. कोलंबस तेथें येतांच सर्वांनीं खडी ताजीम दिली. प्रत्यक्ष राजाराणी उभीं राहिलीं व कोलंबस आतां गुडघे टेंकणार तोंच त्यास हात देऊन त्यांनीं उभें केलें. सर्वांना आनंदाश्रूंनीं गहिंवरून आलें. यत्न करूनहि कोलंबसास शब्द उमटेना. शेवटीं आनंदभार हलका झाल्यावर त्यानें सर्वांस स्वमुखानें सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून राजाराणी खूष झालीं. त्यांनीं देवाची प्रार्थना केली व त्याजवर बक्षिसांचा सडा केला. जो कोणी जमीन पहिल्यानें पाहील त्यास वडें पेन्शन मिळणार होतें. तेंहि त्यांनीं कोलंबसासच दिलें. कारण रीड्रिगोच्या आधीं त्यानेंच उजेड पाहिला होता. पण यामुळें रीड्रिगो इतका रागावला कीं, हे सर्व लोक लबाड व खोटे ख्रिस्ती आहेत असें म्हणून तो वेडानें मुसलमान होऊन परागंदा झाला !

असो. तेथें कोलंबसाच्या कर्तबगारीचा कळस झाला. कारण त्याचा जीवितहेतु पूर्णतेस गेला.

वास्तविक त्यास या वेळींच मरण यावयास हवें होतें. कारण त्यानें येथून पुढें केलेल्या गोष्टी कोणाहि सामान्य माणसास करतां आल्या असत्या; पण पुष्कळदां असें दिसतें, कीं जीवितहेतु संपल्यावरहि कित्येक विभूतिसुद्धां उगाच लुडबूड करीत जगत असतात व त्या योगें त्यांच्या उज्ज्वल नांवास कलंक लागेशीं कृत्यें त्यांच्या हातून होतात. कोलंबसाचें असेंच झालें ती हकीकत थोडक्यांत देतों.

एका सफरींत विजय आल्यामुळें कोलंबसास व राजास सारखाच हुरूप येऊन त्यांनीं दुसऱ्या सफरीची तयारी केली. अशा पांच-चार सफरी त्यानें केल्या. तेथें जावें, तेथिलांशीं संबंध सुरू करावे, भांडणें निघावीं, मारामाऱ्या व्हाव्या, तद्देशियांच्या कत्तली व्हाव्या, त्यांच्या बायकापोरी जबरदस्तीनें ओरबाडाव्या, आपापसांत मारामाऱ्या कराव्या, सोन्याच्या मागें पळावें, गुलाम नेऊन विकावे, नव्या मुलुखाचें नामकरण करावें, हाच काय तो कार्यक्रम. दुसऱ्या सफरीसच तेथील लोकांच्या ध्यानीं आलें, कीं हे लोक बदमाष आहेत. एक कोलंबस नसेल दुर्वृत्त, पण बरोबरचे खलाशी व स्वदेशांत नकोसे झालेले लुच्चे हे महापागल असत. आपल्या सुधारलेल्या शस्त्रास्त्रांनीं हे त्यांस हैराण करीत व त्यांचें सोनेंनाणें बुचाडून वर ते त्यांच्या बायकाहि फूस लावून नेत. कोलंबसाचें हें नवें युग खरें; पण खुद्द मूळ अमेरिकनांस हळुहळू चेंपीत नेणारें आणि शेवटीं भूतलावरून निखालस निपटून टाकणारें हें प्राण-संकटच होतें. कोलंबस स्वतः या बाबींत फार मर्यादेनें व सचोटीनें वागत असे. पण बरोबरचे लोक त्यास आवरत नसत. कित्येकदां

ते त्याजवरच उसळून उठत. पण या बाबतींत जरी तो भला होता तरी दुसऱ्या एका महापातकी संस्थेचा आरंभहि त्याच्याच हातून झाला. नवीन स्थापिलेल्या वसाहतींचा खर्च भागावा आणि खजिन्यांतहि भर पडावी म्हणून त्यानें राजास पत्र लिहून सुचविलें कीं, क्यारिबियन बेटावरचे नरमांसभक्षक लोक यूरोपांत धरून न्यावे व तेथें गुलाम म्हणून विकावे ! व्यापाराला हा उत्तम माल आहे ! पण पत्र लिहितांना तो येवढ्यावरच थांबला नाहीं. दुष्ट कृत्य सोज्ज्वळ करण्याची कलाहि त्याला साधली होती. त्यानें लिहिलें, हे अज्ञ लोक तिकडे विकले गेले म्हणजे खिस्ती होण्याची संधि त्यांस सहजच मिळेल व अशा रीतीनें राजाचा स्वार्थ व गुलामांचा परमार्थ एकदमच साधतील ! एका सफरींत तर त्यानें कित्येक मण सोनें, स्वादिष्ट फळें यांबरोबरच राजधानींत विकावयासाठीं पांचशें इंडियन गुलाम जहाजें भरून पाठविले ! सोन्याचा हव्यास तर त्याला इतका सुटला कीं, तिकडे " चवदा वर्षांवरील प्रत्येक माणसानें दर तीन महिन्यांस चार पांच तोळे सोनें गोळा करून दिलेंच पाहिजे " अशी सक्ति त्यानें केली होती ! जे प्रतिष्ठित असत त्यांस तर सोनें शेरांवारी द्यावें लागे ! जेथें सोनें नसेल तेथें प्रत्येकानें अमुक गठ्ठे कापूस दिला पाहिजे असा दंडक होता. ज्यांनीं हे कर भरले असतील त्यांच्या गळ्यांत खूण म्हणून एक तांब्याची खापरखुंटी अडकवीत असत. अशा प्रकारें प्रथम देवदूतासारखे दिसणारे हे परके लोक सैतान आहेत हें त्या नेटिवांस कळून चुकलें. कोलंबसानें ठिकठिकाणीं किल्ले बांधून तेथें सोनें गोळा करण्याचीं मकाणें केलीं. कोणीं जरा हूं कीं चूं केलें, कीं किल्ल्यावरील शिबंदीचे लोक त्यास चाबकाखालीं मारीत असत. एक गोष्ट मात्र सांगावयास हवी. जेव्हां जेव्हां त्यानें

गुलामांचें भरताड भरून घरीं पाठविलें तेव्हां तेव्हां इझाबेला राणीस परम दुःख होई, तिला संताप येई, आणि " या लोकांस परत आपल्या घरांदारांत नेऊन सोडा " असा हुकूम ती सोडी. पण एकटीचें कांहींच चाललें नाहीं. पुढें कोलंबसाचीहि ग्रहदशा फिरली. शेंकडों दर्यावर्दी तसल्या सफरी करून संपत्ति आणूं लागल्यामुळें त्याची मातब्बरी कोणास वाटेनाशी झाली. राजाराणी थकत चाललीं. बरोबरच्या लोकांस कोलंबस इतका धाकांत ठेवी कीं, ते शेवटीं बंड करून उठत. त्यांनीं अमेरिकेंत त्याजविरुद्ध अनेक कारस्थानें रचिलीं व दरबारांत सारख्या कागाळ्या येऊं लागल्या. शेवटीं त्या खऱ्या आहेत असें वाटून राजाराणीनें त्यास बडतर्फ करून परत बोलाविलें. त्याच्या जागीं असलेल्या अम्मलदारानें त्यास एखाद्या साध्या कैद्याप्रमाणें वागविलें. त्याच्या हातांत दंडाबेडी घालून त्यास स्वदेशास परत धाडिलें. त्याज़वर आरोप असे होते, कीं तद्देशीयांस ख्रिस्ती केलें असतां गुलाम म्हणून विकतां यावयाचें नाहीं म्हणून मिशनऱ्यांच्या कामास प्रतिबंध करतो; व परिचयाच्या किनाऱ्यावर जें खंडोगणतीं मोतीं सांपडलें तें हा आपल्यासाठीं दाबून ठेवतो. चोरट्या बदमाषांप्रमाणें जरी त्याची रवानगी घराकडे करण्यांत आली तरी त्याचें पूर्ववृत्त स्मरून राणीनें गय केली. पण तीहि पुढें लवकरच वारली व त्यास कोणीहि वाली नाहींसा झाला. त्याचें वयहि बरेंच झालें. हळुहळू अशक्तता येऊं लागली. जवळचें सर्वस्व नाहींसें होऊन ब्रह्मस्वाची पाळी आली. संधिवातादि रोगांनीं शरिरांत घर केलें. त्याला स्वतःला अवघ्या पृथ्वीवर आपली म्हणून एक टीचभरसुद्धां जागा राहिली नाहीं. आपल्या मुलास तो काकुळतीनें लिहितो, 'माझ्या इनामापैकीं एक कपर्दिकहि मला मिळत नाहीं. मी

उचापतीवर जगत आहे. वीस वर्षें मीं हाडांचीं काडें केलीं, नवीन पृथ्वी माणसांना दाखविली, पण माझी अंगुळभरहि जमीन स्पेन देशांत नाहीं. कोठेंतरी भटारखान्यांत तुकडे खातों आणि आतां बिलाचे पैसे कोठले द्यावे म्हणून काळजी मला खाते.' अश्या आपत्तींत असतांनाच आपलें आटपत आल्याचें त्याला दिसूं लागलें. कागदोपत्रीं जें काय त्याजपाशीं होतें तें सर्वांना यथायोग्य वांटून श्रद्धाळूपणानें त्यानें देवाची करुणा भाकिली व वयाच्या ७० व्या वर्षी म्हणजे इ० स० १५०६ मे महिन्याच्या २० तारखेस त्यानें प्राण सोडिला.

**श्री० म० माटे**
( पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ )

## प्रश्न व सूचना

( १ ) कोलंबसाला सफरींवर असतांना कोणकोणत्या अडचणी आल्या? त्यांतून तो कसा निभावून गेला?

( २ ) कोलंबसाच्या सफरींमुळें कोणत्या घातुक चाली युरोपांत आल्या? राजांचा स्वार्थ व गुलामांचा परमार्थ हीं एकदमच साधतील अशी कोलंबसाची कल्पना होती. राजांचा स्वार्थ कोणता व गुलामांचा परमार्थ कोणता?

( ३ ) कोलंबस यशस्वी होऊन परत आल्यावर त्याचा मान-सन्मान कसा झाला ह्याचें वर्णन करा.

( ४ ) [ अ ] 'जगलों वांचलों तर', 'मारून मुटकून', अशा प्रकारचीं जोड क्रियापद-रूपें असलेले पांच वाक्प्रचार सांगा.

[ आ ] अशा प्रकारच्या द्वंद्वसमासांचीं ५ उदाहरणें द्या.

( ५ ) पुढील शब्दांचा किंवा शब्द-समूहांचा अर्थ सांगाः—

परागंदा, खडी ताजीम, वेळ मारून नेणें, बोज राखणें, जीव मांड्यांत पडणें, जिवाला तांत लागणें, भेद पाडणें, तांबडें फुटणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ला. नं. ७९

# कवीचें कार्य

[ पुढील लहानसा उतारा रा० प्रल्हाद केशव अत्रे यांनीं सुखटणकर यांच्या 'वासंती' नांवाच्या कवितासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेंतून घेतला आहे. लहान मुलांच्या हातांत केवळ बोधपर व ज्ञानप्रचुर अशा कविता दिल्यास त्या पुष्कळ वेळां त्यांस आवडत नाहींत; म्हणून मुलांना समजतील, आवडतील, व गुणगुणाव्याश्या वाटतील अश्या कविता त्यांच्या वाचनांत याव्यात अशी तरफदारी रा० अत्रे यांनीं या लेखांत केली आहे.]

जे विचार सरळ गद्यांत मांडतां येतील ते मुद्दाम अवघड



प्र. के. अत्रे

शब्दांचा गोपाळकाला करून व्यक्त करण्याचें काव्य हें जसें माध्यम[1] नव्हे तसेंच नीतीचे व ज्ञानाचे धडे देण्याचेंहि तें साधन नव्हे. ज्यांना ज्ञान पाहिजे असेल त्यांनीं पंडितांकडे पळावें; उपदेश पाहिजे असल्यास हरदासी कथेला हजर राहावें; कवींच्या तोंडूनच असल्या गोष्टी ऐकावयाला मिळाल्या पाहिजेत असली आततायीपणाची अपेक्षा त्यांनीं करूं नये. कवींचें कार्य अगदीं निराळें आहे. पायाळू माणसाला ज्याप्रमाणें भूमिगत द्रव्य दिसतें असें म्हणतात त्याप्रमाणें निसर्गातल्या निरनिराळ्या

१ द्वार, साधन.

दृश्यांत दडलेली सौंदर्याची व सत्याची दौलत केवळ कवीच्याच नजरेला दिसत असते. आयुष्यांतील अगदीं 'साध्या[१] साध्या' गोष्टींवर अतिपरिचयानें पडलेलें उपेक्षेचें अवगुंठन कवि आपल्या हलक्या हातानें बाजूला करून त्यामध्यें किती सुंदर 'आशयें' भरला आहे याची जगास जाणीव करून देतो. गुप्त कल्पना उजेडांत आणणें व सुप्त भावना चेतविणें हेंच खरें कवीचें काम आहे. असल्या कवींचीं काव्यें जर आमचीं मुलेंबाळें गुणगुणूं लागतील तरच त्यांना 'ज्ञाताचीं कुंपणें' ओलांडून प्रतिकूल परिस्थितीचा पडदा फाडून पलीकडे पसरलेल्या सौंदर्याच्या चिरंतन सृष्टींत स्वच्छंद विहार करतां येईल. फुलपांखरें हीं नेहमीं सुंदर फुलांवरच बागडत असतात. सुंदर कल्पना जर मुलांना दिसल्या तर तीं आपोआपच त्यांच्याभोंवतीं रुंजी घालूं लागतील. अशा कल्पना त्यांच्या अंतः-करणांत कायमच्या खिळतील, व असलीं गाणीं त्यांच्या ओंठावर अष्टौप्रहर खेळतील. " उद्यां या कविता पाठ करून या " असली जादा ताकीद त्यांना अशा काव्याबद्दल देण्याची पाळी केव्हांहि येणार नाहीं.

प्र० के० अत्रे
( वासंती-प्रस्तावना )

---

१ 'साध्याहि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे.'
—केशवसुत

# काव्याचे घटक

[ पुढील उतारा हरिभाऊ आपटे यांनीं मोगरे यांच्या कवितासंग्रहाच्या एका भागाला लिहिलेल्या प्रस्तावनेंतील आहे. काव्यांत काय काय असलें पाहिजे या प्रश्नाचा पुष्कळ वेळां उगाच बाऊ करण्यांत येतो. व तें समजावून देतांना खूपसें शब्दावडंबर माजविण्यांत येतें. हरिभाऊ आपटे यांनीं या उताऱ्यांत साधे व्यावहारिक दाखले देऊन सोप्या शब्दांत वरील प्रश्नाचें थोडक्यांत व मार्मिक असें उत्तर दिलें आहे. ]

काव्यपृथक्करण केलें तर काव्याचे घटकावयव तीन दिसतात; नाद, अर्थ व ध्वनि. या तीनहि शब्दांना अन्वर्थक इंग्रजी शब्द द्यावयाचे तर ते अनुक्रमें Sound, Sense Suggestion असे देतां येतील. परंतु नाद या शब्दाला sound हा शब्द सर्वथा अन्वर्थक नाहीं. कारण नाद यांत तालबद्धता व माधुर्य सूचित होतात तीं नुसत्या Sound या शब्दांत होत नाहींत. या अवयवत्रयींची अत्यंत प्रमाणशील घटना झालेली दिसली म्हणजे रसिकजनांना काव्यानंद हा झालाच पाहिजे. नुसती शब्दरचना म्हणजे काव्य नव्हे. ती नादवती, अर्थवती आणि ध्वनिवती पाहिजे. शब्द यथोचित पाहिजेत, बाह्यार्थ सुंदर पाहिजे, आणि त्या बाह्यार्थाच्या अंतरंगीं असणारा अर्थ—जो रसिकानें आपल्या रसिकतेनेंच



ह. ना. आपटे

काढावा लागतो–तो अर्थहि फार सुंदर पाहिजे. या तीन घटकावयवांत तरतमभाव आहे हें उघडच आहे. नुसत्या नादयुक्त शब्दांच्या रचनेनेंच काव्य होत नाहीं. परंतु तसल्या रचनेसच सामान्य लोक काव्य समजतात. बाह्यार्थपरिपाकाला महत्त्व काय आहे हें त्यांना समजत नाहीं. त्याहून वरच्या दर्जाचे लोक बाह्यार्थपरिपाकाचें महत्त्व समजतात; परंतु त्यांना अंतरंगार्थ–ज्याला ध्वनि म्हणतात तो–समजण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्याचें महत्त्वहि त्यांचे ध्यानांत येत नाहीं. खरे रसिक आहेत ते मात्र काव्याची परीक्षा करावयाची ती काव्याच्या शब्दचरनेंतील नाद, अर्थ व ध्वनि या तिहींवरून करतात.

याला आपण आम्रफलाचें उदाहरण घेऊं. वर्णानें शेंदऱ्या, लाल किंवा पिवळा जर्द झालेला असा आंबा पाहिला कीं साधारण माणसांचे डोळे लोभावतात. तो चाखल्यावर गोड, आंबट जसा असेल त्याप्रमाणें त्यांना संतोष किंवा असंतोष होतो. परंतु तो गोड लागून शिवाय त्यांतील रसाला विशेष लजत, विशेष प्रकारचा स्वाद लागला, तर त्यावर कांहीं लोक त्या फळाचें महत्त्व मोजतात. लहान मुलें, अज्ञ जन, सुज्ञ जन, हे जसे सामान्यतः तीन लोकवर्ग आहेत, तसेच काव्याच्या रसिकांतहि तीन वर्ग पडतात. एक वर्णलुब्ध किंवा नादलुब्ध, दुसरा अर्थलुब्ध व तिसरा ध्वनिलुब्ध. आम्रफलपरिपाकाप्रमाणेंच काव्यफलाचा परिपाक असतो. तो आंबा सर्वांत उत्कृष्ट कीं ज्याचा रंग सुंदर, ज्याची रुचि गोड, आणि ज्याचा स्वादहि अत्युंत मधुर; परंतु हा अंतस्थ स्वाद सजमणारे रसिक फार थोडे, अगदीं विरळ. तसेंच काव्याच्या अंतरंगांतील ध्वनीचे ज्ञाते रसिक अत्यंत विरळ. तें ज्ञान होण्यास कवीच्या हृदयासारखेंच वाचकाचेंहि हृदय असावें लागतें. अर्थात् तोच कवि

खरोखर मोठा, कीं ज्याच्या काव्यानें प्रत्येक वाचकाच्या हृदयांतलें कवित्व जागृत होतें. हें प्रत्येकाच्या हृदयांतलें कवित्व जागृत करण्यास वर सांगितलेले तीनहि गुण– नाद, अर्थ आणि ध्वनि– कवीच्या कृतींत असावे लागतात. या तीनहि गुणांचें अस्तित्व ज्या कवि-कृतींत असेल ती कविकृति अज्ञ, सुज्ञ व विशेषज्ञ या तिघांस सारखाच मोह घालते.

ह० ना० आपटे
( प्रस्तावना–मोगरे यांची कविता )

---

# गरजवंताला अक्कल नाहीं

[पुढील उतारा रा० भार्गव विठ्ठल वरेरकर यांनीं लिहिलेल्या 'हाच मुलाचा बाप' या नाटकांतील पहिल्या अंकांतला आहे. दिगंबरपंत हा दारिद्र्यग्रस्त असून त्याच्या मुलीचें लग्न जमणें हुंड्याच्या चालीपायीं अशक्यप्राय झालें आहे. अशा स्थितींत विष्णुपंत नांवाचा एक आपमतलबी कारकून त्याला भेटतो व मुलगी एका म्हाताऱ्याला देण्याचा मानभावीपणानें उपदेश करितो असा संदर्भ आहे. कथानक पूर्णपणें समजावून घ्यावयाचें असल्यास व नाटककाराचें कौशल्य पहावयाचें असल्यास सबंध नाटकच वाचणें इष्ट आहे. ]

[ पुण्यांतील एक रस्ता. विष्णुपंत व दिगंबरपंत येतात. ]

**विष्णुपंत**:—दगड आहांत तुम्ही दिगंबरपंत ! रावबहादुर कोणीकडे आणि तुम्ही कोणीकडे ! कुठं इंद्राचा ऐरावत आणि कुठं खेमा गवळ्याची म्हैस ! कांहीं तरी शोभण्यासारखं बोललं पाहिजे ना ? रावबहादुरांपाशीं मीं असली गोष्ट काढली तर ते मला केव्हांच घराबाहेर घालवून देतील.

**दिगंबरपंतः**—तुम्हीं म्हणतां तें सारं खरं आहे. पण म्हणतात ना, गरजवंताला अक्कल नाहीं तशी माझी स्थिति झाली आहे. सहा मुलींचीं लग्नं कशींबशीं उरकलीं. तींच होतां होतां सत्तेचं घर गेलं, वडिलार्जित जमीनजुम्ला[1] गेला, साठ रुपयांची नोकरी होती तीहि सावकाराच्या धरण्यापायीं कर्जबाजारी ठरल्यामुळं गेली. आतां राहिलं काय? फक्त लग्नाच्या दोन मुली! धाकटीच्या लग्नाची काळजी नाहीं म्हणा; कारण माझा भाचा नानू आतां डॉक्टर झाला आहे. त्यानं तिच्या लग्नाचा सारा भार



भा. वि. वरेरकर

स्वतःवर घेतला आहे. अझून कांहीं तो मिळवता झाला नाहीं. नाहींतर यमूच्या लग्नालासुद्धां त्यानं हातभार लावला असता. तेव्हां विष्णुपंत, तुम्हीच सांगा, हुंडा आणूं कुठला? हुंड्याशिवाय लग्न ठरलं तरी, तरी देखील लग्नाचा खर्च व्हायचा हेंच मोठं संकट आहे.

**विष्णुपंत**—हें सुद्धां संकट आहे ना? आतां तुम्हीच सांगा, रावबहादुरांकडचं स्थळ तुम्हांस कसं लाभेल? आजच त्या नरसिंगगडच्या कारभाऱ्यांचं पत्र आलं आहे. ते अडीच हजार रुपये हुंडा द्यायला तयार आहेत आणि रावबहादुर पांच हजारांचा आंकडा दांतीं धरून बसले आहेत. तेवढ्यावर कुठं भागणार आहे

१ जुम्ला (आरबी) = सर्व. जमीनजुमला = वतनवाडी.

म्हणा ! कारण आजच वसंतराव फर्स्ट् क्लासांत बी.ए. पास झाल्याची तार आली.

**दिगंबरपंत**—काय वसंतराव पास झाले ? आणि फर्स्ट् क्लासांत ? ( कपाळाला हात लावतो. )

**विष्णुपंत**—तुम्हांला वाईट वाटलं कीं काय ? दिव्य पुरुष दिसतां अगदीं !

**दिगंबरपंत**—खोटं कशाला बोलूं ? होय, क्षणभर मला वाईट वाटलं खरं. दारिद्र्यानं मन दुष्ट होतं—खरं—तें असंच ! विष्णुपंत, मला क्षमा करा. पण खरं सांगायचं म्हणजे वसंतराव नापास झाले असते तर मला आनंद झाला असता.

**विष्णुपंत**—म्हणजे ? वसंतराव नापास झाल्यानं तुमचा काय फायदा ?

**दिगंबरपंत**—फायदाच असं कांहीं म्हणतां येत नाहीं; पण फायद्याची आशा जागवायला तो एक आधार झाला असता.

**विष्णुपंत**—तो कसा काय बुवा ? मोठे चांडाळ दिसतां तुम्ही हो !

**दिगंबरपंत**—माणसाच्या अंगीं वाटेल तो दोष उत्पन्न करण्याची ताकद फक्त एका दारिद्र्यांत आहे. त्याच दारिद्र्यानं मला सांगितलं, कीं वसंतराव नापास झाले तर श्रीमंतांच्या मुलींच्या त्यांना तितक्याश्या मागण्या येणार नाहींत आणि मग अर्थातच माझी मागणी पुढें करायला मला कांहीं अवकाश उत्पन्न होईल.

**विष्णुपंत**—शुंभ आहांत अगदीं. एक परीक्षा नापास झाल्यानं कांहीं मुलाची किंमत एकदम उतरत नाहीं. या पूर्वींची मागणी बाराशें ( जीभ चावून ) अडीच हजारांची आहे ना ?

**दिगंबरपंत**—पण तीं ते पास होतील या आशेवर केली असेल.

**विष्णुपंत**—मग झालेच कीं नाहीं आतां पास ? व्हायचेच ते पास ! त्यांत कांहीं शंका नव्हती.

**दिगंबरपंत**—पहा विष्णुपंत, एवढं कार्य जुळवून द्याल तर मी केव्हांहि तुमचे उपकार विसरणार नाहीं.

**विष्णुपंत**—काय द्याल मला ?

**दिगंबरपंत**—दारिद्र्य हेंच काय तें माझं वैभव आहे.

**विष्णुपंत**—म्हणजे ! तुमचं दारिद्र्य देणार आहांत कीं काय मला ? खाशी उपकारांची फेड !

**दिगंबरपंत**—तुम्हांला द्यायला माझ्या जवळ काय आहे ? शिकवण्या धरल्या आहेत म्हणून हातातोंडाची गांठ पडते ! हेच देवाचे उपकार म्हणावयाचे !

**विष्णुपंत**—मग तुम्ही मुलीचं लग्न करणार कसं ? बरं, तिचं वय काय आहे ?

**दिगंबरपंत**—तिला हें तेरावं वर्ष असं आज तीन वर्षं सांगत आलों आहें. पण खरं बोलायचं म्हणजे तिला गेल्या श्रावणांत सोळावं संपून सतरावं लागलं.

**विष्णुपंत**—सतरावं ? अरे बापरे ! सतरावं वर्ष ? माझ्या बायकोला सतराव्या वर्षीं तीन मुलं होऊन ती मरून सुद्धां गेली होती. सतरावं वर्ष ! मोठी कठीण स्थिति आहे बुवा !

**दिगंबरपंत**—येत आहे का माझी दया ? पहा, पदर पसरतों. एवढी दया कराच. या कन्यादानाचं फळ तुम्हांलाच मिळेल.

**विष्णुपंत**—सहा कन्यादानांचं फळ तुम्हांला मोठं उत्तम मिळालं आहे कीं नाहीं ? म्हणे कन्यादानाचं फळ ! वाटोळं झालं

साऱ्या संसाराचं ! हेंच ना कन्यादानाचं फळ ? तें तुमचं तुम्हांलाच लखलाभ असो.

**दिगंबरपंत**—तर मग आतां मी करूं तरी काय ?

**विष्णुपंत**—मुळामुठेंत जीव द्या ? काय विचित्र माणूस आहे ? मी काय सांगणार यांत ?

**दिगंबरपंत**—खरंच ! आतां एक धोंडा माझ्या गळ्यांत आणि एक मुलीच्या गळ्यांत बांधून मुळामुठेच्या उदरांत ठाव पहावा लागणार खास !

**विष्णुपंत**—फार उत्तम होईल. मुलांच्या बापांच्या मागचा एक ससेमिरा[1] तरी चुकेल.

**दिगंबरपंत**—मुलीचा बाप झालों, एवढ्यावरूनच मी जगाला त्याज्य वाटूं लागलों अं ! मी मेलों, माझ्या मुली मेल्या, तर जगाच्या मागची एक ब्याद नाहींशी होणार ? विष्णुपंत, मी मेल्यानं जगाचा भार बराच हलका होईल म्हणतां ?

**विष्णुपंत**—काय मूर्ख आहांत हो ! मुलीचं लग्न होत नाहीं म्हणून कुणीं जीव दिला आहे कीं काय ? तुम्हांला मी एक युक्ति सांगतों, ऐका. बिजवराला मुलगी द्यायची तुमची तयारी आहे का ?

**दिगंबरपंत**—काय वय आहे त्या बिजवराचं ?

**विष्णुपंत**—झालं ! वय विचारूं लागलांत. मुलीचं लग्न कसं होईल एवढं पहावं समजलांत ? आमच्या शेजारीं एक गृहस्थ आहेत, त्यांची नुकतीच बायको वारली आहे, चांगलं कुटुंबाचं घर आहे, घरांत भरगच्च माणसं आहेत, त्यांचा वडील मुलगा सारा चाळीस वर्षांचा आहे. सहा भाऊ; पण कसे एक जुटीनें वागतात—चारी मुलींचीं लग्नं झालीं आहेत.

१ एकसारखें मागें लागलेलें संकट.

**दिगंबरपंत**—कुणाचे भाऊ! त्या गृहस्थाचे का?

**विष्णुपंत**—नव्हे, हो. मुलगे त्यांचे. चांगला टणटणीत म्हातारा गृहस्थ आहे. पन्नास रुपये पेन्शन आहे. आज तेरा वर्षें झालीं पेन्शन घेतल्याला. पण कपाळाला सुंठ लागलेली कांहीं कुणीं पाहिली नाहीं.

**दिगंबरपंत**—बरेच म्हातारे असावेत असं दिसतं.

**विष्णुपंत**—हो आहेत म्हातारे, मग? मुलीचं लग्न झालं पाहिजे ना? बस्स, झालं तर. हुंड्याचा भार मुळींच न पडण्याची तजवीज मी करतों. जुळल्यास दोन्ही मंडपांचा खर्चसुद्धां तेच करतील अशी व्यवस्था झाली तरीहि पाहूं!

**दिगंबरपंत**—(स्वगत) काय करूं? पोटच्या गोळ्याला समजून उमजून वैधव्यपंकांत लोटूं कां? काय करूं? मग लग्न तरी कशाला करायचं? शुभमंगल केल्याच्या दुसऱ्याच दिवशीं अशुभ आणि अमंगल अशी जांवयाची प्रेतयात्रा पहायला तयार होऊं काय? कां होऊं नये? हर हर! हुंडा तरी कुठला देऊं? पोरीचं लग्न तरी होईल. मग येईना का वैधव्य? लग्नाशिवाय तर मुलीला ठेवतां येत नाहीं. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं झालेली विधवा आमच्या समाजाला पाहवते पण अविवाहित प्रौढ कुमारिका मात्र आमच्या समाजाला मुळींच दिसत नाहींत! होईल! पुढं विधवा होईल! पण आज तर लग्न होईल? हर हर! दारिद्र्या, काय माझं मन कोतं केलंस हें!

**विष्णुपंत**—कां विचार कसला करतां?

**दिगंबरपंत**—काय करणार? मुलीचं लग्न तर झालं पाहिजे? होय. तुमच्या सूचनेला कबुली देतों. पण नको, आजचा दिवस थांबा. आजच एक गृहस्थ यमुनेला पाहायला यायचे आहेत.

त्यांचा कायम निकाल कळेपर्यंत एवढं स्थळ हातचं घालवूं नका. पोरीच्या कपाळीं काय आहे कोण जाणे? काय व्हायचं असेल तसं होईल.

**विष्णुपंत**—ठीक आहे. ती व्यवस्था मी करतों. (स्वगत) या भिकाऱ्याकडून नाहीं तर नाहीं, पण त्या थेरड्या गुंडोपंताकडून तरी शेंपांचशें उकळतां येतील. (उघड) बरं येतों मी. (पाहून) अरे! हे कोण? दादासाहेब कीं काय? आज कसे आले?

**दिगंबरपंत**—अरे हा नानू! (हातांत पोर्टमँटो घेतलेला वसंतराव व डॉक्टर गुलाब येतात. गुलाब दिगंबरपंतांना पायांवर डोकें ठेवून नमस्कार करतो.) हा वेड्या, हें काय? भर रस्त्यांत मला नमस्कार करतोस?

**गुलाबराव**—वडील माणसांना भर रस्त्यांत नमस्कार करायला मला कुणाच्या बापाचीहि भीति नाहीं.

**विष्णुपंत**—हें काय दादासाहेब? उद्यां येतों म्हणून तार केलीत काय? आणि आजच येतां काय?

**वसंतराव**—गुलाब म्हणाला आजच चल, तेव्हां मीहि निघालों. बाकी....आणखी एक दिवस मुंबईत राहून विशेष काय करणार होतों म्हणा.

**विष्णुपंत**—हेच वाटतं दिगंबरपंतांचे भाचे?

**गुलाबराव**—हो. याच देहाला डॉक्टर गुलाब म्हणतात.

**विष्णुपंत**—ह्यॅ: ह्यॅ: ह्यॅ:! नमस्कार! अलभ्य लाभच झाला म्हणायचा दादासाहेबांच्या कृपेनं!

**गुलाबराव**—ह्यॅ: ह्यॅ: ह्यॅ: ह्यॅ:! नमस्ते! दुरूनच नमस्कार. वसंत, हाच वाटतं तो तुमचा विष्णुपंत दिवाण?

**विष्णुपंत**—कसचे दिवाण–कसचे दिवाण. आपला कारकुनी

करतों रावबहादुरांच्या घरीं. आहेत आणखी दोन कारकून हाताखालीं. बरं चाललं आहे रावबहादुरांच्या कृपेनं. दिवाण कसले म्हणा! तरी पण रावबहादुरांना जर हिज् हायनेस म्हणायचं असेल तर मलाहि दिवाण म्हणायला कांहीं हरकत नाहीं. माझ्या सल्ल्याशिवाय साहेब कोणतीहि गोष्ट करीत नाहींत. दादासाहेब जाणतातच सारं. हो, पण दादासाहेब, ती बॅग द्याना इकडे माझ्याकडे !

**वसंतराव**—नको, नको, राहूं दे.

**विष्णुपंत**—काय दादासाहेब हें? आधीं तरी कळवायचं, शिग्रास घेऊन नसतों का आलों? बरं, नाहीं शिग्रास. पण स्टेशन-वर टांगे नाहींत का मिळत? काय हें? तुम्हीं हातांत बॅग घेऊन येणें म्हणजे काय? निदान हमाल तरी करायचा?

**गुलाबराव**—श्रीमंतीनं दुबळेपणा येतो असं कोणी म्हणतात, तें खोटं ठरविण्यासाठीं वसंतानं स्वतः हमालीचं काम पत्करलं. भला लठ्ठ फुगला आहे. झालं काय मैलभर बॅग न्यायला? आतां वांचले कीं बारा आणे. तो हमाल कशी हुज्जत घालीत होता? भली खोड मोडली गुलामाची.

**विष्णुपंत**—मितव्ययीपणा कांहीं वाईट नाहीं.

**गुलाबराव**—श्रीमंतांचा मितव्ययीपणा तोच गरिबांचा कंजुष-पणा ठरत असतो. पण विष्णुपंत, हा मितव्यय नव्हे आणि कंजुष-पणाहि नव्हे. श्रीमंतीच्या वैभवाचं प्रदर्शन करतांना मनुष्य पराव-लंबी बनत असतो. तेव्हां ज्या स्वावलंबनाला श्रीमंत लोक कंजुष-पणा असं कुजकं नांव देत असतात, तेंच हें स्वावलंबन.

**वसंतराव**—समजलांत विष्णुपंत?

**गुलाबराव**—बरं वसंत ! मी जातों आतां मामांबरोबर. आतां कांहीं घर शोधीत जायला नको. घर दाखविण्याचे तुझे श्रम तरी वांचले.

**दिगंबरपंत**—तसं नको नानू, सारेच आपण आपल्या बिऱ्हाडीं जाऊं ! तेथून थोडा चहा घेऊन वसंतराव जातील आपल्या घरीं.

**विष्णुपंत**—आहे का पण घरीं चहा ?

**गुलाबराव**—गरिबी आली म्हणून गृहस्थपणा कांहीं निघून जात नाहीं. गृहस्थपणाचा कुठं अभावच दिसत असेल तर तो तुम्हां श्रीमंतांकडे ! समजलांत विष्णुपंत ?

**दिगंबरपंत**— नानू, असं भलतंच बोलूं नये. आपण सौजन्यानं वागत राहावं. दुसऱ्याचीं उणीं उकरून काढूं नयेत. सारेच श्रीमंत कांहीं तसे नसतात.

**गुलाबराव**—यांनीं मात्र आम्हांला वाटेल तसं टाकून बोलावं आणि आम्हीं तें सहन करावं ! कां ? तर आम्ही गरीब ! हें पहा मामा, माझा स्वभाव मोठा खट्याळ आहे. कुणीं मला नुसती टिचकी मारली तर उलट त्याला झणझणीत टोला हाणल्यावांचून माझ्यानं राहवत नाहीं.

**दिगंबरपंत**—चला आतां घरीं. रस्त्यांतच किती वेळ बोलत उभे राहणार ? शिवाय तुमच्या हातांत हीं ओझीं आहेत. चला, घरींच बसूं !

**वसंतराव**—माफ करा दिगंबरपंत. मी आतां घरींच जातों. घरीं पोंचण्याच्या पूर्वींच मी इथं आल्याचं कळलं तर बाबा रागं भरतील.

**दिगंबरपंत**—छे: छे: ! असा किती वेळ लागणार आहे ?

**वसंतराव**—( गुलाबला एकीकडे ) मी जातोंच घरीं. नाहींतर

हे आमचे दिवाणसाहेब पुढें जाऊन भलतंच कांहीं तरी शिलगाऊन देतील आणि तें आपल्या पुढील बेतांना विघातक मात्र होईल. ( उघड ) आतां जातोंच मी. उद्यां खात्रीनें भेटेन.

**गुलाबराव**—मामा, जाऊं दे त्याला घरीं. पास झाला आहे कीं नाहीं फर्स्ट् क्लासांत ! एकदां घरीं जाऊन काय तो टेंभा मिरवून घेऊं दे त्याला, चला.

**दिगंबरपंत**—बरं आहे तर. पण विष्णुपंत, मघांशीं सांगितलेल्या स्थळावर नजर ठेवा हं. चार ठिकाणीं चार खडे मारीत राहिलें पाहिजे. करतां काय ?

**गुलाबराव**—कुठलं स्थळ ?

**विष्णुपंत**—आहे आपलं असंच.

**गुलाबराव**—पण सांगाल कीं नाहीं कुठलं तें ?

**विष्णुपंत**—अशा गोष्टींची वाच्यता करूं नये हेंच बरं.

**वसंतराव**—खरं आहे. हल्लींच्या दिवसांत नाटककारांनीं नाटकांचे प्लॉट आणि मुलींच्या बापांनीं शोधलेलं स्थळ कधींहि कुणाला सांगूं नये हेंच बरं.

**गुलाबराव**—तें कांहीं नाहीं. मला सांगायला कांहीं हरकत नाहीं. या विष्णुपंतांनीं दाखवून दिलेलं स्थळ आहे म्हणून जरा शंका येते. आमचे मामा आहेत अगदीं भाबडे. मुलीला स्थळ आहे म्हणतांच वाटेल त्याच्या गळीं पडतात.

**विष्णुपंत**—स्थळ कांहीं वाईट नाहीं. ते सदाशिव पेठेंतील गुंडोपंत पेन्शनर.

**गुलाबराव**—त्यांचा सहावा मुलगा कीं काय ! त्याचं तर गुदस्तांच लग्न झालं.

---

१ पेटवून.

**विष्णुपंत**--नव्हे, नव्हे, ते स्वतः

**गुलाबराव**--काय म्हटलंत? ते स्वतःच? हेंच वाटतं तुमचं तें स्थळ? बेशरम! पाजी! आमच्या यमूसाठीं ऐशी वर्षांच्या थेरड्याचं स्थळ दाखवून द्यायला लाज कशी वाटली नाहीं? मुलगी वाढली म्हणून बाप कांहीं कसाई होत नाहीं, समजलांत? म्हणे गुंडोपंत! ओंकारेश्वरावर गोंवऱ्या गेलेल्या या थेरड्यांना लग्नं हो कशाला हवींत? ऐकलंत विष्णुपंत, ज्या दिवशीं आम्हां सर्वांचे उपाय थकतील, हुंडा न घेतां लग्न करणारा कुणीच पुरुष ज्या वेळीं दिसून येणार नाहीं, आम्ही सर्व लाजाबिजा चट्साऱ्या गुंडाळून ठेवूं आणि खरेखुरे वांध्राचे खाटीक बनूं त्या दिवशीं रिकाम्या खुर्चीला हात लावलेल्या यमूचा एक फोटो काढूं आणि ही रिकामी खुर्ची भरली पाहिजे अशी ग्रेटप्रायमर टाइपांत जाहिरात देऊन खालीं पळालेल्या कैद्याच्या वर्णनाबरहुकूम यमूचं वर्णन देऊन ती जाहिरात या पुण्यांतल्या एखाद्या सचित्र वर्तमानपत्रांत फोटोसकट काढूं आणि "विशेष खुलाशासाठीं वर्तमानपत्राच्या मालकांस भेटावें" अशी सूचना देऊं. समजलं? ज्या अर्थीं वर्तमानपत्रांचे संभावित मालक हल्लीं दीक्षिति करूं लागले आहेत त्या अर्थीं तुमच्यासारख्या मध्यस्थांची पोळी पिकेल असं मुळींच समजूं नका. जा. चार कोरे कागद घेऊन त्यावर तूप, गूळ, चहा, साखरेचा हिशेब लिहीत बसा. जा.

**विष्णुपंत**-- (स्वगत) दगड आहे-अगदीं शंख आहे हरामखोर!

**वसंतराव**--चला विष्णुपंत, उशीर झाला. गुलाब, उद्यां भेटेन तुला.

[ दोघे जातात.

**गुलाबराव**—चला मामा. गुलामाची चांगली कानउघाडणी झाली—

**सोहा कानडा–एकताला** ( साहेन जब मुझे बुलावे० )

**हा धनमद्युत जगांत सान गणित सकलां ॥ध्रु०॥ वित्त-शाठ्य लागलें । नच उदार त्यामुळें ॥ मानदान त्या न-कळे। अजापुत्र गमला ॥ १ ॥ द्रव्यधूम वाढला । म्हणुनि अंध जाहला ॥ स्वप्रकाश त्या कुठला । महामूढ पशुला ॥२॥**

**भा० वि० वरेरकर**

( हाच मुलाचा बाप )

## प्रश्न व सूचना

( १ ) हुंड्याची चाल कोणत्या दृष्टींनीं वाईट आहे तें सांगा. या चालीचे बाबतींत तुम्ही कोणत्या सुधारणा सुचवूं शकाल ?

( २ ) विष्णुपंताच्या स्वभावांतील कांहीं विशेष सांगा.

( ३ ) पुढील वाक्यांचा अर्थ सांगाः—

[ अ ] कुठं इंद्राचा ऐरावत,आणि कुठं खेमा गवळ्याची म्हैस !

[आ] गरजवंताला अक्कल नाहीं.

[ इ ] चार ठिकाणीं चार खडे मारीत राहिलें पाहिजे.

[ ई ] वर्तमानपत्रांचे संभावित मालक हल्लीं दीक्षिति करूं लागले आहेत.

( ४ ) पुढील शब्दांचे अर्थ सांगाः—

ससेमिरा, जमीनजुम्ला, बेशरम, टेंभा मिरविणें, वाच्यता न करणें,अजापुत्र.

# पोराचा नाद झालं !

[ प्रसिद्ध नाट्यछटालेखक श्री. शंकर काशीनाथ गर्गे ऊर्फ 'दिवाकर' यांनीं नाट्यछटांशिवाय कांहीं थोड्या गोष्टीहि लिहिल्या आहेत. त्यांपैकींच पुढील गोष्ट ही एक होय. ही लघुकथा विशेषेंकरून 'भावकथा' आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण त्यांत एका विशिष्ट कोमल भावनेची तीव्रता उत्कटतेनें व्यक्त केली आहे. गेलेल्या मुलाची आठवण होऊन वाईट वाटणें ही गोष्ट संसारांत नित्याचीच असली तरी या भावनेचें मार्मिक व हृदय-स्पर्शी शब्दचित्र थोड्याच पण सूचक अशा शब्दांनीं रंगविणें हें मात्र नेहमींच साधतें असें नाहीं.]

हो तिथंच. शनवारांत नातूंच्या हौदाजवळ जो दुमजली निळा वाडा आहे, तिथंच मी म्हणतों ते नीलकंठराव राहात असतात. वयानें साठीच्या आंत-बाहेर असतील नसतील. मनुष्य खाऊन पिऊन तसा सुखी आहे; पण बरोबरीचे स्नेहीसोबती म्हणावेत, तर ते कांहीं फारसे कोणी दिसत नाहींत; त्यामुळें शाळेंतलें काम संपलें, कीं आपलें घर बरें आणि आपण बरे, ही त्यांची नेहमींची वृत्ति.



शं. का. गर्गे

गेल्या रविवारचीच गोष्ट. दर रविवारीं सकाळीं

आठ ते नऊच्या दरम्यान चहाला मी तिथं हजर असायचें हें आमचें ठरलेलें. म्हणून दिवाणखान्यांत जाऊन, नेहमींप्रमाणें कोटटोपी काढून ठेवली, आणि गालिचावर 'ज्ञानप्रकाश'चा अंक पडला होता तो घेतला आणि वाचूं लागलों. जवळच नीलकंठराव लहानसें पोथी-सारखें कांहीं तरी वाचीत होते आणि तेंहि अगदीं मनापासून ! तेव्हां दोन-तीन मिनिटें तरी 'या बसा' पलीकडे कांहींच आमचें बोलणें झालें नाहीं.

"कां तुमचे बापूसाहेब नाहीं आले वाटतें ?" असें हंसत हंसत आणि पुस्तक मिटवीत त्यांनीं मला विचारलें.

मीं म्हटलें, "नसतील आले. आपल्या संस्थेचे ते तहह्यात सभासद झाले आहेत, तेव्हां आतां सारखीं कामें. आतांच साडे-आठाच्या सुमाराला– त्यांच्या कार्यकारीमंडळाची, मला वाटतें बैठक आहे !"

इतकें मी बोलतों आहें, तोंच माझी नजर नीलकंठरावांच्या चष्म्याकडे गेली, आणि पहातों, तों त्यांचा नेहमींचा चष्मा नाहीं !

म्हणून सहज मीं विचारलें, "कां हो, हा दुसराच चष्मा दिसतो आहे आज !"

"हो !" असें म्हणून किंचित् ते हंसले, आणि........चष्मा हातांत घेऊन, खिन्न स्वरानें....क्षणभरानें मला म्हणतात, "पोराचा नाद झालं !"

"म्हणजे ? मी नाहीं समजलों !"

– २ –

खुर्चीवर बसले होते ते उठले, आणि जड पावलांनीं मी बसलों होतों तिथंच शेजारीं आले, आणि "अरे रामा रे !" असें म्हणून एक मोठा सुस्कारा टाकून खालीं बसले !

समोरच भिंतीवरील एका मोठ्या तसबिरीकडे बोट करून मला विचारतात, "तो फोटो....कुणाचा आहे, तें तुम्हांला ठाऊकच असेल?"

"हो," मीं म्हटलें, "तुमच्या चिरंजीवांचा!"

यावर ते म्हणतात कीं, "हाच आमचा बाळू, आठ एक वर्षांचा असेल, त्या वेळेच्या या गोष्टी. तेव्हां माझी मिळकत म्हणजे शाळेंतला पगार, आणि शिकवण्यांचे वगैरे धरून, तीसचाळीस म्हणजे, शिकस्त! आपला कसाबसा संसार–"

"ही कुठली वांईची, कीं नगरची हकीकत?" मध्येंच विचारलें मीं.

तेव्हां ते म्हणाले, "नाहीं, त्या वेळेला पुण्यास होतों मी.... असो! एक दिवस, काय वाटलें त्याला कुणास ठाऊक....सकाळची वेळ, नेहमींप्रमाणें गीतेंतला पाठ वाचून–"

"ती टेबलावर दिसते आहे तीच का?"

"हो, तीच ती पोथी!....वाचून झाल्यावर जेवायला म्हणून जों उठणार इतक्यांत तो माझ्याकडे पहात म्हणतो,....'दादा! तुम्ही हा'–हा म्हणजे जस्ताचा–'चष्मा कां हो लावतां? सोन्याचा कां नाहीं लावीत?'....कधीं कोणाचा सोन्याचा पाहिला असेल त्यानें, तेव्हां विचारलें आपलें!"

"अस्सें! मग?"

"मग मींहि हंसत हंसत म्हटलें, कीं '....काय करावें बोवा, मी पडलों गरीब! सोन्याच्या चष्म्याला पैसे फार पडतात! आणायचे कुठले? आतां....तूंच मिळवून आणशील, तेव्हां.... घालीन बापडा सोन्याचा'!"

असें बोलतांच त्यांचे डोळे....काय पण भरून आले!!

— ३ —

"झालें!" डोळे पुसून पुढें ते सांगूं लागले, "तें तिथें तितकेंच राहिलें! पुढें मला वाटतें, तो इंग्रजी दुसरींत किंवा तिसरींत असेल. एके दिवशीं कुठलेसे संस्थानिक किंवा दुसरे कोणी तरी–हा ज्या शाळेंत होता, ती शाळा पाहायला म्हणून आले. हा वर्ग पहा, तो पहा, असें करतां करतां याच्या वर्गांत ते आले. आणि विचारलें वाटतें कीं, 'पुस्तकांतल्या कवितांखेरीज बाहेरचें कांहीं कुणाला म्हणतां येतें का?' तेव्हां कोणीं कांहीं फारसें वाटतें म्हटलें नाहीं. याच्यावर जेव्हां पाळी आली, तों लागली स्वारी 'केकां'तले श्लोक म्हणायला! पांच झाले, दहा झाले याचा आपला चालला सपाटा!"

"अरे वा! फारच छान!" असें रहावेना म्हणून म्हटलें मीं!

"अहो, छान कसलें! पूजा, रामरक्षा किंवा असे कांहीं 'केकां'तले श्लोक....बसल्या बसल्या सहज शिकवलेले मीं. झाला त्यांचा उपयोग!"

"मग पुढें?"

"सगळें....आहे तें पुढेंच आहे! त्याचें तें म्हणणें ऐकलें, आणि ते बुवाजी अगदीं खूष झाले! नांव वगैरे विचारलें, अन् लगेच खिशांतून दहा रुपयांची नोट काढून, बक्षीस म्हणून त्याच्या हातावर ठेवली, आणि पाठीवर हात फिरवून शाबासकी दिली!!"

— ४ —

"पुढें दुसऱ्याच दिवशीं पूजा वगैरे आटपली. आणि आतां गीता वाचायला बसणार, इतक्यांत डबीचें झांकण उघडून पाहतों

तों आपला निराळाच चष्मा ! तेव्हां हा आला कुठून म्हणून जों विचार करतों आहें– .

तोंच त्याची आई हंसत हंसत म्हणाली, 'का, येवढा विचार कसला चालला आहे ?'

मीं विचारलें, 'हा चष्मा कोणाचा ?'

तेव्हां ती अधिकच हंसून म्हणाली, 'कोणाचा म्हणजे ? आपलाच नव्हे का तो ?'

'छे ग ! माझा कुठला असेल हा !' असें किंचित् त्रासून म्हटलें मीं !

'बरं तर बाळूलाच विचारावें मग !' म्हणून तिनें त्याला हांक मारली, आणि हंसत हंसत विचारलें कीं, 'अरे, हा चष्मा कोणाचा ?'

पण तोहि कांहीं बोलेना ! गालांतल्या गालांत हंसत, आपला मुकाट्यानं खालीं पहात स्वस्थ उभा.

तेव्हां त्याची आईच कौतुकानें म्हणाली, 'ही....आपल्या बाळूची मिळकत बरं ! काल त्याच्या शाळेंत कोणसंसं आलं होतं. अन् श्लोक चांगले म्हटल्यावरून दहा रुपये याला त्यांनीं बक्षिशी दिली ! त्यांतला हा....'

'खरें का रे ! मग काल कुठं बोलला नाहींस तें ?'

'पण आतांपर्यंत इकडे कळवायचंच नाहीं असंच तर ठरलेलं ! शाळेंतून आल्याबरोबर पैसे मजजवळ दिले, आणि मनांतलं सगळं सांगितलं त्यानं आपल्या ! सकाळीं आज लगोलग गेला आणि हा आणला चष्मा....सोन्याचा करून' ! !"

— ५ —

हें सांगतां सांगतां त्यांचा कंठ किती दाटून आला म्हणून सांगूं !

क्षणभर स्वस्थ....अगदीं स्वस्थ नीलकंठराव पडून राहिले.

"तेव्हां....अशी ही हकीकत!" म्हणून पुनः ते सावकाश बोलूं लागले, "बाळू....आमचा तसा चांगला मुलगा! अभ्यासांत जरी हुशारांतला नव्हता, तरी होता आपला बेताचा! पण स्वभावानं....खरोखरच चांगला! पण नशीबापुढें....थोडेंच चालतें आहे आपलें ? नव्हता आम्हांला फार दिवस लाभायचा तो! वयाच्या सोळाव्याच वर्षी....!"

कशानं इतकं विकोपाला गेलं ?"

"कशानं! कांहीं कुणाला नीट समजलं नाहीं! पोटांत कायसंसं झालेलं! पुष्कळ डाक्टर झाले, आणि इलाज केले, पण नव्हतं झालं चला! एकुलता एक मुलगा! गेल्याची आठवण झाली, अन् जीव घाबरा होऊन तडफडायला लागला म्हणजे हा चष्मा लावतों, आणि बसतों ती गीता वाचीत! तेव्हां असा हा...." नीलकंठराव गहिंवरून म्हणाले, "अस्सा हा पोराचा नाद!!"

'दिवाकर'–शं० का० गर्गे

(रत्नाकर–नोव्हेंबर १९२६)

## प्रश्न व सूचना


(१) नीलकंठरावांच्या भाषणांत कित्येक ठिकाणीं दोन शब्दांमध्यें टिंबें दिलेलीं दिसतात तीं काय दर्शवितात ?

(२) एखादा लहान १०-१२ वर्षांचा मुलगा आपल्या आईला खूष करण्याकरितां तिच्या आवडीची एकादी गोष्ट करीत आहे अशा अर्थाची १५-२० ओळींपर्यंत एक गोष्ट लिहा.

---

# म्हातारपणचे फायदे

[ पुढील उतारा रा० श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'साहित्य-बत्तिशी ऊर्फ सुदाम्याचे पोहे' या विनोदी लेखसंग्रहांतून घेतला आहे. कोल्हटकरांच्या उच्चतम विनोदाचा रोख दुष्ट चालीरीति, भोळ्या व भ्रामक समजुती, खुळचट सोंगें-ढोंगें इत्यादि लोकांच्या नजरेस आणून तीं हास्यास्पद करणें व अशा अप्रत्यक्ष रीतीनें समाजाची सुधारणा करणें इकडे असतो. परंतु कित्येक वेळां त्यांस शब्दांचे खेळ खेळावेसें वाटतें. शाब्दिक विनोद हा उच्चतम विनोदाचा प्रकार नव्हे. तथापि त्यांतील कल्पनांचा खेळ व शाब्दिक कसरत हीं पाहण्यांतहि एक प्रकारची मौज असते. आणि याच हेतूनें पुढील उतारा–( तो उच्चतम विनोदाचा नमुना नसला तरी ) दिलेला आहे. ]



श्री. कृ. कोल्हटकर

माझ्या ओळखीचा एक दीडशें वर्षांचा म्हातारा भिक्षुक नुकताच मरण पावला. त्याचें नांव बचंभट असून त्याचा जन्म नानासाहेब पेशव्यांच्या अमदानींत पुणें मुक्कामीं झाला. थोरल्या माधवरावसाहेबांच्या मुंजीस हा त्यांच्या पंक्तीस मुंजा होता. पानिपतच्या लढाईनंतर रणांगणीं पतन पावलेल्या वीरांचीं जीं अनेक श्राद्धें झालीं, त्यांच्या भोजनप्रसंगीं याचे हात ओले झाले होते. माधवरावांची

पत्नी सती गेली तेव्हां तिला आशीर्वाद देण्यास हा पुढें सरसावला होता. पुढें नारायणरावांच्या वधामुळें राघोबादादांस झालेल्या पातकांचें क्षालन करण्याला ज्या भटांचें पादतीर्थ कारण झालें, त्यांत हा प्रमुख होता. यानंतर दुसऱ्या बाजीरावाचे वेळीं पुण्यास वेढा पडला असतांना तोफांमधून निघणाऱ्या अग्निमय गोळ्यांचें शमन करण्याकरितां त्यानें लाडवांच्या गोळ्यांचीं जीं संतर्पणें चालविलीं त्यांत त्यानें आडवा हात मारिला. इंग्रजांनीं पुण्यांत प्रवेश केल्यावर त्यांचा विटाळ होऊं नये म्हणून ज्या भिक्षुकांनीं श्रीमंतांबरोबर ब्रह्मावर्तास कूच केलें, त्यांतहि हा सामील होता. सत्तावन सालच्या बंडानंतर जे हजारों और्ध्वदेहिक[1] विधि झाले, त्यांत बरीच दक्षिणा संपादन करून आपली जन्मभूमि पहाण्याच्या इराद्यानें बचंभट पुन्हा पुण्यास परत आला. तेथें पुनर्विवाहाविरुद्ध जी प्रथम चळवळ झाली तिच्यांत त्यानें पुढाकार घेतला. परंतु कालगतीबरोबर वाहतां वाहतां पुढें त्याचें मत इतकें बदललें कीं एखादा इतिहास-प्रिय बाप आपली गतभर्तृका मुलगी या ऐतिहासिक पुरुषास अर्पण करण्यास कबूल झाला असता तर बचंभटाची तीन पायांवर (अलीकडे त्याला काठी लागत असे) तयारी असती. त्याच्या डोक्यावरील केसांत तर फारच क्रांति झाली. ज्या डोक्यावर शंभर वर्षांपूर्वी गाईच्या खुरास लाजविण्यासारखी चिमुकली शेंडी असे त्या डोक्यावर गाईचें सबंध खिल्लार मावेल इतकी गर्द केसांची छाया झाली. पण ज्या मनुष्याचे वाट्यास नाना फडणवीस व माधवराव रानडे या उभयतांशीं गप्पागोष्टी करण्याचें भाग्य आलें होतें, त्याला हा डोक्यांतील फरक क्षम्य होता.

बारशास व बाराव्यास जेवणाची सारखीच तयारी असणाऱ्या

१ मरणोत्तर, मेल्यानंतरचे.

या भिक्षुकाचें हव्यकव्यांपलीकडे[1] जर किंचित् लक्ष्य असतें तर आजमितीस कितीतरी वादग्रस्त ऐतिहासिक गोष्टींचा उलगडा झाला असता ! पण त्याचें तिकडे लक्ष नसे इतकेंच नाहीं, तर त्याच्या इतिहासविषयक समजुतींत बराच घोंटाळाहि होता. पुरंदरचा तह पुरंदऱ्यांनीं घडवून आणिला; खर्ड्याचे लढाईंत रक्तापेक्षां शाईच अधिक वाहिली; सुमेरसिंग हा फत्तेसिंग गायकवाडाचा पुत्र व रणजितसिंगाचा नातू होता; ( सांवरशिंगाशीं संबंध न जोडण्याचें कारण केवळ सत्यप्रीति ! ); थोरल्या शिवाजीमहाराजांनीं येथें निराळी गादी स्थापण्याचें कारण सातारच्या रस्त्यांना चढ-उतार असल्यामुळें त्यांना गुढगी रोग झाला होता; नानासाहेब पेशवे इतके समंजस असत कीं सत्तावन सालच्या बंडाचा इतिहास जर एक वेळ त्यांच्या दृष्टीस पडता तर त्यांनीं त्या बंडाचें निशाणच उभारिलें नसतें—अशी मनास चटका लावणारी माहिती अनेकदां त्याच्या तोंडांतून निघे. ही माहिती खोडण्याचेंहि धैर्य आम्हांला बहुधा होत नसे. कारण आमच्या आक्षेपांवर 'चक्षुर्वै सत्यम्'[2] हा त्याचा जबाब ठरलेलाच असे.

यमराजास विस्मृति पाडिलेल्या त्या भिक्षुकानें इतकीं वर्षे जगांत घालवून एक गोष्ट निःसंशयपणानें पैदा केली होती. ती गोष्ट म्हातारपण ही होय. इतक्या पूर्ण स्वरूपाचें म्हातारपण पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि नसेल. असें असूनहि तो नेहमीं चिंताक्रांत असे. याचें कारण त्याच्या अंगच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या गुणाचें, म्हणजे वृद्धपणाचें, वर्णन करितांना त्यानें कोणासहि ऐकिलें नव्हतें. विश्वासराव, थोरले माधवराव इत्यादि अल्पायुषी पुरुषांचीं नांवें अजरामर

१ होमहवन, व्रतवैकल्यें वगैरेसंबंधींचीं ब्राह्मणभोजनें. २ डोळ्यानें पाहिलेलें म्हणून खरें.

व्हांवींत व आपणासारख्या अजरामर पुरुषाचें नांव अल्पायुषी असावें, याबद्दल त्याला सारखा खेद होत असे. या काळजीनें त्याची कंबर अगदीं वांकून गेली, चेहरा फिक्कट होऊन त्यावर सुरकुत्या दिसूं लागल्या व शेवटीं या काळजींतच त्याचा अंत झाला ! त्याच्या आत्म्यास थोडें तरी समाधान व्हावें म्हणून हा लेख लिहीत आहें, व हा त्याच्या वर्षश्राद्धास प्रसिद्ध करण्याचा इरादा आहे.

म्हातारपणाचा पहिला मोठा फायदा म्हटला म्हणजे त्यानें दांत घांसण्याची दगदग नाहींशी होते आणि त्यामुळें राखुंडीचा व दंतमंजनाचा खर्च वांचतो. राखुंडीच्या पायीं तरुणांकडून शेंकडों गोंवऱ्या अग्नये स्वाहा करण्यांत येतात व दंतमंजनाच्या शेंकडों डब्या फस्त होतात. पण म्हातारा कनवाळूपणानें गोंवऱ्यांच्या मुळींच वाटेस जात नाहीं. हें ऋण गोंवऱ्याहि शेवटीं फेडतातच. दुसरा फायदा असा कीं म्हातारपणीं दाढा मुळींच दुखत नाहींत, व दातांतून रक्तहि येत नाहीं; आणि यामुळें औषधाप्रीत्यर्थ होणारा खर्च वांचतो. ठेंच लागून पडल्यास दांत पडण्याची म्हाताऱ्यास मुळींच भीति नसते. शिवाय म्हाताऱ्यावर 'दांत कोरून पोट भरण्याचा' कोणी आरोप ठेवीत नाहीं, किंवा 'याच्यापाशीं दातांवर मारण्यास एक पैसाहि नाहीं' असा दारिद्र्याचाहि आळ त्याजवर घेत नाहीं. दुसऱ्यावर 'दांत ठेवण्याचा' किंवा 'दांतीं तृण धरून शरण जाण्याचा' संशयहि त्याच्याबद्दल कोणी घेत नाहीं. त्यानें कोणाची कितीहि आगळीक केली, तरी त्याला त्याजकडून 'बत्तिशी रंगविण्याची' धमकी मिळत नाहीं. त्यानें कोणाचा कितीहि उपहास केला तरी त्याला 'दांत कां विचकतोस ?' असें म्हणण्याची छाती होत नाहीं. तसेंच त्यानें सांगितलेली गप्प केवळ 'दंतकथा' आहे असें त्याच्या तोंडावर कोणासहि सांगतां येत

नाहीं. व त्याची गालफडें बसलेलीं असल्यामुळें ती 'कपोल-कल्पित' आहे असेंहि म्हणवत नाहीं.

म्हातारा ठेंगण्या दारांतून जातांना त्याच्या कपाळाला कधींहि टेंगूळ येत नाहीं, व जमिनीवरचा पदार्थ उचलतांना त्याला कधींहि मुद्दाम वांकावें लागत नाहीं. तसेंच त्याला कधीं राग आल्यास कपाळाला मुद्दाम आंठ्या घालावयास नको व पसंती अगर नकार दर्शवितांना मान मुद्दाम हलविण्याची तसदी घ्यावयास नको. डोक्यास टक्कल पडलें असल्यास त्याचा हजामतीचा खर्च वांचतो तो निराळाच !

म्हाताऱ्याचे सांधे धरल्यामुळें त्याला घरांतून बाहेर पडतां येत नाहीं व यामुळें रस्त्यानें धांवणाऱ्या गाड्यांखालीं चेंगरून जाण्याची भीति नसते. त्याला धड झोंप येत नाहीं यामुळें तो चोरीबद्दल निर्भय असतो. अंगांत रक्त नसल्यामुळें ढेंकूण त्याच्या वाटेस जात नाहींत व बाहेर निघालेल्या नाकाच्या व हनुवटीच्या बुजगावण्याला भिऊन चिलटेंहि त्याच्या तोंडाभोंवतीं घिरट्या घालीत नाहींत.

एका एकडोळ्या मनुष्यानें एका दोन डोळ्यांच्या माणसास म्हटलें कीं "तुला माझा फक्त एकच डोळा दिसतो, पण मला तुझे दोन दिसतात; अर्थात् तुझ्यापेक्षां मी अधिक डोळस आहें !" याच न्यायानें म्हाताऱ्यालाहि तरुणास हिणवितां येईल कीं, "बाबा रे ! तुला समोर फक्त हाडांचा सांपळा व तोंडाचें बोळकें दिसत आहे; पण मला समोर बांधेसूत व मांसल शरीर आणि सुंदर व तेजस्वी चेहरा पाहण्यास मिळत आहे. तेव्हां तुझ्यापेक्षां मीच सुखी नाहीं काय ?"

डोळ्यांस अंधत्व व कानांस बधिरत्व आल्यामुळें आणि त्यांत विस्मृतीची भर पडल्यामुळें म्हाताऱ्याला किती तरी फायदे होतात! म्हातारा निर्धन असल्यास त्याला त्याचा धनको व तो सधन असल्यास त्याचा गरीब नातलग वाटेंत भेटल्यास त्याला त्यानें ओळखिलें किंवा त्याची मागणी त्याला ऐकूं आली असें क्वचितच घडतें. रिणको व श्रीमंत नातेवाईक यांसंबंधानें मात्र हा नियम खात्रीनें लागू पडेल असें नाहीं. मुलाकरितां वधू पाहण्यास आलेला म्हातारा बाप तिला पाहिल्याबरोबर आपल्या येण्याचाहि हेतु विसरून तिला स्वतःच सनाथ करितांना एखादे वेळीं आढळून येतो ! म्हातारपणची विस्मरणशक्ति एवढी जबर असते ! म्हातार-पणींच्या विस्मृतीमुळें पुष्कळदां आदले दिवशीं वाचलेली गोष्ट दुसरे दिवशीं म्हाताऱ्याच्या लक्षांत राहात नाहीं; यामुळें तेंच तें पुस्तक त्याला दर खेपेस तितकेंच मनोरंजक वाटूं लागतें व या रीतीनें नवीं नवीं पुस्तकें घेण्याचा उपद्व्याप व खर्च वांचतो. एका म्हाताऱ्याला एक वर्षभर एकच गोष्ट रोज रोज त्याच त्या शब्दांनीं सांगतांना मीं पाहिलें आहे. नित्यपठनामुळें ती गोष्ट त्याला लवकरच तोंडपाठ झाली; परंतु ती शिळी असून आपण पूर्वीं कधीं सांगितली आहे ही गोष्ट मात्र त्याला कधीं आठवत नसे. पुष्कळ वेळां म्हातारे प्रतिवर्षीं आपलें तेंच तेंच वय सांगतांना दिसतात याचें कारणहि मधील लोटलेल्या काळाची त्यांना विस्मृति पडते हेंच असावें. अशा वृद्धांचें कालास जसें विस्मरण पडतें तसें कालाचें त्यांना पडल्यास नवल कोणतें ?

म्हातारपणामुळें नीतीवर जो संस्कार होतो तो लक्ष्यांत ठेवण्या-सारखा आहे. म्हाताऱ्याच्या अंगीं ताठा असल्याचें किंवा त्यानें काठीचा उपयोग मारण्याच्या कामीं केल्याचें अजून माझ्या

ऐकिवांत नाहीं. म्हातारा दुसऱ्याला चावतांना कधीं दिसणार नाहीं. त्याला आपल्या सौंदर्याचा किंवा सामर्थ्याचा अभिमान झालेला क्वचितच पाहण्यांत येतो. तरुण मुलींनीं त्याला 'बाबा' किंवा 'आजोबा' या नांवानें संबोधिलें असतां या बहुमानास आपण पात्र नसल्याचें तो प्रांजलपणें कबूल करील. आपलें उरलेलें आयुष्य देशसेवेंत घालविण्याचा निर्धार करणें त्याला मुळींच जड वाटत नाहीं. एका ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्यानें असा संकल्प करून तो मरेपर्यंत म्हणजे सबंध दोन महिने पार पाडल्याचें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. अशा देशसेवेस वाहिलेल्या म्हाताऱ्यास जन्मठेपेची किंवा फांशीची शिक्षा कस्पटासमान असते.

श्री० कृ० कोल्हटकर

( सुदाम्याचे पोहे )

## प्रश्न व सूचना

( १ ) दांत नसणें व कंबर वांकणें या स्वाभाविक दोषांचा फायदा कोल्हटकरांचे मतें म्हाताऱ्यास कसा होतो तें सांगा

( २ ) म्हातारपणची बाह्यतः कुचेष्टा करण्याचे निमित्तानें कोणत्या चालीरीती व कल्पना निंद्य. व हास्यास्पद करण्याचा कोल्हटकरांनीं प्रयत्न केला आहे ?

( ३ ) पुढील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करून अर्थ स्पष्ट कराः—
हात ओला होणें, आडवा हात मारणें, दांतीं तृण धरणें.

( ४ ) दुसऱ्यांच्या शारीरिक व्यंगांची कुचेष्टा करणें कितपत योग्य आहे तें दहा-पंधरा ओळींत सांगा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
१०८ नं.
वा.
ता.



# अप्पांची बैलांची जोडी

[ कुमार 'रघुवीर' ऊर्फ श्री० रघुनाथ जगन्नाथ सामंत यांनीं लिहिलेल्या 'हृदय' नांवाच्या पुस्तकांतून पुढील 'शब्दचित्र' घेतलेलें आहे. त्यांत ठाणें जिल्ह्यांतील एका सुखवस्तु वृद्ध गृहस्थाचें, त्याच्या बैलजोडीचें, व एकंदरींत कोंकणी वातावरणाचें उत्तम चित्र रंगविलेलें आहे. सदरहु पुस्तकांत अशा प्रकारचीं दुसरीं शब्दचित्रें अनेक आहेत तींहि वाचनीय आहेत. ]



र. ज. सामंत

जवळजवळ ऐंशीच्या घरांत वय गेलेलें; पण अप्पांचें शरीर म्हणजे नुसती उभी काठी ! अन् चालणें तरी किती भरभर! उत्साहाचें वारें अंगीं पुरेपूर जणूं काय भरलेलें !

म्हातारा उद्योगीहि तितकाच जबरा ! कामांत काम करण्याची मोठी हातोटी त्याची; पुन्हा सारें होतां होईतों स्वत: करावयाचें. सूनबाई न् मुलगा न् गडी .... ....कोणाची मग मिजास नको चालायला मागून!

थंडी असो का महा थंडी असो, अप्पा दुसऱ्या कोंबड्यानंतर कधींच पडून नाहीं राहावयाचे अंथरुणांत. प्रातर्विधि आटोपले कीं तोंडानें भूपाळ्या गुणगुणत खराट्यानें मागच्या-पुढच्या अंगणांतील किंवा माजघरांतील केर काढायला सुरुवात व्हावयाची ! नातवांचे किंवा स्वत:चे लहानमोठे कपडे धूत बस, घराभोंवतालचें गवतच काढायला वे..... त्यांना एकंदरींत पुष्कळ उद्योग सांपडत ! स्वावलंबन

ही अप्पांच्या आयुष्यक्रमाचीच गुरुकिल्ली, तर नेहमींचा कसला प्रश्न राहिला ?

कोल्ह्या-चोरांच्या भीतीनें कुठें वाड्याच्या वईला[1] झालेलीं 'गोपटीं'[2]-च नीट करून घे, टोणग्याला ओढतांना जड पडूं नये म्हणून रहाटांतच वंगण घाल, पाण्याची कुंडी नाहीं तर 'चोपें'[3]च खराट्यानें धूत बस, विहिरींत सोडलेली वांड्यांची[4] माळ नीट करून घे, आवारांतले बांध भरून काढ, कुठें आंब्यांच्या कलमांनाच कुटाखत[5] घालायला लाव, असें त्यांचें कांहीं ना कांहीं तरी सारखें चाललेलें असायचें काम ! अगदीं कांहींच नाहीं तर वेळ आल्यास चिंचेची शिपटी घेऊन, " याऽ ऽऽ पप्प ! " करीत पाणरहाटाचा टोणगाहि हांकायला त्यांना लाज वाटत नसे !

'डोक्रा'[6]च स्वतः काम करीत असला म्हणजे गडीहि मोठ्या उत्साहानें सारें करीत असत !

मात्र सणावाराला पक्वान्नें किंवा आंब्यांच्या दिवसांत आंबे खातांनाहि अप्पा आपल्या गड्यांना विसरत नसत ! गड्यांना 'वावली'[7]साठीं 'तमाखू'[8]हि ते रोज नियमानें वांटीत !

शहरांत श्रीमंती–सुख पैशावर मानतात ! पण खेडेगांवांत, मिळणाऱ्या वस्तूंवर व आनंदावर !

वेळच्या वेळीं काम होण्यावरच फक्त 'वाडगी'[9]चा कटाक्ष असल्यामुळें गडी वचकून असले तरी अप्पांबद्दल त्यांना फार प्रेम वाटे !

---

१ वई = कुंपण. २ 'गोपटें' याचें अनेकवचन; वईला पडलेलीं भगदाडें. ३ ताड किंवा माड यांचें केलेलें पन्हळ. ४ रहाटाच्या माळेस बांधलेलीं मडकीं (लोटे). ५ मासोळी वगैरेंचें खत. ६ म्हातारा. ७ विडी. ८ तंबाखू. ९ म्हातारा.

पण अप्पांना जनावरांची मोठी हौस ! त्यांचा गोठा नेहमीं दुभत्या गाई-म्हशींनीं अन् बैलांनीं भरलेला असे. आणि त्यांची निगाहि त्यांनीं तितकीच आस्थेनें राखावी. “ त्यांना धू रे, चरायला ने, पाणी दाखव रे, गोठा साफ कर रे !.......” त्यांचे दोन गडी सारखे जनावरांमागेंच असत काम करीत !

आपल्या सारवट[1] गाडीच्या बैलजोडीची मात्र ते स्वतःच विशेष काळजी घेत. “ माझी हिऱ्या-सोन्याची जोडी म्हणजे सारी हिऱ्या-सोन्याची संपत्ति आहे माझी संपत्ति ! ” अप्पा त्यांना थोपटीत मोठ्या अभिमानानें म्हणत; आणि तें अगदीं स्वाभाविक होतें !

सहज त्यांना कोणीं प्रश्न विचारावा, “ कुठून पैदा केली ही जोडी तुम्हीं अप्पा ? फार त्रास घेतां बुवा तुम्ही त्यांच्यापायीं, अशा म्हातारपणीं सुद्धां ! ”

“ हंऽ चाललंय्....अरे आईविना पोरं आहेत हीं, बाबा ! ” ते एखाद्या माणसाविषयीं बोलणें चालल्याप्रमाणें सुरवात करून बोलूं लागत, अन् पुढेंहि ते अगदीं सबंध इतिहास सांगत एकेकाचा ! “ घरचाच हा ‘खोंड’ बरं !....माझ्या डोळ्यांदेखत लहानाचा मोठा झाला ! ह्या हिऱ्याची आई...त्या शिवा पाटलाच्या गोठ्याला आग लागली होती, त्यांतून कशी बशी जळलीपोळलेलीच बाहेर काढली होती ! आमच्या मंगळ्या गड्यानें कसलेंसें औषधमंतर करून तिला बरी केल्यावर दोन वर्षांनीं हा हिऱ्या झाला तिला. हो ! याच गोठ्यांत, इथं !....त्यांतच मेली बिचारी मग ! हल्लीं आमच्या सूनबाईचा तान्हा दूध पितो ना, ती तांबू गाय या हिऱ्याच्या मोठ्या बहिणीची दुसरी मुलगी.... ”

---

१ स्वारीची गाडी. मालाच्या गाडीला कावाडी म्हणतात.

त्यांना कंटाळून "अन् हा सोन्या?"... म्हणून उगाच कोणी प्रश्न टाकावा कीं तसाच एखादा इतिहास बाहेर पडून तोहि 'घरगुती खोंड' ठरायचा!

मग ते आपण होऊनच त्यांच्या त्या जोडीविषयीं वर्णन करूं लागत. "प्रथम गाडीला काढतांना फारच त्रास दिला हो शिंच्यांनीं! मस्त लेकाचे! धावतां धावतां गाडी कुठं तरी नेत रस्त्याच्या कडेला! पण मग थोड्या संवयीनं गुलाम असे छानदार चालींत धावूं लागले म्हणतां, कीं तो सातपाटीचा करीमसाहेब... हं तोच, लागला माझ्या मागं, म्हणाला "वाटेल ती रक्कम घे, पण,...."

ते लांबूं लागले कीं, त्यांना पुन्हा आठवण करून द्यावी लागे; अप्पांचें हिऱ्या-सोन्यांवर प्रेमच तसें अतोनात! त्यांच्याविषयींची एखादी लहानशी आठवणहि त्यांना मोलाची वाटे!

अप्पांच्या चिरंजीवांनीं आपण एक घोड्याचा टांगा ठेवूं म्हणून सहज त्यांच्याकडे मागें एकदां गोष्ट काढली, तेव्हां ते किती मोठ्यानें त्यांच्यावर खेंकसले!

त्यांच्या एका सावकार मित्रानें स्वतः मोटार घेतली त्या वेळीं अप्पांनाहि त्यानें घ्यावयाचा आग्रह केला; अप्पा आपल्या हिऱ्या-सोन्यांच्या पाठीवर थोपटीत म्हणाले, "या सजीव जोडीची गाडी सोडून मला तुमच्यासारखी निर्जीव मोटार नको!"

अप्पांनीं रोज आंघोळीपूर्वी स्वतः हिऱ्या-सोन्यांना धुवावें; दाणावैरण चारावी अन् पाणी दाखवावें. गवताच्या पेंढ्या तेवढ्या गडी आणून सोडीत असे त्यांच्यापुढें.

कुठेंहि काम असलें कीं हिऱ्या-सोन्याला जुंपून ते आपल्या सारवट गाडींतून बाहेर निघत! जोडी जोडायची आपण स्वतः,

शिवळजोतं[1] देखील सैल-घट्ट काय तें आपणच बांधावयाचें त्यांचें !

पागा[2] हातांत घेऊन अप्पांनीं हांक मारिली कीं, ते चालूं लागत. शेंपट्या पिळायला नकोत, कीं पराणी मारायला नको ! एकदां खोकून अप्पांनीं इषारा दिला कीं, जोडी चौखुर धांवूं लागे !

पाऊसपाणी चांगलें व्हावें; दसऱ्याला भरघोंस कणसें दारावरल्या तोरणांत लटकावींत ! कापणीमळणी संपल्याचे निरोप आले कीं, चालले अप्पा हिऱ्या-सोन्याच्या सारवट गाडींतून, मोठ्या पहांटेस, खंडाच्या मापणीला, दहा दहा मैलांवरच्या आपल्या शेतावर ! म्हाताऱ्याला अजूनहि या गोष्टीचा कंटाळा येत नसे.

पूर्वेकडे फटफटीत झालें आहे, काबाडी गाड्यांच्या चाकांचा खडखड आवाज ऐकूं येत आहे ! रस्त्याला लागूनच, पण जरा आंत असलेल्या शेतांतील झोंपड्यांजवळ धनगरी कुत्रीं भुंकत आहेत व कोंबडे आरवत आहेत ! दळणाला मांडलेल्या जात्यांचा घरघर आवाज ऐकूं येत आहे व पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला आहे ! अशा वेळीं अप्पांची गाडी खडीच्या खडबडीत रस्त्यावरून खेड्याकडे जाणाऱ्या, एखाद्या मऊ मातीच्या गराडींत[3] उतरत असे ! सूर्यबिंब नुकतेंच वर येत असलें तर अप्पांनीं पागांसकट हात वर करून सूर्यनारायणाला भक्तिभावानें नमस्कार करावा ! त्या मऊ मातींतून गाडीचीं चाकें शांतपणें घसरत असल्यामुळें हिऱ्या-सोन्यांच्या गळ्यांतील घुंगुरांचा मंजुळ ध्वनि तेवढाच सारखा ऐकूं येई !

गराडीजवळ बाभळीचीं झुडपें गाडीच्या तट्टयाला ओरबडून मागें जात आहेत, गराडीच्या मधल्या उंचवट्यावर वाढलेल्या

---

१ शिवळा = खुंट्या. जोतीं = बैलाच्या मानेभोंवतालचे पट्टे. २ कासरा. ३ शेतांतून जाणाऱ्या कच्च्या गाडीवाटा.

करवंदीच्या जाळ्या मधून मधून गाडीच्या धुराडांखालून मागें निसटत आहेत कमरेला बांडी[1]-कोयता लटकावून, काथ्याच्या दोराच्या साह्यानें ताडांच्या झाडांवर चढणारे उतरणारे भंडारी किंवा लांबवर गवती नंबरांतून गवताच्या मोठमोठ्या राशींच्या जवळपास कामास सुरुवात करणारे कांथोडी[2] दिसत आहेत !

अप्पा असे इकडे तिकडे पाहात असतां, हिऱ्यासोन्यांनीं, आपल्या गळ्यांतल्या घुंगुरांच्या तालावर, गराडीच्या चाकोरींतील तांबसर मऊ मातींतून गाडी जोरांत पुढें न्यावी !

अप्पांनाहि त्यांची काळजी असे ! अर्धी चाल झाली कीं, विसांव्यासाठीं एखादी छायेची जागा पाहून त्यांनीं गाडी थोडा वेळ उभी करावी, हिऱ्यासोन्यांना थोपटावें, त्यांच्या शिंगांजवळ खाजवावें, दोनचार खुरासणीच्या[3] पेंडीचे तुकडे चारावेत, जोतीं-शिवळ सैल करून पुन्हा बांधावीं, कीं नुसत्या हातांतल्या पागांच्या इषाऱ्यावर दौड करावयास हिऱ्यासोन्या पुन्हा आपले आनंदानें तयार !

मापाचें वगैरे काम झालें, कीं संध्याकाळीं सूर्य थोडा खालीं कलल्यावर, थंड वेळीं परत फिरावें; घरच्या ओढीनें हिऱ्यासोन्या सारख्या चालीनें धावूं लागत ! गराड सोडून रस्त्याला लागेपर्यंत सांज होऊन बराच काळोख पसरलेला असे !

नुकत्याच घराकडे परतलेल्या गुरांच्या पावलांनीं उडालेला धुरळा सर्व बाजूंस हवेंत पसरलेला आहे ! जवळपासच्या झोंपड्यां-

---

१ ताडीचा रस सांठविण्याचें मडकें. २ कातकऱ्यांसारखी एक मेहनती जात. ३ मूळ 'खुरासान'मधून आलेलें. ओंवा, तीळ, हळद इत्यादींना लावण्याचें विशेषण.

तून एखादुसरा दिवा मिणमिणत आहे, दमल्याभागल्या पुरुषांचें स्नान चाललें आहे, पोरांच्या खेळाचा आरडाओरडा सुरू आहे!...चुलींत घातलेल्या बोंबलांचा किंवा रस्त्याच्या कडेला असलेल्या एक प्रकारच्या झुडपांचा 'भुताटकीनें'[१] उकडलेल्या बटाट्यांसारखा उग्र वास येत आहे! अशा समयीं चंद्रप्रकाशामुळें पडलेल्या वडांच्या सावलींतून हिऱ्यासोन्यांच्या जोडीनें अप्पा बसलेली सारवट गाडी घरीं घेऊन यावी!

अशीं अठरा वर्षे गेलीं होतीं!

जिथें जिथें अप्पांनीं जावें तिथें तिथें हिऱ्यासोन्यांची जोडी!!

हिऱ्या सोन्याकडे बघे!.... सोन्या हिऱ्याकडे बघे!!....

आज दोन दिवस अप्पा त्यांना दिसले नव्हते; त्यांना त्यांनीं दाणावैरण चारली नव्हती; पाणी दाखवून अंजारलेंगोंजारलें नव्हतें कीं "हिऱ्या ऽ"...."सोन्या ऽ" म्हणून नुसती हांकहि मारली नव्हती!

सुरुवातीच्या थंडीवाऱ्याचें निमित्त होऊन दोनतीन दिवसांत म्हातारा तापानें बिछान्याला खिळून पडला होता, हें बिचाऱ्यांना कसें समजावें?

गडी येऊन त्यांच्यापुढें वैरण ठेवीत. ते खात नसत! पाणी दाखवीत.....ते पीत नसत! गवताच्या पेंढ्या सोडीत....त्यांना ते शिवतहि नसत!

त्यांना वाटे कीं आत्तां आपला मालक येईल; आपल्याला प्रेमानें हांक मारील; आपल्या थरथरत्या हातानें आपल्याला

---

१ एका वनस्पतीचा संध्याकाळचे सुमारास उग्र वास येतो त्यासंबंधींचा खेडवळ लोकांचा समज.

थापटील, व पेंडीचे तुकडे तोंडांत घालून कांहीं तरी बोलत आपल्या मानेला विळखा घालील !

पण त्या सर्व हिऱ्या-सोन्यांच्या कल्पनाच होत्या !

अप्पा तापानें बिछान्यावर तळमळत होते !... आळशीच्या पोटिसाच्या सारख्या शेकानेंहि त्यांचा कफ सैल होत नव्हता ! वैद्यबुवा म्हणूं लागले होते, "म्हातारं[1] माणूस केव्हां तरी जायचंच !"

पण अप्पांना हिऱ्या-सोन्यांची आठवण झाल्यावांचून राहात नसे ! "ते 'डोबे' झाले म्हणून त्यांना विकून टाकाल रे !"— ते मधून मधून ओरडत व त्यांच्या डोळ्यांतून अश्रु टपकूं लागत !

चार दिवसांत हिऱ्या-सोन्यांनीं गवताची काडीहि खाल्ली नव्हती ! पाणी नुसतें हुंगून पाहात ! गोठ्यांतून,पुढल्या अंगणांतील अप्पांच्या नेहमींच्या बसावयाच्या खुर्चीकडे किंवा दाराच्या उंबरठ्याकडे 'ते आतां येतील, मग येतील' अशा दीन उत्कंठेनें पाहून निराशा झाली किंवा घरांतून त्यांच्या कण्हण्याचा क्षीण पण ओळखीचा आवाज ऐकूं आला, कीं हिऱ्या-सोन्या दोघेहि मोठमोठ्यानें हंबरत !

...आणि तें हंबरणें अप्पांच्या कानीं गेलें, कीं तेहि बिछान्यावर पडल्या पडल्या ओरडत, " अरे, त्यांचं दाणा-वैरण झालं का ?... पाणी दाखवायचं राहिलं असेल... "

नाहीं तर त्यांनीं चिडखोरपणानें म्हणावें, " अरे, मी नसलों तर तुम्ही त्यांना उपाशी मारून टाकाल, मारून !

पण त्या चालत्या धडधाकट बैलजोडीला मारण्याचा कोणाचाच विचार झाला नाहीं व झाला नसता !

त्यांच्यापुढें सारें येत होतें; पण हिऱ्या-सोन्यांना अप्पा दिसत नव्हते ! त्यांचा प्रेमळ हात त्यांच्या पाठीवरून फिरत नव्हता !

---

१ म्हातारे.

त्यांच्या हातचे पेंडीचे तुकडे चघळण्याचा किंवा ते बसलेली स्वारीची गाडी ओढून नेल्याचा आनंद अनुभवण्याची संधीहि त्यांना येत नव्हती !

शेवटीं एके दिवशीं सकाळीं लोकांनीं त्यांच्या अप्पांना उचलून अंगणांत आणिलेलें हिऱ्या-सोन्यांना दिसलें ! त्यांच्या जिवाची कोण धडपड !...मोठमोठ्यानें हंबरून त्यांनीं दावीं तोडण्याचा प्रयत्न केला ! हिऱ्या मोकळा होऊन अंगणाकडे येऊं लागला तोंच त्याला एका गड्यानें पुन्हा दोरानें भक्कम बांधलें !

ते मोठमोठ्यानें हंबरतच होते ! पण अप्पा कांहीं बोलले नाहींत कीं त्यांच्याजवळहि आले नाहींत !

हिऱ्यासोन्यांच्या देखतच लोकांनीं अप्पांना उचलून, फाटका-बाहेर लांब, अगदीं लांब नेलें !

आश्चर्यमिश्रित दुःखानें ते सतत मोठ्यानें हंबरूं लागले, "अप्पा, या हो या ! तुम्ही भेटलां नाहींत म्हणून आम्ही उपाशी आहोंत ! पाठीवरून नुसता हात फिरवून आम्हांला प्रेमानें थोपटा तरी !"

पण अप्पा आले नाहींतच ! दोनदोन रपाटे मात्र बसले पाठींत काठीचे ! "वांघ खाय येन्[1] !....बुगाच वरडाया रोग आलाया का आंऽ ?"....गोवाऱ्याकडे दीनपणें टक लावून पाहात माराच्या भीतीनें हिऱ्यासोन्या स्तब्ध राहिले !

मुक्या हृदयाच्या भावना हृदयांतल्या हृदयांत धुमसूं लागल्या ! आधीं वाचा नव्हतीच; पण आतां भाव प्रकट करणेंहि अशक्य झालें !

---

१ एक शिवी.

पशुहृदयालाहि प्रेमाचा ओलावा व भावभावना असतात हें मानवी हृदयाला समजलें नाहीं !

*    *    *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हिऱ्यासोन्यांची जोडी एकमेकांच्या मानेजवळ मान टाकून मरून पडली होती !

हा असा चमत्कार घडला तरी कसा हें शेजाऱ्यापाजाऱ्यांना कोडेंच पडलें !

शोक आवरून अप्पांचे चिरंजीव बाहेर येऊन पाहतात तों त्यांनाहि आश्चर्य वाटलें ! त्यांत गाडीला चांगली चालणारी सदृढ जोडी एकदम अनपेक्षित मेली याबद्दलचें दुःखच जास्त डोकावत होतें !

शेवटीं सर्वानुमतें ठरलें कीं, कोणतें तरी विषारी किरडूं रात्रीं चावून हिऱ्यासोन्या मेले !

हिऱ्यासोन्यांचा अंत विषामुळें झाला होता, कीं अमृतामुळें हें मात्र खुद्द त्यांचें त्यांनाच ठाऊक !

महारांनीं त्यांना उलटें करून कातडीं काढण्यासाठीं, वांशावर घालून नेईपर्यंत शेजारच्या बंडूनानांचा अरुण, त्यांच्याकडे कुतूहल-दृष्टीनें पाहात होता !

बंडूनानांनीं हांक मारली तरी तो हिऱ्यासोन्यांच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांकडेच पाहात राहिला ! त्यानें जरा आणखी खालीं वांकून पाहिलें असतें तर त्यांत त्याला स्वतःचेंच प्रतिबिंब दिसलें असतें ! महार उचलूं लागतांच अरुणचे बालिश कोमल डोळेहि आंसवांनीं भरूं लागले !

तोंच बंडूनाना त्याच्यावर ओरडले, " अरेऽ....मी म्हणतोय् मघांपासून, तें तुला ऐकूं येतंय् कीं नाहीं, एऽ बैलोबा ! "

र० ज० सामंत

( हृदय )

### प्रश्न व सूचना

( १ ) अप्पांच्या स्वभावाचें १५-२० ओळींत वर्णन करा.

( २ ) तुमच्या परिचयाच्या एखाद्या म्हातारीचें शब्दचित्र काढण्याचा प्रयत्न करा.

( ३ ) 'खेडेगांवांतील सुखदुःखें' यावर ३० ओळींपर्यंत निबंध लिहा.

( ४ ) "पशुहृदयालाहि प्रेमाचा ओलावा व भावभावना असतात हें मानवी हृदयाला समजलेंच नाहीं"—या कल्पनेचा १० ओळींपर्यंत विस्तार करा.

( ५ ) बंडूनाना व त्यांचा अरुण यांचा उल्लेख करून लेखकानें कोणतें कार्य साधलें आहे ?

---

## गोपाळराव आगरकर

[ गोपाळ गणेश आगरकर हे 'सुधारक' असूनहि 'सनातनी' लोकांना (ज्यांना 'सुधारक' 'दुर्धारक' म्हणत असत अशांना सुद्धां ) किती व कां प्रिय होते हें लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या लेखांतील पुढील उताऱ्यावरून समजून येईल. त्याचप्रमाणें आगरकर स्वतः सुधारक असून ते आपल्या पत्नीला तिच्या इच्छेप्रमाणें जुन्या पद्धतीनें कां वागूं देत असत ह्यांतील इंगित पुढील उताऱ्यावरून कळून स्वातंत्र्याची खरी कल्पना काय आहे हें विद्यार्थ्यांच्या ध्यानांत येईल. ]

आमच्या शिक्षकांपैकीं ज्यांचें अद्यापहि आम्हांस सप्रेम स्मरण होतें त्यांपैकीं गोपाळराव आगरकर हे एक होत. त्यांची साधी राहणी, निर्गर्वी वृत्ति, शिकविण्याची कळकळ, विद्यार्थ्यांनीं किती वेळां, कोणत्याहि प्रकारच्या व कितीहि शंका विचारल्या तरी न

रागावतां समाधान करण्याची उत्सुकता, मतविरोध झाला असतांहि विद्यार्थ्यांविषयीं प्रेम अबाधित ठेवणारी मनाची उदारता इत्यादि त्यांचे गुण ज्यांच्या प्रत्ययास आले त्यांना त्यांना गुरुवर्यांविषयीं प्रेम व आदर वाटल्यावांचून राहिला नाहीं. त्यांच्या हाताखालीं शिकत असतां सहांपैकीं शेवटच्या दोन वर्षांत बहुधा असा एखादाच दिवस गेला असेल कीं, ज्या दिवशीं आमचा आणि या गुरुजींचा कोणत्या तरी विषयावर वाद झाला नाहीं ! त्यांना वाद फार प्रिय असे व वाद करितांना त्यांच्या मनाची समता सहसा ढळत नसे. सामाजिक विषयांसंबंधीं त्यांच्या आणि आमच्या स्वभावसिद्ध विचारौघांत जमीनअस्मानाचें अंतर ! ते सुधारणावादी, आमचा ओढा परंपरेच्या विचारांकडे ! त्यांच्या मतांचा पुरस्कार करणें आम्हांला आतांहि इष्ट वाटत नाहीं. त्यांचें मन मिल, हक्सूले वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या विचारांनीं अगदीं भारून टाकलें होतें. बुद्धीलाच मुख्य प्रामाण्य दिल्यामुळें स्वबुद्धीला न पटेल तें सारें झूट असें मानणाऱ्यांपैकीं ते एक प्रमुख होते. शास्त्रपुराणांविषयीं त्यांचें मन पूर्वग्रहदूषित झालेलें असल्यामुळें शास्त्रपुराणांचा अभ्यास करण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाहीं. त्यांच्याजवळ तर्कास्त्र नेहमीं सज्ज असे व यच्चयावत् विषयांवर ते या अस्त्राचा उपयोग करीत !

आगरकरांशीं विद्यार्थिदशेंत वाद करायची ताकद आम्हांस कोठून असणार ? तथापि आम्ही त्यांच्याशीं झोंबी घेत असूं व वस्ताद मुलाला कुस्ती खेळायला शिकवतो तसे ते वादपटुत्वाच्या नाना तऱ्हा शिकवीत. त्यांच्या शिक्षणांत अभ्यासक्रमाला धरून असा फार थोडा भाग असे. परीक्षेचीं उत्तरें मुलांनीं कशीं द्यावींत इकडे त्यांचें बिलकूल लक्ष नसे. मुलांना स्वतंत्र विचार करण्याची संवय

लागावी असें त्यांचें मुख्य धोरण असे. त्यांचा आमचा गुरुशिष्य-त्वाचा संबंध चांगला सहा वर्षें टिकला, व त्यांच्या आमच्यांत स्वाभाविक विचारप्रवृत्तींचा जरी ३६ चा आंकडा होता तरी त्यांच्याविषयीं आमच्या मनांत निरंतर प्रेमादर असे; व आम्हांला नक्की सांगतां येतें कीं मतभिन्नतेमुळें त्यांच्या मनांत आमच्याबद्दल गढूळपणा उत्पन्न झाला नाहीं इतकेंच काय पण त्यांचें शुद्ध प्रेम केव्हांहि कलुषित झालें नाहीं. 'सुधारक' आणि 'मुमुक्षु' यांच्या विचारांत आज जो भेद तोच तेव्हांहि त्यांच्या आमच्यांत होता. तथापि गोपाळरावजी मनाचे अत्यंत थोर होते. त्यांचें मन मोकळें, व अंतःकरण उदार असे. त्यांच्या कर्कशतर्कपद्धतीहून त्यांचें अंतः-करण अगदीं भिन्न होतें; म्हणजे ते ममताळु व सहनशील असत. वादांत खंबीर पण चित्तांत मृदु यांत त्यांचें सर्व वर्णन आलें. शिष्य वादप्रवीण झाला म्हणजे त्यांना पुरे, ते त्याच्या मतांकडे पाहात नसत. ते वादांत सहसा कधीं रागावत नसत; फार फार रागावले तर बुक्की टेबलावर जोरानें आपटून 'तुला या गोष्टी आज समजत नाहींत, पण पुढें कळून येतील' असें म्हणून क्षणभर गंभीर होत, पण दोन मिनिटांच्या आंतच आपल्या विशाळ मिशांतून फार गोड हंसत व त्याबरोबर सर्व मुलांचें हास्य मिसळलें जाऊन जो क्लासभर निर्भेळ आनंद पिके त्याची कल्पना गोपाळरावांच्या विद्यार्थ्यांवांचून इतरांस होणें कठीण ! ! त्यांची विनोदी, निष्कपट व आनंदी मुद्रा आमच्यापुढें अजून दिसते. मतें काय, मतें काळाच्या पोटांत विलय पावतात. मनुष्याचीं मतें त्याच्या परिस्थिती-प्रमाणें, त्याच्या व्यासंगाप्रमाणें, त्याच्या संगतीप्रमाणें, बनत असतात. पण हीं मतांचीं बाहेरचीं टरफलें टाकून आंत पाहिलें पाहिजे, व तशीं आगरकरांचीं मतें विसरून त्यांच्या अंतरात्म्याकडे

पाहिलें म्हणजे त्यांचा आत्मा फार प्रेमळ, अत्यंत निष्कपट व उदार, पराकाष्ठेचा कनवाळु होता व याच त्यांच्या गुणांचें स्मरण होऊन आम्हांला त्यांचेविषयीं अत्यंत प्रेम वाटतें. असा विशुद्धात्मा दुर्लभ होय.

आमच्या गरिबीमुळें न्यू इंग्लिश स्कुलांतील आमचा सर्व विद्याभ्यास व कॉलेजांतील दोन वर्षे 'फ्री' म्हणजे नादार विद्यार्थी म्हणून गेलीं. एकदां सहामाही परीक्षेंत मी नापास झालों तेव्हां अर्थातच फ्रीशिपवरचा हक्क बुडाला; पण प्रि० आगरकरांस भेटून फ्रीशिप चालू ठेवण्याची विनंति करण्यासाठीं मी वर गेलों. शिक्षकांच्या खोलींत फ्रीशिपच्या वांटणीचाच विचार चालला असून एक शिक्षक म्हणाले, 'पांगारकराला फ्रीशिप देतां उपयोग नाहीं. तो पेट्रिअट आहे, टिळकाइट आहे !' यावर आगरकर झट्दिशीं आवेशानें म्हणाले ! 'छे छे ! त्याला फ्रीशिप दिलीच पाहिजे. तो होतकरू, उत्साही आहे !' हें वाक्य कानावर पडतांच आम्ही तसेच खालीं आलों व दुसऱ्या दिवशीं बोर्डावरील यादींत नांव मिळालें ! ही गोष्ट क्षुल्लक आहे पण आपल्याहून भिन्न विचारांच्या ओघांतला हा विद्यार्थी आहे हें कळूनहि गोपाळरावांच्या चित्ताची समता व औदार्य कसें ढळत नसे हें दाखविणारी आहे म्हणून येथें दिली आहे. हा विद्यार्थी आपल्या संस्थेंत असून त्याचे विचार-आचार आपल्याहून भिन्न आहेत एवढ्याचसाठीं त्याच्यावर नाराजी करणारे शिक्षक कोठें असतील त्यांनीं यापासून फार धडा घेण्यासारखा आहे. गोपाळराव आगरकरांच्या मनाचा मोठेपणा अनुपम आहे. मोठ्या गोष्टींत मोठेपणा दाखविणारे मोठे लोक पुष्कळ असतात, पण लहान गोष्टींतहि ज्यांचा मोठेपणा प्रगट होतो तेच खरे मोठे होत !

इ० स० १८९० सालीं आम्हीं मॅट्रिकच्या वर्गांत होतों. आगरकर आमचे इंग्रजीचे गुरु. आमचे वर्गांत वेलणकर म्हणून एक विद्यार्थी होता. तो वयानें, समजुतीनें व धीटपणानें सर्वांत वरचढ होता. वर्गांत आगरकरांच्या तासाला नेहमीं देव आहे कीं नाहीं, धर्म, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, मुलांमुलींना एकत्र शिकवणें, जातिभेद असल्या विषयांवर गप्पा व चर्चा चालत. आगरकरांचे विचार आम्हांला आवडत नसत, पण आगरकर फार आवडत. वेलणकरानें एके दिवशीं येथें जोगेश्वरीच्या देवळांत आगरकरांच्या कुटुंबाला देवीपुढें नाकदुऱ्या काढतांना व सुवासिनींची खणानारळांनीं ओटी भरतांना पाहिलें. त्यानें ही गोष्ट शाळेंत येतांच आम्हां विद्यार्थ्यांना सांगितली व आगरकर वर्गांत येतांच त्यांना प्रश्न विचारण्याचें सर्वानुमतें ठरविलें. प्रश्न फार नाजुक, पण आगरकरांना विचार-स्वातंत्र्य व उघड चर्चा फार आवडे. पहिलाच तास आगरकरांचा होता. गुरुजी वर्गांत आले ! सर्व वर्गांत क्षणभर गांभीर्य पसरलें. वेलणकर उभा राहिला त्या वेळीं प्रश्नोत्तरें झालीं तीं येणेंप्रमाणें:—

'Sir ! I have to ask a question मला एक प्रश्न विचारायचा आहे.'

'हूं, विचार.' वेलणकर स्तब्ध ! 'विचार, विचार.'

'मला !' पुन्हा स्तब्ध !

'मला काय ?'

'मला भय वाटतें !'

'भय ! आणि माझें ? मी का वाघ आहें का सिंह ? मुलांना खातों काय ?

'मला अभय असावें !'

'पूर्ण अभय आहे. वाटेल तें बोल. मी रागावत नाहीं.' गुरुजी विश्वास उत्पन्न करणाऱ्या गोड आवाजानें म्हणाले.

'मी काल जोगेश्वरीच्या देवळांत गेलों होतों. तेथें मिसेस् आगरकर यांना देवीपुढें कान धरून मस्तक वाकवतांना व बायकांची खणानारळांनीं ओटी भरतांना पाहिलें!'

गुरुजी शांतपणानें हंसून म्हणाले, 'बरं मग?'

'मग काय?'

मग मला काय म्हणतोस? 'What a fool you are!'

'त्यांचें हें वागणें आपल्या मताशीं विसंगत आहे!'

'पण मी म्हणजे मिसेस आगरकर नव्हे' (हंशा).

'पण त्या आपलें कुटुंब आहेत!'

'दोघांचे देह वेगळे आहेत हें तुला कबूल आहे ना?'

'हो, उघडच आहे.'

'मग तिचे विचार माझ्या विचारांहून भिन्न असतां कामा नयेत असें कां तुझें म्हणणें?'

'होय असेंच.'

'किती मूर्ख! माझें वागणें माझ्या विचारांशीं विसंगत आहे असें तूं सिद्ध करून दाखवितोंपर्यंत ह्या तिच्या कृतीमुळें माझ्यावर आक्षेप कसा येऊं शकतो? हें पहा, ती एक जुन्या विचारांची बायको आहे. ('She is an old fashioned lady.') मी तिला माझे सुधारणेचे विचार सांगत असतों, पण तिच्या मतांत फरक होऊन हे नवे विचार तिला पटले नाहींत तोंवर तिच्या वर्तन-स्वातंत्र्यांत ढवळाढवळ करण्याचा मला हक्क आहे असें मी समजत नाहीं. लोकांना सुधारायचा प्रयत्न करावा, पण नवे विचार त्यांना पटले नाहींत तोंवर त्यांचें आचारस्वातंत्र्य हिसकावून घ्यावें असें मी

कधीं सांगायचा नाहीं. हा जुलूम होईल ! सुधारणा म्हणजे जबरदस्ती नव्हे, ज्याला त्याला आपल्या मताप्रमाणें वागूं द्यावें यालाच मी सुधारणा म्हणतों.'

गोपाळरावजींचा स्वभाव असा उमदा व मोकळा असे. त्यांत आंत एक व बाहेर एक असें नसे. कुत्सितपणा त्यांच्या मनाला कधीं शिवलाच नाहीं. देवाधर्मावर त्यांचा विश्वास नव्हता. पांढरा चुना, हिरवीं पानें, काळी सुपारी यांच्या संयोगांत तांबडा रंग उत्पन्न होतो त्याप्रमाणें पांच असोत पंचवीस असोत तत्त्वांच्या संयोगांत जी चेतना उत्पन्न होते तिला जीव अगर आत्मा म्हणतात; पुनर्जन्म, परलोक, देव इत्यादि सर्व भ्रम आहेत हे त्यांचे विचार ते वर्गांत मुलांना नेहमीं सांगत असत. हे विचार नास्तिकपणाचे होत. या विचारांचा माझ्याहि मनावर वर्ष सहा महिने परिणाम होऊन नास्तिकपणाकडे मनाचा ओघ वाहूं लागला होता (इ.स.१८९४), पण पूर्वजांच्या पुण्यानें व भगवत्कृपेनें नास्तिक्यपिशाचिकेच्या हातून मी लवकरच सुटलों ! आगरकरांचें वर्णन 'अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ' या शब्दांत होतें. त्यांचें देहावसान इ०स०१८९५ सालीं झालें. त्या वेळीं त्यांचे प्रेतयात्रेला जमलेला विद्यार्थिसमूह आपला प्रेमळ बाप गेला असें समजून ढळढळां रडला ! विद्यार्थ्यांशीं ते एकजीव झाले होते. इतका शिष्यजन-प्रिय गुरु विरळच सांपडेल. ते नास्तिक असले तरी असले उदारधी नास्तिक लक्षावधि आस्तिक म्हणविणाऱ्यांपेक्षां व 'चित्ते वाचि क्रियायां' एकरूप नसलेल्या लोकांपेक्षां फार श्रेष्ठ होत. आम्ही आस्तिक्यबुद्धि हा सर्व सद्-

गुणांचा राजा समजतों, तथापि त्याच्याहि अभावीं गोपाळरावांची योग्यता कमी समजत नाहीं. ते थोरच होते.

ल० रा० पांगारकर
('मुमुक्षू'तील निवडक निबंध)

**प्रश्न व सूचना**

( १ ) आगरकर व पांगारकर यांच्यामध्यें कोणकोणत्या बाबतींत मतभेद होता ? असा मतभेद असतांहि आगरकर त्यांस इतके प्रिय व आदरणीय कां झाले तें सांगा.

( २ ) [ अ ] पुढील शब्दसमूहांचा वाक्यांत उपयोग करून दाखवाः—
जमीन अस्मानाचें अंतर, ३६ चा आंकडा, नाकदुऱ्या काढणें.
[ आ ] पुढील समासांचा विग्रह कराः—
नास्तिक्यपिशाचिका, अनुपम, आचार-स्वातंत्र्य.

( ३ ) आगरकरांनीं आपलीं सुधारकी मतें आपल्या पत्नीवर कां लादलीं नाहींत ?

---

# जुन्या भाषेचे दोन नमुने

[ पुढील २ उतारे जुन्या भाषेचे नमुने म्हणून दिलेले आहेत. त्यावरून जुन्या भाषेच्या स्वरूपाची सामान्य कल्पना येईल. जुन्या भाषेचे व्याकरण-विशेष किंवा वाक्यरचनाविशेष यांचा मुलांनीं बारकाईनें अभ्यास करावा असा हेतु नसून जुन्या भाषेचें केवळ दिग्दर्शनहि करून दिलें असतां तें त्यांना मनोरंजक होईल व असल्या प्रकारचें वाङ्मय पुढें मागें वाचण्याची इच्छा होईल या आशेनें हे उतारे दिलेले आहेत. ]

## ( १ ) हस्तीची गोष्ट

### ( १५ व्या शतकाच्या पूर्वीचा )

गांवां हस्ती आला तै जात्येंधे[1] हस्तीतें पाहों गेले : एकें पावो

---

१ जन्मापासून आंधळा.

देखिला : एकें सोंड देखिली : एकें कानु देखिला : एकें पाठि देखिली : एकें पोट देखिलें : एकें पूंस[1] देखिलें : मग एकमेकेसीं सवादति : हारे तुवां हस्ति देखिला : पावो देखिला तो म्हणे हस्ति खांबासारिखा : सोंड देखिली तो म्हणे हस्ति मूसळासारिखा : कानु देखिला तो म्हणे हस्ति सूपासारिखा : पाठि देखिली तो म्हणे हस्ति भिंतीसारिखा : पोटू देखिलें तो म्हणे हस्ति कोथळेयासारिखा : पूंस देखिलें तो म्हणे हस्ति खरोड्यासारिखा : ऐसें एकमेकां उरोधिति : तेयांमध्यें डोळसू असे तो म्हणे हा हस्तीचा एकेकु अवयेवु होय : पर हस्ति नव्हे : ऐसा अवयवी युक्त तो हस्ति :

## ( २ ) गडकोटाचें महत्त्व

### ( १८ व्या शतकाच्या आरंभींचा )

संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग. दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्वस[2] होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असें कोणास म्हणावें ? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांणीं आधीं देशामध्यें दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलें परचक्रसंकट दुर्गाश्रयीं परिहार केलें. ज्या देशांत गडकोट नसतील त्या देशांत आपले राज्याचे सरहद्दीपासून पुढें जबरदस्तीनें नूतन स्थळें बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयीं सेना ठेवून पुढील देश स्वशासनें वश करावा. असें करीत करीत राज्य वाढवावें. गडकोटाचा आश्रय नसतां फौजेच्यानें परमुलखीं टिकाव धरून राहवत नाहीं. फौजेविरहित परमुलखीं प्रवेश होणेंच नाहीं. इतक्याचें कारण तें गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. या-

१ पुच्छ, शेपूट. २ उध्वस्त, ओस.

करितां ज्यांस राज्य पाहिजे त्यांणीं गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपलीं वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण असें पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरंवशावर न राहतां आहे त्याचें संरक्षण करणें; व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतांच करावा, कोणाचा विश्वास मानूं नये. गडकोट-संरक्षणाचें कार्य फार नाजूक. परम नाजूक स्थळास एखादा मामलेदारादि जे लोक ठेवणें, त्यांणीं भेद केलियामुळें, अथवा शत्रु चालोन आला असतां नामर्दी केल्यामुळें, अथवा त्यांचे गाफिलीमुळें स्थळास दगा जाहला तर स्थळासहित तितकें राष्ट्र हातींचें गेलेंच. उरल्या स्थळास व राष्ट्रास उपसर्ग लागला, शत्रु प्रबळ होऊन पावला असतां जो गेला किल्ला, त्या किल्लेकराचें वारें इतर राहिले किल्लेकरांस लागोन तेही स्थळास अपाय योजितात. म्हणजे एक एक राज्यासच धक्का बसतो. याकारणें किल्लेकोट जतन करणें ही गोष्ट सामान्य आहे असें न समजतां, तेथील उस्तवारी व शासन यांस तिळतुल्य अंतर पडों न द्यावें.

रामचंद्रपंत अमात्य
(आज्ञापत्र)

---

# भले बहाद्दर !

[ पुढील दोन लेख हौशी खेळाडू व पटाइत लेखक प्रो० ना. सी. फडके यांनीं १९२८ सालच्या 'रत्नाकरा'च्या दोन अंकांत 'वनकिशोर' हें टोपण नांव घेऊन प्रसिद्ध केले आहेत. मुलांना सामान्यतः खेळ, त्यांत मिळालेले विजय व त्यांची रसभरित वर्णनें स्वाभाविकतःच प्रिय असतात. या

दृष्टीनीं हे लेख मुलांना वाचावेसे वाटतील, व ते वाचून त्यांना आनंद होईल या भावनेनें ते दिले आहेत. तसेंच खेळ व खेळाडू यांचीं चित्रें डोळ्यांपुढें उभीं राहतील, अशा रीतीचीं त्यांचीं वर्णनें कशीं करावींत व 'खेळ बहाद्दरांचें' कौतुक उचित शब्दांनीं कसें करावें हें प्रो० फडके यांच्या या लेखांवरून विद्यार्थ्यांनीं शिकण्यासारखें आहे.

यांतील पहिला लेख १९२८ च्या मार्च महिन्यांत जी हिंदी टीम 'ऑलिंपिक' सामन्यांत भाग घेण्याकरितां पाठविली होती तिच्यासंबंधींचा—आहे. ध्यानचंद नांवाच्या हॉकी खेळणाऱ्या सुप्रसिद्ध खेळाडूनें या सामन्यांत जी बहादुरी केली तिचेंहि वर्णन विशेष विस्तारानें केलेलें आढळेल.

दुसऱ्या लेखांत १९२७ सालीं जे चौरंगी सामने झाले त्यांतील शेवटच्या—म्हणजे हिंदू व पार्शी यांच्या—सामन्याचें चित्र रेखाटलें असून, त्यांतलेत्यांत धुलीपसिंगाच्या प्रेक्षणीय खेळाचें विशेष वर्णन आलेलें आहे.]

## हॉकीचा ऑलिंपिक[१] सामना ( १९२८ )

हिंदी टीम प्रथम इंग्लंडमध्यें गेली व तेथें मार्च २७ पासून एप्रिल २१ पर्यंतच्या बावीस दिवसांच्या अवधींत तिचे एकंदर अकरा सामने झाले. म्हणजे एक दिवसाआड आमचे खेळाडू सारखे सामने खेळत होते. हॉकीची मॅच खेळणें किती परिश्रमाचें आहे याची ज्यांना कल्पना आहे त्यांना अशाप्रकारें सारखे सामने खेळणें ही गोष्ट कौतुकाची वाटेल. मग या अकरा सामन्यांपैकीं फक्त एकाच सामन्यांत आणि तेंहि पहिल्याच सामन्यांत म्हणजे ज्या वेळीं हिंदी खेळाडूंना सारेंच वातावरण बुजण्यासारखें होतें, त्या वेळींच काय तें अपयश मिळालें, ही गोष्ट केवळ्या कौतुकाची

---

१ ग्रीस देशांत ऑलिंपिआ नांवाच्या क्रीडांगणावर दर ४ वर्षांनीं ग्रीस राष्ट्राच्या पूर्वकालीन उत्कर्षाच्या काळीं (म्हणजे सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी) एक क्रीडामहोत्सव होत असे. त्यावरून अलीकडे कांहीं वर्षांपासून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामन्यांनादेखील हाच शब्द लावला जातो.

आहे? हा पहिला एकच सामना सोडला तर इंग्लंड, हॉलंड, बेल्ज्यम्, फ्रान्स व जर्मनी येथील झालेल्या एकंदर सतरा सामन्यांत व प्रत्यक्ष ऑलिंपिक दंगलींत झालेल्या चार बड्या सामन्यांत हिंदी टीमनें केव्हांहि हार खाल्लेली नाहीं, इतकेंच नव्हे तर दर वेळीं आपल्या प्रतिपक्षाला सणसणीत मार दिलेला आहे. हें पाहतां सगळ्या जगाकडून हिंदी टीमची आज वाहवा होत आहे हें साहजिक होय असें कोण म्हणणार नाहीं?

इंग्लंडमध्यें पहिले तीन सामने होतांच हिंदी टीमकडे सर्वांचें लक्ष वेधलें आणि हिंदी टीमचा पाडाव करण्यासाठीं निरनिराळ्या टीम्स कबर कसूं लागल्या. त्याच सुमारास फोकस्टोन येथें प्रतिवर्षीं होणारी हॉकीची दंगल झाली, व आतां या दंगलींत आपण हिंदी टीमला मारूं अशा ईर्षेनें केवळ इंग्लंडांतीलच नव्हे तर फ्रान्स व जर्मनीमधील एकंदर तीनशें रथी-महारथी जमा झाले. जर्मन खेळाडूंची तर अशी गंमत सांगतात कीं, त्यांची हिंदी टीमशीं मॅच् होती, त्याच्या आदल्या दिवशीं त्यांनीं सारखें आपल्या अंगाला मालिस करून घेण्याचा सपाटा चालविला होता. पण प्रतिस्पर्ध्यांनीं जंग जंग पछाडलें तरी हिंदी टीमनें फोकस्टोनच्या दंगलींत झालेल्या सर्व सामन्यांत शत्रूला धूळ चारली व आपलें श्रेष्ठत्व सिद्ध केलें.

इंग्लंडमधील हे सामने झाल्यापासून सर्वांची खात्री होऊन चुकली कीं, ऑलिंपिक दंगलींत आतां हे हिंदी खेळाडू कोणाची डाळ शिजूं देणार नाहींत. इंग्लंडमधील एकंदर अकरा सामन्यांत मिळून हिंदी टीमवर सारे १८ गोल झाले होते, व त्यांनीं लोकांवर ७२ म्हणजे चौपट गोल केले होते. हिंदी खेळाडूंची खेळण्याची तऱ्हा तिकडल्या लोकांना असामान्य वाटली. त्यांची चपळाई आणि

काठीनें चेंडू ढकलीत नेण्याची त्वरा व सफाई पाहूनच ते थक्क होत. या चपळाईवरून एका पत्रानें या हिंदी खेळाडूंना मांजराचे पाय आहेत असें म्हटलें होतें. हिंदी खेळाडू चेंडू घेऊन वाऱ्यासारखे धावूं लागले, कीं प्रतिपक्षी सर्वस्वीं हताश होऊन उभे राहात. प्रतिपक्षाच्या गड्यांना हुलकावण्या देण्यांतील कसब, आपापसांत चटाचट चेंडू देत-घेत पुढें जाण्याचें चापल्य आणिं हातांतील काठीनें चेंडू मारण्याच्या वेळची सफाई या हिंदी खेळाडूंच्या तऱ्हा तिकडील लोकांना अपूर्व वाटल्या, व या गुणांच्या जोरावरच हिंदी टीमनें सर्व टीम्सना चीत केलें. पुष्कळ वेळां असें होई कीं, हिंदी टीमवर चिडून युरोपियन खेळाडू त्रागा करून वाटेल तसे टोले लगावण्यास व हिंदी खेळाडूंना अंगाची धडक देण्यास प्रारंभ करीत. पण असल्या अस्त्रांचा हिंदी खेळाडू सहज लीलेनें बींमोड करीत, व त्यांची ती चतुराई पाहून प्रेक्षकांस त्यांचें अतिशय कौतुक वाटे. हिंदी टीममध्यें खेळाडूंची अदलाबदल प्रसंगानुसार होत असे. नेहमीं त्याच त्या अकरा जणांनीं खेळणें शक्य नसतें. एखादा खेळाडू आजारी असतो व मग त्याच्या जागीं दुसऱ्याची योजना करावी लागते; पण बहुतेक सर्व सामन्यांत खेळण्यांत सहा युरोपिअन्स, दोन मुसलमान व तीन हिंदु असत. हे सर्वच खेळाडू पटाईत होते; पण ध्यानचंद हा हिंदी खेळाडू म्हणजे केवळ टीमचा प्राण होता. हॉकीच्या खेळांत प्रत्येक पक्षाकडे अकरा खेळाडू असतात व त्यांपैकीं सहाजण आपल्यावर डाव होऊं नये अशा तऱ्हेनें बचावाचा खेळ व बाकीचे पांचजण प्रतिपक्षावर डाव करण्यासाठीं माऱ्याचा खेळ खेळत असतात. या पांचजणांच्या रांकेंत जो मध्यावर असतो त्याला 'सेंटर् फॉर्वर्ड्' असें म्हणतात, व ही जागा सर्वांत

जबाबदारीची समजली जाते. ध्यानचंद हा सेंटर् फॉर्वर्ड्च्या कामावर असे, व त्याचें क्रीडाचातुर्य पाहून लोक विस्मयानें थक्क होत. हिंदी टीमची त्याच्यावर केवढी भिस्त होती तें पहावयाचें असल्यास पुढील आंकडे पहावे. इंग्लंडमधील झालेल्या अकरा सामन्यांत हिंदी टीमनें जे एकंदर ७२ गोल केले त्यांपैकीं ध्यानचंदनें ३६ केले होते. कांहीं कांहीं सामन्यांत त्यानें डझनवारी गोल केले. त्याच्याकडे चेंडू येण्याचा अवकाश, कीं प्रतिपक्षाचे कितीहि लोक त्याच्यावर तुटून पडले तरी तो त्या सर्वांना सहज धाब्यावर बसवून सफाईनें मार्ग काढीत जाई व शेवटीं अशा कांहीं नेमानें टोला मारी कीं, चेंडू बंदुकीच्या गोळीप्रमाणें प्रतिपक्षाच्या गोलमध्यें गेलेला लोकांना दिसे ! त्याच्या चापल्यापुढें कोणाचाहि उपाय चालत नसे. बहुतेक प्रत्येक सामन्यांत प्रतिपक्षाचे लोक त्याला दाबून ठेवण्याचे हरप्रयत्न करीत; पण सर्वांच्या हातावर तुरी देऊन चेंडू घेऊन तो केव्हां भरारी मारी त्याचा पत्ता लागत नसे. त्याच्या अजब चापल्यावरून व चेंडू घेऊन जाण्याच्या कौशल्यावरून त्याला लोक " जादूगार ध्यानचंद "...." ध्यानचंद दी विझार्ड " असें म्हणूं लागले, व 'ध्यान' हें त्याचें लाडकें नांव लोकांच्या जिभेवर नाचूं लागलें. पूर्वी क्रिकेटच्या खेळांत ज्याप्रमाणें 'रणजी'नें इंग्लंडला वेड लावलें होतें, त्याप्रमाणें हॉकीच्या खेळांत 'ध्यान'नें साऱ्या जगाला वेड लावलें.

इंग्लंडमधील सामने आटोपून हिंदी टीम हॉलंड, फ्रान्स, बेल्जम, जर्मनी या देशांत हिंडली. या सफरींत एकंदर सात सामने झाले होते व ते सर्व हिंदी टीमनें जिंकले. या सात सामन्यांत मिळून हिंदी टीमवर सारे सहा गोल झाले, व तिनें प्रतिपक्षावर ६३ गोल केले. यांपैकीं २५ गोल 'ध्यान'नें केले !

अशा प्रकारें आधींच दिग्विजय संपादून हिंदी टीम शेवटीं ऑलिंपिक सामने खेळण्यासाठीं ॲमस्टरडॅम येथें दाखल झाली. हिंदी टीम सर्वांना मारणार अशी सर्वांची खात्री होऊन चुकली होती, आणि तेंच शेवटीं खरें झालें. ऑलिंपिक अजिंक्यपत्रासाठीं हिंदी टीमला डेन्मार्क, बेल्जम, ऑस्ट्रिया, स्वित्सरलंड व हॉलंड अशा पांच देशांशीं सामने खेळावे लागले. यांपैकीं एकाहि सामन्यांत हिंदी टीमवर एकदांहि गोल झाला नाहीं, आणि हिंदी टीमनें मात्र कमींत कमी तीन व जास्तींत जास्त नऊ गोलांनीं प्रत्येक टीमचा पाडाव केला. हॉलंडशीं जो अखेरचा सामना झाला तो साहजिकच अत्यंत चुरशीचा झाला. हॉलंडचे खेळाडू विलक्षण निकरानें खेळले. हिंदी खेळाडूंची तऱ्हा त्यांनीं बऱ्याच अंशीं उचलली होती, आणि ध्यानचंदचा पक्का बंदोबस्त राखण्याची त्यांनीं शिकस्त केली, पण हिंदी खेळाडूंनींहि जिवापाड काम केलें. ध्यानचंदनें तर कमाल केली. प्रतिपक्षाचे कोटकिल्ले फोडीत धांव मारण्याचा त्यानें कळस करून दाखविला. विद्युल्लतेसारखा तो क्रीडांगणावर चमकत होता, व चापल्याची शिकस्त करून त्यानें हॉलंडवर पहिला गोल चढविला. तेव्हां टाळ्यांच्या गजराची जी लाट उठली ती हॉकीच्या इतिहासांत अजरामरच राहील. एकदां एक गोल चढविल्यावर 'ध्यान'ला आणखी स्फुरण चढलें व लवकरच त्यानें आणखी एक गोल केला. नंतर थोड्याच वेळांत हॉलंडवर तिसरा गोल झाला व सामना पुरा होतांच यशस्वी झालेल्या हिंदी टीमच्या अभिनंदनार्थ जिकडून तिकडून हर्षध्वनीचा एकच कल्लोळ उठला. हिंदी टीमनें मिळविलेला हा त्रैलोक्य-विजय अपूर्व होय. या विजयामुळें हिंदी राष्ट्राची इभ्रत हजारों पटींनीं वाढली आहे, यांत संशय नाहीं. असा हा असामान्य

पराक्रम गाजवून ता. २२ जून रोजीं परत येणाऱ्या हिंदी टीमचा आपल्यापैकीं प्रत्येकानें गौरव केला पाहिजे. कोणत्याहि राष्ट्राचा दर्जा काव्य, शास्त्र, राजकारण इत्यादि क्षेत्रांतील त्याच्या कामागिरी प्रमाणेंच त्याच्या क्रीडाक्षेत्रांतील नैपुण्यावरहि अवलंबून असतो. या दृष्टीनें आपल्या कालिदासाचें शाकुंतल जर्मन कवि गॉयटे हा डोक्यावर घेऊन नाचल्याचें ऐकून आपणांस जो आनंद होतो तोच ध्यानचंदला तिकडले खेळाडू डोक्यावर घेऊन नाचले हें ऐकून आपल्याला झाला पाहिजे !

'वनकिशोर' ऊर्फ ना० सी० फडके

---

## क्रिकेटचा चौरंगी सामना (१९२७)

परवांच्या सामन्यांत सर्व प्रेक्षकांचें लक्ष प्रिन्स धुलीपसिंग यांजकडे होतें म्हणून त्यांचें वर्णन येथें दिलेंच पाहिजे. पण त्यांची प्रशंसा करण्याच्या भरांत इतर कांहीं खेळाडूंच्या प्रशंसनीय कामाचा उल्लेख चुकून राहील म्हणून त्यांबद्दल आधींच लिहिणें बरें. आणि लिहिण्यासारखी पहिली गोष्ट म्हणजे प्रो० देवधर यांचें बॅटिंग्. हिंदूंचे सर्वांत खात्रीचे बॅट्समन् म्हणून प्रो० देवधर यांची गणना सर्वानुमतें केव्हांच होऊन चुकलेली आहे, आणि ही आपली कीर्ति त्यांनीं अनेक दंगलींत राखलेलीहि आहे; परंतु यंदा त्यांनीं आपली ही कीर्ति नुसती राखलीच नव्हे तर वाढविली यांत संशय नाहीं. देवधर क्रीडांगणावर पाय ठेवतात तेव्हां निम्यांहून अधिक वेळां हिंदूंची नौका बुडते कीं तरते अशा संकटांत असते. देवधरांनीं यावयाचें –धिम्या खेळानें शत्रूच्या बोलिंग्चा कणा मोडावयाचा आणि हिंदूंची बाजू सांवरून मग बाद व्हावयाचें, हा क्रम जवळ-जवळ ठरलेला आहे. यंदाहि देवधर पहिल्या डावांत खेळावयास आले ते हिंदू टीमचा मनोरा ढांसळत होता अशा परिस्थितींतच.

जय व धुलीपसिंग ही दीर्घकाल टिकलेली जोडी चीत झाली होती, व चार वुइकेट्स पडून अवघ्या सुमारें १५० च धांवा सांचल्या असल्यामुळें २०० च्या आंतच सारी टीम खलास न झाली म्हणजे मिळविली असें म्हणण्याची वेळ आली होती. पण अशा बिकट परिस्थितींत देवधर यांनीं आपला नेहमींचा धीमा डाव सुरू केला. इतकेंच नव्हे तर यंदा त्यांनीं धीमेपणांत फार वेळ न घालवितां खांदे सरसावून फटके मारण्यास विलंब लावला नाहीं. पारशी यंदा जरा आपल्या बोलिंग्च्या घमेंडींत होते. आणि लेग्च्या बाजूला बॅट्स्मन्च्या लगत दोन फील्डर्सचा खोडा (लेग् ट्रॅप्) ठेवण्याची एम्. सी. सी. टीमपासून उचललेली आपली युक्ति फार यशस्वी होते असें त्यांना वाटूं लागलें होतें. पण देवधर यांनीं हा खोडा चांगलाच खिळखिळा करून टाकला. त्या फील्डर्स्च्या अंगावरूनच त्यांनीं कित्येक बाउंडरीचे फटके लागोपाठ मारले. ऑफ्च्या बाजूला तर त्यांचे तडाखे ठरलेलेच असतात. पहिल्या डावांत ते चांगलेच टिकल्यासारखे झाले होते व ४८ वरच त्यांचा कॅच् उडाला तो कुयोगच! पण या कुयोगाचा सूड त्यांनीं दुसऱ्या डावांत पुरा घेतला. ते पहिल्या जोडींत आजपर्यंत कधीं आले नव्हते ते आले, व आल्या क्षणापासून त्यांनीं बोलिंग् धोपटावयास प्रारंभ केला. त्यांनीं क्षेत्राची कोणतीहि बाजू कांहीं शिल्लक ठेविली नाहीं. जिकडे तिकडे चेंडू लगावले. जें पारशी बोलिंग पहिल्या डावांत प्रेक्षकांना पल्लेदार वाटलें होतें तें त्यांनीं पुरें हास्यास्पद करून टाकलें. त्या बोलिंगला जणूं आपण लहान पोरांची टुरटुर समजत आहोंत अशा वृत्तीनें त्यांचे रट्टे चालू होते. समशेरीसारखी त्यांची बॅट् फिरत होती. व हालवलेल्या झाडाचे आंबे गोळा करावे त्याप्रमाणें ते व परदेशी मिळून धांवांचे जुडगे हिंदूंच्या पदरांत टाकीत

होते. त्यांचे कित्येक कट् व ड्राइव्ह फारच सुंदर होते; व अवघ्या १७ धांवांच्या आटोक्यांत सेंचरी आली असतां त्यांचा चेंडू झेलला गेला, ही खेदाची गोष्ट होय. देवधर यांच्याप्रमाणेंच श्री० जय यांचें बॅटिंग् मनांत भरण्यासारखें झालें. पहिल्या डावांत ते व धुलीप जोडीनें खेळत होते; पण दोघांत उजवा-डावा कोण हें चटकन् सांगवणार नाहीं असा जय यांचा खेळ झाला. त्यांचें ड्राइव्ह धुलीपच्या तोडीचे वाटत होते आणि बोलिंग् फोडण्याचा आत्मविश्वास धुलीप इतकाच त्यांच्याहि फटक्यांत स्पष्ट दिसत होता. दोघांच्या धांवा सारख्याच वेगानें चालल्या होत्या, व ५०, ६० व ७० हे टप्पे दोघांनीं खांद्याला खांदा भिडवून पटापट ओलांडले तेव्हां सर्व प्रेक्षकांचीं अंतःकरणें कौतुकानें गहिंवरल्याखेरीज राहिलीं नाहींत.

परंतु इतरांपेक्षां धुलीपासिंग यांजकडे यंदा सर्वांचे डोळे अधिक लागून राहिले होते. त्यांची कीर्ति सर्वांच्या कानीं होती, व त्यांच्यांत विशेष काय आहे तें सर्वांना पहावयाचें होतें. ते बॅटिंग् कसें करतात येवढेंच नव्हे तर ते फील्डिंग् कसें करतात, उभे कसे राहतात, कसे चालतात, किती बोलतात, केव्हां हसतात, आउट झाल्यावर परत कसे जातात—प्रत्येक गोष्ट लोकांना टिपून पहावयाची होती आणि थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ते लोकांना सर्वस्वीं प्रिय झाले. त्यांनीं स्लिप्मधील फील्डिंग् शंभर नंबरी केलें. पहिल्या डावांत त्यांनीं दोन कॅच केले ते दोन्हीहि वाघानें टिपण साधावें अशा ऐटीनें केले. आपल्या जागीं ते सर्वदा अत्यंत दक्षतेनें उभे असलेले दिसत व इतर खेळाडूंशीं ते अतिशय गोडीनें वागत. दुर्बिणींतून पहाणारांस त्यांच्या तोंडावरचें हास्य कधींच लोपलेलें दिसलें नाहीं. क्रीडांगणावर ते इकडे तिकडे चालत तेहि मोठ्या रुबाबानें. ते उणेपुरे

उंच आहेत, बांध्यानें मजबूत व प्रमाणशीर आहेत, वर्णानें गोरटे, नाकाडोळ्यांनीं नीटस आणि मुद्रेनें अत्यंत आकर्षक आहेत. धांवा काढावयाच्या वेळीं ते सशाच्या वेगानें धांवत असत; पण ज्या वेळीं टोला लांब गेला असेल व एकच धांव काढावयाची असेल त्या वेळीं दिवाणखान्यांत चालावें अशा सावकाशीनें आणि रमत गमत चालत ते एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जात. अर्थात् ते ही गोष्ट करीत ती स्वतःचा दम विनाकारण खर्च न व्हावा म्हणून. मागें टॅरंट् या नांवाचा जो युरोपियन खेळाडू येथें खेळत असे तो असेंच करी. परंतु परवांच्या मॅचमध्यें धुलीपसिंग जेव्हां जेव्हां सावकाश चालून धांव पुरी करीत तेव्हां पारशी खेळाडूंना खिजविल्यासारखें प्रेक्षकांना वाटे व ते त्याबद्दल दर वेळीं टाळ्या वाजवीत. चोरट्या धांवा काढण्यांत धुलीपसिंग प्रवीण दिसले, व एकंदरींत धांव काढावयाची त्यांची नेहमींच तयारी असे. जोडीदार तयार असला कीं, त्यांच्याकडून कधींच ना नसे. त्यांच्या प्रत्येक कृतींत चलाखपणा भरलेला होता. त्यांच्या बॅटिंग्मध्यें देखील चलाखीचाच गुण प्रामुख्यानें दिसला. बोलरचा पडणारा चेंडू कसा पडत आहे, याचा अदमास ते ताबडतोब करीत व त्यांची बॅट् फिरे ती चलाखीनें आणि ऐटीनें. चांचरत, गडबडत असा त्यांचा टोला कधींच बसला नाहीं. आपल्या देवधर, नायडू अशा नामांकित खेळाडूंपेक्षां धुलीपसिंग यांच्या ठिकाणीं अधिक कांहीं दिसलें असलें तर त्यांच्या बॅटिंग्-मधील कमालीचा सहजपणा. त्यांच्या जोडीनें खेळत असतांना जय यांनींहि आपली करामत कांहीं कमी दाखविली नाहीं हें वर लिहिलेंच आहे. पण धुलीपइतकेच जय यांचे फटके जोरांत लागत हें जरी खरें, तरीं धुलीप यांच्या खेळण्यांतील सफाई ( ईझ् ) जय यांच्या खेळण्यांत दिसली नाहीं. धुलीपशीं तुलना केली कीं, जय यांचे

फटके ओबडधोबड वाटत. नामांकित चित्रकाराच्या हातांतला कुंचला किंवा निष्णात व्हायोलिन वाजविणाराच्या हातांतील गज हालावा तितक्या डौलानें व सफाईनें धुलीपसिंगांच्या हातांतील बॅट हाले. आणि या सफाईप्रमाणेंच जेथें उघडी जागा दिसेल तेथेंच नेमका टोला देण्याची चतुराई (प्लेसिंग्) त्यांच्या अंगीं विशेष दिसली. चिकाटीकडे (स्टेडिनेस) त्यांच्या मनाचा ओढा नाहीं. किंबहुना फार वेळ संथपणें खेळण्यांत बोलिंग्चा बडेजाव उगीच वाढवून ठेवण्यासारखें आहे, असें त्यांचें तत्त्व असल्यासारखें दिसलें. सण-सणीत खेळण्याचा त्यांचा स्वभाव दिसला. पहिल्या डावांत त्यांनीं आल्यावर पहिल्या दोनतीन ओव्हर्समध्यें बोलिंग्चा अदमास घेतला, आणि मग ताबडतोब मारावयास प्रारंभ केला. पारशी बोलिंग् यंदा विशेष जोरांत होतें हें वर एकदां सांगितलें आहेच; परंतु जय यांच्या साहाय्यानें धुलीपसिंगांनीं त्या बोलिंग्ची नांगी सहज मोडली. भुंकणाऱ्या चावऱ्या कुत्र्याला लीलेनें पकडून त्याच्या भोंवतीं गळपट्टा सरकवून आपल्याला हवें तसें हिंडवावें त्याप्रमाणें त्यांनीं पारशी बोलिंग्चें करून टाकलें. जमशेठजी हा पारशी बोलर फार कठीण समजला जातो; पण त्याचे चेंडू तर धुलीपनीं पुढें येऊन ठोकले. जमशेठजींच्या बोलिंग्ची त्यांनीं अशी चीरफाड केली कीं, त्यानें पुन्हा सबंध मॅच्मध्यें चेंडू हातीं घेतला नाहीं. चारी दिशांच्या बाऊंड्ऱ्या त्यांनीं चेंडूला दाखविल्या. वुइकेटच्या कोणत्याहि बाजूस त्यांचे टोले सारख्याच सफाईनें जातात हें त्यांच्या बॅटिंग्मधील विशेष होय. त्यांचे चहूं बाजूंचे फटके ऐटबाज असतात. त्यांचा ड्राइव्ह्चा फटका पाहिला म्हणजे तर एखादा पर्शियन तलम गालिचा उलगडत गेल्याचा भास होतो. आणि स्लिप्मधील फील्डर्स्मधून मारलेले त्यांचे 'लेग कट'चे तडाखे तर आड-

तालाला वळसे घालून जाणाऱ्या गायकाच्या सुरेल तानेइतके गोड वाटतात. दुसऱ्या डावांत त्यांनीं एक ओव्हर बाउंडरी मारली ती सुद्धां चेंडू सहजासहजीं उचलून ! सारांश, त्यांच्या खेळांत शास्त्र व कला यांचा मोठा मनोहर मिलाफ झालेला आहे. आपल्या खेळानें व वागणुकीनें त्यांनीं मुंबईच्या प्रेक्षकांचीं मनें पूर्ण अंकित करून घेतलीं यांत संशय नाहीं व चौरंगी सामन्यासाठीं ते पुन्हा हिंदूंना केव्हां लाभतील असेंच आज सर्वांचें मत आहे.

'वनकिशोर' ऊर्फ ना० सी० फडके

**प्रश्न व सूचना**

( १ ) खेळाच्या एखाद्या सामन्याचें वर्णन करा. वर्णनामध्यें खेळाडूंना व प्रेक्षकांना काय वाटत होतें याचाहि मधून मधून उल्लेख असावा.

( २ ) [ अ ] पुढील शब्दप्रचारांचा वाक्यांत उपयोग करून दाखवा:–
( १ ) जंगजंग पछाडणें. ( २ ) धूळ चारणें. ( ३ ) डाळ शिजूं न देणें. ( ४ ) धाब्यावर बसविणें.
[ आ ] बचावाचा खेळ व माऱ्याचा खेळ यांतील भेद स्पष्ट करून सांगा.

( ३ ) [ अ ] मागील लेखांतील ३-४ सुंदर दाखले शोधून काढा.
[ आ ] टीमचा मनोरा ढांसळणें, बोलिंगचा कणा मोडणें अशा प्रकारच्या रूपकात्मक रचनेचीं २-३ उदाहरणें द्या.

( ४ ) फडके यांनीं 'टीम्स्', 'फील्डर्स्', 'ओव्हर्स्' अशीं अनेकवचनी इंग्रजी रूपें दिलीं आहेत. मराठी नियमांप्रमाणें त्यांचीं अनेकवचनी रूपें कशीं होतील ? तुम्हाला कोणतीं रूपें घालणें बरें वाटतें ?

---

# लग्न का नाटक ?

[ कित्येक वेळां आपल्या समाजांतील लग्नें भावलाभावलींचे लग्नांप्रमाणें लावण्यांत येतात. वधूवरांना त्यांतील गांभीर्य व पावित्र्य कळत नाहीं, भिक्षुकांना आपण मंत्र म्हणतों त्यांचा अर्थ कळत नाहीं, 'इतरे जन' हि

लग्नाच्या जबाबदारीकडे लक्ष देत नाहींत, बायका निरर्थक चालीरीति पाळण्यांतच मग्न असतात, इत्यादि गोष्टींना अनुलक्षून रा० राम गणेश गडकरी यांनीं लग्न हें एका लहान मुलाला 'नाटक'च कसें वाटलें याचें हास्यरसोत्पादक वर्णन त्याचें तोंडून करविलें आहे. वर्णनांतील विनोद जरी किंचित् बोचक वाटला तरी बोलून चालून तो विनोदच आहे व त्याचे मूळाशीं समाजांतील हास्यास्पद प्रकारांना आळा घालण्याची सदिच्छा आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे त्या विनोदाचें फारसें कांहीं वाटणार नाहीं.]

धाकटा जगू कळूं लागल्यापासून एका नाटक मंडळींतच होता. एकदां मंडळीच्या मालकाबरोवर एक लग्नसमारंभ पाहून आल्यावर त्यानें आपल्या समवयस्क मित्रांना खालीं लिहिल्याप्रमाणें 'रिपोर्ट' दिला.

खेळ मुद्दाम बांधिलेल्या मांडवांत झाला. स्टेज मातीचेंच केलें होतें आणि फारच लहान होतें. 'सीन' जंगलाचा होता असें वाटतें; पण जंगलाच्या 'झालरी' मुळींच नव्हत्या म्हणून त्यांच्या-बद्दल स्टेजवर झाडांचा पालाच बांधला होता. पडदे स्टेजच्या भोंवतीं न बांधतां सगळ्या थेटरभोंवतीं गुंडाळले होते. खेळाचे पास फुकट वांटले होते. खुर्च्याबिर्च्या कांहीं नव्हत्या. सगळ्यांना जाजमा-वरच बसावें लागलें. 'कुलीन' स्त्रियांसाठीं स्टेजच्या आजूबाजूस जागा राखून ठेविली होती; पण गर्दी फार झाल्यामुळें त्यांना उभ्यानें सगळा खेळ पहावा लागला. मॅनेजर लोकच पानविडी-तंबाखू घेऊन ऑडिअन्स[1]मध्यें फिरत होते. पण ते कुणाजवळून पैसे घेत नव्हते. सोडालिंबूची कांहींच सोय नव्हती. पेटींतबल्याबद्दल सनया आणि ताशे ठेवले होते. त्या लोकांचीं कामें केव्हां केव्हां

१ Audience श्रोतृवर्ग.

होतीं हें सुद्धां त्यांना ठाऊक नव्हतें म्हणून त्यांना मधून मधून 'वाजवा' 'वाजवा' म्हणून सांगावें लागत होतें. आम्ही गेलों त्या वेळीं स्टेजवर मुख्य पुरुषपार्टी, मुख्य स्त्रीपार्टी व एक भटाचें सोंग घेतलेला मनुष्य यांचीं कामें चाललीं होतीं. फक्त मुख्य पार्टी लोकांनींच रंग लावला होता. तो सगळ्या आंगभर होता. रंग फारच वाईट– अगदीं हळदीसारखा– होता. भटानें रंग लावला नव्हता; पण त्याचें सोंग अगदीं हुबेहूब झालें होतें. त्याची 'नक्कल'[1] अगदीं चोख होती; परंतु तो फार घाईनें बोलत होता म्हणून त्याचें बोलणें ऐकूं येत नव्हतें. मुख्य पुरुषपार्ट्यांचा आवाज बसला होता; कारण त्यानें सगळीं पदें ओढून दिलीं होतीं. शिवाय त्या दोघांच्या 'नकला' मुळींच पाठ नव्हत्या; म्हणून भट त्यांना स्टेजवरच 'प्रॉम्प्ट' करीत होता. प्रॉम्प्टिंग ऑडिअन्समध्यें स्पष्ट ऐकूं येत होतें. भटाचें ॲक्टिंग् छान होतें. राजाराणींना ॲक्टिंग् मुळींच येत नव्हतें. स्त्रीपार्ट्याचें तें पहिलेंच काम होतें असें वाटतें, कारण तो फार घाबरून मान खालीं घालून होता. बोलतांनासुद्धां तो चांचरत होता; पण ऑडिअन्स् फारच चांगलें होतें; एकानें-सुद्धां टाळ्या दिल्या नाहींत. शेवटीं त्या दोघांचें लग्न झालें आणि त्या वेळीं सातआठ जणांनीं 'कोरस'[2] म्हटला आणि खेळ आटोपला. राजाराणी 'कोरसां'त म्हणत नव्हतीं.

रा० ग० गडकरी
(संपूर्ण बाळकराम)

**प्रश्न व सूचना**

(१) एखाद्या लग्नसमारंभाचें—मांडव, भटजी, वधूवरांचे आईबाप इत्यादिकांचें–२५-३० ओळींत वर्णन करा.

---

१ पाठ म्हणावयाचा भाग. २ Chorus.

(२) [ अ ] स्त्रीपाटर्यांचें तें पहिलेंच काम होतें असें म्हटलें आहे तें कां ?

[ आ ] राजाराणी 'कोरसां'त म्हणत नव्हतीं म्हणजे काय ?

[ इ ] जगू बोहल्याला काय समजला ?

( ३ ) गडकऱ्यांचा हा लेख वाचून हल्लींच्या लग्नपद्धतींत व लग्न-समारंभाचे बाबतींत तुम्हांला कोणत्या सुधारणा सुचवाव्याश्या वाटतात तें १५-२० ओळींत लिहा.

( ४ ) जगूचें हें पत्र वाचून जुन्याचा अभिमान बाळगणाऱ्या त्याच्या मित्राला वाईट वाटलें, व असलें पत्र लिहिण्याबद्दल त्याची त्यानें कान-उघाडणी केली अशी कल्पना करा व त्यानें पाठविलें असतें तसें १५-२० ओळींचें एक पत्र लिहा.

---

## रामदासांची शिकवण

[ रामदासांच्या पूर्वींच्या साधूसंतांनीं लोकांना 'संसार सोडा, त्यांत कांहीं अर्थ नाहीं' असा निवृत्तिपर उपदेश केला असा त्यांचेवर आक्षेप आहे. तो खरा आहे का खोटा आहे या वादांत शिरण्याचें कांहीं कारण नाहीं. खालील उताऱ्यांत रा. भावे यांनीं वादाची एकच बाजू मांडली असली तरी भाषेच्या व मांडणीच्या दृष्टीनें तो फार सुंदर उतरला आहे; आणि याच दृष्टीनें विद्यार्थ्यांनीं तो वाचावयाचा आहे. ]

रामदासाच्या पूर्वी जे इतर लोक स्वतःस ज्ञानी म्हणवीत, आपण गुरु समजून इतरांस 'उपदेश' देऊं धावत, स्वतः आपण आणि आपला देश बुडत आहे तिकडे लक्ष न देतां दुसऱ्यास तरणोपायाचा मार्ग दाखवूं लागत, त्यांना काय चाललें आहे हेंच मुळीं दिसत नव्हतें, व कंगालपणाच्या किंकाळ्या त्यांच्या कानाला ऐकूं येत नव्हत्या, आाणि केव्हां आल्याच तर ते लोकांना शिकवीत कीं, 'बाबांनो, हें सर्व मिथ्या आहे. हा केवळ भास आहे. दारिद्र्य

जितकें येईल तितकें चांगलें. त्यानें ऐहिक सुख दूर जातें पण परमेश्वराचे पाय जवळ येतात. संसार ही वस्तु वाईट आहे. त्याची चिंता करणें मूर्खपणा आहे. शहाण्यानें संसाराची होळीच करावी. बायकापोरें डोळ्यांदेखत तडफडून मेलीं तरी त्याचें दुःख लवमात्र मानूं नये व अशा ऐहिक त्रासांनीं मनाची शांतता बिघडूं देऊं नये. आंगभर वस्त्र लावूं नये व पोटभर अन्न खाऊं नये. उपासतापासांची संवय करावी; आणि सारा वेळ टाळ हातीं धरून—तेहि नसले तर नुसते दगडच हातानें कुटून—तोंडानें ईश्वरनामाचा जप चालवावा', असें हे संत गुरू जगाला पढवीत. ही यांची पढवणी महाराष्ट्र तीन-चारशें वर्षें सारखें पढत होतें; पण त्याचा परिणाम काय झाला हें रामदासाला दिसत होतें. पाहिजे होतें एक आणि हे पढवीत होते भलतेंच. दुनियेभर समबुद्धि निर्माण करावी, उंदीरमांजरांची मैत्री जमवावी, ऊंसभोपळ्यांची जुडी बांधावी, अशासारखे या संतांचे यत्न होते. त्यांची अशक्यता रामदासाच्या डोळ्यांस स्पष्ट दिसली. एक वेळ वाऱ्याचा दोर विणून त्यानें पाण्याच्या धारांचा भारा बांधिता येईल, सावली उलथून तिची दुसरी बाजू पाहतां येईल, कदाचित् कोणाला आपल्या कोंपराला लागलेला गूळ चाटून त्याची गोडीहि चाखितां येईल, पण टाळांच्या आवाजानें आणि नुसत्या नामाच्या देवघेवीनें देशाची आपत्ति दूर होणार नाहीं, हें त्याच्या तीव्र बुद्धीनें तेव्हांच ताडिलें.

महाराष्ट्राच्या उत्तम क्षेत्रांत इतकीं वर्षें निवृत्तीचे मळे हे संत एकसारखे लावीत होते. जें पेरावें तें उगवतें. निवृत्तीच्या झाडांना प्रवृत्तीचीं फळें कोठून येणार? तुळस कितीहि पवित्र झाली, तिची लावणी कितीहि भक्तिभावानें केली तरी आंब्याचें किंवा बांबूचें कार्य करील काय? बसावयाला सावली किंवा टेकावयाला काठी तिच्या-

पासून कधींहि प्राप्त होणार नाहीं. त्याचप्रमाणें हे संत गुरू आणि ह्यांचा उपदेश उपयोगी पडण्यासारखा नाहीं, हें रामदासाच्या लक्षांत आलें; व नामरसायन कितीहि गुणी मात्रा असली तरी जडलेल्या रोगाला कांहीं विशेष अनुपानावांचून ती कुचकामाची आहे असें त्याला दिसलें.

अनेक वर्षेपर्यंत स्वतः हिंडून, डोळ्यांनीं लोकस्थिति पाहून एक नवा संप्रदाय काढून महाराष्ट्राचा उद्धार करावा असें रामदासानें ठरविलें व तो शके १५६६ मध्यें तीर्थयात्रा संपवून परत जांबेस आला; व येथूनच त्यानें संप्रदायाचा आरंभ करून मठस्थापनेस सुरुवात केली.

> **महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे**
> **जाणते करून विखरावे । देशोदेशीं ॥**

हें त्याचें मुख्य धोरण होतें. खुळसट भोळ्या भाविकांना तो फारसें हाताशीं धरीत नसे.

> **जितुका भोळाभाव । तितुका अज्ञानाचा स्वभाव ।**
> **अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजेल कैचा ॥**

असें तो म्हणे. आपल्या सांप्रदायिकांना वाटल्यास घरेंदारें करून त्यांनीं संसार करावा व कुटुंबवत्सल व्हावें. यास त्याची हरकत नव्हती. किंबहुना संसार नीट करणें हाच [त्याच्या मतें] परमार्थाचा एक रस्ता होय असें त्यास वाटे. संसार हा परमार्थाचा एक रस्ता होय पण तो परमार्थ नव्हे. तें एक साधन असेल पण साध्य नव्हे. त्यांतच गढून राहणें हें केवळ शहाणपण नाहीं. ज्यायोगें पुष्कळांचे संसार नीट नांदतील, अनेकांचे योगक्षेम[1] चांगल्या रीतीनें चालतील, सर्वत्रांचीं मुलेंबाळें सुख पावतील

---

1 इष्टवस्तूंची सिद्धि व त्यांचें रक्षण.

याकरितां आपल्या संसाराचा त्याग करावा, हेंच रामदासास योग्य वाटे.

वि० ल० भावे
( महाराष्ट्रसारस्वत, भाग २ रा )

### प्रश्न व सूचना

( १ ) खालील वाक्यांचा अर्थ स्पष्ट कराः—

[ अ ] संसाराची होळी करावी.

[ आ ] उंदीर-मांजराची मैत्री जमवावी, ऊसभोपळ्याची जुडी बांधावी अशांसारखे या संतांचे प्रयत्न होते. ( अशा आशयाच्या आणखी ३–४ उपमा—पुस्तकांतील व पदरच्या सांगा. )

[ इ ] निवृत्तीच्या झाडांना प्रवृत्तीचीं फळें कोठून येणार ?

[ ई ] संसार हा परमार्थाचा एक रस्ता होय, पण तो परमार्थ नव्हे.

[ उ ] कंगालपणाच्या किंकाळ्या त्यांच्या कानाला ऐकूं येत नव्हत्या.

( २ ) " पाहिजे होतें एक आणि हे पढवीत होते भलतेंच." भाव्यांच्या मतें काय पाहिजे होतें व रामदासपूर्वकालीन संत 'भलतेंच' काय पढवीत होते तें सांगा.

( ३ ) 'जें पेरावें तें उगवतें' यांतील आशय स्पष्ट करण्याकरितां ( पुस्तकांत नसलेले ) एक दोन दाखले द्या.

---

# तुकारामबोवांच्या कवित्वाचे हेतु

[ बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं पुढील उताऱ्यांत तुकारामबुवांच्या कवित्वाचे हेतु व कांहीं विशेष दिलेले आहेत. दिलेले हेतु व विशेष हे तुकारामबुवांच्या कवित्वाचे म्हणून दिले असले तरी कवीच्या कवित्वामध्यें जे भेद असतात तेहि सहजगत्या या उताऱ्यावरून कळून येतील. ]

कवित्व रचण्यामध्यें कवीचे निरनिराळे हेतु असूं शकतील. कोणी स्वतःच्या मनाची तळमळ शांत करण्यासाठीं काव्य करितात, तर कोणी परदुःखनिवारणार्थ काव्य रचतात. कोणी भगवद्भक्ति-गौरवास्तव काव्य गुंफतात, तर कोणी काव्यकृतीनें समाजास कर्तव्य-मार्ग दाखवितात. कोणी आपल्या वैषयिक[1] मनोवृत्ति पुरविण्यासाठीं कवित्व करितात, तर कोणी विरक्तिपूर्वक भगवद्भजनाचा मार्ग चोखाळ-ण्यासाठीं कवित्वाचा अंगीकार करितात. कोणी स्वार्थावर पूर्णपणें पाणी सोडून निःस्पृहपणें व निरिच्छपणें काव्य करितात, तर कोणी यशोधनावर नजर ठेवून काव्यदेवीची आराधना करितात. तुकाराम-बोवांच्या अभंगात्मक काव्यकृतीचें नुसतें वरवर परीक्षण केलें तरी इतकें सहज लक्षांत येतें कीं, भगवद्भक्तीचा गौरव, भागवतधर्माचा प्रसार, दुःखितांचें समाधान, नीत्युपदेश, आत्मानुभवाचें कथन हेंच त्यांच्या काव्याचे मुख्य हेतु होत. त्यांना द्रव्य व लौकिक यांची मुळींच अपेक्षा नव्हती. त्यांचें साधुत्व, निःस्पृह राहणी, एकनिष्ठ भगवद्भक्ति आणि मन वेधून टाकणारी काव्यरीति, यांमुळें त्यांचा लौकिक फार झाला, शिष्यमेळा मोठा जमला व त्यांच्या नांवाचा जिकडे तिकडे जयघोष दुमदुमला ही गोष्ट खरी; परंतु अशी आपली लौकिक कीर्ति व्हावी या उद्देशानें त्यांनीं काव्यरचना चालविली नव्हती. भक्तिमाहात्म्य कळून लोकांनीं धर्म व नीति यांचा मार्ग धरावा म्हणून बोवांचे प्रयत्न होते. त्या प्रयत्नांचा मुख्य हेतु बऱ्याच अंशांनीं सफल झाला आणि त्याचें आनुषंगिक[2] फळ कीर्तिरूपानें बळेंच बोवांच्या गळीं पडलें, यास त्यांचा नाइलाज

१ विषयासंबंधीं, विषयोपभोगासंबंधीं. २ अनुषंगानें येणारें; साहचर्यानें येणारें.

होता. कवित्वाचा उपयोग द्रव्यार्जनाकडे करावयाचा नाहीं हा तर बोवांचा बाणाच होता हें मागें सांगितलेंच आहे. प्रत्यक्ष राजानें शिष्यभाव स्वीकारून, अपरंपार लक्ष्मी नजराण्यादाखल आपखुषीनें सादर केली असतां, तिला ज्यांनीं गोमांसासमान मानून, तिकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं, त्या तुकारामबोवांच्या निःस्पृहपणाबद्दल पुरावा देण्याची जरूरीच नाहीं असें आम्हांस वाटतें. एकंदरींत तुकारामबोवांचें अभंगात्मक वाङ्मय हें केवळ आंतड्याला पीळ पडूनच उद्भवलेलें आहे. त्यांत

**" मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया "**

अशा तऱ्हेची वरपांगी वृत्ति कोठेंहि आढळत नाहीं. कृत्रिमता, झिलई, चापणचोपण, मखलाशी, हीं तुकारामबोवांच्या काव्याला कधीं शिवलीं नाहींत. लोकांची आवडनिवड किंवा समाजाच्या मनोवृत्तींचा प्रवाह पाहून लोकाराधना करण्याचे नादीं ते कधींहि लागले नाहींत. खऱ्या मनोवृत्ति दाबून दांभिकपणानें लोकप्रियतेला आपली वाणी व लेखणी वाहण्याचें काम त्यांनीं कधींहि केलें नाहीं. लोकप्रवाहांत दुर्बल होऊन वाहून जाणारे बोवा ते नव्हते, तर खऱ्याखोट्याची आपल्या मतानें—पोक्त[1] विचारानें—परीक्षा करून, लोकमताची पर्वा न करितां खऱ्या मार्गानें जाणारे ते होते. यामुळें बोवांची वाणी करारी, तेजस्वी, व प्रसंगीं कठोरहि झालेली आढळते; इतकेंच नव्हे, तर निंद्य वस्तूविषयीं तिटकारा दर्शवीत असतांना, ती कित्येक वेळां जहाल जाऊन अश्लीलत्व दोषासहि पात्र झाली आहे. त्यांनीं

**'सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमता' ॥**

---

१ ( फारसी ) पक्व, प्रौढ.

अशा प्रकारचें वर्तन ठेवल्यामुळेंच, त्यांची वाणीहि जोरदार व अर्थपूर्ण वठलेली आहे. ते म्हणतातः—

**" काय माझे नेती वाईट म्हणोन? । करूं समाधान कशासाठीं ? काय मज लोक नेती परलोका ?। जातां कोणी नरका निवारील?"॥**

तुकारामबोवांची सर्व कविता धर्मोपदेश व नीत्युपदेश यांना व भगवत्सेवेला वाहिलेली आहे. याव्यतिरिक्त ती दुसऱ्या कोणत्याहि विषयाकडे वळत नाहीं. राजकारण तर तिला मुळींच भावत नाहीं. राजकीय बाबतींत, परतंत्र झालेल्या राष्ट्रांत स्वातंत्र्येच्छा उत्पन्न करण्याच्या कामीं, व स्वराज्याचा उपक्रम करण्याविषयीं, तुकाराम-बोवा उदासीनच आहेत, असें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. तुकारामबोवांच्या वाणींत तडफ-सणसणीतपणा आहे. परंतु ती तडफ-तो सणसणीतपणा-केवळ पाखंडांवर प्रहार हाणण्याचे कामीं व दांभिकांचा गर्व खंडण्याचे कामीं दिसून येतो. राजकारणी जुलूम झाल्यास त्यांची वाणी त्याविषयीं मूग गिळून किंवा मलूलपणा स्वीकारून पंगुत्व प्रकट करीत आहे. राजकारणांत मन घालून, लोकांना कळकळीचा उपदेश करून त्यांच्या अंतःकरणांत स्वराज्य व स्वातंत्र्य यांची स्पृहा उत्पन्न करणारे प्रसिद्ध कवि श्रीरामदास हे एकच होत. तुकारामबोवांच्या अभंगांत वीर्योत्कर्षदर्शक बाणेदार उद्गार आहेत, परंतु ते उद्गार समरांगणावर शत्रूला तोंड देणाऱ्या धाडसी शूराचे नाहींत, तर ते, मन घट्ट करून, धैर्यानें संकट, आपत्ति, अपवाद, व छळ सोसणाऱ्या आणि ईश्वरचरणीं सर्वस्व

होता. कवित्वाचा उपयोग द्रव्यार्जनाकडे करावयाचा नाहीं हा तर बोवांचा बाणाच होता हें मागें सांगितलेंच आहे. प्रत्यक्ष राजानें शिष्यभाव स्वीकारून, अपरंपार लक्ष्मी नजराण्यादाखल आपखुषीनें सादर केली असतां, तिला ज्यांनीं गोमांसासमान मानून, तिकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं, त्या तुकारामबोवांच्या निःस्पृहपणाबद्दल पुरावा देण्याची जरूरीच नाहीं असें आम्हांस वाटतें. एकंदरींत तुकारामबोवांचें अभंगात्मक वाङ्मय हें केवळ आंतड्याला पीळ पडूनच उद्भवलेलें आहे. त्यांत

**" मोलें घातलें रडाया । नाहीं असूं आणि माया "**

अशा तऱ्हेची वरपांगी वृत्ति कोठेंहि आढळत नाहीं. कृत्रिमता, झिलई, चापणचोपण, मखलाशी, हीं तुकारामबोवांच्या काव्याला कधीं शिवलीं नाहींत. लोकांची आवडनिवड किंवा समाजाच्या मनोवृत्तींचा प्रवाह पाहून लोकाराधना करण्याचे नादीं ते कधींहि लागले नाहींत. खऱ्या मनोवृत्ति दाबून दांभिकपणानें लोकप्रियतेला आपली वाणी व लेखणी वाहण्याचें काम त्यांनीं कधींहि केलें नाहीं. लोकप्रवाहांत दुर्बल होऊन वाहून जाणारे बोवा ते नव्हते, तर खऱ्याखोट्याची आपल्या मतानें—पोक्त[1] विचारानें—परीक्षा करून, लोकमताची पर्वा न करितां खऱ्या मार्गानें जाणारे ते होते. यामुळें बोवांची वाणी करारी, तेजस्वी, व प्रसंगीं कठोरहि झालेली आढळते; इतकेंच नव्हे, तर निंद्य वस्तूविषयीं तिटकारा दर्शवीत असतांना, ती कित्येक वेळां जहाल जाऊन अश्लीलत्व दोषासहि पात्र झाली आहे. त्यांनीं

**'सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमता' ॥**

१ ( फारसी ) पक्व, प्रौढ.

अशा प्रकारचें वर्तन ठेवल्यामुळेंच, त्यांची वाणीहि जोरदार व अर्थपूर्ण वठलेली आहे. ते म्हणतात:—

" काय माझे नेती वाईट म्हणोन ? । करूं समाधान कशासाठीं ?
काय मज लोक नेती परलोका ?। जातां कोणी नरका निवारील?" ॥

तुकारामबोवांची सर्व कविता धर्मोपदेश व नीत्युपदेश यांना व भगवत्सेवेला वाहिलेली आहे. याव्यतिरिक्त ती दुसऱ्या कोणत्याहि विषयाकडे वळत नाहीं. राजकारण तर तिला मुळींच भावत नाहीं. राजकीय बाबतींत, परतंत्र झालेल्या राष्ट्रांत स्वातंत्र्येच्छा उत्पन्न करण्याच्या कामीं, व स्वराज्याचा उपक्रम करण्याविषयीं, तुकारामबोवा उदासीनच आहेत, असें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. तुकारामबोवांच्या वाणींत तडफ—सणसणीतपणा आहे. परंतु ती तडफ—तो सणसणीतपणा—केवळ पाखंडांवर प्रहार हाणण्याचे कामीं व दांभिकांचा गर्व खंडण्याचे कामीं दिसून येतो. राजकारणी जुलूम झाल्यास त्यांची वाणी त्याविषयीं मूग गिळून किंवा मलूलपणा स्वीकारून पंगुत्व प्रकट करीत आहे. राजकारणांत मन घालून, लोकांना कळकळीचा उपदेश करून त्यांच्या अंतःकरणांत स्वराज्य व स्वातंत्र्य यांची स्पृहा उत्पन्न करणारे प्रसिद्ध कवि श्रीरामदास हे एकच होत. तुकारामबोवांच्या अभंगांत वीर्योत्कर्षदर्शक बाणेदार उद्गार आहेत, परंतु ते उद्गार समरांगणावर शत्रूला तोंड देणाऱ्या धाडसी शूराचे नाहींत, तर ते, मन घट्ट करून, धैर्यानें संकट, आपत्ति, अपवाद, व छळ सोसणाऱ्या आणि ईश्वरचरणीं सर्वस्व

अर्पण करून कर्मातीर्त[1] झाल्यामुळें लोकांची पर्वा न करणाऱ्या विरक्ताचे उद्गार आहेत.

वा० अ० भिडे
( तुकारामबोवा )

### प्रश्न व सूचना

( १ ) काव्य करण्याचे निरनिराळे हेतु सांगून त्यांपैकीं उच्च हेतु कोणता हें सांगा. तुकारामबोवांनीं कोणत्या हेतूंस्तव काव्य केलें ?

( २ ) [ अ ] पुढील वाक्यांचा अर्थ स्पष्ट करून सांगाः—

( १ ) कोणी यशोधनावर नजर ठेवून काव्यदेवीची आराधना करितात. (२) लोकप्रियतेला वाणी व लेखणी वाहण्याचें काम त्यांनीं कधीं केलें नाहीं.

[ आ ] निरिच्छ, नीत्युपदेश, यशोधन, स्वातंत्र्येच्छा, वीर्योत्कर्ष, कर्मातीत, वाङ्मय या शब्दांतील पदें सांगून त्यांचे संधि कसे झाले तें सांगा.

---

## कै० न्या० महादेव गोविंद रानडे

[ न्या० महादेव गोविंद रानडे हे वारल्यानंतरच्या म्हणजे ता. २२ जानेवारी १९०१ च्या 'केसरी'च्या अंकांत कै० बाळ गंगाधर टिळक यांनीं त्यांचेसंबंधीं एक गुणवर्णनपर मृत्युलेख लिहिला. त्या लेखांत न्यायमूर्ति रानड्यांचें कर्तृत्व व मोठेपणा त्याचप्रमाणें टिळकांचें भाषाप्रभुत्व व त्यांची गुणग्राहकता हीं चांगल्या तऱ्हेनें दिसून येतात. ]

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून हिंदुस्थानांतील, महाराष्ट्रांतील व विशेषतः पुण्यांतील लोकांस आपल्या

---

[1] कर्माच्या ( बंधनाच्या ) पलीकडे.

घरचाच एक कार्यकर्ता पुरुष गेल्याइतकें दुःसह दुःख होईल व निदान कांहीं कालपर्यंत तरी या दुःखदायक बातमीनें त्यांचें भान नाहींसें होईल यांत शंका नाहीं. मनुष्याचें जीवित नश्वर आहे वगैरे तत्त्वज्ञानाचे विचार कितीहि डोक्यांत घोळत असले तरी वैभवानें, बुद्धीनें, कर्तृत्वानें किंवा विद्वत्तेनें ज्या थोर गृहस्थांनीं राष्ट्राचा कार्यभार उचलून पुढाकार घेतलेला असतो त्यांच्या मृत्यूनें कांहीं कालपर्यंत तरी जग शून्यवत् भासणें अगदीं स्वाभाविक आहे. माधवरावजींचें चरित्र दुसरीकडे सविस्तर दिलें आहे. त्यावरून कॉलेजांत असतांना त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक कसा वाढला होता, पुढें नोकरींत त्यांचा प्रवेश कसा झाला, तेथें त्यांस कोणकोणते मान मिळाले व अखेरीस हायकोर्ट जज्जाच्या जागेपर्यंत त्यांची मजल कशी पोहोंचली वगैरे गोष्टी वाचकांस कळून येतील. अलौकिक बुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशाबद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचें स्वाभाविक जडलेलें व्यसन, अचूक कल्पकपणा वगैरे अनेक गुणांनीं माधवरावजींचें चरित्र बोधपर असून महत्त्वाचें झालें आहे. याखेरीज राजदरबारीं व लोकांत त्यांस जो वेळोवेळीं मान मिळत गेला व लोकांची आणि सरकारची जी कामगिरी त्यांनीं बजाविली तीहि कांहीं साधारण नाहीं. दुसऱ्या कोणा पुरुषाच्या हातून एवढीच कामगिरी जरी झाली असती तरी देखील त्याची थोर पुरुषांत गणना करावी लागली असती. पण रावसाहेबांकरितां (न्यायमूर्ति हें कृत्रिम नांव सोडून देऊन आम्हां पुणेंकर लोकांच्या तोंडीं बसलेल्या त्यांच्या नेहमींच्या नांवानेंच येथें उल्लेख करणें आम्हांस अधिक प्रशस्त वाटतें.) आज महाराष्ट्रांतील प्रत्येक समजूतदार मनुष्य जो हळहळत आहे तो ते कांहीं हायकोर्टाचे जज्ज होते, प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष होते किंवा सामाजिक सुधारणेचे

अध्वर्यु होते म्हणून नव्हे. या गोष्टी थोरपणा प्राप्त होण्यास साधनीभूत नाहींत असें नाहीं. पण तेवढ्यानें माधवरावजींच्या थोरपणाची उपपत्ति लागत नाहीं अशी आमची समजूत आहे. कै० कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे बुद्धीनें बृहस्पतितुल्य विद्वान् आमच्यांत झाले नाहींत असें नाहीं. प्रार्थनासमाज किंवा समाज-सुधारणा यांचे निःसीम भक्तहि माधवरावजींच्या बरोबरीचे किंवा कांकणभर जास्तहि असूं शकतील; व हायकोर्टांत एक नेटिव्ह जज्ज असावयाचा असा सरकारचा जोंपर्यंत विचार आहे तोंपर्यंत नेटिव्ह हायकोर्ट जज्जाचीहि परंपरा कायम राहील. माधवरावजीं-करितां महाराष्ट्रदेश जो आज हळहळत आहे व आपलें अपरिमित नुकसान झालें असें आज जें प्रत्येकास वाटत आहे तें असल्या बाह्य गुणांकरितां नव्हे. न्यायमूर्ति हे मार्मिक लेखक, चांगले वक्ते, उत्तम विद्वान्, अलौकिक बुद्धिमान्, जबर विद्याव्यासंगी, असाधारण कल्पक आणि सरळ मनाचे व शांत स्वभावाचे होते हें सर्वांस महशूर आहे. पण कमलाची खरी योग्यता ज्याप्रमाणें पाकळ्यांच्या आकारांत, रंगांत किंवा मार्दवांत नसतां त्याच्या सुगंधीपणांत असते, तद्वत् माधवरावजींच्या खऱ्या लोकप्रियतेचें व मोठेपणाचें बीज ज्यांस पाहणें आहे त्यानें वरील गुणांखेरीज दुसऱ्या कांहीं गोष्टींचा विचार केला पाहिजे.

हा विचार कोणता हें सांगण्यापूर्वी माधवरावजी पुण्यास पहिल्यानें जेव्हां आले तेव्हां पुणें किंवा महाराष्ट्र यांची काय स्थिति होती याचें थोडक्यांत निदर्शन केलें पाहिजे. एक राज्य जाऊन दुसरें राज्य कायम होईपर्यंत मध्यंतरीं जो काल जातो तो राष्ट्राच्या अभिवृद्धीस पुष्कळ प्रकारें प्रतिबंधक असतो, हें ऐतिहासिक तत्त्व सुप्रसिद्ध आहे. सन १८२० पासून सन १८७० पर्यंत महाराष्ट्र

देशाची स्थिति अशाच प्रकारची होती. ज्या पुणें शहरांत नाना फडणिसासारख्या मुत्सद्द्यांनीं कांहीं वर्षें वास्तव्य करून मराठी राज्याचा गाडा हाकला व जेथें पेशवाईची अखेर होईपर्यंत मुत्सद्दी व शूर पुरुषांची परंपरा कायम होती, तेथें एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत सर्व बाबतींत बहुतेक प्रेतकळा आली होती असें म्हटलें असतां त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या सरदार घराण्यांतील पुरुषांनीं पेशवाईत मोठमोठीं कामें केलीं होतीं त्यांच्या वंशजांस इंग्रज सरकारनें पेन्शन घेऊन स्वस्थ बसण्यास सांगितलें असल्यामुळें नवीन राज्यव्यवस्थेच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करण्याचें त्यांचें कुलव्रत त्यांनीं सोडून दिलें होतें. देशाचे पुढारीच असे कर्तव्य-पराङ्मुख झाल्यावर गरीब रयतेची स्थिति कशी झाली असेल हें सांगावयास नकोच. टोपीवाल्याची राज्य करण्याची शिस्तवार रीत, चोहोंकडे त्यानें घालून दिलेलीं कायद्याचीं बंधनें, जमीनपाहणी, आगगाड्या, तारायंत्रें, शाळा, पोष्ट ऑफिसें वगैरे राज्यव्यवस्थेच्या अपूर्व थाटानें लोक दिपावून गेल्यासारखे झाले होते. त्यांतून बंडवाल्यांचा पराभव झाल्यानंतर तर इंग्रजी राज्याची अधिकच छाप बसली गेली. जुन्या सरदार घराण्यांतील पुरुषांस राजकारणांत पडण्याची जरूर नसल्यामुळें त्यांच्या अंगचे गुण लुप्तप्राय झाले, व पुणें पाठशाळेंतून तयार झालेले नवीन विद्वान् सरकारी नोकरींत आणि त्यामुळें प्राप्त झालेल्या मानांतच दंग होऊन राहिले. जी पुण्याची तीच सगळ्या महाराष्ट्राची स्थिति होती. माधवरावजी पुण्यास येण्यापूर्वीं येथील विश्रामबाग कॉलेज किंवा पूना कॉलेजमधून बुद्धिवान् व विद्वान् मंडळी तयार होऊन बाहेर पडली नव्हती असें नाहीं, पण वर निर्दिष्ट केलेल्या अनेक कारणांमुळें राष्ट्रामधील चळवळ अगदीं बंद पडून गेली होती व कोणास आपण पुढें काय करावें हें

सुचत नसून आपली हल्लींची स्थिति बरी किंवा वाईट हेंहि कळत नव्हतें. ज्या प्रांतांतील लोकांनीं एकदां मराठी राज्याचा गाडा हाकला होता त्यांतील पुढाऱ्यांच्या वंशजांची दोन पिढ्यांत अशी स्थिति होऊन जावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. पण माधवरावजींनीं पुण्यांत जेव्हां पाऊल ठेवलें तेव्हां या महाराष्ट्राच्या जुन्या राजधानीची स्थिति वरच्याप्रमाणें झाली होती यांत बिलकुल संदेह नाहीं. कोणत्याहि प्रकारची चळवळ करण्याविषयीं पराङ्मुखता आणि केवळ स्वहितपरायणतेमुळें अथवा पूर्वीच्या अमदानींत ज्या गुणांची चहा होत होती तेच गुण नेटिवांच्या अंगीं तरी असण्याची आवश्यकता न राहिल्यामुळें एक प्रकारचें लोकांच्या पुढाऱ्यांच्या अंगीं आलेलें शैथिल्य हेंच काय तें सर्व देशभर नजरेस येत होतें. लोकांच्या अंगचें तेज अगदींच नाहींसें झालेलें होतें असें नाहीं, पण वर लिहिलेल्या कारणांमुळें महाराष्ट्रदेश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं अनेक रीतींनीं त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे; व आमच्या मतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय. मुंबईच्या कॉलेजांत विद्याभ्यास करीत असतां इंग्रजी विद्येनें माधवरावजींच्या मनावर जे परिणाम झाले असतील अथवा त्यांच्या अंतःकरणांत जो प्रकाश पडला असेल त्याखेरीज त्यांच्या मनाची सार्वजनिक चळवळीकडे प्रवृत्ति होण्यास डॉ० भाऊ दाजी, दादाभाई नौरोजी वगैरे थोर गृहस्थांचीं प्रत्यक्ष उदाहरणें बरींच कारणीभूत

झालीं असावीं. एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, माधवराव मुंबई सोडून कायमचे पुण्याच्या प्रिन्सिपाल सदर[1] अमीनच्या जागेवर आले तेव्हां दादाभाई नौरोजींसारख्या पुढारी गृहस्थांच्या उदाहरणानें व कृतीनें त्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला होता. माधवरावजी मुंबईसच राहाते, तर आपल्या असाधारण बुद्धिसामर्थ्यानें त्यांनीं तेथेंहि उत्तम लौकिक संपादन केला असता, यांत बिलकुल शंका नाहीं. तथापि महाराष्ट्राची राजधानी जें पुणें शहर तेथें येऊन त्यांस जी कामगिरी करावयास सांपडली, त्यामुळें माधवरावजींच्या अंगचे अलौकिक गुण लोकांच्या पूर्णपणें नजरेस आले असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सरकारी नोकरीचें काम चांगल्या रीतीनें संभाळून देशाच्या उत्कर्षाकरितां कोणकोणत्या दिशांनीं काय काय प्रयत्न केले पाहिजेत हें ठरविणें व ते अमलांत आणण्याकरितां सतत परिश्रम करून जागरूकता ठेवणें हें कांहीं सामान्य बुद्धिमान् पुरुषाचें काम नव्हे. कित्येकांस नित्य व्यवसायापुढें सार्वजनिक कामें सुचत नाहींत; सुचलीं तर करण्याची उमेद नसते; आणि यदाकदाचित् करण्यास प्रवृत्त झाले तर त्यांस मनुष्यबळ किंवा इतर जी सामुग्री लागते ती ज्या उपायांनीं प्राप्त करून घ्यावयाची ते उपाय योजण्यास ते असमर्थ असतात. कित्येक विद्वानांची तर या व्यापक प्रश्नानें बुद्धिच गुंग होऊन जाते, व कित्येक एकदेशीय[2] असून कोणास अमुक एक दिशेनें राष्ट्राची उन्नति होईल असें वाटत असल्यास दुसरीच दिशा पसंत पडते. माधवरावजींच्या अंगचा पहिला गुण हा होय कीं, सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नति झाली पाहिजे असें त्यांस वाटत होतें व या सर्व दिशांचें व बाजूंचें सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या

१ दुसऱ्या वर्गाचा न्यायाधीश. २ एकांगी.

योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वरानें त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धि दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतींत आम्ही मागें आहों व या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज इतर सुधारलेल्या राष्ट्रांची आपणांस बरोबरी करतां यावयाची नाहीं असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता. यांपैकीं कांहीं बाबतींत त्यांचीं मतें पुढें ज्या नवीन चळवळी निघाल्या त्यामुळें सर्व लोकांस पसंत पडेनाशीं झालीं होतीं. पण तेवढ्यानें त्यांची योग्यता कमी होते असें नाहीं. घाटांतून एकदां एका कुशल इंजिनियरानें आगगाडीची लाइन मारल्यानंतर त्यांत सुधारणा करणारे जरी पुष्कळ लोक निघाले तरी ज्याप्रमाणें मूळ इंजिनीयरच्या कल्पकपणास कमीपणा येत नाहीं, तद्वतच रावसाहेब रानडे यांची स्थिति होय. वर सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारें थंड झालेल्या देशाच्या प्रत्येक गात्रास कसें सजीव करतां येईल याचा रात्रंदिवस विचार करणारा तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत एकच पुरुष झाला. सन १८०० सालीं निवर्तलेल्या नाना फडणिसास मोडकळीस आलेली पेशवाई कशी सुरक्षित ठेवावी याची ज्याप्रमाणें रात्रंदिवस काळजी वाटत असे, तद्वतच एकोणिसाव्या शतकाच्या शेवटलीं पंचवीस तीस वर्षें माधवरावजींनीं राज्यक्रांतीनें कांहीं वेळ स्तब्ध झालेल्या महाराष्ट्रास कसें सजीव करतां येईल या काळजींत घालविलीं. आणि केवळ महाराष्ट्राकरितांच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाबद्दल अशाच तऱ्हेचे विचार त्यांच्या मनामध्यें सदैव घोळत असत. पाश्चिमात्य शिक्षणाबरोबरच एक प्रकारची सार्वजनिक जबाबदारी आपणांवर येऊन पडते ही गोष्ट माधवरावजींनीं पुरी ओळखली होती व आपल्या पंचवीस-तीस वर्षांच्या वर्तनक्रमानें लोकांस ती जबाबदारी कशी बजावावी याचें उत्कृष्ट उदाहरण घालून

देऊन त्यांनीं महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थान देशाचा लौकिक राखला असें म्हणणें भाग आहे

हिंदुस्थानची किंवा महाराष्ट्र देशाची जागृति अमुक उपायानें होईल आणि अमुक उपायानें होणार नाहीं, हें ठरविण्यास असामान्य व व्यापक बुद्धि लागते हें वर सांगितलेंच आहे. पण अशा प्रकारची अलौकिक बुद्धि असूनहि जर दुसरे गुण पुढाऱ्यांच्या अंगीं नसतील, तर त्यांच्या हातून मोठीशी कामगिरी कधींहि व्हावयाची नाहीं. राष्ट्राची उन्नति होण्यास ज्या हजारों गोष्टी कराव्या लागतात त्या एकट्याच्या हातून होत नाहींत. त्यास योग्य माणसांची निवड करून त्यांचें साह्य घ्यावें लागतें; किंबहुना अशा प्रकारचीं माणसें तयार करावीं लागतात असें म्हटलें तरी चालेल. माणसें तयार करण्याचें काम किती कठीण आहे हें अनुभवावांचून समजणें अशक्य आहे. मनुष्यांची पारख, त्यांच्या हातून चुक्या घडल्या असतां त्यांस शांतपणें संभाळून घेऊन पुन्हा उत्तेजन देण्यास अवश्य लागणारे उत्साह, शांति वगैरे गुण पुढाऱ्यांचे आंगीं जरूर असावे लागतात. माधवरावजींच्या अंगीं हे गुण पूर्णपणें वसत होते व म्हणूनच त्यांच्या हातून इतकीं कामें येथें सिद्धीस गेलीं. सार्वजनिक सभा, वक्तृत्वसभा, लवादकोर्ट, प्रार्थनासमाज, फीमेल हायस्कूल, औद्योगिक चळवळ वगैरे ज्या अनेक संस्था पुणें शहरांत झाल्या किंवा आहेत, त्या सर्वांशीं माधवरावजींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें संबंध होता असें आढळून येईल. या सर्व चळवळी सुरू ठेवण्याबद्दल लोकमत जागृत करून कायम ठेवणें, निरनिराळ्या संस्थांकरितां निरनिराळीं मनुष्यें पाहून त्यांच्या हातून तीं तीं कामें करून घेणें, स्वदेशांतल्या किंवा परदेशांतल्या सर्व प्रकारच्या हालचालींवर नजर ठेवून त्यांचा देशाच्या उत्कर्षाशीं कसा संबंध पोहोंचतो याचें अहोरात्र मनन करणें हें

माधवरावजींचें व्यसनच होऊन राहिलें होतें. त्यांच्या घरीं केव्हांहि ज़ा, तेथें कांहीं नाहीं कांहीं तरी सार्वजनिक विषयाची चर्चा चालू असावयाचीच. बारा आणि बारा चोवीस तास अशा रीतीनें सार्वजनिक कामांत एकसारखें मन घालून तीं सुयंत्रित रीतीनें चालविण्याइतकें बुद्धिसामर्थ्यच आधीं फार थोड्या लोकांत असतें. आणि ज्या थोड्या लोकांच्या आंगीं अशा प्रकारचें सामर्थ्य असतें त्यांस आलस्यानें, स्वहितपरतेनें किंवा उत्साहभंगानें पछाडलें असल्यामुळें युनिव्हर्सिटींतून दरसाल शेंकडों ग्रॅज्युएट बाहेर पडताहेत, तरी रात्रंदिवस देशहितार्थ तनमनधन अर्पणारा 'यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः' या न्यायानें एखादाच माधवरावजींसारखा पुरुष निर्माण होतो. असा पुरुष आपल्यामधून गेला असतां एकाएकीं सूर्यास्त झाल्याप्रमाणें सर्व लोक दिङ्मूढ झाले यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

माधवरावजींनीं जीं हीं सर्व कामें केलीं तीं त्यांस सुखानें करतां आलीं अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. मुंबईपेक्षां पुणें किंवा महाराष्ट्रदेश यांतील जमीन अधिक एकरूप असल्यामुळें, सार्वजनिक चळवळींचें माधवरावजींनीं मुंबईहून आणलेलें बीं येथें लवकरच उदयास आलें हें गेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासावरून कोणासहि सहज समजण्यासारखें आहे. हें बीं रुजत घालून त्यास पाणी घालणें व पुढें तज्जन्य वृक्षाचें पालनपोषण करणें हें सर्व काम माधवरावजींच करीत होते. त्यांच्या हाताखालीं कै० सार्वजनिक काका, कै० सीतारामपंत चिपळोणकर, रा० रा० शिवराम हरि साठे वगैरे बरीच मंडळी असून पुढें पुढें कै० रा० ब० नूलकर, कै० कुंटे यांच्यासारख्यांचेंहि साहाय्य त्यांस मिळालें होतें. पण या सर्व गृहस्थांची व त्यांनीं चालविलेल्या कामाची मदार काय ती माधवरावजींवरच असे ही गोष्ट लवकरच सरकारच्या नजरेस आली.

मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत केल्यानंतर त्यांची कमिशन-मार्फत जी चौकशी झाली तेव्हां पुणें शहरांत झालेली चळवळ आणि सन १८७९ सालीं बुधवारचा वाडा जळाला असतां गांवांत झालेली धामधूम ज्यांस आठवत असेल ते रावसाहेबांनीं अंगीकारलेला क्रम बिनधोक्याचा होता असें कधींहि म्हणणार नाहींत. महाराष्ट्रांतील लोकांस सार्वजनिक बाबतींत चळवळ करण्याचें जर कोणी शिक्षण देत असेल तर ते माधवरावजीच होत ही गोष्ट सरकारास कळून चुकली होती, व माधवरावजींची पुण्याहून नाशिकास व नाशिकाहून धुळ्यास जी उचलबांगडी झाली ती कांहीं केवळ एक जागीं एक मनुष्य पुष्कळ वेळ ठेवणें योग्य नाहीं एवढ्याचकरितां नव्हे, हें सर्वांस माहीत आहेच. फार लांब कशाला, माधवरावजींनीं स्थापिलेली सार्वजनिक सभा ही राजद्रोही आहे असा सर रिचर्ड टेंपलच्या कारकीर्दींत बूट निघाला होता, पण या सर्व अडचणींतून आणि संकटांतून धिमेपणानें माधवरावजींनीं हातांत धरलेलीं सर्व कार्यें तडीस नेलीं. यांच्यापेक्षां कमी उत्साहाचा पुरुष प्रसंगीं डगमगून गेला असता. पण रावसाहेबांच्या बुद्धीचें व्यापकत्व जितकें अलौकिक होतें तितकाच शांति हा गुण त्यांचे अंगांत असामान्य असल्यामुळें त्यांच्या दीर्घोद्योगास अखेरीस यश येऊन मुंबई इलाख्याच्या मध्यभागांत एक प्रकारची विशेष जागृति प्राप्त झाली. माधवरावजींसारखे पुरुष जेथें निपजले नाहींत तेथल्या आणि महाराष्ट्राच्या स्थितीची तुलना केली असतां आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल. सारांश, महाराष्ट्रांत जर कांहीं आजमितीस जोम आढळून येत असला, त्यांतील वक्ते व लेखक जर निर्भयपणें सार्वजनिक गोष्टींची चर्चा करीत असले, तर तें माधवरावजींच्या २५ वर्षांच्या दीर्घोद्योगाचें फळ होय असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

अशा तऱ्हेचा पुरुष देशांत निर्माण होणें हें देशाचें एक भाग्यच आहे. विद्वत्ता, मुत्सद्दीपणा, काम करण्याची हौस, सार्वजनिक हित कोणत्या उपायांनीं करितां येईल याबद्दल एकसारखा निदिध्यास, आणि लोकांनीं नेहमीं आपल्या उन्नतीच्या चळवळींत व्यग्र असावें अशी अनिवार इच्छा, इतके गुण आंगीं वसत असलेले थोर पुरुष राष्ट्रांत वारंवार निपजत नसतात. महाराष्ट्रदेशांत आठराव्या शतकांत नाना फडणीस अशा प्रकारचे मुत्सद्दी होऊन गेले खरे, पण विद्वत्तेचें मान लक्षांत आणितां त्यांची आणि माधवरावजींची तुलना करण्यापेक्षां महाराष्ट्राच्या किंवा दक्षिणेच्या प्राचीन इतिहासांत प्रसिद्धीस आलेले हेमाद्री किंवा माधवाचार्य यांची उपमा आमच्या मतें माधवरावजींस अधिक साजण्यासारखी आहे. माधवाचार्यांची बुद्धि चोहोंकडे अकुंठित असल्यामुळें त्यांस 'सर्वज्ञः स हि माधवः' असें म्हणत असत. माधवरावजींचें बुद्धिवैभवहि अशाच प्रकारचें विस्तृत व व्यापक होतें; व या इंग्रजी राज्यांत जर हायकोर्टच्या जज्जाच्या कामापलीकडे त्यांच्या विशाल बुद्धीचा उपयोग झाला नाहीं तर तो दोष माधवरावजींचा नव्हे, हल्लींच्या राज्यपद्धतीचा आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. माधवरावजी जर आणखी कांहीं दिवस जगते तर त्यांनीं सुरू केलेल्या चळवळी उघड रीतीनें हातीं घेऊन दादाभाई किंवा ह्यूम यांजप्रमाणें त्या शेवटास नेण्याचा उद्योग निकरानें होण्याचा संभव होता. पण त्यांच्या हातून आम्हां लोकांचें अशा प्रकारें कल्याण व्हावें असा ईश्वरी संकेत नव्हता असेंच म्हटलें पाहिजे. एरव्हीं त्यांस ६० वें वर्ष लागलें म्हणून त्यांची ज्युबिली करण्याऐवजीं त्यांचा मृत्युलेख लिहिण्याचा दुःखकारक प्रसंग आमच्यावर आला आहे तो आला नसता.

माधवरावजींचा महाराष्ट्राकडे आणि महाराष्ट्रीयांचा माधवरावजीं-कडे विशेष ओढा कां होता याचा यावरून विशेष खुलासा होईल. कायदेपंडित, लेखक वगैरे बाबतींत माधवरावजींची योग्यता इतर कोणत्याहि राष्ट्रीय पुढाऱ्यापेक्षां कमी नव्हती. किंबहुना सर्व विषय अवगत करून घेण्याची हौस आणि कोणताहि विषय हातीं घेतला असतां त्यासंबंधीं कांहीं तरी नवी शकल काढून त्यास मनोहर रूप देण्याची त्यांची अपूर्व हातोटी दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रीय पुढाऱ्यांत सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं. पण याहीपेक्षां त्यांच्या आंगचा लोकोत्तर गुण म्हटला म्हणजे आपल्या राष्ट्राचा अभ्युदय केव्हां ना केव्हां तरी खास झाला पाहिजे, किंबहुना ही गोष्ट परमेश्वरानेंच संकल्पित आहे अशी जी त्यांच्या ठायीं उमेद होती ती होय. भावी सुपरिणामाबद्दल अशा तऱ्हेची निःसंशय मनोवृत्ति फारच थोड्या पुढाऱ्यांचे ठायीं आढळून येते. सरकारचा तावेदारपणा, योग्य माणसांची कमतरता, समाजामध्यें रूढ असलेल्या समजुती इत्यादि अनेक कारणांनीं माधवरावजींस आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी करतां आल्या नाहींत; तथापि दूरवर नजर देऊन धिमेपणानें अंगीकृत कार्यें त्यांनीं अव्याहत रीतीनें चालू ठेविलीं होतीं. प्राचीन व अर्वाचीन सुधारणेच्या झगड्यांत मनुष्यास पदोपदीं कसें बुच-कळल्यासारखें होतें याचें एके प्रसंगीं त्यांनीं मोठ्या मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे. या सर्व अडचणी सोसून बिनतक्रार देशोन्नतीच्या कार्याकरितां उत्साहानें भगवाझेंडा हातीं घेऊन सदैव पुढें राहणें हें कांहीं लहानसहान मुत्सद्दीपणाचें काम नव्हे. पण माधवरावजींची लोकसेवा एवढ्यावरच थांबली नाहीं. त्यांनीं आपल्या हयातींत, आपल्या जन्मभूमींतील लोकांस शहाणे करून सोडण्याचा क्रम अबाधित चालू ठेविला होता. राष्ट्रामध्यें लिहिणारे व बोलणारे

पुढारी जरी पुष्कळ असले तरी अशा रीतीनें लोकसमाजामध्यें जागृति उत्पन्न करण्याचें गुरुत्व ज्यांकडे देतां येईल असे लोक फारच विरळा आहेत. माधवरावजी हे अशा विभूतींपैकींच एक होते व म्हणूनच त्यांजकरितां आज सर्व लोक आम्हां सर्वांचा एक अप्रतिम हितकर्ता गेला म्हणून हळहळत आहेत. अशा तऱ्हेचा पुरुष इंग्रजी राज्य झाल्यापासून तरी महाराष्ट्रांत निघाला नाहीं व पुढेंहि माधवरावजींची जागा लवकर भरून येईल असें वाटत नाहीं.

अशा तऱ्हेचा पुरुष काळानें आमच्यामधून ओढून न्यावा हें आमचें मोठें दुर्दैव होय. माधवरावजींच्या कुटुंबाची त्यांच्या मृत्यूनें जी हानि झाली आहे ती तर खरोखरीच दुष्परिहार्य होय. त्यांच्यावर हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे खरा व आम्हीं कितीहि शांतवन केलें तरी तें दुःख कमी होणें कठीण आहे; तथापि, महाराष्ट्रांतील प्रत्येकजण त्यांच्या दुःखाचा वांटेकरी आहे या गोष्टीकडे लक्ष देऊन त्या आपलें मन विवेकानें आवरतील, आणि ज्या महापुरुषाच्या मृत्यूकरितां आज आपण सर्वजण दुःख करीत आहों त्यांचेंच उदाहरण आपणांपुढें ठेवून यथाशक्ति, पण खऱ्या कळकळीनें त्यांनीं घालून दिलेला कित्ता गिरवून त्यांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होतील अशी आम्हांस आशा आहे. माधवरावजी तर गेलेच पण त्यांनीं घालून दिलेलें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून सर्वजण जर यथाशक्ति देशकार्याकरितां झटण्याचा प्रयत्न करतील तर आपल्या सर्वांस जी गोष्ट हवी आहे ती प्राप्त झाल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं. माधवरावजींच्या गुणांबद्दल जितकें जास्त लिहावें तितकें थोडेंच आहे; करितां आजचा लेख आम्हांस जरी अपुरा वाटत आहे, तरी माधवरावजींस

त्यांच्या सत्कर्माप्रमाणें गति मिळो एवढी अखेरीस प्रार्थना करून हा दुखवट्याचा लेख येथेंच संपवितों.

वा० गं० टिळक
(केसरी)

**प्रश्न व सूचना**

(१) माधवराव रानडे यांच्या गुणांचें थोडक्यांत वर्णन करून टिळकांना आवडलेला त्यांचा सर्वांत मोठा गुण कोणता हें विस्तारानें सांगा.

(२) १८२० पासून १८७० पर्यंत महाराष्ट्रास टिळकांनीं 'थंड गोळा' म्हटलें आहे तें कां हें त्या वेळच्या राजकीय, सामाजिक वगैरे परिस्थितीचें वर्णन करून सांगा.

(३) [अ] पुढील वाक्यांचा थोडक्यांत अर्थ सांगाः—

(१) महाराष्ट्र देश थंड गोळा होऊन पडला होता. (२) अंगीकृत कार्यें त्यांनीं अव्याहतपणें चालू ठेविलीं होतीं.

[आ] पुढील शब्दसमूहांचा वाक्यांत उपयोग करून दाखवाः—
गाडा हांकलणें, छाप बसणें, मदार असणें.

[इ] पुढील शब्दांचा अर्थ सांगाः—
ईश्वरी संकेत, भावी सुपरिणाम, कुलव्रत, सांगोपांग, दिङ्मूढ, अहोरात्र, शैथिल्य.

[ई] हेमाद्रि व माधवाचार्य या दोघांची मिळून ५ ओळींत माहिती द्या.

---

## भाऊबीज

[रा० नारायण महादेव पटवर्धन यांनीं लिहिलेल्या 'आमची दिवाळी' या पुस्तकांतून पुढील उतारा घेतला आहे. त्यांत मुलांना उपयुक्त अशी हरतऱ्हेची माहिती, घरगुती विनोद, व प्रसंगाला उचित अशी साधी-सोपी भाषा यांचा सुंदर मिलाफ झाला आहे.]

प्रतिपदेचा क्षय असल्यामुळें एकदम भाऊबिजेचाच दिवस उजाडला. वास्तविक सकाळीं थोडी स्वस्थता असती तर सर्वांनाच बरें वाटलें असतें; परंतु ११ वाजतां परदेशीं जाणारी बोट पाहावयास जायचें, का आरामशीर जेवणखाण करायचें असा प्रश्न पुढें येऊन बराच वेळ त्यावर एकमत होण्याची आशा दिसेना.

" कोंकणच्या बोटीसारखीच ती असणार. तिला काय पाहायला जायचें आहे ? " सईताई आरामशीर जेवणाच्या सूचनेला दुजोरा देत पहिल्या सूचनेच्या विरुद्ध बोलल्या.

" तुम्हांला जायचें नसलें तर नका जाऊं. पण कोंकणच्या बोटींत व या बोटींत जमीन-अस्मानाचा फरक आहे ! एकच गोष्ट पहा, कीं कोंकणच्या बोटींत प्रवाश्याला जास्तींत जास्त फार तर एक दीड दिवसच काढावा लागत असल्यामुळें, तेथें बसण्यापुरती—फार तर आडवें होण्यापुरती—जागा प्रवाश्याला दिली म्हणजे त्याची सोय आपण करून दिली, असें बोटीच्या मालकांना वाटतें. उलट परदेशच्या बोटींत प्रवाश्यांना महिनामहिना सुद्धां काढावा लागत असल्यामुळें त्यांच्या—निजणें, बसणें, जेवणें, खेळणें, स्नान करणें वगैरे—सर्व सोयी बोटींत कराव्या लागतात."

अबासाहेबांनीं दुसरी बाजू पुढें मांडून पत्नीचें समाधान करण्याचा प्रयत्न केला.

शेवटीं 'हो-ना' करतां करतां, ११ वाजतां जेवून बाहेर पडायचेंच कायम झालें. बासुंदीपुरीचा आग्रह रात्रीं करायचा असें ठरल्यामुळें, मंडळी वेळेवर जेवून एका टॅक्सींतून बाहेर निघाली. बाहेरून चर्नीरोड् स्टेशनाचे बाजूनें जात असतां राजाबाई टॉवर, हायकोर्ट, सेक्रेटरीएट इत्यादि जीं जीं मोठीं ठिकाणें जातां जातां

दाखवितां आलीं व दिसलीं तीं तीं पाहून मंडळी एकदम बॅलर्ड् पिअर्च्या रस्त्याला लागली.

" काय ही उंच माडी ! येथून सगळी मुंबई दिसेल नाहीं मामा ? " विनू राजाबाई टॉवरसंबंधींच विचार करीत म्हणाला.

" या उंच माडीला टॉवर् म्हणजे मनोरा म्हणतात; या टॉवर-वरून खरोखरच बहुतेक सर्व मुंबई दिसते. पण यापेक्षां कितीतरी मोठमोठे टॉवर लंडन्, न्यूयॉर्क् वगैरे शहरांत आहेत. न्यूयॉर्कमधील 'लारकिन्' नांवाच्या टॉवरला तर ११० मजले असून त्याची रस्त्यापासूनची उंची १२०८ फूट म्हणजे जवळ जवळ २०० पुरुष आहे ! " बाबूरावानें आश्चर्यपूर्वक सांगितलें.

" अबबब ! कितीतरी ही उंची ! " विनू-सोनू ओंठांवर बोटें ठेवून तितक्याच आश्चर्यानें ओरडलीं, व या आश्चर्यांतच टॅक्सी बॅलर्ड् पिअरवर येऊन पोंचली.

" मोठ्या स्टेशनाला जसे पुष्कळसे प्लॅट्फॉर्म् असतात व निर-निराळ्या मार्गांच्या गाड्या जश्या निरनिराळ्या प्लॅट्फॉर्म्वरून सुटतात तसे येथेंहि पुष्कळसे धक्के किंवा डॉक्स् असून, सामान्यतः ठराविक डॉक्स्वरून ठराविक मार्गांच्या बोटी निघतात. ही समोर जी बोट दिसते आहे ती जपानकडे जाणारी आहे." असें सांगून बाबूराव मंडळींना समोरील बोटीकडे घेऊन गेला, व खिशांतून स्वतःच्या नांवाचें एक कार्ड काढून तें त्यानें बोटीवरील कप्तानास दाखविलें. कप्तानानें बाबूरावाकडे जरा अदबीनें पाहिलें, व ती सर्व मंडळी डेक्वर चढली. या वेळीं बोटींत प्रवासी वगैरे कोणी नसून ती धुण्याचें व साफसूफ करण्याचें काम चालू होतें. बाबूरावानें मंडळींना अगदीं खालपासून वरपर्यंत नेऊन, बोट चालविणारीं एंजिनें व इतर यंत्रें असलेली जागा; व्यापारी माल व प्रवाश्यांचें जास्तीचें सामान

सांठविण्याची जागा; फर्स्ट् क्लास व सेकंड् क्लास प्रवाश्यांच्या खोल्या, त्यांतील निजण्याच्या, तोंड धुण्याच्या वगैरे सोयी; जेवणाचें प्रशस्त दालन, व तेथील सोयी; पत्रें लिहिण्याची व विड्या वगैरे ओढण्याची स्वतंत्र जागा; गाण्याची व पिआनो वगैरे वाद्यें वाजविण्याची जागा; पोस्ट ऑफिस्; वाचनालय; दवाखाना; स्नानगृह; पुस्तकें, वर्तमानपत्रें, फळें वगैरे विकत मिळण्याची जागा; एका देशांतील पैशाचें दुसऱ्या देशांतील पैशांत रूपांतर करण्याची जागा; क्रिकेट्, टेनिस्, पिंग्पांग् वगैरे खेळ खेळण्याच्या व शर्यती लावण्याच्या जागा; डेकवर हिंडण्याकरितां मोकळी ठेवलेली जागा, व तेथेंच बसून समुद्रावरील शोभा पाहाण्याकरितां ठेवलेलीं बाकें किंवा पडल्या-पडल्या वाचण्याकरितां ठेवलेल्या आरामखुर्च्या; कप्तानाची खोली, चौकशीची जागा इत्यादि ठिकाणें बाबूरावानें त्यांस दाखविलीं.

"काय हो या सोयी! इतक्या सोयी असल्यावर वर्ष वर्ष सुद्धां बोटीवर राहाण्याचा माणसाला कंटाळा येणार नाहीं! तूं परदेशीं गेलास तेव्हां उगीचच मेलें मला रडूं आलें!" सईताई जरा आश्चर्यानें व गहिंवरून येऊन बाबूरावाकडे पाहून म्हणाल्या. "उद्यां सोनी सासरीं जातांना तुम्हांला रडूं येईल तें कांहीं सासरीं तिला कांहीं कमी पडेल म्हणून नव्हे, किंवा तीहि सासरीं जातांना पुनः पुनः मागें वळून पाहील, तें कांहीं सासरीं गारिबी आहे म्हणून नव्हे सईताई; तर–काय सांगूं? येईल थोडेच दिवसांत अनुभव." पापासाहेबांनाहि जरा भरून आलें. परंतु तें दिसूं नये म्हणून ते आपल्याशींच 'कन्या सासुऱ्याशीं जाई, मागें परतुनि पाही' असें गुणगुणूं लागले.

हें अकल्पित आलेलें प्रेमाचें सौम्य व नाजूक वादळ टाळण्याच्या हेतूनें बाबूरावानें सईताईचें लक्ष चट्दिशीं एका क्रेन्-( यारी )-

कडे वेधलें. तो अजस्र लोखंडी सांगाडा, त्याला लटकावलेले साखळदंड, तो इकडून तिकडे हालविण्याकरितां केलेलीं लोखंडी चाकें, व जोडलेल्या तरफा, आणि मोठमोठीं पोतीं किंवा गठ्ठे धक्यावरून बोटीच्या तळमजल्यांत टाकतांना अजस्र हत्तीच्या सोंडेसारखी होणारी कृति, हीं पाहून अबासाहेबांसुद्धां सर्व मंडळींना फार आश्चर्य वाटलें, व 'काय ही यंत्राची अजब शक्ति—'! असे उद्‌गार त्यांचे तोंडून बाहेर पडले.

"अहो! एवढेंच काय? 'सॅरॉस्' म्हणून एक क्रेन् येथें जवळच असून त्याचे योगानें २३ टन म्हणजे जवळजवळ ३२ खंडी वजनाच्या गाड्याच्या गाड्या उचलतां येतात! सबंध पूलच्या पूल या यंत्रानें बाजूला सारतां येतात! इंग्लंड्च्या टेम्स् नदीवर असे कांहीं पूल आहेत, कीं त्यांचेखालून मोठमोठ्या जंगी जहाजांना जातांयेतां येत नाहीं; पण तेथेंहि अशी कांहीं युक्ति केली आहे, कीं जहाज पुलाशीं आलें कीं तो पूल दुभंग होतो, व जहाज पुलाखालून गेलें कीं लगेच तो पुनः सांधला जातो."

बाबूरावाच्या या माहितीनें यंत्राच्या सामर्थ्याबद्दल मंडळींना जास्तच आश्चर्य वाटूं लागलें.

"पण मला अजून हेंच कोडें आहे! अशा प्रसंगीं यंत्राच्या शक्तीचें आश्चर्य करावयाचें, का तीं बनविणाऱ्या मनुष्याच्या कल्पकतेचें?" पापासाहेबांनीं आपला पूर्वीचाच प्रश्न पुनः काढला.

"पण यांत विरोध आहे कोठें? यंत्राच्या शक्तीचें कोणीं कौतुक केलें म्हणजे अप्रत्यक्षतः तें मनुष्याच्या बुद्धीचेंच कौतुक केल्यासारखें होतें; व आणखी पुढें जायचें तर असेंहि म्हणतां येईल कीं, मनुष्याच्या बुद्धीचें कौतुक करणें हेंहि एक प्रकारें ही बुद्धि देणाऱ्या ईश्वराच्या सामर्थ्याचें कौतुक करण्यासारखेंच आहे."

अबासाहेबांचा हा मुद्दा फारच समर्पक व मनोरंजक असून बाबूरावालाहि त्यांत भाग घेण्याची इच्छा झाली होती; परंतु बरोबरच्या बायकांमुलांकडे पाहून त्यानें चट्दिशीं पुढचा मार्ग धरला. जातां जातां त्यानें कुलाब्याची दांडी व इतर दीपगृहें दुर्बिणींतून दाखविलीं. विनूला दीपगृहांची, तर सोनूला दुर्बिणीची फारच मजा वाटली. दीपगृहांमुळें समुद्रांत खडक किंवा इतर धोक्याच्या जागा कोठें आहेत हें समजून पुढील संकट कसें टाळतां येतें इत्यादि माहिती बाबूमामा मुलांना सांगत आहे तोंच मंडळी टॅक्सीपाशीं आली. टॅक्सी गेट् ऑफ् इंडिआपाशीं थांबली. गेट् ऑफ् इंडिआच्या त्या भव्य व सुंदर कमानी, त्यांचे दगड, भोंवतालचा एकंदर थाट, व विशेषतः समोरच्या समुद्रांत तरंगत असलेलीं रंगीबेरंगी, व लहान लहान होडगीं पाहून मंडळींना फारच मजा वाटली.

"आतांपेक्षां संध्याकाळीं माणसें होड्यांत बसून हिंडायला जातांना फारच मजा दिसते. अशा प्रकारच्या होड्यांतून लंडनच्या टेम्स् नदीवर कितीतरी माणसें इकडून तिकडे हवा खाण्याकरितां जात-येत असतात; आणि जेव्हां त्यांच्या शर्यती लागतात तेव्हांची मौज तर कांहीं विचारावयास नको. विनू, काल जसें मीं तुम्हांला शाळांशाळांमध्यें होणाऱ्या क्रिकेटच्या किंवा फूट्बॉल्च्या सामन्यांबद्दल सांगितलें, तसेच सामने या होड्या वल्हविण्याचेहि होतात; त्यांस ते 'रिगेटा' म्हणतात. याहि शर्यतींचें इंग्रज लोकांना भारी वेड आहे. या निमित्तानें प्रत्येक मुलाला थोडेंफार वल्हावितां हें येतेंच, व अशा रीतीनें समुद्राबद्दल वाटत असलेली भीति लहानपणापासूनच वाटेनाशी होते. आतां जमिनीची भीति उरली नाहीं, पाण्याची भीति उरली नाहीं; हवेंत विमानांतून फिरण्याची भीति मात्र अद्याप थोडी आहे; पण तीहि घालविण्याकरितां जारीचे उपाय चालू आहेत.

परवांच विमानखात्यावरच्या एका बड्या अधिकाऱ्यानें लंडनमधील लहान मुलांना विमानांतून फुकट फिरवून आणिलें! एकाद्या गोष्टी-बद्दल वाटत असलेली भीति घालवून त्यासंबंधींची आवड उत्पन्न करण्याच्या काय या युक्त्या!" बाबूराव मोठ्या भरांत येऊन सांगत होता.

"आम्हांला नेतां का होड्यांतून मामा?" विनू-सोनूनें विचारिलें.

आपल्या सांगण्याचा इष्ट तो परिणाम झालेला पाहून बाबू-रावांना आनंद झाला, व इतर वडील मंडळी गेट् ऑफ् इंडिआमध्यें कोल्ड्रिंक् पीत बसली आहेत तोंच बाबूरावानें विनू-सोनूला थोडेंसें होडींतून हिंडवून आणलेंहि. होडींत बसल्या बसल्या, प्रथम लोक नुसत्या ओंडक्यांवरच, नंतर सपाट फळ्यांवर कसे तरंगत असतील; नंतर त्यांना काठीचे साह्यानें फळ्या वाटेल तश्या वळविण्याचें कसें सुचलें असेल; काठ्यांवरून व पोहण्यावरून त्यांना वल्ह्याची कल्पना कशी आली असेल; नंतर छत्रीवरून शिडाचा उपयोग करण्याचें कसें सुचलें असेल; व शेवटीं हल्लींप्रमाणें ते वाफेच्या एंजिनाचा उपयोग कसा करूं लागले; इत्यादि माहिती थोडी स्वत:, व थोडी मुलांकडून काढून घेत, त्यानें दिली. ते परत येतात तों बाकीची मंडळी कोल्ड्रिंक् पीत बसलेली त्यांस दिसली.

"आम्हांला नको तुमचं कोल्ड्रिंक्! आम्हीं समुद्रांत काय काय पाहिलें!" असें सोनूनें पापासाहेबांच्या चिडविण्याला चोख उत्तर दिलें! मंडळी टॅक्सींत बसली; व ताजमहाल हॉटेलवरून परत घराकडे फिरली. ताजमहाल हॉटेलची उंच इमारत पाहून, व पापासाहेबांनीं सांगितलेली तेथील सर्व व्यवस्था ऐकून मंडळींना आश्चर्य वाटलें.

"आमचे मुसलमान दोस्त नेहमीं येथें उतरावयाचे ना. एरवीं

आम्हांला माहीत असण्याचें काय कारण?" पापासाहेबांनीं आपल्या माहितीचें समर्थन केलें.

"एक हॉटेल् म्हणजे एक लहानसें गांवच, नाहीं का? तेथें सगळं कांहीं असावयाचें!" विनू आश्चर्यानें म्हणाला.

"ही इमारत, व ही व्यवस्था कांहींच नाहीं! या इमारतीला फार तर ७।८ मजलेच असतील. अमेरिका खंडांत न्यूयॉर्क् म्हणून जें मुख्य शहर आहे तेथें तर ५०।५० मजल्यांच्याहि कांहीं इमारती आहेत! आणि प्रत्येकींत १ ।१० हजार माणसें राहतात! आणि एवढ्या माणसांना लागणाऱ्या सगळ्या गोष्टी तेथल्या तेथें मिळतात. जन्मभर घरांतून बाहेर पडावयाचें नाहीं असें एखाद्यानें ठरविलें तरीसुद्धां त्याचें चालेल. असें कोणी ठरवीत नाहीं, ती गोष्ट निराळी! उलट अमेरिकन् लोकांना घराबाहेर इतके उद्योग असतात, कीं त्यांना सबंध दिवसांत घरीं यायला देखील फुरसत नसते. रात्रीं मात्र सर्व माणसें कबुतरांसारखीं आपापल्या जागीं जमतात. अशा उद्योगामुळें तर अमेरिकन् लोकांनीं एवढाले शोध लावले आहेत व इतकी संपत्ति मिळविली आहे.' एडिसन्, फोर्ड, वगैरे माणसें केवढीं जबरदस्त बुद्धिमान् व उद्योगी!" बाबूराव अमेरिकेंतील 'स्कायस्क्रेपर'ची व तेथील थोर व्यक्तींची माहिती देण्यांत अगदीं दंग होऊं लागला होता, तोंच "कांहीं कांहीं मोटारींवर 'फोर्ड' लिहिलेलें असतें त्याचा अर्थ काय मामा?" असें विनूनें विचारलें.

"अरे! तोच हा मीं सांगितलेला फोर्ड. आपल्याकडे येणाऱ्या बऱ्याच मोटारी या फोर्डसाहेबानें आपल्या एकट्याच्या कारखान्यांत बनविल्या आहेत; आणि त्यानें तर आतां अशी प्रतिज्ञा केली आहे म्हणतात कीं, या मोटारींचा धंदा इतका वाढवायचा, कीं हल्लीं

मोटारींचा उपयोग फक्त बसण्याकडेच होतो तो शेती करणें. लांकडें कापणें व वाहून नेणें वगैरे कामें करण्याकडेहि करावयाचा! व अशा रीतीनें मनुष्याला हातानें करावयास फारसें कांहीं ठेवावयाचेंच नाहीं." बाबूरावानें विनूच्या शंकेचें समाधान केलें.

"मी म्हणतों तें हेंच! मनुष्य पांगळा बनणार पांगळा, अबासाहेब. त्या भस्मासुरानें आपल्याला वर देऊन ज्यानें शक्ति दिली त्या शंकराच्याच डोक्यावर हात ठेवून त्याला मारण्याचा जसा घाट घातला, तसेंच यंत्रहि एक दिवस आपल्यांत शक्ति उत्पन्न करणाऱ्या मनुष्याच्याच मुळावर येणार बरं! ... पासाहेबांना पुनः गंभीर विचार सुचूं लागले!

"आणि त्या एडिसनूनें काय ...?" विनूनें गाडी पुनः मूळ ठिकाणावर आणिली.

"तें तुला समजणार नाहीं, कारण मलाच सांगतां येणार नाहीं! पण त्यानें ग्रामोफोन्, फोटोग्राफ्, विजेचे दिवे, आपण तारेनें एकमेकांना निरोप पाठवितो तें तारायंत्र, किंवा तारांचा उपयोग न करतांच निरोप कळविण्याची युक्ति, तसेंच काल तूं ऑफिसमध्यें पाहिलास तो टेलिफोन् इत्यादि यंत्रें व शोध एकट्या एडिसन्नें लावले आहेत!" बाबूरावानें समजावून देण्याचे भानगडींत न पडतां थोडक्यांत यादीवजा सांगितलें. मात्र सांगण्याच्या भरांत तारांवांचून निरोप पाठविण्याच्या युक्तीचा शोध इटलीच्या मार्कोनीनें लावला हें बाबूराव विसरला; व त्यानें तोहि शोध एडिसन्चे नांवावरच जमा केला. ही चूक इतर कोणाच्या लक्षांत येणें शक्यच नव्हतें. बाबूरावाच्या या क्षुल्लक चुकीमुळें बिचाऱ्या मार्कोनीला मात्र विनूच्या जगांत थोडीसुद्धां जागा मिळाली नाहीं. क्षुल्लक चुकीचा केवढा हा घोर परिणाम!

सारखें सारखें अमेरिकन् किंवा इंग्रज लोकांच्या गुणांचेंच कौतुक मुलांपुढें होऊं देणें देशाभिमानाचे दृष्टीनें बरें नव्हे, आपल्या हिंदी लोकांचेहि कांहीं गुण त्यांस माहीत असावयास पाहिजेत या भावनेनें अबासाहेब म्हणतात—

"आपल्या हिंदुस्थानांतहि फार मोठे शोधक होऊन गेले, व आतांहि आहेत बरं का विनू. जगदीशचंद्र बोस म्हणून एक बंगाली प्रोफेसर आहेत, त्यांनीं वनस्पतींनाहि मनुष्यासारख्या कांहीं भावना आहेत असें सिद्ध केलें आहे. तसेंच हृदयावरती परिणाम करणाऱ्या वनस्पतींचा शोध लावून, मनुष्याला हरतऱ्हेच्या हृदयविकारांपासून वांचविण्याची त्यांत शक्ति आहे असेंहि त्यांनीं सिद्ध केलें आहे. तसेंच कावाली नांवाच्या एका गुजराथी गृहस्थानें इंग्लंडपासून हिंदुस्थानापर्यंतचा सर्व प्रवास विमानानें केला. केवढें हें धाडस !"

"पण अबा, मास्तर म्हणाले त्याचें विमान मधेंच खालीं येऊन फुटलें !" विनूनें वडिलांना मध्येंच अडविलें.

अबासाहेबांची स्थिति जरा चमत्कारिक झालेली पाहून, बाबूराव दुसरा विषय काढण्याची खटपट करीत होता; परंतु इतक्यांत घर येऊन टॅक्सी थांबल्यामुळें सर्वच प्रश्न आपोआप सुटला. उन्हांतून परत आल्यामुळें सर्वांनाच फार उकडत होतें, व 'चहा का आइस्क्रीम् ?' असा प्रश्न विचाराकरितां पुढें आला असतां, बाबूराव—चहा; बाकी सर्व—आईस्क्रीम; व पापासाहेब—दोन्ही; असा निकाल लागला.

थोड्याच वेळांत चहा व आइस्क्रीम् हीं आलीं, व मंडळी आपापल्या परीनें त्यांचा समाचार घेत घेत गप्पा मारीत बसली.

"काय मेलं त्या कमानीशीं ऊन लागत होतं ? जीव जातो आतां अशी स्थिति झाली." आइस्क्रीमनें आतां थोडें थंड वाटल्या-

मुळें सईताईंना गेट ऑफ इंडिआजवळच्या उन्हाच्या चटक्याची आठवण साहजिकच झाली.

" हा आक्टोबरचा उन्हाळा, सईताई, या दिवसांत सन्स्ट्रोक होऊन माणसं मरतात देखील ! " पापासाहेबांनीं संमतिवजा भाषण केलें.

" आपल्याला नाहीं इतकं ऊन लागलं होडींत " विनूनें सांगितलें.

" न लागायला काय झालं ? आम्ही सांवलींत तरी बसलों होतों, तुमच्या डोक्यावर तर कांहींच छाया नव्हती. लक्ष असेल दुसरीकडे, मग ऊन कशाला लागेल ? " सईताईनीं उत्तर दिलें.

" लक्ष दुसरीकडे होतं हें तर खरंच ताई, पण समुद्रावर जमिनीवरच्यापेक्षां ऊन काय किंवा थंडी काय कमी लागतात हेंहि कांहीं खोटं नाहीं. जमिनीवर ऊन व थंडी दोन्ही फार. उलट समुद्रावर दोन्हींचंहि प्रमाण कमी. आमच्या मुंबईला तुमच्या तळेगांवापेक्षां ऊनहि कमी आणि थंडीहि कमी. कारण, आम्हांला समुद्र जवळ अन् तुम्हांला फार लांब." बाबूरावानें थोडक्यांत समविषम हवेची कल्पना दिली.

" थंडी कमी म्हटलं तर एक वेळ चालेल; कारण थंडींत सुद्धां येथें फारसं पांघरूण लागत नाहीं. पण ऊन कमी असं नाहीं कबूल करायची मी. तरी बरं, जरा बाहेरून यायचं झालं तरी शर्ट घामानं चिंब झालेला असतो म्हणून ! " आपलें म्हणणें सप्रमाण सिद्ध केलें असें वाटून इंदिरामामी विजयी मुद्रेनें पतीकडे पाहून म्हणाल्या.

" घाम येतो तो कांहीं उन्हामुळें नव्हे. त्याचें कारण मुंबईच्या हवेंत वाफेचें प्रमाण जास्त हें. तुमच्या तळेगांवला कांहीं इतका

घाम येत नाहीं. कारण तें समुद्रापासून लांब आहे आणि म्हणून हवेंत वाफेचें प्रमाण कमी आहे." असें सांगून बाबूरावानें ज्ञायकोला गप्प बसविलें.

"बरें, आतां पुरे या हवापाण्याच्या गोष्टी. आजची भाऊबीज आतां झालीच म्हणावयाची. उद्यां सकाळीं ठरल्याप्रमाणें आम्हांला सोडणार ना बाबूराव?" आबासाहेबांनीं हवापाण्याच्या मीमांसे-सारखा रूक्ष विषय बदलण्याचे हेतूनें, व सईताईंना उद्यांच्या बांधा-बांधीची जणूं कांहीं सूचना देण्याच्या निमित्तानें बाबूरावास विचारलें.

"अलबत्! कां नाहीं सोडणार? आणखी ४।५ दिवसांनीं विजेची गाडी थेट पुण्यापर्यंत सुरू होते आहे. पहा तिनें जाणार असल्यास! थोडासा वेळ कमी लागून, धुराबिराचा त्रासहि होणार नाहीं; पण आग्रह मुळींच नाहीं. आपलं नेहमींचंच धोरण असं. एकमेकांनीं एकमेकांना 'या' म्हटलं कीं यावयाच; परंतु 'जातों' म्हटलं कीं आग्रह करावयाचा नाहीं. तुम्हीं पहिलं कबूल केलंत, आम्हांला दुसरं कबूल केलं पाहिजे. लाइफ इज् बिझिनेस् अँड् ए कॉम्प्रमाइज आफ्टर ऑल् अबासाहेब! सर्व व्यवहार कसा चोख आणि तडजोडीचा असला पाहिजे." बाबूरावानें अबासाहेबांस स्पष्ट सांगितलें. बाबूरावाच्या या सरळ धोरणाचें, व विशेषतः आतांच्या त्याच्या त्या सच्च्या मुद्रेचें सर्वांनाच कौतुक वाटलें. लहानसहान साध्या गोष्टींतहि त्याची ही प्रामाणिकपणाची व देवघेवीची वृत्ति दिसून येत असे.

"पण अजून भाऊबीज संपली आहे कोठें? ओवाळायचें आहे म्हटलं अजून!" सोनूनें विनूकडे पाहात ओवाळणीची आठवण करून दिली.

" बासुंदी तरी पोटभर कोठें खाली आहे अजून ? बासुंदी टाका म्हणजे ओवाळणी मिळेल ! " विनूनें हातवारे करीत सोनूला उत्तर दिलें.

" अगदीं बरोबर ! भाचा अगदीं मामासारखा आहे. 'लाइफ् इज् बिझिनेस्.' दिल्याशिवाय मिळत नाहीं, पेरल्याशिवाय उगवत नाहीं. 'नादत्तमुपतिष्ठते' ! " पापासाहेब फार खूष होऊन म्हणाले.. 'लाइफ् इज् बिझिनेस्' या तत्त्वाचा मघाशीं जो अर्थ कळला नव्हता तो पापासाहेबांच्या या भाषणानें कळून सईताईनाहि भावाच्या धोरणाचें व विनूच्या बोलण्याचें कौतुक वाटलें.

ना० म० पटवर्धन
( आमची दिवाळी )

## प्रश्न व सूचना

( १ ) बोटीच्या धक्क्याचें व बोटीचें थोडक्यांत वर्णन करा. ( बोट पाहिली नसल्यास स्टेशनचें व आगगाडीचें वर्णन करा. )

( २ ) तुम्हांला दिपवाळीचे निमित्तानें २५ रुपये दिले आहेत अशी कल्पना करून ती रक्कम कशी खर्च कराल तें सांगा.

( ३ ) थोडक्यांत माहिती द्याः—फोर्ड; एडिसन, रिगेटा, दीपगृह, स्कायस्क्रेपर, ताजमहाल हॉटेल.

# वाङ्मय-माला

पुष्प २ रें

( पद्य-विभाग )

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ......... नं. .........
ता. ..............
ठाणें.

संपादक

प्रो० वा. म. जोशी, एम्, ए.

ना. म. पटवर्धन, एम्. ए., एल्. टी.

१९३३

प्रकाशक
**ना. म. पटवर्धन**, एम्. ए.
प्रिन्सिपाल, अध्यापिकाशाळा,
हिंगणें बुद्रुक पुणें ४.

[ या आवृत्तीचे हक्क पूर्णपणें उभयसंपादकांकडे आहेत. ]

मुद्रक
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु**,
'राजगुरु आणि कंपनीज् प्रेस',
५१३ शनवार पेठ, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
क्रमांक ३६३
ता. २९-१-३४
ठाणें.

# प्रस्तावना

पुढील कवितांचा संग्रह हायस्कुलें व ट्रेनिंग कॉलेजें यांतील विद्यार्थ्यांस उपयोगी पडावा म्हणून केलेला आहे. मोठ्या माणसांना समजणाऱ्या व आवडणाऱ्या कविता त्यांच्या दृष्टीनें किती जरी चांगल्या असल्या तरी विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें त्या चांगल्या असतीलच असें नाहीं, कारण विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक प्रवृत्ति व आवडीनिवडी निराळ्या असतात. त्यांस चमत्कारयुक्त प्रसंग, निरनिराळ्या ठेक्याच्या चाली, नादमाधुर्य, शब्द-चमत्कार, थोडक्यांत चटका लावून सोडणाऱ्या आटपशीर कविता, फार गुंतागुंत नसलेल्या साध्यासुध्या सद्भावनांचा उत्कट व सुबोध परिपोष इत्यादींची विशेष आवड असते; आणि ही दृष्टि पुढें ठेवूनच प्राचीन व अर्वाचीन काव्यांतील योग्य त्या उताऱ्यांचीच निवड केली आहे.

काव्याचे द्वारें ज्ञानवृद्धि किंवा नीत्युपदेश यांचा लाभ झाला तर तो नको आहे असें नाहीं; तथापि आल्हाद देणें व सद्भावनांचा परिपोष करणें हा काव्य शिकविण्याचा प्रधान हेतु आहे हें लक्षांत ठेवून शिक्षकांनीं केवळ शब्दार्थांच्याच दृष्टीनें काव्याची छाननी न करितां त्यांतील सौंदर्यस्थळें दर्शविणें व रसाविष्कार करणें यांकडे अधिक लक्ष द्यावें अशी सूचना आहे.

ज्या ज्या कवींनीं किंवा त्यांच्या आप्तेष्टांनीं आपआपल्या काव्यांतील उतारे घेण्याची परवानगी दिली त्यांचे आम्ही आभारी आहों.

हिंगणें,
विजयादशमी,
२९।९।३३

वा० म० जोशी
ना० म० पटवर्धन

# अनुक्रमणिका

## विभाग २—पद्य


| | मथळा | कवि | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | |
| १ | खरेखोटे साधु | तुकाराम | १ |
| २ | वामनी श्लोक | वामन | ४ |
| ३ | भीम-जरासंधयुद्ध | मुक्तेश्वर | ६ |
| ४ | स्वार्थत्यागाची चढाओढ | मोरोपंत | १२ |
| ५ | केवढें हें क्रौर्य ! | रे० ना. वा. टिळक | १७ |
| ६ | उत्तेजनाचे दोन शब्द | 'केशवसुत' | २० |
| ७ | आम्ही कोण ? | ,, | २१ |
| ८ | बाळ जातो दूर देशा | गोपीनाथ तळवलकर | २२ |
| ९ | राजा भोज | 'विनायक' | २४ |
| १० | चिमणी | ,, | २५ |
| ११ | घन तमीं शुक्र बघ राज्य करी | भा. रा. तांबे | २७ |
| १२ | प्रभात | 'दत्त' | २८ |
| १३ | समसमां संयोग कीं जाहला | 'गोविंदाग्रज' | ३० |
| १४ | आईसाठीं आणलेलें फूल | ह. स. गोखले | ३२ |
| १५ | भ्रान्त तुम्हां कां पडे ? | मा. त्रि. पटवर्धन | ३४ |
| १६ | कादरखां | 'केशवकुमार' | ३६ |
| १७ | खडी फोडणारा | वा. गो. मायदेव | ३८ |
| १९ | कृतज्ञता | 'गिरीश' | ४० |
| २० | झालों जरी स्वतंत्र | ना. के. बेहेरे | ४२ |
| २१ | वंदन तुज मायभूमि | 'यशवन्त' | ४५ |
| २२ | आपली मराठी भाषा | | ४८ |
| २३ | प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा | श्री. कृ. कोल्हटकर | ५१ |

# वाङ्मय-माला (पुष्प २ रें)

## विभाग २—पद्य

### खरेखोटे साधु

[ पुढील सहा अभंग तुकारामबुवांच्या अभंगांतून नमुन्यादाखल निवडले आहेत. तुकारामबुवांचा जन्म केव्हां झाला याबद्दल वाद आहे. १४९०, १५२०, व १५३० हे तीन शक जन्मशक म्हणून दिले जातात. त्यांच्या मृत्युकालासंबंधींहि थोडीशी अनिश्चितता आहे. ते शके १५७१ किंवा १५७२ मध्यें इहलोक सोडून गेले असें म्हणतात. म्हणजे सामान्यपणें तुकाराम, शिवाजी व रामदास या तीन विभूति महाराष्ट्रामध्यें एकेच काळीं सुमारें वीस वर्षें आपापल्या परींनीं कार्य करीत होत्या. तुकारामबोवांच्या अभंगांत निवृत्तिपर व प्रवृत्तिपर असे दोन्ही प्रकारचे अभंग सांपडतील. त्यांनीं केवळ वैराग्यच शिकविलें अशी सर्वसामान्य समजूत आहे तथापि त्यांच्या अभंगांत सांसारिक नीति व व्यवहार यासंबंधींचीहि बरीच शिकवणूक आढळून येते. पुढील अभंगांत खरा साधु कोण, ढोंगी साधु कोण, त्याचप्रमाणें ईश्वरप्राप्ति कशानें होते व कशानें होत नाहीं इत्यादि गोष्टींचें व्यावहारिक दाखले देऊन मोठें मार्मिक विवरण केलें आहे. ]

[ १ ]

आंधळ्यासी जन अवघेचि आंधळे । आपणासी डोळे दृष्टी नाहीं ॥१॥
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासी कारण चवी नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे शुद्ध नाहीं आपण जो । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

[ २ ]

भाव धरी तया तारील पाषाण[१] । दुर्जना सज्जन काय करी ॥ १ ॥
करितां नीट नव्हे श्वानाचें हें पुच्छ । खापरा परीस काय करी ॥२॥

---

१ पाषाणाची मूर्ति.

# अनुक्रमणिका

## विभाग २—पद्य


| | मथळा | कवि | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | |
| १ | खरेखोटे साधु | तुकाराम | १ |
| २ | वामनी श्लोक | वामन | ४ |
| ३ | भीम-जरासंधयुद्ध | मुक्तेश्वर | ६ |
| ४ | स्वार्थत्यागाची चढाओढ | मोरोपंत | १२ |
| ५ | केवढें हें क्रौर्य ! | रे० ना. वा. टिळक | १७ |
| ६ | उत्तेजनाचे दोन शब्द | 'केशवसुत' | २० |
| ७ | आम्ही कोण ? | ,, | २१ |
| ८ | बाळ जातो दूर देशा | गोपीनाथ तळवलकर | २२ |
| ९ | राजा भोज | 'विनायक' | २४ |
| १० | चिमणी | ,, | २५ |
| ११ | घन तमीं शुक्र बघ राज्य करी | भा. रा. तांबे | २७ |
| १२ | प्रभात | 'दत्त' | २८ |
| १३ | समसमां संयोग कीं जाहला | 'गोविंदाग्रज' | ३० |
| १४ | आईसाठीं आणलेलें फूल | ह. स. गोखले | ३२ |
| १५ | भ्रान्त तुम्हां कां पडे ? | मा. त्रि. पटवर्धन | ३४ |
| १६ | कादरखां | 'केशवकुमार' | ३६ |
| १७ | खडी फोडणारा | वा. गो. मायदेव | ३८ |
| १९ | कृतज्ञता | 'गिरीश' | ४० |
| २० | झालों जरी स्वतंत्र | ना. के. बेहेरे | ४२ |
| २१ | वंदन तुज मायभूमि | 'यशवन्त' | ४५ |
| २२ | आपली मराठी भाषा | | ४८ |
| २३ | प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा | श्री. कृ. कोल्हटकर | ५१ |

# वाङ्मय-माला (पुष्प २ रें)

## विभाग २—पद्य

### खरेखोटे साधु

[ पुढील सहा अभंग तुकारामबुवांच्या अभंगांतून नमुन्यादाखल निवडले आहेत. तुकारामबुवांचा जन्म केव्हां झाला याबद्दल वाद आहे. १४९०, १५२०, व १५३० हे तीन शक जन्मशक म्हणून दिले जातात. त्यांच्या मृत्युकालासंबंधींहि थोडीशी अनिश्चितता आहे. ते शके १५७१ किंवा १५७२ मध्यें इहलोक सोडून गेले असें म्हणतात. म्हणजे सामान्यपणें तुकाराम, शिवाजी व रामदास या तीन विभूति महाराष्ट्रामध्यें एकेच काळीं सुमारें वीस वर्षे आपापल्या परींनीं कार्य करीत होत्या. तुकारामबोवांच्या अभंगांत निवृत्तिपर व प्रवृत्तिपर असे दोन्ही प्रकारचे अभंग सांपडतील. त्यांनीं केवळ वैराग्यच शिकविलें अशी सर्वसामान्य समजूत आहे तथापि त्यांच्या अभंगांत सांसारिक नीति व व्यवहार यासंबंधींचीहि बरीच शिकवणूक आढळून येते. पुढील अभंगांत खरा साधु कोण, ढोंगी साधु कोण, त्याचप्रमाणें ईश्वरप्राप्ति कशानें होते व कशानें होत नाहीं इत्यादि गोष्टींचें व्यावहारिक दाखले देऊन मोठें मार्मिक विवरण केलें आहे. ]

[ १ ]

आंधळ्यासी जन अवघेचि आंधळे । आपणासी डोळे दृष्टी नाहीं ॥१॥
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासी कारण चवी नाहीं ॥ २ ॥
तुका म्हणे शुद्ध नाहीं आपण जो । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥ ३ ॥

[ २ ]

भाव धरी तया तारील पाषाण[1] । दुर्जना सज्जन काय करी ॥ १ ॥
करितां नीट नव्हे श्वानाचें हें पुच्छ । खापरा परीस काय करी ॥२॥

---

१ पाषाणाची मूर्ति.

निंबाचियां[1] झाडा साखरेचें आळें । बीज तैसीं फळें येतीं तया ॥३॥
तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खळ तयाहूनी ॥ ४ ॥

[ ३ ]

सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें । भक्षायाला दिलें श्वानालागीं ॥ १ ॥
मुक्ताफळाहार[2] खरासी घातला । कस्तुरी सुकराला चोजविली[3] ॥२॥
वेदपारायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खूण काय जाणे ॥३॥
तुका म्हणे ज्याचें तोचि एक जाणे । भक्तीचें महिमान साधु जाणे॥४॥

[ ४ ]

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥ १ ॥
ज्यासि नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूति[4] लावूं नये ॥२॥
जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥३॥
ज्याचें मन नाहीं लागलें हातासीं । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥४॥
तुका म्हणे ज्यासी नाहीं हरिभक्ती । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥५॥

[ ५ ]

डोई वाढवूनि केश । भुतें आणिती अंगास ॥ १ ॥
तरी ते नव्हती संतजन । तेथें नाहीं आत्मखुण[5] ॥ २ ॥
मेळवूनि नरनारी । शकून सांगती नानापरी ॥ ३ ॥
तुका म्हणे मैंद[6] । नाहीं त्यापाशीं गोविंद ॥ ४ ॥

[ ६ ]

मुखें बोले ब्रह्मज्ञान । मनीं धन-अभिमान ॥ १ ॥
ऐशियाची करितां सेवा । काय सुख होय जीवा ॥ २ ॥
पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥ ३ ॥
विरळा ऐसा कोणी । तुका त्यासी लोटांगणी ॥ ४ ॥

---

१ पाठभेद–काय करिल तया. २ पाठभेद–मुक्ताफळहार. ३ कौतुकानें लाविली. ४ भस्म. ५ आत्मज्ञानाचा प्रत्यय. ६ जड, ढोंगी.

## प्रश्न व सूचना

( १ ) [ अ ] पहिल्या चार अभंगांत यमकें कोठें आहेत, व शेवटल्या दोन अभंगांत कोठें आहेत तें शोधून काढा.

[ आ ] पुच्छ—परीस
ज्ञान—खूण
मिष्टान्न—कारण
जाणे—महिमान

हीं यमकें कानाला बरीं लागतात काय? असलेंच एकादें यमक शोधून काढा.

( २ ) दिलेल्या अभंगांतील तुम्हांला आवडणारे चार दृष्टान्त द्या; व ते त्या त्या संदर्भांत कसे लागू पडतात हें सांगा.

( ३ ) अभंग २ व ३ यांमधील पुढील पाठांपैकीं कोणते पाठ तुम्हांला आवडतात व ते कां आवडतात हें पांच पांच ओळींत सांगा.

| | पाठ | पाठभेद |
|---|---|---|
| [ अ ] | निंबाचिया झाडा साखरेचें आळें<br>बीज तैशीं फळें येतीं तया | काय करिल तया साखरेचें आळें<br>बीजें तसीं फळें येतीं तया |
| [ आ ] | मुक्ताफळाहार खराशीं घातला | मुक्ताफळहार खरासी घातला |

( ४ ) दिलेल्या अभंगांचे आधारें (व वाटल्यास त्यांतील कांहीं चरण उद्धृत करून) एकाद्या ढोंगी साधूचें १०।१५ ओळींत वर्णन करा.

( ५ ) [ अ ] दुर्जनाचें मत बदलणें अतिशय कठिण आहे हें पटवून देण्याकरितां तुकारामानें कोणते दाखले दिले आहेत व ते कसे लागू पडतात हें सांगा. तुम्ही एखादा दाखला देऊं शकाल काय?

[ आ ] सोनियाचे ताट क्षीरीनें भरिलें ।
भक्षायाला दिलें श्वानालागीं ॥

या दाखल्यानें तुकारामबुवांना काय सिद्ध करावयाचें आहे ? मुळांत दिलेल्या दाखल्यांमध्यें तुम्ही एखाद्या दाखल्याची भर घाला.

( ६ ) सज्जनाचा स्वभाव ज्यांत दर्शविला जाईल असे अभंगाचे एक-दोन चरण करण्याचा प्रयत्न करा.

---

## वामनी श्लोक

[ भर्तृहरीनें संस्कृतमध्यें 'नीतिशतक' लिहिलें असून त्याचें समश्लोकी भाषांतर वामनानें मराठींत केलें आहे. हा भाषांतरकार वामन आणि सुप्रसिद्ध वामन पंडित हे एकच आहेत का त्या भिन्न व्यक्ति आहेत याबद्दल विद्वानांत मतभेद आहे, परंतु त्या वादांत शिरण्याचें प्रयोजन नाहीं. नमुन्यादाखल दिलेले खालील श्लोक त्यांतील कल्पना, भाषा व चाली या तिन्ही गुणांनीं वाचनीय व पठनीय आहेत यांत शंका नाहीं. ]

सुनीतिपथ सेवणें मलिन कर्म मानेच ना ।
घडो मरण नावडे खलजनांप्रति प्रार्थना ॥
विपत्तिसमयींहि जो प्रकटवीच ना दीनता ।
भल्याविण असें असिव्रत[1] करूं शके कोणता ॥ १ ॥
झाला क्षीण बहू क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्धकें ।
आली कष्टदशा घडो मरणही कीं तेज गेलें निकें[2]
ऐसाही मृगराज जीर्ण तृण तो भक्षील कीं काय हा
शौर्यें भेदुनि हस्ति-मस्तक शुभ-ग्रासींच ज्याला स्पृहा ॥२॥
ऐकें चातक सावधान करुनी चित्ता सख्या वैखरी[3] ।
आकाशीं असती पयोद बहु तैसे सर्व नाहीं परी ॥
कांहीं वृष्टि करोनि पोषिति धरा कांहीं वृथा गर्जती ।
ज्यां ज्यां पाहसि दीनभाषणिं नको प्रार्थूंच सर्वांप्रती ॥ ३ ॥

---

१ तलवारीच्या धारेवरून चालण्यासारखें कठीण व्रत. २ अगदीं, पूर्णपणें, निःसंशय. (मूळ आरबी शब्द. अर्थ–शुद्ध) ३ वाणी.

तोयाचें परि नांवही न उरतें संतप्त लोहावरी ।
तें भासे नलिनीदलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी ॥
तें स्वातीस्तव अब्धि-शुक्ति-पुटकीं[1] मोतीं घडे नेटकें ।
जाणा उत्तम-मध्यमाधमदशा संसर्गयोगें टिके ॥ ४ ॥

वृक्ष फार लवती फलभारें ।
लोंबती जलद घेउनि नीरें ॥
थोर गर्व न धरी विभवाचा ।
हा स्वभाव उपकार—परांचा ॥ ५ ॥

योजी हिताप्रति निवारुनि पापकर्में ।
वर्णी बरेंच गुण झांकुनिया कुकर्में ।
दे आपणांस असतां व्यसनीं[2] त्यजीना ।
सन्मित्रलक्षण असें वदतात जाणा ॥ ६ ॥

क्षीरानें दिधले स्वकीय गुणही नीरास आत्माश्रयें ।
त्या क्षीरास हुताशनें[3] श्रमवितां तें तोय मेलें स्वयें ॥
झाला ताप विशिष्ट अग्निवदनीं तें दुग्ध जेव्हां पडे ।
तेव्हां धाउनि तोय शीतल करी मित्रत्व हें चोखडें[4] ॥ ७ ॥

खल्वाट[5] चंड-किरणें अति तप्त झाला ।
छायार्थ ताल[6]-तरु-मूल-समीप गेला ॥
तत्काळ थोर पडलें फळ तो निमाला[7] ।
ये जेथ दैव-हत येइल तेथ घाला ॥ ८ ॥

---

१ शुक्ति = शिंप; पुटक = पोकळी. २ संकटांत. ३ अग्नीनें. ४ खरें, शुद्ध, उत्तम. ५ टक्कल पडलेला मनुष्य— टकल्या. ६ ताडाचें झाड. ७ संपला, मेला.

### प्रश्न व सूचना

( १ ) 'आकाशीं असती पयोद बहु तै–से सर्व नाहीं परी' या चरणांत यतिभंग-दोष झाला आहे. सहाव्या श्लोकांतहि असाच दोष झाला आहे तो शोधून काढा.

( २ ) 'सुनीतिपथ सेवणें' या श्लोकांतील उदाहरणें घेऊन प्रास व यमक यांतील फरक सांगा.

( ३ ) 'ऐकें चातक सावधान करुनी' हा श्लोक खरोखर चातकालाच उद्देशून म्हटलेला आहे काय ? नसल्यास कोणाला उद्देशून म्हटलेला आहे ? अन्योक्ति म्हणजे काय ?

( ४ ) पुढील शब्दांचा अर्थ सांगा, व समास असल्यास त्यांचा विग्रह कराः—सुनीतिपथ, सन्मित्रलक्षण, हुताशन, खल्वाट, चंड-किरण, तालतरुमूल, दैवहत.

( ५ ) वामनानें सन्मित्राचें लक्षण ज्यांत दिलेलें आहे तो श्लोक द्या. कुमित्राचें लक्षण गद्यांत ( जमल्यास पद्यांत ) देण्याचा प्रयत्न करा.

( ६ ) 'क्षीरानें दिधले' या श्लोकाचा अर्थ व तात्पर्य सोप्या भाषेंत समजावून सांगा.

( ७ ) 'खल्वाट चंडकिरणें' या श्लोकांत वामनानें एक उदाहरण देऊन दैववादाचें समर्थन केलें आहे; प्रयत्नवादाचें समर्थन करण्याकरितां तुमच्या वाचनांत आलेलें ( किंवा तुमच्या स्वतःचें ) एखादें उदाहरण द्या.

---

## भीमजरासंधयुद्ध

[ मुक्तेश्वरानें (१६०८-१६५९) सबंध महाभारत मराठींत ओंवीवृत्तांत आणिलें असें म्हणतात. परंतु आदि, सभा, वन, विराट व सौप्तिक अशीं अवघीं पांचच पर्वें उपलब्ध आहेत. खालील उतारा सभा-पर्वांतील आहे. यांतील प्रसाद (म्हणजे सुबोधता) व ओज ( म्हणजे जोरदारपणा ) हे गुण, डोळ्यांपुढें चित्र उभें राहील अशा रीतीची वर्णनशैली, त्याचप्रमाणें उपमा-उत्प्रेक्षादि अलंकार या गोष्टी पाहण्यासारख्या आहेत.]

कंसारी संसारगजकेसरी । हांसोनि बोले श्रीकृष्ण शौरी[१]
" पांडुपुत्र हे निर्धारीं । भीमार्जुन जाण पां ॥ १ ॥
मागें अपराध केले क्षमा । लोटली मर्यादेची सीमा
ते कार्याकारणें पुरुषाधमा । शेवटीं फळ भोगीं कां ॥ २ ॥
सरला सुकृताचा तंतु । आयुष्यतैला झाला अंतु
माझिये हस्तीं व्यजनवातु । भीमरूपें उदेला ॥ ३ ॥
असेल वांचावयाची आर्ती[२] । तरी रक्षिल्यां करीं बंधमुक्ती
आम्हां तुम्हां अर्थाअर्थीं । वैरसंबंध असेना ॥ ४ ॥
करीं रायांचें बंधमोचन । कीं युद्धा उठी न लागतां क्षण
यावेगळा विचार आनें[३] । करणें आतां घडेना ॥ ५ ॥
तिघांमाजि जो आवडे । त्यासीच भिडिजे इडेंपाडें[४] "
मागध म्हणे, " मूर्खा ! तोंडें । जल्प करिसी बाचाटा ॥ ६ ॥
तूं बहुरूपी खेळसी सोंगें । कोणतें युद्ध जिंकिलें आंगें
वेडींबागडीं भाविकें भणंगें । तुझें शूरत्व त्यांमाजी ॥ ७ ॥
पार्थ पृथेचें सुकुमार बाळ । शास्त्राभ्यासीं गेला काळ
मजसी अयोग्य, परि अळुमाळ[५] । भीम कांहीं दिसतसे ॥ ८ ॥
तोहि मंद जड आळसी । बहुत आहार निद्रा त्यासी
आयुष्य सरलें म्हणून ऐसी । बुद्धी उदेली तुम्हांतें ॥ ९ ॥
तिघांतें हाणोनि चडकर्णा[६] । क्षणामाजी मेळवीन मरणा
बळें सर्पाचिया सदना । मंडूक वस्ती पावला " ॥ १० ॥
" मंडूक किंवा तिघे गरुड । आतांचि होईल हा निवाड
समय प्राप्त झालिया वाडें[७] । बोल टाकीं माघारा " ॥ ११ ॥

---

१ शूरसेनाचा नातू. २ तीव्र इच्छा. ३ अन्य, दुसरा. ४ ईर्षेनें, नेटानें.
५ किंचित्. ६ चपराक. ७ पुष्कळ, मोठें, अमर्याद.

ऐसें बोलतां चक्रपाणी । उभे ठेले समरांगणीं
जरासंधें राज्यासनीं । अभिषेकिलें सहदेवा[1] ॥ १२ ॥
प्रधानातें निरोपी मुखें । " राज्य रक्षावें अति विवेकें
होणार तें होतसें सुखें । निर्भय सर्वीं असावें " ॥ १३ ॥
सरसावुनी[2] वीरगुंठी[3] । भीम लक्षिला दारुण दृष्टीं
जैसा मदोन्मत्त करटी[4] । सिंहेश्वरें लक्षावा ॥ १४ ॥
भीमा-अंगीं वीरश्रीचा लोटू । धरितां न धरवे अतिउद्भटू[5]
अगस्ती धांवे समुद्र घोटूं[6] । तैसा झगटे पुढारां ॥ १५ ॥
दोघे पिटिती पाणितळें । जानुमूळें बाहुमूळें
मही ताडितां पादतळें । शैलमौळें[7] थरकतीं ॥ १६ ॥
किरीट काढोनी हस्तकीं । केश आंवळिले मस्तकीं
चंड गर्जना करिती मुखीं । काळ कांपे चळचळां ॥ १७ ॥
धांवोनि भीमाची वीरगुंठी । मागधें कवळोनियां मुष्टी
दक्षिण हस्त सूदला[8] कंठीं । काळपाशासारिखा ॥ १८ ॥
दांत खाऊनि करकराटी । गुडघा स्थापिला हृदयपुटीं ।
'सावध' म्हणे कृष्ण जगजेठी । 'बापा ! भीमा बलिष्ठा' ॥१९॥
भीमें भैरवाकार दृष्टी । हृदयीं वोपिली[9] वज्रमुष्टी
सोडवूनि मगरमिठी । झिंजाडोनि लोटिला ॥ २० ॥
तेणें मागुति उठोनि विकळ । पडिला जैसा विशाळ ताळ
पुढती उठोनि उतावीळ । भीम मध्यें कवळिला ॥ २१ ॥

---

१ आपल्या मुलाला. २ सांवरून. ३ वीरांच्या मस्तकावरील केसांची गांठ, झुपका. ४ करट ( गंडस्थळ ) असलेला, हत्ती. ५ पराक्रमी, भव्य. ६ घोंट घेण्यास. ७ शैलांचीं शिखरें. ८ ठेविला. ९ दिली, ठेविली.

दोन्ही कोंपर दोन्ही मुष्टी । चारी आघात वोपिले पृष्ठीं
मागध क्षोभोनी उफराटी । हुमणी[1] हाणी मस्तकीं ॥ २२ ॥

झोंबी सोडवूनी तवकें[2] । मस्तका मस्तकें देती थडके
सहस्रसंख्या लोट भडके[3] । अशुद्धांचे[4] चालती ॥ २३ ॥

हस्त वोढिती तोडावया । पाय कवळती मोडावया
डोळे टोंचिती फोडावया । पाडावया दशनातें ॥ २४ ॥

करप्रहार लत्ताप्रहार । मुष्टिप्रहार मस्तकप्रहार
मोजोनि मारिती शतसहस्र । 'उसनें घे घे' म्हणोनि ॥ २५ ॥

मस्तकीं वाहती करून मोट । भूमीं टाकिती जैसा घट
तळीं पाषाण होती पिष्ट । अंगलोटें दोघांच्या ॥ २६ ॥

व्याघ्रा-ऐसे क्रोधानळीं । झोंबों पाहती कंठनाळीं
सिंहा-ऐसे कुंभस्थळीं । भेदूं म्हणती मस्तकें ॥ २७ ॥

सर्पा-ऐसे फुस्कारती । सिंहा-ऐसे हुंकारती
वृषभा-ऐसे फुंपाटती । उफाळती इसाळें[5] ॥ २८ ॥

मुष्टिघातांचिया ध्वनी । थरथराटें थरके धरणी
वोथंरोनी[6] पाताळफणी । मार्ग पाहे पळावया ॥ २९ ॥

निराहार निरुदक । विसांवा न घेतां पळ एक
तेरा दिवसपर्यंत देख । युद्ध झालें दोघांसी ॥ ३० ॥

कार्तिकाच्या प्रथम दिवशीं । संग्राम मांडला दोघांसी
लोटलिया त्रयोदशी । निशी झाली झुंजतां ॥ ३१ ॥

---

१ ढुसणी. २ आवेशानें. ३ चकाकणारे, लालभडक. ४ रक्ताचे. ५ ईर्षेनें.
६ धावरून.

चतुर्दशीचिया रातीं । मूर्च्छा पावला मागधनृपती
ते वेळीं संकेत दावी हातीं । पांडवातें माधव ॥ ३२ ॥
'पाय कवळोनियां करतळीं । चिरोनी करावीं दोन्ही फळीं
जरेनें सांधिला तो उखळीं । सांधा वेगीं बलिष्ठा ॥ ३३ ॥
यावेगळा उपाय आन । करितां मागध न पावे मरण
आतांचि होऊनि सावधान । युद्ध करील मागुती' ॥ ३४ ॥
ऐसें बोले जंव मुकुंद । तंव सावध झाला जरासंध
धावला जैसा द्विरद मदांध । झगटे विशालद्रुमासीं ॥ ३५ ॥
प्रवर्तला महामारीं[1] । पतंग जैसा वैश्वानरीं
तैसा मुष्टिप्रहारीं । रागें ताडी भीमातें ॥ ३६ ॥
भीमें रगडोनिया दाढा । मध्यभागीं कर्षिला गाढा[2]
माथां वाहोनियां भवंडा[3] । चक्राकार दाविला ॥ ३७ ॥
तेथोनि टाकिला भूतळीं । लात वोपिली वक्षःस्थळीं
वज्रें ताडोनियां मौळी[4] । शक्र भंगी पर्वता ॥ ३८ ॥
तेंवीं पाडोनियां उताणा । वामपादें दक्षिणचरणा
रगडोनि सव्य पाद जाणा । उभयहस्तीं कवळिला ॥ ३९ ॥
आसडोनी[5] बळें उद्भटें[6] । मधें उधडिला तडतडाटें
अशुद्ध-नदीचे खळखळाटे । रंगभूमिके लोटले ॥ ४० ॥

---

१ महामारीं–जिवापाड केलेले श्रम. २ पराक्रमी (विशेषण); किंवा जोरानें, घट्ट, मजबूत रीतीनें (क्रियाविशेषण). ३ भवंडा = फेरा (वा. दा. ओक), मोल्सवर्थ 'भोंवाडा' असा शब्द देतो. या दोन्ही चरणांचा अर्थ–'डोकीवर घेऊन वाटोळा फिरविला' असा दिसतो; परंतु व्याकरणदृष्ट्या पाहतां सर्व शब्दांची संगति चांगलीशी लागत नाहीं. ४ डोकें. ५ हिसके देऊन. ६ पराक्रमी वीरानें. ('बळउद्भटें' असा निर्णयसागरी पाठ).

जडोनि[1] मागुता उठिला झुंजा[2] । देखोनि आश्चर्य अर्जुनाग्रजा
पुढती धरोनी महाराजा । दुभागिलें हस्तकें ॥ ४१ ॥
तिसऱ्यानें देहाकार घडिला । भीम हांसोनी आवेशला
पायीं कवळोनि वहिलें[3] । मस्तकावेन्हीं मागुता ॥ ४२ ॥
शतवार देऊनीयां फेरे । भूमीं त्राहाटिला[4] अंगभारें
चिरोनि सांडिला द्विकरें । दोहींकडे देहुडीं[5] ॥ ४३ ॥
ते न लागती एक शवा । मागध निःशेष मुकला जीवा
झाला भरवंसा पांडवा । आणि माधवा पार्थासी ॥ ४४ ॥
जयजयकार करूनि सकळीं । उभयलोकीं पिटिली टाळी
देवीं वोपिल्या पुष्पांजली । कृष्णभीममस्तकीं ॥ ४५ ॥

मुक्तेश्वर

## प्रश्न व सूचना

( १ ) भीमजरासंधयुद्धाचें मुळांतील जरूर तेवढे शब्द व चरण घेऊन गद्यांत वर्णन करा.

( २ ) 'थरथराटें थरके धरणी,' 'मधें उधडिला तडतडाटें' या शब्दांतील वर्णांचा नाद त्या त्या अर्थाला अनुरूप आहे. असेच दुसरे कांहीं शब्द वरील उताऱ्यांतून शोधून काढा.

( ३ ) [ अ ] खालील शब्दांचा अर्थ स्पष्ट करून सांगाः—

संसारगजकेसरी; पुरुषाधम; हृदयपुट.

---

१ पुनः एक होऊन, जुळून. २ झोजा (= लढेश्वर, अगडबंब) असा खरा पाठ दिसतो. तो न स्वीकारल्यास झुंजा म्हणजे झुंज करणारा योद्धा असा अर्थ केला पाहिजे. ३ चलाखीनें. 'वहिला' याऐवजीं 'वाहिला' असा पाठ सुचवावासा वाटतो. ४ आपटिला. ५ देवडीवर. ( वांकडें असा अर्थ कांहीं लोक करतात ).

[ आ ] अतिउद्धट्ट, यशाभिक्षा हे शब्द संधिनियमांना अनुसरून आहेत काय ?

( ४ ) खालील अलंकारिक भाषेंतील स्वारस्य स्पष्ट करून सांगा:—

[ अ ] सरला सुकृताचा तंतु । आयुष्यतैला झाला अंतु ॥
माझिये हस्तीं व्यजनवातु । भीमरूपें उदेला ॥

[ आ ] बळें सर्पाचिया सदना । मंडूक वस्ती पावला ॥

[ इ ] पाडिला जैसा विशाळ ताळ.

[ ई ] धांवला जैसा द्विरद मदांध । झगटे विशाल द्रुमासी ॥

( ५ ) कृष्ण व जरासंध यांचें युद्धापूर्वीं जें संभाषण झालें तें गद्यांत विस्तार करून सांगा.

---

# स्वार्थत्यागाची चढाओढ

[ " पांडव तापसवेषानें आपली आई कुंती इजसह ब्राह्मणाचे घरीं राहत होते. त्या नगरीस बकराक्षस फार छळीत होता. त्यास रोज पुष्कळसा साळीचा भात, एक बकरा व एक मनुष्य आहारार्थ लागत असे. प्रत्येक कुटुंबावर एकदां त्या राक्षसाची भूक शमविण्याची पाळी येत असे, तेव्हां कुटुंबांतील कोणी तरी एक मनुष्य बळी द्यावा लागे. पांडव ज्या ब्राह्मणाचे घरीं होते त्या ब्राह्मणावर तशी पाळी आली, तेव्हां सर्व कुटुंब मोठ्या दुःखांत पडलें. ब्राह्मण, त्याची भार्या, त्याची उपवर कन्या व तान्हुला मुलगा यांपैकीं कोणीं जावें असा मोठा विचार पडला. अखेर कुंतीच्या आज्ञेवरून भीमसेन ब्राह्मणाच्या वतीनें गेला व बकासुरास मारून ब्राह्मणावरचें व एकंदर नगरीवरचें संकट त्यानें नाहींसें केलें. या मोरोपंती प्रकरणांत आश्रयद ब्राह्मणाचा उपकार फेडण्याची कुंतीची उत्सुकता व पांडवांचें

औदार्य वर्णनीय आहेतच, पण ब्राह्मण, त्याची स्त्री, कन्या व पुत्र यांचा संवाद व अन्योन्यप्रेम फार हृदयद्रावक असें कवींनें वर्णिलें आहे. यांत कौटुंबिक नीति ध्वन्यर्थानें फार चांगल्या तऱ्हेनें दर्शविली आहे."

ल० रा० पांगारकर ]

होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला मुदित
तों कुंती परिसे त्या आश्रयदब्राह्मणालयीं रुदित ॥ १ ॥
भीमासि म्हणे 'रडतो दुःखें सकुटुंब विप्र बापा हे
मज बहु दुःसह झालें आले नेत्रासि अश्रु बा पाहे ॥ २ ॥
आम्ही पक्षी, हें गृह नीडें[1], धरादेव[2] आश्रयागम[3] हा
दुःख हरूनि करावी प्रत्युपकृति, होय हाचि याग महा' ॥३॥
भीम म्हणे 'शोध करीं जा स्वमुखें विप्रनायका पूस
वारीन दुःख सर्वहि, दहना अतिभार काय कापूस ?' ॥ ४ ॥
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासुराकडे मोहें
करितां विलाप बोलत होता निज दुःख तेधवां तो हें ॥ ५ ॥
'जाये ! वदलीस परस्थळगमन विचार सर्वथा राहो
माहेर येथ होतें ओळखिती लोक सर्व थारा हो ॥ ६ ॥
गेलों असतों तरि कां पडतें हें प्राणसंकट प्रमदे
स्वकुटुंबव्यसन[4] जसें देतें न तसें बुधा विष श्रम दे ॥ ७ ॥
जरि दान तुझें द्यावें कांते मज भासतें तसें तरि तें
सिंधूदरीं[5] विकावें स्वहितार्थ तितीर्षुनें[6] जसें तरितें[7] ॥ ८ ॥
पुत्रचि अधिक न कन्या अन्यास गमे, मला न लोभ्याला
नयनयुगांतुनि एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला ॥ ९ ॥

---

१ घरटें. २ भूदेव, ब्राह्मण. ३ अगम = वृक्ष, आधारवृक्ष. ४ संकट. ५ समुद्राच्या मध्यभागीं. ६ तितीर्षु = तरूं इच्छिणारा. ७ तरी = नौका, होडी.

देतों निज वपु परि तूं भीरु कसी साहसील विरहातें
स्वर्गींहि दुःसहचि जें म्हणसील मज स्मरोनि चिर 'हा'! तें॥१०॥
प्राणाचा त्याग बरा तुमचा न बरा कसा न तो पापी
कूपांत बळें अबळा घालुनि ठकवूनि दोर जो कापी' ॥ ११ ॥
तों ब्राह्मणी म्हणे 'हो कवि साधु तुम्ही करूं नका शोक
यन्मूळ 'आपदर्थे' तो शंकरसाचि आठवा श्लोक ॥ १२ ॥
अजि 'आत्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि', श्लोकीं
तेंचि करा हो न बुडों द्या हो मज निजमतीसहि शोकीं ॥ १३
पतिपूर्वी स्त्रीस मरण तें लग्नाहूनि काय हो ऊन
न रहावेंचि सतीनें पळभरहि विरूपकाय होऊन ॥ १४ ॥
रक्षाल तुम्हीच मुलें अबला भावीलि भार जीवा हे
रक्षील कसी अन्या नवपूरीं भीरु फार जी वाहे ॥ १५ ॥
जाईन मीच, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे
दैवें स्त्री म्हणुनि दया येतां मत्प्राण कां न वांचावे ॥ १६ ॥
मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं
ती स्त्री मीच म्हणा जी ! मागें सारूनिया नकारा हूं' ॥ १७॥
ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे 'अयि ते
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते' ॥ १८ ॥
परिसे असें पृथा जों तोंचि म्हणे त्यासि कन्यका 'मातें
द्या द्यायाचीच सुता हे किमपि नयेचि अन्य कामातें ॥ १९ ॥

---

१ तूं मज स्मरोनि चिर जें 'हा!' म्हणशील तें मज स्वर्गींहि दुःसहचि. २ सुज्ञ, शहाणा. ३ ज्याचें मूळ ४ आपदर्थे धनं रक्षेत् दारान् रक्षेत् धनैरपि । आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि ॥ ५ कमी. ६ मानील ७ नूतन उदकाच्या पुरांत. ८ अहो. ९ हे स्त्रिये तूं हें अदय भाषण कसें बोललीस? हे दयिते हा मी तें करण्यास समर्थ आहे काय?

आत्मा पुत्र सखा स्त्री कन्या चिंताचि सर्व काळ जिला
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला ॥ २० ॥

कन्या रक्ष्य तिघांतुनि एका तुज बुध म्हणेल कां ? टाकीं,
बापा काष्ठानेंचि प्राज्ञ सुखें काढितात कांटा कीं' ॥ २१ ॥

ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे तशांत जवळून
खवळूनि उठे बाळक बोले हस्तें तृणासि कवळून ॥ २२ ॥

समजावुनि त्यांसि म्हणे 'ऐसें लात्रिंचरा[1]सि मालीन
कां ललतां आललतां पलतां मी सागलांत तालीन' ॥ २३ ॥

हासविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळशब्दानें
अब्दानें[2] ग्रीष्मदवाकुळबर्हिकुळें जसींच अब्दानें[3] ॥ २४ ॥

तेव्हांचि पृथा देवी भेटे अभयोक्ति जी वदे त्यांतें
संजीवनीच जाणों ती रोगें[4]करुनि जीवदेत्यांतें ॥ २५ ॥

कुंती म्हणे 'दिला तुज एक स्वसुत द्विजा नकोचि रडों
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नको चिरडों' ॥ २६ ॥

विप्र म्हणे 'शिव ! शिव ! पर-घातक जो स्वार्थलुब्ध नर कामी
तो जैसा तैसा या कर्मे पावेन घोर नरका मी' ॥ २७ ॥

कुंती म्हणे 'मदात्मज गुरुवरमंत्रें असे महातेजा
साहों न शकति राक्षस वज्राघातासही सहाते ज्या ॥ २८ ॥

सुरवल्लिं[5]चा नव्हे गा क्षुद्रलतागुच्छकासम स्तबक[6]
स्पष्ट मदात्मजचरणीं अर्पील प्राणधन समस्त बक ॥ २९ ॥

---

१ रात्रिंचर = राक्षस. २ मेघानें. ३ पाण्याच्या दानानें. ४ रोगानें ग्रस्त होऊन. ५ कल्पलता. ६ गुच्छ.

परि हें विप्रवरा त्वां नें प्रकटावें मनींच जिरवावें
विद्यार्थिजनोपद्रव लागेल म्हणोनियां न मिरवावें ॥ ३० ॥
मग विप्रपृथाप्रार्थित भीम धरुनि राक्षसापराध मनीं
कोपे, जाणों दहनाचि तो होय; प्रार्थना तया धमेनीं ॥ ३१ ॥
तें मान्य करुनि मुनिला 'व्हा स्वस्थ' असेंचि तो कवि प्रार्थी
संसारीं वित्तार्थी तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी ॥ ३२ ॥
मारी हरि लीलेनें जेंवि गजा तेंवि पार्थ कुणपाशा
तैं सुर म्हणति 'यमाच्या, गुरु साजति भीमबाहुगुण पाशा'॥३३॥

**मोरोपंत**

( आदिपर्व-अ. ३१ )

## प्रश्न व सूचना

( १ ) ब्राह्मण, त्याची पत्नी व त्यांचीं मुलें हीं आपलाच बळी द्यावा असें सांगत आहेत अशा आशयाचा एक संवाद तयार करा.

( २ ) उताऱ्यांतील तिसऱ्या आर्येतील रूपकांचा भाव विस्तार करून ( १०।१५ ओळींपर्यंत) सांगा.

( ३ ) "हासविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळशब्दानें" असें पंतांनीं म्हटलें आहे. तीं 'तिघेंहि' कां हसलीं, व त्यांना कां हर्ष झाला हें सांगा.

( ४ ) ब्राह्मण म्हणतोः-

"पुत्रचि अधिक न कन्या अन्यास गमे मला न लोभ्याला."

हा आपला भाव स्पष्ट करण्याकरितां त्यानें कोणता दाखला दिला आहे? कांहीं लोकांना कन्येपेक्षां पुत्र अधिक वाटतो तें कां?

( ५ ) [ अ ] १० व्या आर्येतील दुसऱ्या चरणांत 'स्वर्गींहि' असा

---

१ न प्रकटावें = फोडूं नकोस. २ विद्यार्थिजनांचा त्रास. ( राक्षसवधाची गोष्ट जर सर्वश्रुत झाली तर मंत्रविद्या शिकण्याची इच्छा करणाऱ्या लोकांपासून भीमाला उपद्रव होईल). ३ फुंकणी. ४ कुणप = शव, प्रेत; अश = खाणें. प्रेत खाणारा. ५ भीमाचे बाहू हेच दोर.

शब्द आहे त्याबद्दल 'स्वप्नींहि' असा पांगारकरांच्या प्रतींतील पाठ आहे. हा पाठ घेतला असतां अर्थ काय होतो?

[आ] "मग विप्रपृथाप्रार्थित भीम धरुनि राक्षसापराध मनीं" या ओळींत कोणता अलंकार आहे?

(६) या उताऱ्यांत "कौटुंबिक नीति ध्वन्यर्थानें फार चांगल्या तऱ्हेनें दर्शविली आहे" असें पांगारकर म्हणतात. कशी तें सांगा.

(७) [अ] 'अनिष्ठितुं' हे १८ व्या आर्येंत आलेलें रूप चुकीचें असून त्या ऐवजीं 'अनुष्ठातुम्' असें रूप पाहिजे हें संस्कृतच्या विद्यार्थ्यांनीं ध्यानांत धरावें.

[आ] १३ व्या आर्येंतील 'आत्मानं सततं रक्षेत्' याचा अर्थ स्वतःच्या जीवाचें रक्षण करावें असा कांहीं लोक करितात. व त्याप्रमाणें त्या ब्राह्मणस्त्रीनेंहि केला आहे. खरा अर्थ 'केवळ शरीराचें रक्षण' असा नसून 'शरीरापेक्षां उच्च असलेल्या आत्म्याचें रक्षण' असा अर्थ आहे असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे.

---

# केवढें हें क्रौर्य !

[रे० नारायण वामन टिळक (१८६५-१९१०) हे आधुनिक उत्तम कवींपैकीं एक असून त्यांच्या कवितेंत प्रसाद व माधुर्य हे गुण विशेषेंकरून दिसून येतात. फुलांमुलांची आवड, निसर्गाबद्दल प्रेम, खरी ईश्वरनिष्ठा, कौटुंबिक सद्गुणांबद्दल आदर हे त्यांच्या मनाचे विशेष होत. ते जरी ख्रिस्ती झाले होते तथापि महाराष्ट्र व मराठी भाषा यासंबंधींचा त्यांचा ओढा शेवटपर्यंत कायम होता.

हीन-दीन माणसांचींच नव्हे तर पशुपक्ष्यांचीं सुखदुःखें व त्यांच्या भाव-भावना ते कल्पनेनें कसे जाणीत असत व त्यांचें समरसतेनें कसें वर्णन करूं शकत हें पुढील करुणरसपूर्ण कवितेवरून दिसून येईल.]

[ पृथ्वीवृत्त ]

क्षणोक्षणिं पडे, उठे परि बळें, उडे बापडी,
चुके पथहि येउनी स्तिमित[1] दृष्टिला झांपडी;
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी,
तशीच निज कोटरा[2] परत पातली पक्षिणी. ॥ १ ॥
म्हणे निज शिशूंप्रती 'अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतिचा कवळ एक मीं आणिला;
करा मधुर हा ! चला ! भरवितें तुम्हां एकदां
करो जतन यापुढें प्रभुपिता अनाथा सदा ! ॥ २ ॥
अहा ! मधुर गाउनि रमविलें सकाळीं जनां,
कृतघ्न मज मारितील नच ही मना कल्पना !
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुनि घांस झाडावरी
क्षणैक बसलें न तों, शिरत बाण माझ्या उरीं ! ॥ ३ ॥
निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला ! किति दया ! कसा हा नय[3] !
उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला
वधून मज पांखरा निरपराध कीं दुर्बला ! ॥ ४ ॥
म्हणाल भुलली जगा, विसरली प्रियां लेंकरां,
म्हणून अतिसंकटें उडत पातलें मी घरा;
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मजबरोबरीं परि दयाघना ईश्वरा ' ॥ ५ ॥
असो; रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी
म्हणून तरुच्या तळीं निजलि ती द्विजा भूवरीं;

---

१ जाड्य आलेली. २ कोटर = झाडाची पोंकळी, ढोली. ३ नीति.

जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पलें[1]
नरें धरुनि नाशिलें, खचित थोर बुद्धी, बल ! ॥ ६ ॥
मातींत ते पसरले अतिरम्य पंख,
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक !
चंचू तशीच उघडी, पद लांबविले,
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले[2] ! ॥ ७ ॥

**रे० नारायण वामन टिळक**

## प्रश्न व सूचना

( १ ) पक्षिणी बाणानें घायाळ होऊन पडली असतां पारधी तिला धरण्याकरितां आलेला आहे अशी कल्पना करून दोघांमधील संभाषण १५-२० ओळींत द्या.

( २ ) पशुपक्ष्यांना नाहक मारणें कसें क्रूरपणाचें आहे हें या किंवा दुसऱ्या एखाद्या गोष्टीचे आधारें थोडक्यांत सांगा.

( ३ ) [ अ ] पुढील शब्दांवर व्याकरणविषयक टीपा द्याः—
कृतघ्न, निरपराध, दयाघन, निष्कलंक.
[ आ ] 'उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला' या चरणांत मनुष्य खरोखरच 'उदार बहु शूर' आहे असें म्हणावयाचें आहे काय ?

उपरोधिक भाषण म्हणजे काय? याच कवितेंतील उपरोधाचीं दोन उदाहरणें देऊन त्यांचा अर्थ स्पष्ट करा.

[ इ ] 'किती घळघळां गळे', तसेंच 'परत पातली पक्षिणी' यांतील शब्दालंकार ओळखा. याच अलंकाराचें या कवितेंतील दुसरें एखादें उदाहरण द्या.

---

१ कमल. २ संपले, बंद झाले.

# उत्तेजनाचे दोन शब्द

[ कृष्णाजी केशव दामले ऊर्फ 'केशवसुत' ( १८६६ ते १९०५ ) हे रेव्हरंड टिळकांप्रमाणेंच आधुनिक कवींमध्यें अग्रेसर मानले जातात. त्यांची भाषा जरी खडबडीत असली व रचनेंतहि कांहीं दोष असला तरी तिच्यांत एक प्रकारचा जोर आहे. त्यांच्या विचारांत जोम व तडफ असून ते जुन्या समजुतींना धक्का देणारे व समाजाला नवीन वळण लावूं पाहणारे असे आहेत.

पहिल्या कवितेंत उद्योगाचें व निर्धाराचें महत्त्व सांगितलें असून दुसऱ्या कवितेंत त्यांचा आत्मविश्वास व कवीच्या कर्तृत्वाविषयींची उच्च कल्पना हीं दिसून येतात. ]

जोर मनगटांतला पुरा घाल घाल खर्ची;
हाण टोमणा, चळ न जरा अचुक मार बर्ची ! १

दे टोले जोंवरी असे तप्त लाल लोखंड;
येइल आकारास कसें झाल्यावर तें थंड ? २

उंच घाट हा चढूनियां जाणें अवघड फार;
परि धीर मनीं धरूनियां न हो कधीं बेजार ! ३

यत्न निश्चयें करुनी तूं पाउल चढतें ठेव;
मग शिखराला पोंचुनि तूं दिसशिल जगासि देव ! ४

ढळूं कधींही देउं नको हृदयाचा निर्धार;
मग भय तुजला मुळीं नको, सिद्धि खास येणार ! ५

झटणें हें या जगण्याचें तत्त्व मनीं तूं जाण;
म्हणून उद्यम सोडुं नको जोंवरि देहीं प्राण ! ६

केशवसुत

### प्रश्न व सूचना

( १ ) [ अ ] 'दे टोले जोंवरी असे । तप्त लाल लोखंड' यांतील कल्पनेचा विस्तार करा. ( याच अर्थाची एखादी इंग्रजी म्हण ठाऊक असल्यास सांगा.)

[ आ ] केशवसुत 'अचुक मार बर्ची' असें म्हणतात. बर्ची कोणास मारायाची व कशी मारावयाची हें स्पष्ट करून सांगा.

( २ ) [ अ ] 'येइल आकारास कसें' यांत छंदाच्या दृष्टीनें कांहीं दोष दिसतो काय? असाच आणखी एकादा सदोष चरण या कवितेंत असल्यास दाखवा.

[ आ ] शेवटची कविता व पूर्वींच्या कविता यांत यमकदृष्ट्या कांहीं निराळेपणा दिसतो काय ?

---

## आम्ही कोण ?

### [ श्लोक ]

आम्ही कोण म्हणून काय पुससी? —आम्ही असूं लाडके—
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वीं या प्रतिभावलें विचरतों चोहींकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

सारेही बडिवार येथिल पहा ! आम्हांपुढें ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया—
सौन्दर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें!

शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें ?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटतीं आणावया कोण ते ?

ते आम्हीच; सुधा कृतींमधुनियां ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य[1], मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें ! १२
आम्हांला वगळा—गतप्रभ[2] झणीं होतील तारांगणें;
आम्हांला वगळा—विकेल कवडीमोलावरी हें जिणें ! १४

केशवसुत

### प्रश्न व सूचना

( १ ) [ अ ] कवींना वगळलें असतां जिणें कवडीमोल होईल असें केशवसुत म्हणतात; कसें तें १० ओळींत सांगा.

[ आ ] कवि हे देवाचे लाडके आहेत असें केशवसुत समजतात; कां तें १० ओळींत सांगा.

( २ ) 'आम्ही कोण ?' या कवितेंत यमकें कोणत्या कोणत्या चरणांत साधलीं आहेत, तसेंच शेवटीं पुरा श्लोक न देतां श्लोकार्धच दिला आहे या गोष्टी विद्यार्थ्यांनीं लक्षांत घेण्यासारख्या आहेत.

( ३ ) रा० प्र. के. अत्रे यांचा कवींसंबंधींचा गद्यविभागांतील उतारा व केशवसुतांची 'आम्ही कोण' ही कविता यांचे आधारें कवि व सामान्य लोक यांमधील फरक १५-२० ओळींत सांगा.

---

## बाळ जातो दूर देशा

[ मुलगा दूरदेशीं जाण्यास निघाला आहे, फार दिवस त्याची गांठ पडणार नाहीं, वय लहान, इत्यादि गोष्टींचा विचार मनांत येऊन त्याच्या आईच्या प्रेमळ मनाची कशी अवस्था होत आहे याचें पुढील कवितेंत सोप्या व सुंदर भाषेंत हुबेहुब वर्णन केलें आहे.]

बाळ जातो दूर देशा मन गेलें वेडावून
आज सकाळपासून ॥
हात लागेना कामाला वृत्ति होय वेड्यावाणी
डोळ्याचें ना खळे पाणी ॥

---

१ शरणजाण्यास योग्य. २ निस्तेज.

आणा दूध जिन्सा नव्या, आणा ताजा भाजीपाला
माझ्या लाडक्या लेकाला ॥
त्याच्या आवडीचे चार करूं पदार्थ सुंदर
कांहीं देऊं बरोबर ॥
त्याचें बघा ठेविलें का नीट सामान बांधून
कांहीं राहील मागून ॥
नको जाऊं आतां बाळा कुणा बाहेर भेटाया
किती शिणविसी काया ॥
वाऱ्यासारखी धावते वेळ भराभरा कशी
गाडी थांबेल दाराशीं ॥
पत्र धाड वेळोवेळीं, जप आपुल्या जीवास
नाहीं मायेचें माणूस ॥
उंच भरारि घेउन घार हिण्डते आकाशीं
तिचें चित्त पिलापाशीं ॥
बाळा, तुझ्याकडे माझा जीव तसाच लागेल
स्वप्नीं तुलाच पाहील ॥
बाळ जातो दूर देशा देवा ! येऊन ऊमाळा
लावी पदर डोळ्याला. ॥

**गोपीनाथ तळवलकर**
( दूर्वांकुर )

## प्रश्न व सूचना

( १ ) एखादा मुलगा (किंवा मुलगी) विद्याभ्यासाकरितां परगांवीं जाण्यास निघाला आहे अशी कल्पना करून त्या प्रसंगाचें वर्णन करा.

( २ ) या पद्यांत असलेल्या उपमांचीं व अनुप्रासांचीं उदाहरणें द्या.

# राजा भोज

[ 'विनायक' ऊर्फ विनायक जनार्दन करंदीकर (१८७२ ते १९०९) यांच्या 'राजा भोज' या कवितेंत इंग्लिशमधील Abu Ben Adhem या कवितेंतील जनसेवेचें महत्त्व दर्शविणारी कल्पना घेतली आहे.]

स्वप्नीं गाढ निमग्न भोज असतां ये जागृती त्याजला,
पाहे सुंदर मंदिरांत भरली चंद्रप्रभा सोज्वला;
जैशी कुंदलता फुलून खुलते तें स्थान शोभे तसें,
योगी तेथ कुणी लिहीत बसला भोजास तेव्हां दिसे. १

'सोन्याच्या नव पुस्तकांत लिहितां योगींद्र, हें कायसें?'
राजा धीर धरून नम्र वचनें त्याला विचारी असें;
'ज्यांचा भाव अखंड ईशचरणीं नांवें तयांचीं मुला !'
प्रेमें सद्वचनें, प्रसन्न वदनें योगी असें बोलला. २

'आहे ना मम नाम संत पुरुषा ! मालेंत त्या गोंविलें?'
प्रश्ना उत्तर या प्रशांत मुनिनें राजा नकारीं दिलें;
'माझें नांव नसो तयांत नसलें, जे प्राणिमात्रावरी,—
सुप्रेमा करिती तयांतचि मला द्या स्थान कोठें तरी.' ३

भोजाचें पुरवून ईप्सितें[1] मुनी तो होय अंतर्हित,
रात्रीं तो दुसऱ्या पुनः प्रकटला, भोजा करी जागृत;
यादी त्याजवळी कृपा प्रभुवरें केली तयांची असे,
तीमध्यें पहिलें स्वनाम नवलें त्या रेखलेलें दिसे ! ४

विनायक

१ इच्छिलेली गोष्ट. २ गुप्त.

### प्रश्न व सूचना

( १ ) 'राजा भोज' या कवितेंतील गोष्ट देऊन तींतील मूलभूत कल्पनेचा विस्तार करा.

( २ ) 'जनसेवा का ईश्वरसेवा ?' या विषयावर २५ ओळींपर्यंत एक संभाषण तयार करा.

---

## चिमणी

[ 'विनायकां'च्या पुढील कवितेंत आरशांत आपलें प्रतिबिंब पाहणाऱ्या एका चिमणीच्या गोष्टीच्या आधारें माणसानें जगांत कसें वागावें यासंबंधीं एक सुंदर तत्त्व सांगितलें आहे.]

[ चाल—धिन्ना धिन्नक धिन्ना धी. ]

बेफिकीर साधी भोळी ओसरींत चिमणी आली;
टिपावया लागे दाणे गुंगत 'ची ची ची' गाणें ॥ १ ॥
सहज आरसा एक तिला बागडतां दृष्टीं पडला;
उडत तयासन्निध गेली, उभी तेथ विस्मित ठेली. ॥ २ ॥
ती चंचलता मूर्तिमती, परी तिची कुंठली गती;
स्वप्रातिबिंबित रूपानें तिची लया नेलीं भानें. ॥ ३ ॥
भाग आपला ते दाणे टिपावयाच्या हेतूनें;
आली वाटुनि ही दुसरी चढे तिच्या संताप शिरीं. ॥ ४ ॥
मारुनि चोंचीचे घाव करूं सवतिचा पाडाव;
या आवेशें ती भोळी उडी आरशावर घाली. ॥ ५ ॥
चोंच दुखावें, रक्त निघे, वेडी परि माघार न घे;
पुनः पुनः आरशावरी चंचुपुटाचे वार करी. ॥ ६ ॥
श्रमली, ओशाळली मनीं, आले अश्रु तिच्या नयनीं;
सौम्यपणें दर्पण पाही, बिंब त्याच रूपा लाही. ॥ ७॥

द्वेष ओसरे, प्रेम भरे,
वैरी तोचि स्नेहि ठरे!
चुंबी आलिंगी सखिला,
होई तेंच प्राप्त तिला. ॥ ८ ॥
अजाण तें पांखरूं असें
फसे यांत आश्चर्य नसे;
आम्ही ज्ञानी सुज्ञ गडी
तसेचि चुकतों घडीं घडीं !॥९॥
दिव्य आरसा जगताचा
ईश्वर-निर्मित नवलाचा;
सदैव आम्हांपुढें उभा
दावी सत्यप्रतिबिंबा. ॥ १० ॥
हासूं आम्ही जगा तसें
करील जग आमुचें हसें;
करितां जगताची कींव,
देइल तें जीवा जीव ! ॥ ११ ॥
लोभाचें फल लोभ मिळे
द्वेषानें सद्भाव जळे;
जसें गावया पढवावें
तसे बोल गाती रावे. ॥ १२ ॥
कळून हें आम्हां सगळें
मूढभाव मतिचा न गळे;
करून जातों भलतेंच,
पदोपदीं खातों ठेंच ! ॥ १३ ॥

विनायक

## प्रश्न व सूचना

( १ ) पुढील चरणांचा अर्थ सांगा:—

[ अ ] ती चंचलता मूर्तिमती,
परी तिची कुंठली गती ।

[ आ ] दिव्य आरसा जगताचा
ईश्वरनिर्मित नवलाचा

( २ ) 'आम्ही ज्ञानी सुज्ञ गडी, तसेचि चुकतों घडीं घडीं.' चिमणीसारखे आपण कसे चुकतों हें १५–२० ओळींत सांगा.

# घन तमीं शुक्र बघ राज्य करी !

[ मोठी आपत्ति आल्यामुळें खिन्न झालेल्या मनाला कवि तांबे यांची पुढील कविता स्फूर्तिदायक होईल. तिची चाल तिच्यांतील अर्थाला साजेशीच आहे.]

घन तमीं शुक्र बघ राज्य करी !
रे खिन्न मना ! बघ जरा तरी ! ॥ध्रु०॥

ये बाहेरीं अंडें फोडुनिं
शुद्ध मोकळ्या वातावरणीं
कां गुदमरसी आंतच कुढुनी !
रे ! मार भरारी जरा वरी ! ॥ घन० ॥ १

प्रसवे अवस सुवर्णा अरुणा !
उषा प्रसवते अनंतकिरणा !
पहा कशी ही वाहे करुणा !
कां बागुल तूं रचितोस घरीं ? ॥ घन० ॥ २

फूल हंसे कांटचांत बघ कसें !
काळ्या ढगिं बघ तेज रसरसे !
तीव्र हिमांतरिं वसंतहि हसे !
रे ! उघड नयन ! कळ पळे दुरी ! ॥ घन० ॥ ३

फूल गळे ! फळ गोड जाहलें !
बीज नुरे ! डौलांत तरु डुले !
तेल जळे ! बघ जोत पाजळे !
का मरणिं अमरता ही न खरी ? ॥ घन० ॥ ४

भा० रा० तांबे

### प्रश्न व सूचना

( १ ) 'तेल जळे । वध जोत पाजळे' या दाखल्यानें कोणती गोष्ट नजरेस आणावयाची आहे? असेच दाखले ( याच कवितेंतील व दुसरे ) द्या.

( २ ) खालील चरणांतील कल्पना स्पष्ट कराः—

[ अ ] ये बाहेरीं अंडें फोडुनि
[ आ ] कां बागुल तूं रचितोस घरीं ?
[ इ ] का मरणिं अमरता ही न खरी ?

( ३ ) अलंकार व वृत्त या दृष्टींनीं खालील ओळींतील गुणदोष सांगाः—

[ अ ] रे मार भरारी जरा वरी
[ आ ] फूल हंसे कांट्यांत बघ कसें ?

---

## प्रभात

[ दत्तात्रय कोंडो घाटे ऊर्फ 'दत्त' (१८७५-१८९९) यांच्या 'प्रभात' या काव्यांत नादमाधुर्य, कल्पनाविलास व विचारपावित्र्य यांचा सुंदर विलास झालेला दृष्टीस पडेल.]

[ चाल—घनश्याम सुंदरा० ]

प्रभात झाला रवी उदेला ऊठ उशिर झाला;
प्रेमळ भावें सरळ मनानें वंदिं जगत्पाला. ॥ १ ॥
दहिंवर पडलें मौक्तिकवृष्टी जणुं भूवर झाली;
प्रेमरंगरंगित ही स्मितमुखि पूर्व दिशा खुलली. ॥ २ ॥
मंदमंद मधुगंधि समीरण येती भेटाया;
अलिंगुनि सांगती काळ हा दवडुं नको वांया ॥ ३ ॥
हास्यवदन ही सुमनमंडळी उठुनि उषःकालीं
दहिंवरतोयें जणुं का प्रातःस्नान करित बसली ॥ ४ ॥

प्रसन्नवदना वनलक्ष्मी ही शुचिर्भूत दिसते;
नानाविध नवपल्लव वाहुनि देवपुजा करिते ॥ ५ ॥
तरुवर उठले, प्रफुल्ल झाले, आनंदें डुलतीं;
तन्मय होउनि मानसपूजा जणुं का हे करिती ॥ ६ ॥
विहंग उठले गाउं लागले तरुवरि केव्हांचे;
मंजुळ वाणी ऐक जणूं हे गायक स्वर्गीचे ॥ ७ ॥
गगनविहारी खग वैतालिक[1] वायूवरि बसुनी
प्रभुगुण गाती उंच अंबरीं तल्लिन होऊनी. ॥ ८ ॥
खळखळ वाहत लगबग येती तटिनी गिरिवरुनी
देव-दर्शना जणूं चालल्या भाविक या तरुणी ॥ ९ ॥
तरुवसनावृत तुंग पुरातन पर्वत हे दिसती;
वल्कलधारी आद्यऋषी जणुं ध्यान धरुनि बसती ॥ १० ॥
जिकडे तिकडे मंगलमय हें भूमंडल दिसतें;
ऊठ मानवा ! आळविं प्रभुला जाइं शरण त्यातें ॥ ११ ॥

दत्त

**प्रश्न व सूचना**

( १ ) दहिंवर, पक्षी, नद्या, पर्वत यांसंबंधीं कवीनें केलेल्या उत्प्रेक्षा (कल्पना) द्या. या उत्प्रेक्षांत तुम्ही स्वतःची भर घालण्याचा प्रयत्न करा.

( २ ) प्रातःकाळाचें किंवा सायंकाळाचें २०-२५ ओळींत वर्णन करा.

...ठी ग्रंथ संग्रहालय
ना.... ...ं.

१ भाट.

# समसमां संयोग कीं जाहला

[ रा. राम गणेश गडकरी (१८८५-१९१९) यांच्या पुढील कवितेंत कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या एका अन्योक्तींतील सुप्रसिद्ध चरणार्ध घेतलेला आहे. परंतु दोहोंतील हेतु व कल्पना अगदीं भिन्न आहेत. ज्यांत भावनेचा जिवंतपणा नाहीं अशी कविता ग्रामोफोनमधील गाण्याप्रमाणेंच आहे अशी कल्पना कवीनें केली आहे. ]

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी,
गंधें युक्त फुलें फळेंहि असतीं ज्याचीं सुधेच्या परी,
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे मुखींचें, भला
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला !
( कृष्णशास्त्री चिपळूणकर )

संध्याकाळ सदा उदास करितो माझ्या अभागी मना
त्यानें हर्षति जीवमात्र, परि तो मातेंच दे यातना
नित्याचा क्रम एक हा ठरविला कीं काळ जायाप्रती
कोठेंही तरि शून्यवृत्ति फिरुनी येणें घरा मागुतीं ॥ १ ॥
येतां एक दिनीं असेंच, दिसली वेली कुठेंशी मला
होतीं कांहिं फुलें तिच्यावर-मना आनंद तैं वाटला
घ्यावीं काढुनि दोन तीन म्हणुनी जों जीव माझा भुले
वारा वाहुनियां जरा—भरभरां सारीं उडालीं फुलें ॥ २ ॥
वेलीचीं नव्हतीं फुलें तिजवरीं होतीं कुणीं टाकिलीं
( प्रेमाचे शुकपाठ बोलत नटी तें आठवे त्या स्थलीं )
कांहीं त्यांतुनि घेतलीं उचलुनी, चालावया लागलों
"याचें काय करूं" विचार करितां हा मी परी भागलों॥३॥
कोणी मित्र मला पुढें भटकतां वाटेमधें भेटला
प्रेमें ओढुनियां स्वकीय सदनीं तो शीघ्र नेई मला

माझें स्वगत तो करी बहुपरी खेदास न्याया लया
ग्रामोफोनहि लाविला; रिझवि तें गाणें मना माझिया ॥४॥
त्या गाण्यांतिल शब्दसंघ पडला होता मनासारखा
गाणाराहि गळा किती मधुर तो लोकींच या पारखा
अर्थानें तर वेड लागत मना; उत्कर्ष झाला रसा
नाहीं एकच तेवढें हृदय तें; हा खेळ दैवा ! कसा ॥ ५ ॥

ग्रामोफोनवरी तेव्हां संतोषें जीव हर्षतां
फुलें तीं टाकुनी होई "गोविंदाग्रज" चालता ॥६॥

**गोविंदाग्रज**
( वाग्वैजयंती )

**प्रश्न व सूचना**

( १ ) वेलीवरील उसनीं फुलें गोविंदाग्रजांनीं ग्रामोफोनला वाहिलीं यांतील स्वारस्य स्पष्ट करून सांगा.

( २ ) [ अ ] 'समसमां संयोग कीं जाहला' या चरणार्धाचा उपयोग कृष्णशास्त्री चिपळूणकर व गडकरी यांनीं कसाकसा केला आहे हें सांगा.

[ आ ] या चरणार्धाचा उपयोग उचित रीतीनें करतां येईल अशी स्वतःची एखादी कल्पना गद्यांत किंवा पद्यांत द्या.

# आईसाठीं आणलेलें फूल

[ इतर आयांप्रमाणें आपल्या आईनेंहि डोकींत फूल घालावें म्हणून एका लहान मुलानें मोठ्या प्रेमानें बागेंतून फूल आणून तिला दिलें हा प्रसंग वर्णन करून त्या प्रसंगीं त्या विधवा मातेला काय वाटलें हें रा० ह. स. गोखले यांनीं पुढील कवितेंत सहृदयतेनें ध्वनित केलें आहे. ]

श्रवणिं ठेवुनि नव पुष्प छानदार
करी स्वच्छंदें उपवनीं विहार
विहरतांना तोडून फूल एक
बाळ माघारा परतला सवेग ॥ १ ॥

परी करिंचें सुम जपुन ठेवियेलें
नाहिं त्यानें वर करुनि हुंगियेलें
नाहिं चुरिलें पाडिलें पथें येतां
कशासाठीं तो असें जपत होता ? ॥ २ ॥

पडे दारीं पाऊल तोंच ऐका
'आई! आई!' मारितो गोड हांका
शोध करितां धुंडुनी सदन सर्व
धाव घेई परिसतां शब्द 'धांव' ॥ ३ ॥

'रामराया धांव'[1] हें गोड गाणें
गात आई तुळशिशीं असें जाणे
येइ तेथें हळु पद न वाजवीलें
जननिनयनींचे अश्रु देखियेले ॥ ४ ॥

---

१ 'धांव रे रामराया' हें रामदासांचें पद.

अशीं गाणीं बसुनियां नित्य येथें
माय अपुली सुस्वरें नित्य गाते
तदा अश्रुसरी नयनिं तिच्या येते
असें त्यातें ठाऊकें पुरें होतें ॥ ५ ॥
गीत आईचें म्हणुनि जसें झालें
अश्रु पदरानें पुसुनि जसे गेले
तसा निकटीं येऊन बाळ बोले
'तुला आई मीं फूल आणियेलें' ॥ ६ ॥
'किती सुंदर टवटवित पहा आहे
घाल अपुल्या डोक्यांत आज तूं हें
तूंच घालित नाहींस कां कधींही ?
माधवाची घालिते रोज आई !' ॥ ७ ॥
सहज ऐकुनि उद्गार बालकाचे
पाणि झालें त्या मातृमानसाचें
कंठ दाटुनि तन्नयन भरुनि आले
तदा अवघड बहु बालकास झालें ॥ ८ ॥
विगत सौख्याचें स्मरण तिला झालें
अधिक तों तों तद्हृदय भरुनि आलें
वदलि नाहीं परि एकही वचासी
मात्र धरिलें लाडक्या निज उराशीं ! ॥ ९ ॥

हरि सखाराम गोखले
( कांहीं तरी )

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. ... नं. ...
ता. ...
ठाणे.

### प्रश्न व सूचना

( १ ) मुलाचें बोलणें ऐकून आईच्या हृदयाचें पाणी कां झालें ? तिच्या मनांत कश्या प्रकारच्या आठवणी किंवा कशा प्रकारचे विचार आले असतील ?

( २ ) मुलाचे डोळे कां भरून आले ? त्याला अवघड काय झालें ?

---

## भ्रान्त तुम्हां कां पडे ?

[ हिंदी लोकांवर निराशेची छाया पडलेली पाहून माधव त्रिंबक पटवर्धन यांनीं त्याना उत्तेजन देण्याकरितां, त्यांचा उत्साह वाढविण्याकरितां, व त्यांना कर्तव्याची दिशा दाखविण्याकरितां पुढील गझ्झल रचला आहे आणि तो खरोखरच स्फूर्तिदायक आहे. श्री अे वगैरे अक्षरें पटवर्धन लिहितात त्याप्रमाणें छापलीं आहेत. ]

हिन्दपुत्रांनो, स्वतांला लेखितां कां बापडे ?
भ्रान्त तुम्हां कां पडे ?
वाघिणीचें दूध प्यालां, वाघबच्चे फाकडे. भ्रान्त०

हिन्दभू वीरप्रसू जी वैभवाला पावली
कां अता खालावली ?
धन्यता द्याया कुशीला अङ्ग झाडा, व्हा खडे भ्रान्त०

पूर्वजांची थोरवी लाभे पुन्हा बोलून का ?
झिङ्गुनी डोलूं नका;
लक्ष्य द्या चौंहीकडे, द्या कालवैशिष्ट्याकडे ! भ्रान्त०

श्रेष्ठता जन्मेंच कां ये ? जातिदर्पाला त्यजा,
हिन्दुतेला या भजा
नेमका कां भेद भासे ? साम्य सारें कां दडे ? भ्रान्त०

कर्मयोगीं अेक व्हा रे, नायकी वा पायकी
दावुनि या लायकी;
खानदानींतील नादाना, करीं घे फावडें. भ्रान्त०
अेकनाथाची कशी आम्हांस होअी विस्मृती
जो दया मानी स्मृति,
जो कडे घे अन्त्यजाचें पोर तान्हें शेम्बडें ! भ्रान्त०
पोट जाळायास देव्हारे पुजारी माजवी,
अीश्वराला लाजवी,
चूड घ्या अन् चेतवा हें रूढ धर्माचें मढें ! भ्रान्त०
अिच्छितां स्वातन्त्र्य, द्या स्वातन्त्र्य हें अन्यासही,
का न कोणा आस ही ?
कां गुलामांचे तुम्हां सुल्तान होणें आवडे ? भ्रान्त०
कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला,
थाम्बला तो सम्पला !
धावत्याला शक्ति येअी आणि रस्ता सापडे. भ्रान्त०

× × ×

हिन्द-पुत्रांनो, हिताचें तें तुम्ही हातीं धरा
अेरव्ही माफी करा.
शब्द माझे बोबडे अन् ज्ञान माझें तोकडें
चित्त माझें भाबडें.

माधव त्रिम्बक पटवर्धन

## प्रश्न व सूचना

( १ ) एकनाथ व 'अंत्यजाचें पोर' यांची गोष्ट अगदीं थोडक्यांत सांगून तिचा तात्पयार्थ सांगा.

( २ ) [ अ ] वरील गझ्झलांतील यतिभंगाचीं ४ उदाहरणें शोधून काढा.
[ आ ] यतिभंगाचे दोष असूनहि ही कविता कांहीं लोकांना आवडते याचीं कारणें सांगा.

( ३ ) खालील ओळींतील कल्पनांचा विस्तार कराः—
[अ] वाघिणीचें दूध प्यालां,वाघबच्चे फाकडे। होतसां कां भेकडे?
[आ] खानदानींतील नादाना, करीं घे फावडें !
[ इ ] कायदा पाळा गतीचा काळ मागे लागला। थाम्बला तो सम्पला.

( ४ ) हिन्दपुत्रांनीं, आतां यापुढें कसें वागावें याबद्दल पटवर्धनांनीं 'भ्रान्त तुम्हां कां पडे ?' या कवितेंत काय सांगितलें आहे ?

---

## कादरखां

[ पठाण म्हटला म्हणजे सर्व साधारण लोकांचे मनांत कोणत्या प्रकारची मूर्ति उभी राहते, कोणत्या आठवणी होतात, कोणते विचार मनांत येतात व कोणत्या भावना जागृत होतात याचें रा० प्रल्हाद केशव अत्रे उर्फ 'केशव-कुमार' यांनीं पुढील कवितेंत दिग्दर्शन केलें आहे. या कवितेची चाल शोकाला किंवा विलापाला अनुरूप आहे; पण आंतील मजकूर मात्र विनोदी स्वरूपाचा आहे. या कवितेंत 'कादरखां' किंवा पठाणलोक यांची चेष्टा करणें हा अभिप्राय नसून मौजेचें वर्णन करून क्षणभर हास्य-विनोद उत्पन्न करणें येवढाच हेतु आहे. हें काव्य वाचीत असतां कवि 'माधव' यांनीं लिहिलेल्या "हा कोण इथें पडलेला ? । गोकलखां लढनेवाला ! ॥" असा आरंभ असलेल्या 'गोकलखां' नांवाच्या काव्याची आठवण होते. किंबहुना या काव्याचें विकृतानुकरण (Parody) प्रस्तुत काव्यांत आहे असें कांहीं ठिकाणीं वाटतें. ]

हा कोण इथें पडलेला । 'कादरखां काबुलवाला' ॥ध्रु० ॥
चिप्पाड देह हा अडवा । पसरला सहा अन् फूट !
पालथे पलिकडे पडले । विकाळ खिळ्यांचे बूट !
चुणिदार चोळणा आतां । फाटून होय चिरगूट !
बैसला पठाणी बडगा । बाजूला दूर निमूट !
चिखलांत बुडाले कल्ले !
त्या ओढिति चिल्लेंपिल्लें !
खिसमीस खिशांतिल उरलें
कुणि मारि तयावर डल्ला । 'कादरखां काबुलवाला' १
अफगाण दऱ्यांतिल आतां । डुरकाळ्या फोडिति शेर !
बुरख्यांतुनि कंदाहारी । उठलासे हाहाःकार !
तो शरबत पीतां पीतां । दचकेल मधेंच अमीर !
'क्या हुवा!', ओरडुनि ऐसें । बडवितात सगळे ऊर !
ते हेरतचे अक्रोड
ते बदाम-पिस्ते गोड,
रडरडुनी होती रोड !
अलबुखार अंबुनि गेला । 'कादरखां काबुलवाला' २
तो हिंग काबुली आतां । विकणार यापुढें कोण ?
व्याजास्तव बसुनी दारीं । गरिबांचा घेइल प्राण ?
खाणार कोण या पुढतीं । तीं कलिंगडें कोरून ?
सजवील नूर नयनांचा । कीं सुरमा घालुनि कोण ?
रस्त्यावर मांडुनि खाटा
हुक्क्यासह मारिल बाता—
हिंडेल कोण वा आतां
घालून चमेलीमाळा । 'कादरखां काबुलवाला' ३

करुं नका गलबला अगदीं। झोंपला असे हा वीर !
जन्मांत असा पहिल्यानें। पहुडला शांत गंभीर !
राहणें जितें तरि मागें। व्हा दोन पावलें दूर !
हा बसेल मानगुटीला। ना तरी होउनी पीर !
जा पळा, पंचनाम्याला
तो आला डगलेवाला,
अडकवील कीं साक्षीला,
मग म्हणाल, पुरता भंवला। " कादरखां काबुलवाला "४

केशवकुमार
( झेंडूचीं फुलें )

**प्रश्न व सूचना**

( १ ) मरून पडलेल्या कादरखांचें १० ओळींत शब्दचित्र काढा व जमल्यास वर्णनानुरूप एक चित्र काढा.

( २ ) इकडे येणाऱ्या पठाणांचे उद्योग, त्यांचा पोषाख, त्यांचीं खाद्य-पेयें, त्यांच्या चालीरीती इत्यादिसंबंधीं माहिती द्या.

---

# खडी फोडणारा

[ कवि एका मुलाला बरोबर घेऊन फिरावयास जात असतां त्याला वाटेंत खडी फोडणारे मजूर व त्यांचीं बायका-मुलें दिसलीं. त्यांपैकीं एका मजुराला कवीबरोबर असलेल्या मुलाला पाहून तेवढ्याच वयाच्या आपल्या मेलेल्या मुलाची आठवण होते व तो कवीला सद्गदित अंतःकरणानें त्याच्या मरणाची वगैरे हकीकत सांगतो. शेजारच्या आयाबाया आपलें सांत्वन करण्यास आल्या असतां आपणच उलट त्यांची समजूत कशी घातली हें त्याचे

तोंडून ऐकून कवि आश्चर्यचकित होतो व त्या सर्व दृश्याचा कवीचे मनावर इतका परिणाम होतो कीं त्याच्या स्मृतींत तें कायमचें स्थान मिळवितें.]

(सुनीत)

“ हो दादा !–अगदीं असाच मुलगा !–सांगूं तुम्हां काय ते
लीला मांडिति बालगोप असले मातापित्याभोंवते
कष्टांचे कसलेहि डोंगर पहा नाहीं कधीं भासत
जेव्हां हीं भंवतीं फुलें विकसतीं खेळोनियां हांसत !

राशी ह्या खडिच्या अम्हीं उठवल्या साहोनि वारा-उन
ह्याऐसा, इंसरा असाच चिमणा गेला अम्हां टाकुन !
माझ्याभोंवतिं ह्या जमून सगळ्या आकाश भेदींतशा
बाया सांगत–धीर मींच दिधला–“छे ना रडा गे अशा”

देतांना अपुणांस बाळ पुशिलें नाहीं तयें आपणां
नेला आज गडी तसाच, रडुनी येणार का तो पुन्हा ?
सांगा का दुसरें असे तरि खरें ? दादा ! मला आपण ”
गेलों मी स्तिमितत्व[1] पावुनि मनीं बोलास त्या ऐकुन !

तीं रस्त्यावरचीं जनें गरिबशीं येतीं मनीं भावडीं
अश्रुक्लिन्न[2] गमे अजूनि वदतो तो फोडणारा खडी !

वासुदेव गोविंद मायदेव
(भावतरंग)

**प्रश्न व सूचना**

(१) रस्त्यावर काम करणाऱ्या मजुराचें व तेथील देखाव्याचें १५-२० ओळींत वर्णन करा.

---

१ स्तब्धत्व. २ अश्रूंनीं भिजलेला.

(२) वरील कवितेंमधील खडी फोडणाऱ्यानें आयाबायांचें समाधान कसें केलें हें सांगा. त्यानें केलेलें हें समाधान ऐकून कवी 'स्तिमितत्व' कां पावला ?

---

## कृतज्ञता

[ आईपासून दूर असलेल्या व मृत्यूच्या दारीं पडलेल्या एका मुलाला इस्पितळामध्यें सेविकेनें व डॉक्टरानें फार चांगल्या रीतीनें वागविलें. त्यांच्या उपकाराची फेड आपल्या हातून कसची होणार ह्या विचारानें व आईची आठवण होऊन त्या मुलाची अवस्था काय झाली, तसेंच कृतज्ञता पूर्णपणें व्यक्त करण्यास असमर्थ असलेली त्याची दीन मुद्रा पाहून डॉक्टराच्याहि मनाची काय अवस्था झाली हें पुढील करुणरसात्मक कवितेमध्यें 'गिरीश' ऊर्फ शंकर केशव कानेटकर यांनीं वर्णन केलें आहे. ]

पोर खाटेवर मृत्युच्याच दारा
कुणा गरिबाचा तळमळे बिचारा
दूर आई राहिली कोंकणांत
सेविकेचा आधार एक हात ! ॥ १ ॥

ताप त्यानें भरतांच तडफडावें
पांखरानें एकलें फडफडावें
हळू गोंजारी सेविका दयाळू
डाक्तराचें वच शांतवी कृपाळू ॥ २ ॥

कधीं त्यानें घ्यावें न मुळीं अन्न
कुठें डोळे लावून बसे खिन्न
आणि डाक्तर येतांच गोंजराया
हाय लागे तो घळघळां रडाया ॥ ३ ॥

एक दिन तो व्याकूळ फार झाला
आणि त्यानें पुशिलेंच डाक्तराला—
'अतां दादा मरणार काय मी हो'?
तोंच लागे अश्रुची धार वाहों ॥ ४ ॥

हृदय हलुनी डोळ्यांत उभें पाणी
तरी डाक्तरची वदे करुण वाणी
दोन गोष्टी सांगून धीर देई
पुन्हा गोंजारुन शांतवून जाई ॥ ५ ॥

रात्र अंधारी माजली भयाण
सोसवेना जीवास अतां ताण
हळुच बोलावी बाळ डाक्तराला
तोहि धर्मात्मा धावुनीच आला ॥ ६ ॥

अतां बाळाला टोंचणार तोंच
वदे वासुनि पांखरू दीन चोंच
'नको आतां....उपकार फार झाले !
तुम्हीं—मजला किति....गोड....वागवीलें ॥ ७ ॥

भीत....दादा....मरणास....मुळीं....ना....हीं !
तुम्हीं....आ....ई !' बोलला पुढें नाहीं
झणीं डोळे फिरविले बाळकानें
आणि पुशिलीं लोचनें डाक्तरानें ॥ ८ ॥

'गिरीश'
( कांचनगंगा )

### प्रश्न व सूचना

( १ ) इस्पितळ पाहिलें असल्यास त्यांतील आजाऱ्यांच्या खोलीचें व तेथील व्यवस्थेचें वर्णन करा.

( २ ) [ अ ] या कवितेंत मुलाला गिरीशांनीं पाखराची उपमा अनेकदां दिलेली आहे ती त्या त्या ठिकाणीं कशी सार्थ आहे तें सांगा.

[ आ ] इस्पितळांतील डॉक्टर फार चांगला होता हें गिरीशांनीं कसें दर्शविलें आहे ?

( ३ ) ' तुम्ही....आ...ई ! बोलला पुढें नाहीं.'—तो कां बोलला नाहीं ? बोललाच असता तर काय बोलला असता ?

---

## झालों जरी स्वतंत्र

[ आपणांस स्वतंत्रता मिळाली असतांना आपण कसें असावें, लोकांशीं कसें वागावें, आपलीं ध्येयें काय असावीं यांविषयीं उच्च प्रकारचे विचार रा० नारायण केशव बेहेरे यांनीं पुढील कवितेंत दर्शित केले असून त्यांनीं आपल्या जोरदार व स्फूर्तिदायक वाणीनें सद्भावनांचाहि उत्तम परिपोष केलेला आहे. ]

( चालः—**आनंद कंद ऐसा०** )

झालों जरी स्वतंत्र । सोडूं न ताळतंत्र ॥ ध्रु० ॥

स्वातंत्र्य स्वैर नाहीं
शिस्तींत जन्म घेई
हा हक्क जन्मसिद्ध । आम्ही जगीं स्वतंत्र १

निर्धास्त वाढ व्हाया
लागे अशीच छाया
छाया असून तेज । जीवास देत ओज २

## झालों जरी स्वतंत्र

हें ताट अमृताचें
हा कल्पवृक्ष नाचे
मरणास मृत्यु देई। आशा सुपुष्प होई ३

वृद्धांस पूज्य मानूं
अनुभूति नित्य वानूं
चालू परी स्वतंत्र। सोडूं न ताळतंत्र ४

हा देह रोज झिजवूं
पोटास अन्न मिळवूं
मागूं पित्या न वित्त। श्रम-जीवनीं चरित्र ५

गृहिं द्रव्य सांठलेलें
देशार्थ देउं सगळें
दारिद्र्य—देव—भक्त। आम्ही खरे स्वतंत्र ६

व्यसनांस खोल गाडूं
निर्बंध दुष्ट तोडूं
आनंद सेवण्यांत। सोडूं न ताळतंत्र ७

अन्याय मुळिं न साहूं
सत्यास हार वाहूं
दुष्टांस हाणूं लाथ। आम्ही असूं समर्थ ८

साधेपणा जनाचा
मोठेपणा मनाचा
हा थोर राजपंथ। आम्हां असे पसंत ९

साधेंच अन्न खाऊं
साधेंच वस्त्र लेवूं
दीनां मिळेल अर्थ। देशांत राहि वित्त १०

मराठी ग्रंथ संग्रहालय

बलवंत वीर्यवंत
नयमंत नीतिमंत
होऊं असे महंत । आम्ही खरे स्वतंत्र ११

जन्में कुणीहि असला
कोठें जगांत वसला
भाऊ अम्हां पसंत । त्यजि जो न ताळतंत्र १२

अमुच्या पराक्रमाला
जगिं बांध घालण्याला
नाहीं कुणी समर्थ । आम्ही खरे स्वतंत्र १३

सान्मित्र देव पाठीं
नभ ये म्हणून हातीं
काळावरीच मात । आम्ही करूं जगांत १४

दैत्यांस उद्धरीलें
त्या देवरूप आलें !
मनुजेंच मूर्तिमंत ! होतात देव संत ! १५

विश्वांत राज्य अमुचें
बंधुत्व गोड नाचे !
स्फुरतो मुखांत मंत्र । 'आम्ही जगीं स्वतंत्र' १६

नारायण केशव बेहेरे
( मोत्यांची माळ )

### प्रश्न व सूचना

( १ ) खालील ओळींतील कल्पनांचा विस्तार कराः-

[ अ ] स्वातंत्र्य स्वैर नाहीं !

[ आ ] आशा सुपुष्प होई ।

[ इ ] साधेपणा जनाचा । मोठेपणा मनाचा ।
हा थोर राजपंथ । आम्हां असे पसंत ।

[ ई ] कालावरीच मात । आम्ही करूं जगांत ।

( २ ) "दारिद्र्य-देव-भक्त । आम्ही खरे स्वतंत्र ।" याचा अर्थ सांगून हें ध्येय तुम्हांस कितपत पसंत पडतें हें सकारण सांगा.

( ३ ) भावी स्वतंत्र भारतपुत्राचें ( किंवा भारतकन्येचें ) एक कल्पनाचित्र काढा.

---

## वंदन तुज मायभूमि

[ संजीव नांवाच्या मुलाला कांहीं कारणामुळें लहान गुन्हेगारांना सुधारण्याकरितां काढिलेल्या बन्दीशाळेंत ( Reformatoryमध्यें ) ठेवण्यांत आलें होतें. तेथून तो सुटल्यावर त्याला या देशांत अब्रूनें राहणें अशक्य होऊन तो महायुद्धाच्या काळीं पलटणींत आपलें नांव नोंदवून घेऊन देशत्याग करितो. देशत्याग करतांना त्याला काय वाटलें याचें हृदयस्पर्शी वर्णन कवि 'यशवन्त' ऊर्फ यशवन्त दिनकर पेंढरकर यांनीं लिहिलेल्या 'बन्दीशाळा' नांवाच्या काव्यांतून घेतलेल्या पुढील कवितेंत केलें आहे. ]

( चालः—बहु असोत सुंदर० )

वंदन तुज मायभूमि ! हें अखेरचें
न कळे तव दर्शन कधिं फिरुन व्हायचें !
विसकटली बसवावी फिरुन ती घडी
तव काजीं झिजवावी शक्य तों कुडी

आशेची फोल परि भ्रमुनि वावडी[1]
देशोधडि लागे ही आज बापुडी
आंचवलों जननीच्या सौख्यकारणा
आंचवलों तेंवि तुझ्या क्लेशवारणा
काय म्हणूं परिसमाप्ति ही तुला रुचे ?
वंदन तुज मातृभूमि हें अखेरचें ॥ १ ॥

यश मळलें उजळाया फिरुन त्याप्रती
तळमळलों धडपडलों निशिदिनीं किती
परि भूवरि पाय कुणीं टेकुं ना दिला
काकांचे जेवि थवे भ्रष्टल्या पिला
काडीचा आधारहि मानिला महा
झाली परि फसवणूक नित्य दुस्सहा
मान उंच करुं पाहे कोंवळी कळी
धडगत लागेल तिची केंवि वादळीं
झिडकारुनि दिधलें जें लेंकरूं तुवां
टाकलास ज्याचा तूं तोडुनी दुवा
तरि त्याच्या नच खळती अश्रु नेत्रिंचे
वंदन तुज मातृभूमि हें अखेरचें ॥ २ ॥

मरणाच्या दाढेमधिं चाललों जरी
मरणाच्या भीतिचा न लेशही उरीं
मरणाच्या खाईमधिं आयु कण्ठलें
मरणाचें काय तया बुजगे-बाहुलें[2] ?

---

१ हवेंत उडविण्याचा एक मोठा पतंग. २ बुजगावणें

ग्रीष्माचा दाह काय वाळल्या तृणा ?
राखेला जाळिल का अग्नि तो पुन्हा ?
परि तुझी न भेट मला व्हायची पुढें
ह्या शल्यें हें तुटतें मात्र आंतडें
मिळणार न अन्त्यशयन गे त्वदंकिचें
वंदन तुज मातृभूमि हें अखेरचें ॥ ३ ॥

यशवन्त
( बन्दीशाळा )

## प्रश्न व सूचना

( १ ) देशत्याग करतांना संजीवाचें हृदय हळहळलें तें हालअपेष्टांच्या किंवा मरणाच्या भीतीमुळें, का दुसऱ्या कशामुळें ? त्याला खरें शल्य कशाचें वाटत होतें ?

( २ ) [ अ ] खालील ओळींतील कल्पना स्पष्ट कराः—

१ आंचवलों जननीच्या सौख्यकारणा
आंचवलों तेंवि तुझ्या क्लेशवारणा ।

२ मरणाच्या खाईमधिं आयु कण्ठलें
मरणाचें काय तया बुजगबाहुलें ?

[ आ ] पुढील शब्दांचा अर्थ सांगाः—
आशेची वावडी, देशोधडी लागणें, धडगत लागणें, त्वदंकिंचें अन्त्यशयन.

( ३ ) संजीवाचा कोंवळेपणा व त्यावर आलेल्या प्रसंगाचा कठोरपणा हीं कवीनें कोणत्या दाखल्यांच्या द्वारें दर्शविलीं आहेत हें सांगून हे दाखले कसे समर्पक आहेत हें समजावून सांगा.

# आपली मराठी भाषा

[ आपल्या मराठी भाषेबद्दल जुन्या-नव्या कवींना वाटत असलेलें प्रेम व तिच्याविषयीं वाटत असलेला अभिमान पुढील उताऱ्यांवरून दिसून येईल. ]

माझा मऱ्हाटा चि बोलु कवतिकें ।
परि अमृतातें ही पैजेसीं जींके ।
ऐसीं अक्षरें चि रसिकें । मेळवीन ॥

ज्ञानदेव

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवि । मा[1] प्राकृतीं काय उणीवी ? ।
नवीं जुनीं म्हणावीं । कैसें कथीं सुवर्णसुमनें ॥ १ ॥
कपिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचें काय नीर ? ।
वर्णास्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखें ॥ २ ॥
संस्कृत वाणी देवें केली । प्राकृत काय चोरांपासूनि आली ? ।
असो या अभिमानभुली । वृथा बोली काय काज ? ॥ ३ ॥

एकनाथ

प्राकृत म्हणोनि दूषिती । तेचि या ज्ञाना वंचती[2] ।
भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख कीं ना ? ॥ १ ॥
हातीं देतां नवरत्नें । मऱ्हाटेन बोलें न घेणें ।
आतां हानी तयाकारणें । ते दूरी नसे ॥ २ ॥

दासोपंत

---

१ मग. २ मुकतात.

जैसी पुस्पांमाजी पुस्प मोगरी । कीं परिमळांमाजी कस्तुरी ।
तैसी [1]भासांमाजी साजिरी । मराठिया ॥ १ ॥
पक्षिआंमधे मै[2]ओरू । वृक्षांमधें कल्पतरू ।
भासांमधें मानु थोरू मराठीआ ॥ २ ॥

फादर स्टीफन्स
( क्रिस्तपुराण )

प्राकृत आणि संस्कृत । दोनीमाजी एकचि अर्थ ।
जैसा दोन स्त्रियांचा एक नाथ । दोन्ही हस्त एकाचेचि ॥ १ ॥
अबळांस न कळे संस्कृतवाणी । जैसें आडांतील पाणी ।
परी दोरपात्रांवांचुनी । अशक्त जनीं केंवि निघे ? ॥ २ ॥
तें तडागासि येतां त्वरें । तात्काळचि तृषा हरे ।
भोळे जन तारावया ईश्वरें । प्राकृत ग्रंथ निर्मिले ॥ ३ ॥
संस्कृत इक्षुरस अपार । त्याची प्राकृत हे साखर ।
सुज्ञ जन सुकुमार सेवणार । प्रेमरसीं मिळवूनियां ॥ ४ ॥

श्रीधर

( आर्या )

प्राकृत म्हणोनि नि[3]र्भर हांसतिल अतज्ज्ञ नीच मत्कृतिला
परि जाणशील बा तूं रसिक कविवरा मनीं चमत्कृतिला॥ १ ॥
ग्रंथ प्राकृत दिसतो परि न प्राकृत विलोकितां नीट ।
गोपांत गोप भासे कृष्ण परि नयेचि पाहतां वीट ॥ ॥ २ ॥

१ भाषांमध्यें. २ मयूर. ३ अतिशय.

(श्लोक)

गीर्वाणें राघवाचें यश रसिकजनां लागतें फार मिष्ट ।
तैसें न प्राकृतानें अचतुर म्हणती मानिती तें न शिष्ट ॥
पीतां गोक्षीर कार्तस्वरमाणिचषकें[1] देतसें जेंवि गोडी ।
सारङ्गाला पलाशद्रुम[2]-दल-पुटकें सेवितां ते न सोडी ॥

**मोरोपंत**

म्हणतात जे 'मराठी भाषा होणार ही असे नष्ट;
मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वांचवावया कष्ट ?'
त्यांना हेंच पुसा कीं 'मरणोन्मुख होय आपली माय
म्हणुनी औषध कांहीं पुत्रीं देऊं नये तिला काय ?'

**गं. रा. मोगरे**

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे ।
नसो आज ऐश्वर्य या माउलीला यशाची पुढें थोर आशा असे ।
न मातब्बरी पंचखण्डान्तरीं ती जरी मान्यता पावली इङ्ग्रजी ।
भिकारीण आई जहाली म्हणूनी कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी? १
मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं ।
सहिष्णुत्व अङ्गीं पुरें बाणलेलें हिच्या एक ताटांत आम्ही बसूं ।
हिचे पुत्र आम्ही हिचे पाङ्ग फेडूं वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरीं ।
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं ॥२॥

**माधव त्रिम्बक पटवर्धन**

---

१ सुवर्णमणिपात्र. २ पळस.

# प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

[ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं लिहिलेलें पुढील महाराष्ट्रगीत चालीच्या दृष्टीनें तसेंच अर्थाच्या दृष्टीनेंहि फार चांगलें आहे. मूळ गीतांतील पांच कडव्यांपैकीं फक्त दोनच येथें दिलीं आहेत. ]

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदतीं
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म राजकारण समवेत चालतीं
शक्ति युक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ १ ॥ प्रिय०

गीत मराठ्यांचें तें श्रवणिं मुखिं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरीं ठसो
वचनिं लेखनींहि गिरा आपुली दिसो
सतत महाराष्ट्र—धर्म-मर्म मनिं वसो
देह पडो सत्कारणिं ही असे स्पृहा ॥ २ ॥ प्रिय०

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ....
ता. ....

(श्लोक)

गीर्वाणें राघवाचें यश रसिकजनां लागतें फार मिष्ट ।
तैसें न प्राकृतानें अचतुर म्हणती मानिती तें न शिष्ट ॥
पीतां गोक्षीर कार्तस्वर[1]माणिचषकें देतसें जेंवि गोडी।
सारज्ञाला पलाश[2]द्रुम-दल-पुटकें सेवितां ते न सोडी ॥

**मोरोपंत**

म्हणतात जे 'मराठी भाषा होणार ही असे नष्ट;
मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वांचवावया कष्ट ?'
त्यांना हेंच पुसा कीं 'मरणोन्मुख होय आपली माय
म्हणुनी औषध कांहीं पुत्रीं देऊं नये तिला काय ?'

**गं. रा. मोगरे**

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ती राजभाषा नसे ।
नसो आज ऐश्वर्य या माउलीला यशाची पुढें थोर आशा असे ।
न मातब्बरी पंचखण्डान्तरीं ती जरी मान्यता पावली इङ्ग्रजी ।
भिकारीण आई जहाली म्हणूनी कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी? १
मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं ।
सहिष्णुत्व अङ्गीं पुरें बाणलेलें हिच्या एक ताटांत आम्ही बसूं ।
हिचे पुत्र आम्ही हिचे पाङ्ग फेडूं वसे आमुच्या मात्र हृन्मन्दिरीं ।
जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं ॥२॥

**माधव त्रिम्बक पटवर्धन**

---

१ सुवर्णमणिपात्र. २ पळस.

# प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

[ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं लिहिलेलें पुढील महाराष्ट्रगीत चालीच्या दृष्टीनें तसेंच अर्थाच्या दृष्टीनेंहि फार चांगलें आहे. मूळ गीतांतील पांच कडव्यांपैकीं फक्त दोनच येथें दिलीं आहेत. ]

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदतीं
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म राजकारण समवेत चालतीं
शक्ति युक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ १ ॥ प्रिय०

गीत मराठ्यांचें तें श्रवणिं मुखिं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरीं ठसो
वचनिं लेखनींहि गिरा आपुली दिसो
सतत महाराष्ट्र—धर्म-मर्म मनिं वसो
देह पडो सत्कारणिं ही असे स्पृहा ॥ २ ॥ प्रिय०

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ता.
दि.

# याच लेखकांनीं लिहिलेलीं पुस्तकें

**प्रो० वा. म. जोशी**, एम्. ए., महिलापाठशाला व महिलाश्रम, हिंगणें.

| | | |
|---|---|---|
| * | १ रागिणी ( आवृत्ति ३ री ) | ३—०—० |
| * | २ आश्रमहरिणी ( आवृत्ति ३ री ) | ०—६—० |
| * | ३ नलिनी | २—४—० |
| * | ४ सुशीलेचा देव ( आवृत्ति २ री ) | २—०—० |
| * | ५ नीतिशास्त्रप्रवेश ( आवृत्ति ३ री ) | ४—०—० |
| * | ६ साक्रेटिसाचे संवाद | ३—८—० |
| * | ७ नवपुष्पकरंडक | ०—८—० |
| * | ८ विचारविलास | ३—०—० |
| * | ९ A Gist of the Geeta Rahasya. (प्रती संपल्या) | 0–8–0 |
| | १० वाङ्मयमाला ( पुष्प २ रें )…. … | ( छापत आहे. ) |

**प्रि० ना. म. पटवर्धन**, एम. ए., एल्. टी, अध्यापिकाशाला, हिंगणें.

| | | |
|---|---|---|
| * | १ आमची दिवाळी (आवृत्ति दुसरी) | ०—६—० |
| ‡ | २ जगांतील मौजा | ०—६—० |
| ‡ | ३ जगांतील मुलें | ०—१०—० |
| ‡ | ४ साम्राज्यांतील आपले संबंधी | ०—१०—० |

## हिंगणें येथील अनाथबालिकाश्रम संस्थांमधील इतर लेखक-लेखिकांनीं लिहिलेलीं पुस्तकें

**प्रो० धोंडो केशव कर्वे**, बी. ए., संस्थेचे संस्थापक.

| | | |
|---|---|---|
| * | आत्मवृत्त ( आवृत्ति २ री ) | ३—०—० |

**श्री० पार्वतीबाई आठवले**, अनाथबालिकाश्रम.

| | | |
|---|---|---|
| * | माझी कहाणी | १—०—० |
| | My Story (Translated by Rev. Abbott) | |

**डॉ० कमलाबाई देशपांडे**, बी. ए., पीएच्. डी., महिलापाठशाळा, पुणें.

| | | |
|---|---|---|
| | १ गीत-द्विदल (रा० य. न. केळकर यांचे सहकार्यानें ) | ०—८—० |

**कु० बाळूबाई खरे**, बी. ए., कन्याशाळा, पुणें.

| | | |
|---|---|---|
| * | १ अलंकार-मंजूषा | ३—८—० |
| | २ हिंदु व्यवहार-धर्मशास्त्र (श्री० का. न. केळकर यांचे सहकार्यानें) | ४-०-० |

* ३ रानफुलें ०-४-०

४ स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा ( श्री० का. न. केळकर यांचे सहकार्यानें ) ०-४-०

**कै० गो. म. चिपळूणकर.** एम्. ए., कन्याशाळा, पुणें.

Scientific Basis of Women's Education. Rs. 3-0-0

**प्रो० वा. गो. मायदेव**, एम्. ए., महिलापाठशाळा, पुणें.

* १ तांबे यांची कविता १—८—० *३ गरिबाची गोष्ट ०-८-०

$ २ काव्यमकरंद ०-१०-० ४ अभिनयगीत (लहान मुलांकरितां गाणीं) ०-६-०

**श्री० भा. धों. कर्वे**, बी.एस्सी.,बी.टी.,एम्.एड्.,अध्यापिकाशाला, हिंगणें.

* १ शिक्षणविषयक नवे विचार ३-०-०

२ " मी कसा झालों ? " ०-८-०

**श्री० वि. आ. मोडक**, बी. ए., बी. टी., महिलाश्रम, हिंगणें.

* १ भूगोलावरील कांहीं विचित्र प्राणी १—०-०

‡ २ भूगोलावरील साहसी प्रवासी ०-१०-०

‡ ३ भूगोलावरील वनस्पतींचे प्रदेश ०-१२-०

**श्री० मो. स. मोने**, अध्यापिकाशाला, हिंगणें.

* १ मराठी भाषेचे व्याकरणकार २-०-०

$ २ आपलें बोलणें—व्याकरणाचीं क्रमिक पुस्तकें, भाग १ते४ किंमत अनुक्रमें ३, ४, ५, व ६ आणे

* ६ संक्षित मराठी व्याकरण(व्ह.फा. परीक्षेच्या उजळणीकरितां) ०-४-६

७ पंचवार्तिक ( पं. भीष्माचार्यकृत ) ( महानुभावीय वाङ्मय-जिज्ञासूंकरितां ) ०-४-०

८ मराठी व्याकरण व साहित्य— ( प्रौढ विद्यार्थी व शिक्षक यांजकरितां. ) ( छापत आहे )

हीं सर्व पुस्तकें व्यवस्थापक, पुस्तक-विक्री-खातें, हिंगणें बुद्रुक, पुणें ४ येथें विकत मिळतील.

---

* लायब्ररी व बक्षिसांकरितां मंजूर.

‡ पुरवणीवाचनाकरितां मंजूर.

$ अभ्यास-पुस्तक ( टेक्स्ट ) म्हणून मंजूर.